म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा . वा .
दा. क्र. ९१२१



# झाशीची
# स्वातंत्र्य लक्ष्मी

रा. गो. भिडे.

IRBK-0109121

चित्रशाळा प्रेस - प्रकाशन विभाग - पुणे

IRBK-0109121

# झांशीची स्वातंत्र्य-लक्ष्मी

अ.क्र. २१२१०
वा-मा
१३८९
३१-३-५

लेखक

रामकृष्ण गोपाळ भिडे

सहसंपादक केसरी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९१२१ नों. दि.
वि. का-ना क्र.

एकमेव विक्रेते

चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग, पुणें २

किंमत २॥ रुपये

प्रकाशक
भ. मा. गोसावी
फलटण

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

मुद्रक
ग. म. वीरकर
व्यवस्थापक, राजमुद्रणालय
फलटण

अनुक्रम ............
विभाग ..............
क्रमांक ..........
नों. दि. ........
वाचनालय

भारतीय

स्वातंत्र्य - संपादनार्थ

ज्यांनीं

आपले देह अर्पण केले

त्या हुतात्म्यांच्या चिरस्मृतीस

# सादर समर्पण

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रकरण १ लें, | सिंहावलोकन ... | १ |
| प्रकरण २ रें, | दिल्लीची किल्ली ... | ९ |
| प्रकरण ३ रें, | झांशी व इंग्रज ... | १९ |
| प्रकरण ४ थें, | झांशीचा सुभा ... | २५ |
| प्रकरण ५ वें, | झांशी खालसा केली ... | ३३ |
| प्रकरण ६ वें, | डलहौसीचें धोरण ... | ५४ |
| प्रकरण ७ वें, | कमलवासिनी लक्ष्मी ... | ६२ |
| प्रकरण ८ वें, | स्वातंत्र्ययुद्ध ... | ६९ |
| प्रकरण ९ वें, | झांशी भोंवऱ्यांत सांपडली ! ... | ७८ |
| प्रकरण १० व, | झांशीवर हल्ला ! ... | ८७ |
| प्रकरण ११ वें, | झांशीचा विध्वंस ... | १०२ |
| प्रकरण १२ वें, | झांशीनंतर काल्पी ... | १०८ |
| प्रकरण १३ वें, | ग्वाल्हेरचें युद्ध व अखेर ... | ११७ |
| प्रकरण १४ वें, | पुढील हकीकत ... | १२८ |
| वंशवृक्ष | ... | १३७ |
| राणीसाहेबांबद्दल परस्थांचे उद्गार | ... | १३८ |
| आधारभूत ग्रंथांची यादी | ... | १४० |

॥ श्रीराम ॥

## आभार

देशगौरव सुभाषचंद्र बोस यांनीं आजाद हिंद सैन्यांत महिलांची झांशीच्या महाराणीसाहेबांच्या नांवानें एक पलटण उभारली. त्या निमित्तानें कल्पना आली कीं त्या रणरागिणीचें आपणहि चरित्रगान करावें. त्याप्रमाणें तें लिहून झालें, आणि अकल्पित अडचणी न येत्या तर तें स. १९४६ मध्यें त्यांच्या पुण्यस्मरणदिनींच प्रसिद्ध झालें असतें. पण युद्धजन्य आपत्तींनीं नित्यजीवनावरहि परिणाम झाला आहे; तसाच तो कागद, मुद्रण यावरहि झाला असल्यानें हें प्रसिद्धीकरण लांबलें व उशीरा कां होईना तें आज वाचकांस सादर करतांना आनंद वाटत आहे.

महाराणीसाहेबांचीं मराठींत ३-४ चरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत, त्यांत विशेष अधिकृत चरित्र म्हणजे रा. ब. पारसनीस यांनीं लिहिलेलें, पण तें अलीकडे दुर्मिळ झालें आहे, व तें प्रसिद्ध झाल्यानंतर चरित्र-विषयाची बरीच नवी साधनसामुग्रीहि उपलब्ध झाली आहे. तिचा व इतर साधनांचा भरपूर उपयोग करून हें चरित्र लिहिलें आहे. हें लिहीत असतांना, माझे मित्र प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. **आबा चांदोरकर** यांनीं प्रारंभापासून चरित्र हातानिराळें होईपर्यंत मला आस्थेनें अनेक सूचना केल्या, साधनें पुरविलीं, हस्तलिखित वाचून पाहिलें. त्यांचा आधार मला नसता तर हें चरित्र माझ्यानें पुरें होणें कठीण गेलें असतें. त्याबद्दल त्यांचा मी चिरऋणी आहे. त्याचप्रमाणें—

सागर येथील वकील श्री. **काशीनाथ महादेव टोळे** यांनाहि मी बराच त्रास दिला. त्यांनींहि मला अनेक सूचना करून माहिती दिली; इंदूर येथील माझे स्नेही श्री. **बाबुराव सिन्नरकर**, सराफ, यांनीं मला महाराणीसाहेबांच्या वंशजांची माहिती मिळवून पाठविली याबद्दल मी वरील उभय मित्रांना धन्यवाद देणें माझें कर्तव्य आहे.

पुस्तक लिहून बरेच दिवस झाले, पुण्यास छापण्याचा योग येईना, तेव्हां फलटण येथील राजमुद्रणालयानें माझ्या हांकेस ओ देऊन मला वेळींच साहाय्य केलें, व अत्यंत कळकळीनें छपाईचें काम सुंदरपणें करून दिलें याबद्दल राजमुद्रणालयाच्या चालकांचे आभार मी कोणत्या शब्दांत मानावेत! तसेंच श्री. भ. मा. गोसावी यांनीं प्रकाशनाची जबाबदारी घेतली याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझे मित्र चित्रमयजगत्चे संपादक श्री. त्र्यंबकराव रघुनाथ देवगिरीकर हे विविध स्वरूपाच्या कार्यांत अत्यंत मग्न असतांहि मी विनंति करतांच त्यांनीं या चरित्राला प्रस्तावना दिली, व प्रसिद्ध इतिहाससंशोधक व समर्थभक्त श्री. आबा चांदोरकर यांनीं चरित्राचा पुरस्कार केला याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

—रामकृष्ण गोपाळ भिडे

# पुरस्कार

सूर्य दाखविण्यास काडवातीचा काय उपयोग? तो हास्यास्पद प्रयत्न! त्याचप्रमाणें शक १७७९-८० मध्यें भारतांत झालेल्या स्वातंत्र्यसंगरांत प्रमुखपणें पुढाकार घेणाऱ्या स्वातंत्र्य-लक्ष्मीच्या चरित्रास प्रस्तावना कोण लिहिणार?

तो अधिकार ज्यांनीं स्वातंत्र्याची रणधुमाळी मांडली—खेळली असेल त्यांचा. अद्यापि भारत स्वतंत्र झाला नाहीं. तथापि योग असा कीं, स्वतंत्र भारत निर्माण करण्याचा अचाट व अतर्क्य उद्योग करणाऱ्या एका महापुरुषा—नेताजी—नें आपल्या सैन्यामध्यें राणीसाहेबांच्या नांवाचें "झांशी राणी" पथक निर्माण केलें. तें जिच्या हाताखालीं दिलें तिचेंहि नांव "लक्ष्मी" च!

पण भारत-दुर्दैव अजून संपलें नाहीं. त्या वेळचा तसा या वेळचाहि प्रयत्न तोकडा पडला. कां व कसा पडला हें जाणण्यासाठींसुद्धां असल्या चरित्राची जरूरी असते. याशिवाय अनेक प्रसंग असल्या चरित्रांनीं साधतां येतात.

असलें हें चरित्र लेखकानें लिहून नूतन चाललेल्या एका रोमहर्षण प्रसंगास उजळा दिला! आतांपर्यंत राणीसाहेबांचीं मराठींत २-३ चरित्रें प्रसिद्ध झालीं; त्यांत लक्षांत भरण्यासारखें असें कै. पारसनीस यांचेंच; पण तें विशिष्ट परिस्थितींत लिहिल्यानें त्यांत अत्यंत "सावधानता" राखली गेली. त्या वेळेस तें योग्य होतें. आतां त्या गोष्टीस बरींच वर्षें लोटलीं. कांहीं नवीन पुरावे पुढें आले. आतां "स्पष्टता" जाहीर करण्याची वेळ आली म्हणून लेखकानें आतांपर्यंतचीं एतद्विषयक सर्व साधनें चाळून त्याचा योग्य उपयोग करून सुसंगतपणें व नवीन माहितीची भर घालून हें चरित्र लिहिलें. हें छोटेंसें दिसलें तरी यांत महत्त्वाचे सर्व प्रसंग आलेले आहेत.

चिरकाल नुसत्या धुमसत राहणाऱ्या अर्धवट जळणाऱ्या निखाऱ्यापेक्षां मुहूर्तभरच कां होईना प्रज्वलित झालेली 'बिजली' केव्हांहि श्रेष्ठ! प्रकृतींत पसरलेला घनान्धकार नाहींसा करून ती सत्यसृष्टि दाखविते व शूरांच्या हृदयांत अधिक निर्भयता निर्माण करते. हें चरित्र वाचल्यानें वाचकांच्या मनावर हा परिणाम होईल अशी अपेक्षा करणें अनाठायीं होईल काय?

असें हें चरित्र प्रसिद्ध केल्याबद्दल लेखकाचें अभिनंदन करतों व ज्यास भारत स्वतंत्र व्हावा अशी तळमळ असेल त्यानें याचें पठण करावें अशी विनंति करतों!

पुणें,
ज्येष्ठ व॥ ११, १८६९

—आबा चांदोरकर

१९४७

# प्रस्तावना

अनुक्रम ..........
दि.

"One name stands out above others and is revered still in popular memory, the name of Lakshmi Bai, Rani of Jhansi, a girl of twenty years of age, who died fighting. 'Best and bravest', of the rebel leaders, she was called by the English general who opposed her."

**Pandit Jawaharlal Nehru**
*'Discovery of India', P. 384.*

राणी लक्ष्मीबाई यांचें चरित्र माझे स्नेही श्री. रा. गो. भिडे यांनीं लिहिलें व त्याला प्रस्तावना लिहिण्याचें काम त्यांनीं मजकडे सोपविलें. मी स्वतः या लेखनाला लायक नाहीं ही जाणीव असूनहि श्री. बाबुराव यांच्या लेखनाचा पुरस्कार व अभिनंदन करण्याकरतां मी चार शब्द लिहीत आहे.

श्री. बाबुराव हे इतिहासाचें वाचन शौर्य, पराक्रम वगैरेच्या संशोधना-करतां करीत असतात. प्रस्तुतचें चरित्र हें मराठशाहीवरील त्यांच्या नितान्त प्रेमाचें एक द्योतक आहे.

मराठ्यांच्याबद्दल आदर कोणा महाराष्ट्रीयाला नाहीं? त्या आदरांत कमीअधिक अंशांचा फरक असेल, पण आपल्या पूर्वजांचे पराक्रम आठवतांना धन्यता वाटते व आनंद होतो. राणी लक्ष्मीबाई यांचा पराक्रम हा एक आदराचें व अभिमानाचें स्थान आहे.

मराठशाहींत तीन पराक्रमी स्त्रिया होऊन गेल्या. पहिल्या आनंदीबाई, दुसऱ्या अहल्याबाई व तिसऱ्या लक्ष्मीबाई. या तीनहि स्त्रिया राजघराण्यांत वाढल्या. त्यांतल्या पहिल्या आनंदीबाई, त्यांची बुद्धिमत्ता व कारस्थानी वृत्ती ही मराठ्यांच्या उत्कर्षाला कारणीभूत झाली नाहीं. पण दुष्कृत्यें करावयास सत्कृत्य करावयास लागणाऱ्या धाडसापेक्षां किंवा बुद्धीपेक्षां जास्त धाडस व बुद्धि लागते! अर्थात् त्या धाडसी बुद्धीचा प्रकार निराळा असतो. आनंदीबाईत हे गुण निश्चितपणें होते म्हणून त्यांना एक असामान्य स्त्री म्हणावयास हरकत नाहीं. अहल्याबाई या साध्वी, सत्‌शील व सत्प्रवृत्त होत्या. तशाच त्या मुत्सद्दी व राजकारणीहि होत्या. आदर्श स्त्री म्हणून

त्यांचा आपण गौरव करतों. पण या दोन्ही स्त्रियांपेक्षां लक्ष्मीबाई ह्या निराळ्या होत्या. जगाचें ओझरतें दर्शन घेतात न घेतात तोंच त्यांच्यावर संकटाचे डोंगर कोसळले. २२ वर्षांच्या अल्पकालीन आयुष्यांत आपलें नांव चिरंतन करून ठेवणारी व्यक्ति मराठ्यांच्या इतिहासांत ही एकच आहे. वय व पराक्रम याचा संबंध नसतो हें खरें आहे, पण लहान वयांत पराक्रम क्वचित् आढळतो.

राणी लक्ष्मीबाई या एकंदरींत दुर्दैवीच होत्या. २२ वर्षांच्या वयांत बिजवर नवरा मरतो काय, मुलगा मरतो काय, आणि झांशीचें राज्यहि जातें काय ! पण पारिजातकासारखीं कांहीं फुलें सकाळीं उमलतात, आणि घटका दोन घटकांनीं मलूल होतात, तसें लक्ष्मीबाईचें झालें. एवढ्या लहान वयांत जीवनाचा सारा चित्रपट समाप्त झाला पण तो लोकांच्या स्मरणांत मात्र कायमचा राहिला. लक्ष्मीबाईंना बिजलीची उपमा देतात आणि ती सार्थहि आहे. क्षणभर विद्युत् चमकावी, तशा लक्ष्मीबाई मराठ्यांच्या इतिहासांत पारतंत्र्याचें भुरें, ढग दाटून आले असतां चमकल्या, आणि अदृश्य झाल्या. त्यांच्या तेजाची रेखा मात्र स्मरणांत राहिली.

तो सारा इतिहास दुःखमय आहे. त्या दुःखद इतिहासाच्या पार्श्वभूमीवर लक्ष्मीबाईचें चरित्र उठून दिसतें. त्या इंग्रजांना सामील झाल्या असत्या तर डलहौसीनें झांशीची गादी चालू ठेवली असती. पण अशा मेलेल्या जीवंतपणापेक्षां त्यांनीं आपल्या जीवंतपणाचा होम केला हेंच त्यांचें वैशिष्ट्य. लक्ष्मीबाईचा त्याग मोठा, कां पराक्रम मोठा, कां त्यांचें देशप्रेम मोठें ? त्यांच्या बालवयांत असे कोणते संस्कार त्यांच्या मनावर झाले होते कीं ज्या संस्कारांमुळें त्यांनीं पराक्रम केला ? मराठ्यांचें राज्य पुनः स्थापावें, पेशवाईचें पुनरुज्जीवन करावें, हिंदुस्थान देश गुलामगिरींतून सोडविण्याकरतां इंग्रजांना हांकून द्यावें, बंडवाल्यांची संघटना करावी आणि संघटितरीत्या इंग्रजांशीं मुकाबला करावा, वगैरे विचार त्यांच्यापुढें नव्हते. त्यांना आपली झांशी, आपलें राज्य इंग्रजाकडून जिंकलें जावयास नको होतें. आपल्या नवऱ्यानें मरतांना जें राज्य आपल्या स्वाधीन केलें तें राज्य बुडविण्यास आपण कारणीभूत झालों हा कलंक त्यांना आपल्या नांवाला लागावयास नको होता. झांशीपेक्षांहि पतीवरील त्यांचें प्रेम भव्य, उदात्त

होतें. हिंदु महिलांचें हेंच वैशिष्ट्य असतें. नवऱ्यानें राखलेलें राज्य आपण बुडविलें हा अपवाद त्यांना असह्य झाला. आपल्या राज्यरक्षणाकरतां त्या जीवावर उदार झाल्या. इंग्रजाबद्दलचा त्यांचा त्वेष ह्या जाणीवेंतून निर्माण झाला. त्यांनीं आपल्यापुढें स्वाभिमानाचा प्रश्न ठेवला व त्यावर शक्ति-सर्वस्व वेचलें. लक्ष्मीबाईंच्या पराक्रमाचें वर्णन करतांना आपण त्या पराक्रमाचा निर्झर स्त्रीत्वांतून निर्माण झाला ही गोष्ट विसरतां कामा नये. स्त्रीत्व हें त्या पराक्रमाचें, त्या त्यागाचें व त्या आत्मसमर्पणाचें उत्पत्तिस्थान होतें. तें स्त्रीत्व आदर्श होतें. तें भीरु नव्हतें, तें स्वार्थी नव्हतें, तें सुखाकरितां लालचावलेलें नव्हतें. त्यांत प्रेम होतें, कर्तव्याची प्रखर जाणीव होती. अशा या प्रेममय भावनेवर अधिष्ठित झालेलें कर्तव्य कोणता त्याग कमी लेखील? मला तर वाटतें, लक्ष्मीबाईंच्या मदतीला पराक्रम आला नसता, त्यांना धर्यानें हात दिला नसता तर एखाद्या वीररमणीला शोभेशा ऐश्वर्यानें त्यांनीं आत्मसमर्पण केलें असतें.

आपण लक्ष्मीबाईचा पराक्रम तेवढा वर्णन करतों. त्यापासून स्त्रीपुरुषांनीं स्फूर्ति घ्यावी म्हणतों, आणि शत्रूला नष्ट करण्याकरतां जीवनसर्वस्व अर्पावें म्हणतों. पण असा त्याग, प्रबल भावना व कठोर कर्तव्य निष्ठेशिवाय करतां येत नाहीं. लक्ष्मीबाईपुढें देशाच्या स्वातंत्र्याचा आदर्श नसेल, परदास्यांतून मातृभूमी मुक्त करण्याचें विशाल ध्येय त्यांनीं पुढें मांडलें नसेल; पण त्यांच्यापुढें तितकेंच किंवा त्याहिपेक्षां वर वर्णिलेलें उदात्त ध्येय होतें. जीवनांत कांहीं स्थायी भाव असतात. ते भाव प्रत्येक स्त्रीपुरुषांत असतात; पण ते सुप्त असतात. प्रसंगानें ते फुलतात. राणींच्या आयुष्यांत ते भाव फुलले हेंच त्यांचें वैशिष्ट्य आहे.

माणसाला यश अपयश येणें ह्या गोष्टी परिस्थितीवर अवलंबून असतात. प्रत्येक चांगली गोष्ट यशस्वी होतेच असें नाहीं. त्यामुळें अनेक ध्येयवादी वेडे म्हणून मानले जातात व ते मृत्युमुखीं पडतात. तेव्हां यश हें ध्येयाच्या शुद्धीचें खरें गमक नाहीं. किंबहुना खरा ध्येयवादी हा लौकिक दृष्ट्या अपयशीच होतो. फार थोड्यांच्या नशिबीं खरें यश लिहिलेलें असतें.

१८५७ सालचें युद्ध हें अखेरचेंच बंड होतें. मोगलाई व पेशवाई यांचा शेवटचा श्वास या बंडानें टाकला. तें बंड शिपायांचें होतें व त्याला

कारण धार्मिक होतें असें म्हणतात. पण कारणें कांहीं असलीं तरी जनतेंतील पौरुष जागृत झालें नाहीं व त्या पौरुषानें प्रतिकार केला नाहीं तर कारणें असलीं काय आणि नसलीं काय सारखेंच. शेवटची पौरुषाची धुगधुगी या बंडाच्या रूपानें व्यक्त झाली आणि त्या बंडांत राणी लक्ष्मीबाई यांनीं अतुल पराक्रम केला हें त्या युद्धाचें भूषण आहे. आत्मरक्षणाकरितां प्रतिकार करणें हें तर जीवंतपणाचें लक्षण आहे. मृत माणसें प्रतिकाराऐवजीं पलायन करतात. व्यक्ति अगर समाज जीवंत आहे कां मेलेला आहे हें त्याच्या भेकडपणानें सिद्ध होत नाहीं, त्याच्या प्रतिकारावरून सिद्ध होतें. जीवंत मरणापेक्षां मरून जीवंत रहाणें श्रेष्ठ आहे. राष्ट्राला जीवंत मरण आलें म्हणजे तें राष्ट्र गुलामच रहावयाच्या योग्यतेचें ठरतें. १८५७ च्या युद्धांत हिंदुस्थान मेला नाहीं हें सिद्ध झालें. हिंदी सैनिकांनीं हिंदुस्थान गुलाम रहाणार नाहीं हें आपल्या जीवाचें तर्पण करून सिद्ध केलें !

थोर पुरुषांचीं चरित्रें हीं राष्ट्राच्या वाटचालींत मैलाच्या दगडाप्रमाणें असतात. श्री. भिडे यांनीं लक्ष्मीबाईचें चरित्र लिहिलें आहे; पण तो इतिहासच आहे. नाहीं तरी लक्ष्मीबाईच्या चरित्रांत इतिहासाशिवाय दुसरें काय आहे ? २२ वर्षांच्या वयांत त्यांनीं कांहीं विद्वत्ता संपादन केली नाहीं, ग्रंथ लिहिले नाहींत किंवा ग्रंथ वाचले नाहींत. त्यांनीं जगांत प्रवास केला नव्हता किंवा कला आणि शास्त्रें यांचें अध्ययन केलें नव्हतें. त्यांनीं एकच गोष्ट केली आणि ती इंग्रजांच्याबरोबर शौर्यानें लढण्याची. त्याहि लढ्यांत त्यांना लष्करीविद्येचें शिक्षण मिळालेलें नव्हतें. स्वाभिमान राखण्याकरतां आणि आपल्या घराण्याची गादी सांभाळण्याकरतां त्यांनीं शौर्याची शर्थ केली आणि कसलेल्या व संपन्न अशा इंग्रजांना नकोनकोसें केलें. राणीच्या पराक्रमानें त्यांचेहि डोळे दिपले व त्या बंडांतील सर्व पुढाऱ्यांपेक्षां लक्ष्मीबाई अत्यंत शूर होत्या व श्रेष्ठ होत्या असे उद्गार त्यांनीं काढले !

चरित्रें हीं मनोरंजनाकरतां सहजासहजीं लिहीत नाहींत. समाजांत आदर्श व्यक्ति फारशा नसतात. पण ज्या कांहीं थोडयाशा आदर्श व्यक्ती मधून मधून चमकतात त्या व्यक्तींचीं वर्णनें करणें आणि त्यांचें अनुकरण करण्याची प्रेरणा जनतेंत निर्माण करणें हें चरित्रलेखकांचें उद्दिष्ट असतें. लक्ष्मीबाईच्याप्रमाणें आम्ही हातांत तलवार घेऊन इंग्रजाविरुद्ध लढावयास

जावें असा सांगण्याचा हेतु चरित्रकाराचा नाहीं; पण स्वातंत्र्यरक्षणाकरतां स्वाभिमानाचा होम करतां कामा नये, आणि अशा तुच्छ जीवनापेक्षां मरण हें श्रेष्ठ समजावें हेंच चरित्रकाराला वाचकांच्या मनांत बिंबवावयाचें आहे.

राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपी आणि इतर अनेक शूरवीरांच्या पुण्याईनें आज आपला देश स्वतंत्र होत आहे. पण देश स्वतंत्र झाला कीं तो निर्भय झाला असें नाहीं. स्वतंत्र राष्ट्रांना पारतंत्र्याचें भय सतत असतें. तेव्हां येणाऱ्या उज्ज्वल काळांतील स्वातंत्र्याचें रक्षण आपण प्राणाची पर्वा न करतां केलें पाहिजे. पण तेवढ्यानें भागत नाहीं हेंहि मागील इतिहास सांगतो. ध्येयाशिवाय, संघटनेशिवाय, शस्त्राशिवाय व साधनाशिवाय स्वातंत्र्याचेंहि रक्षण करणें अशक्य आहे. तेव्हां भविष्यकाळांतील आत्मरक्षण हें भूतकाळांतील आत्मरक्षणाइतकें नुसतें भावनानिष्ठ व पराक्रमावर अधिष्ठित झालेलें नाहीं.

आपल्याला पाश्चात्यांचें अनुकरण करावयाचें नाहीं. पाश्चात्य संस्कृतींत हिंसा हें साधन, स्वार्थ हें साध्य आणि भीति किंवा दहशत हीं दुबळेपणा निर्माण करणारीं उपसाधनें आहेत. आपल्याला जगांत निर्भयता आणायची आहे, आजचा स्वार्थ नष्ट करायचा आहे, संस्कृतीचें वर्धन करायचें आहे, आणि मानवी जीवन हें हिंसेच्या बंदिवासांतून मुक्त करावयाचें आहे. तें ध्येय व तो समाज निर्माण करणें हें आपलें कर्तव्य आहे. इतिहासापासून आपण हेच धडे घेतले पाहिजेत!

श्री. भिडे यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक हें चरित्र व चरित्रात्मक इतिहास लिहिला याबद्दल त्यांना धन्यवाद. श्री. भिडे यांची भाषा जोरदार व प्रभावी आहे. त्यांनीं केलेल्या परिश्रमाचें मराठी वाचक सार्थक करतील अशी आशा आहे.

पुणें,
ता. १-७-४७

—त्र्यं. र. देवगिरीकर



झांशीची स्वातंत्र्यलक्ष्मी

# झांशीची स्वातंत्र्यलक्ष्मी

## १ : सिंहावलोकन

उत्तर हिंदुस्थानांत यावनी प्रस्थापित झाली व यवनी सत्तेचा लोंढा दक्षिण भारतावर लोटून स. १३१८ त देवगिरीच्या यादवांची सत्ता संपुष्टांत आली, मुस्लीम सत्तेनें मूळ धरलें; तथापि महाराष्ट्रांतील मराठी सरदार मुस्लीमांच्या सर्वस्वी अंकित कधींहि राहिले नाहींत. ते आपल्या प्रान्तापुरता स्वतंत्रपणें कारभार करीत, वेळप्रसंगीं शेजाऱ्यापाजाऱ्याशीं कुरापती काढीत. अशा रीतीनें आपसांत वैमनस्यें असल्यानें सर्वांनीं एकजूट होऊन दृढमूल होऊं लागलेल्या मुसलमानी सत्तेस प्रतिकार झाला नाहीं; इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं सरदार तर मुस्लीमांचे अंकित होऊन त्यांचे ताबेदार बनले. अशा मराठा सरदारांत खानदेशांत निकम; ठाण्याच्या बाजूला राणे; कोळवणांत कोळी; रामनगरांत राणे; सोनगड व रायरी भागांत तेथील राजे; शिरकाणांत शिरके; खेळणास शंकरदेव, वाडीस सावंत; बेळगांवास कर्णराज; मोरगिरीस मोरे; अशीं लहानमोटीं मराठी घराणीं असून तीं आपणास राजे म्हणवीत व स्वतंत्रपणें कारभार करीत. परंतु वर सांगितल्याप्रमाणें आपसांतील वैमनस्यामुळें त्यांस १४६० च्या सुमारास बहामनी राज्याचे मांडलीक व्हावें लागलें.

देवगिरीच्या यादवांच्या पाडावानंतर विजयनगरांत हिंदूचें प्रबल असें हिंदु साम्राज्य स्थापन झालें व त्यानें मुसलमानी आक्रमणास बराच काळ यशस्वीपणें तोंड दिलें, परंतु दक्षिणेंतील पांचहि मुसलमानी राज्यांनीं एकजूट करून विजयनगरचें साम्राज्य नष्ट केलें आणि तेव्हांपासून हिंदूचें असें स्वतंत्र राज्य दक्षिण भारतांतून अस्तंगत झालें. मध्यंतरीं १४६८ ते ७५ पर्यंत दक्षिणेंत दुर्गादेवी नांवानें प्रसिद्ध असलेला भयंकर दुष्काळ पडला.

त्यापूर्वीं यादवांची सत्ता नष्ट झालीच होती; त्यांतच हा दैवी प्रकोप झाल्यानें हिंदु राजांनीं जी एक विशिष्ट प्रकारची समाजपद्धती रूढ केली होती तीहि नष्ट होऊन गेली. देशांतील अनेक घराणीं उठून उत्तर भागांत निघून गेलीं, देश उजाड झाला. सुप्रसिद्ध दामाजीपंताची कथाहि याच काळांत घडून आली. जुनीं देवस्थानें, वतनें नष्ट झालीं. पुढें अल्लाउद्दीन खिलजीनें देवगिरी बुडविल्यानंतर रयतांकडून नीट वसूल व्हावा म्हणून व उजाड पडलेले गांव पुनः वसाहतीस आणावे म्हणून त्यानें नवीन वतनदार उत्पन्न केले. तालिकोटच्या भयंकर झगड्यांत हिंदूंची एकूणएक समाजव्यवस्था लयास गेली व सर्व परंपरा नष्ट झाली. परचक्र, राज्यक्रान्त्या, अंदाधुंदी या एकसारख्या देशावर आदळूं लागल्यानें देश दैन्यवाणा झाला, पण ही दीनदशा पाहून तत्कालीन विचारी लोकांचे डोळे उघडूं लागले. मुसलमान राज्यकर्त्यांचेंहि हिंदूंच्या मदतीशिवाय चालेना; तेव्हां त्यांनीं घरंदाज मराठे लोकांस मनसबदाऱ्या दिल्या. अशा रीतीनें मध्यंतरीं मोडलेला मराठी वतनदारांचा वर्ग पुनः डोकें वर काढूं लागला. अशा घराण्यास हाताशीं धरून मुसलमान राज्य हाकीत होते. मराठ्यांस संतुष्ट राखण्यास अन्यहि कारण होतें. हे मराठे सरदार स्वतंत्र वृत्तीचे असून आपापली फौज बाळगून होते. त्यांची स्वतंत्र अशी ग्रामसंघटनाहि होती, तीमुळें कोणाहि परस्थाला तेथें बोट शिरकवितां येत नसे. अर्थातच अशा मराठ्यांशीं सामोपचारानें वागणेंच मुस्लीम राज्यकर्त्यांनीं ठरविलें. या मुसलमानी राज्यांत कंबरसेन, अचलोजी जाधव (यादव), संभाजी चिटणीस, पुढें मुरार जगदेव, रायराव, कदमराव, मदनपन्त इत्यादि कर्ते पुरुष उदयास आले.

महाराष्ट्रांतील लोकांचा स्वाभिमान परकीय सत्तेनें दाबून टाकलेला असला तरी तो आंतून सारखा धुमसत मात्र होता, व त्याचा केव्हां तरी उद्रेक व्हावयाचा होता, तो शिवछत्रपतींनीं केला, इतकेंच. परकीय सत्तेविषयीं चीड हा महाराष्ट्रीयांचा एक स्वभावविशेषच आहे. महाराष्ट्रांत मुसलमानी अंमलाखालीं कांहीं वजनदार घराणीं फौजबंद होतीं. त्याशिवाय देशमुखांचीं अनेक घराणीं ठिकठिकाणीं होतीं. देशमुख–देशपांडे हे सरकारी वसुलाचें काम करीत. फलटणचे निंबाळकर, मलवडीकर घाडगे, म्हसवडचे माने, जतचे डफळे, वाडीचे सावंत, सिंदखेडचे जाधव व छत्रपतींचे पूर्वज वेरूळचे

भोंसले हे प्रारंभीं देशमुखीच करीत, व देशमुख हेच खरे वतनदार समजले जात. मुसलमानांनीं आपली सत्ता बसविण्यास सुरवात केली तेव्हां कोकणचे राजे शिर्के होते ते पुढें मुसें खोऱ्यांत शिरकवली येथें गेले. रायरी प्रान्त व जावळी प्रान्त यांचे ताब्यांतून पुढें जावळीच्या चंद्रराव मोऱ्यानें घेतला. तळ-कोकणांत शृंगारपूर येथेंहि सुर्वे सरदार होते त्यांजकडे कांहीं शिर्के गेले. दुसरें मोठें घराणें घाटग्यांचें. नागोजीराव घाटगे हे प्रसिद्ध होते. घोरपडे घराणें हेंहि असेंच प्रसिद्ध घराणें असून त्यांतील सांडूर, मुधोळ, गुत्ती, दत्तवाड हीं घराणीं प्रसिद्ध आहेत. याशिवाय मोहिते, महाडिक, मोरे, सावंत, निंबाळकर, जाधव, भोंसले, इत्यादि कर्तीं मराठे घराणीं होतीं.

छत्रपति शिवाजीमहाराजांनीं पुढें संस्थापित केलेल्या स्वराज्यास ज्या प्रमुख घराण्यांचा मुख्यतः उपयोग झाला तीं हीं घराणीं होत. वस्तुतः शहाजी-राजांनींच या कार्यास आरंभ केला होता. सर्व मराठामंडळ एका कार्यांत संबद्ध करणें हें मोठें महत्त्वाचें कार्य होतें; आणि सुदैवानें तो काळहि मराठ्यांस अनुकूळ असाच होता. कारण दक्षिणेंतील मुसलमानी सत्तेचीं छकलें उडूं लागलीं होतीं व त्या सर्वांचाच ग्रास गिळण्यासाठीं दिल्लीचा मोंगल टपला होता. अर्थात् दोघांच्या भांडणांत आपला हात साधून घेण्याचें मराठ्यांनीं योजिलें तर त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. उत्तरेकडील फौजांची मराठ्यांना भीति मुळींच वाटत नव्हती. कारण महाराष्ट्राची भू-रचनाच अशी आहे कीं तींत मोंगल फौजा विनायासें घुसणें कधींच शक्य नव्हतें. त्यामुळें मोंगलांना रजपुतांवर जसा शह बसवितां आला तसा महाराष्ट्रावर कधींच बसवितां आला नाहीं.

दक्षिणेंतील मुसलमानी सत्तेला उतरती कळा व शहाजीराजांचा उत्कर्ष या गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून घडून आल्या. शहाजीराजे प्रथमतः निजामशाहीचे आधारस्तंभ होते व निजामशाहीमध्यें कर्तुमकर्तुम अशी सत्ता त्यांनीं गाजविली. 'किंग मेकर' ही पदवी त्यांनीं यथार्थतनें शोभविली. निजामशाहीच्या पडितकाळीं तिला सावरून धरण्याचे त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले. निजामशाही बुडाली तर आपल्या सत्तेला वेध लागणार हें ओळखून आदिलशाही दरबारनें शहाजीराजांना उत्तेजनच दिलें. अशा रीतीनें दोन्ही दरबारीं शहाजीराजांचें महत्त्व वाढलें. पुढें निजामशाही मोडली तेव्हां

प्रसंग पडेल तसें वर्तून शहाजीराजांनीं आपलें बल किंचितहि कमी होऊं दिलें नाहीं. निजामशाही मोडतांच आदिलशाहींत हे मनसबदार झाले. या वेळेपासूनच शहाजीराजांनीं आदिलशाहींतील निंबाळकर वगैरे सरदार यांच्याशीं संधान बांधून ठेवलेंच होतें. पुढें मोहिते घराण्याशीं शरीरसंबंध करून तें घराणेंहि आपलेंसें केलें. मोंगलांनीं निजामशाहीशीं व नंतर विजापुराशीं झगडे केले. त्या कालांत शहाजीराजांनीं जे अचाट उद्योग केले, धोरणें बांधलीं, व कर्तृत्व गाजविलें तें सर्व बालशिवाजीसमक्ष घडत गेल्या-कारणानें तो कित्ता पुढें ठेवून शिवाजीनें स्वराज्यसंस्थापनेचें कार्य प्रारंभिलें असें म्हणण्यांत अयथार्थ असें कांहींच नाहीं. शहाजीला त्याच्या सर्व कारभारांत त्याला त्याचेच जातभाई जाधव यांचाच विरोध झाला.

निजामशाहीची वाटणी होऊन जो भाग आदिलशाहाच्या वाटणीस आला त्याची व्यवस्था लावण्यासाठीं मुरार जगदेव यांच्या साह्यास शहाजीस देण्यांत आलें. पुढें रणदुल्लाखानास कर्नाटकप्रान्तीं पाठविलें, त्याचेबरोबरहि शहाजीराजे गेले व श्रीरंगपट्टणवर स्वारी करून कावेरीच्या उत्तरेकडील सर्व मुलूख जिंकून घेतला. याबद्दल शहाजीस कोलार, बंगलूर, उसकोटा, बालापूर व शिरे असे पांच प्रान्त जहागिरीदाखल मिळाले. पुढें रणदुल्लाखान दरबारीं परत गेल्यावर शहाजी हाच विजापूरचा कर्नाटक प्रान्ताचा सर्वाधिकारी झाला. बादशहाकडे ठराविक रक्कम पाठवून बाकी स्वतंत्रपणें सर्व कारभार त्यानें केला. त्यानें कर्नाटकी लोकांस फार ममतेनें वागविलें. जमीनधाऱ्याची सुव्यवस्था लावून दिली. वीर, मुत्सद्दी, पंडित, कलावान लोकांना त्याच्या दरबारीं आश्रय मिळूं लागला व

अरु उत्तर दच्छिन रच्छनको
इत साहजु है उत साहजहाँ ॥

असे उद्गार शहाजीराजांच्या राजवटीबद्दल व त्यांच्या वैभवाबद्दल निघूं लागले. दक्षिणेस शहाजी व उत्तरेस शहाजहाँ, अशी म्हणच त्या वेळीं रूढ झाली होती. शहाजीराजांचें वैभव एकसारखें वाढतच होतें. परंतु स्वतंत्र राज्यसंस्थापना करण्याची त्यांची मनीषा साध्य झाली नाहीं. तें कार्य त्यांनीं शिवाजीराजांकरवीं करविलें. शिवाजीराजांसमोर वडिलांच्या धोरणाचा व कर्तृत्वाचा आदर्श होताच. त्यांतच मातुःश्री जिजाबाई व मार्गदर्शक दादाजी

कोंडदेव यांचे साहाय्यानें शिवरायानें बालपणींच कार्यास प्रारंभ केला. मराठी घराणीं महाराष्ट्रभर विखुरलीं होतीं व प्रायः तीं स्वतंत्रपणें वागत. त्यांना कधीं गोडीनें तर कधीं धाकदपटशानें आपल्या कार्यांत ओढून घेण्याचे शिवाजीराजांनीं मनस्वी प्रयत्न केले. शिवाजी पुणें प्रान्तीं राहत असे व तेथून मावळ प्रान्तींचा बंदोबस्त ठेवी. या मावळांत पुण्याखालीं बारा व जुन्नराखालीं बारा मावळें होतीं. रोहीडखोरें, वेलवंड, मुसें, जोर, कानद, शिवथर, मुठम, पौड, गुंजण, भोर, पवन हीं पुण्याखालील मावळें व जुन्नरखालीं अशींच बारा मावळें होतीं. पुण्याखालील बारा मावळांपैकीं बरींच मावळें आज भोर संस्थानांत समाविष्ट आहेत; व याच मावळांत प्रथमतः स्वराज्य-संस्थापनेच्या कार्यास प्रारंभ झाला. या खोऱ्यांतून क्षत्रिय मराठ्यांचीं बरींच घराणीं असून त्यांचे मदतनीस प्रभु देशपांडे व ब्राह्मण कुलकर्णी असत. यांत जेधे, बांदल, खोपडे, मरळ, पासलकर, सिलीमकर हीं घराणीं सुप्रतिष्ठित होतीं. ते अस्सल क्षत्रिय असून मानापमानाखातर प्राण पणालाहि लावून झुंजत. त्यांच्यांत आपसांत झगडे नेहमींच चालत. शिवाजीनें त्यांच्यांतील हा विस्कळितपणा घालवून दादाजीच्या मदतीनें त्यांना स्वराज्यकामीं लावलें. या कामीं त्याला किती कष्ट, काय यातायाती पडल्या असतील; प्रसंगीं गोड बोलून, तर कधीं धाक दाखवून, तर कधीं धूर्तपणा करूनहि या सर्वांचें ऐक्य साधून त्यांना स्वराज्यसंपादनाच्या कामीं लावलें. ही शिवछत्रपतीची कर्तबगारी केवळ अमूल्य आहे. फळभारानें नम्र झालेल्या वृक्षाचीं फळें खातांना कष्ट पडत नाहींत; पण ज्यानें त्या वृक्षाचें रोपटें लावून त्याला खतपाणी घातलें व त्याची बालपणीं जोपासना केली, त्याचेच परिश्रम खरे वर्णनीय, आणि तें काम छत्रपतींनीं केलें !

छत्रपतींना या कामीं सर्वच स्वजनांनीं साहाय्य केलें नाहीं. जावळीच्या चंद्रराव मोऱ्यासारख्यांनीं सतत विरोधाचेंच धोरण ठेवलें. त्याचा कांटा मार्गांतून काढावा लागला. निंबाळकरासारखा शूर फसगतीनें बाटला गेला, त्यास पुन्हां स्वधर्मांत घेऊन विवाहसंबंधानें आत्मसात् करून घेतला. निंबाळकर घराणें पुरातन. त्यांतील पुरुष वीर, महाराष्ट्रांत त्यांना मानमान्यता मोठी, असें घराणें शिवछत्रपतींनीं केवढी दूरदृष्टि चालवून आपलेंसें करून घेतलें! शिवाजीनें दादाजी नरसू प्रभू देशपांडे, रोहिड खोऱ्याचे देशमुख,

यांसहि मोठ्या शिताफीनें आपणांत ओढलें. त्याचप्रमाणें कान्होजी जेधे देशमुख, बाजी पासलकर यांसारखीं शूर, वजनदार व गुणी माणसें आपलींशीं केलीं व स्वराज्याच्या कामास प्रारंभ केला. शहाजीराजांचे प्रयत्न व जिजाबाई, शिवाजी, दादाजी कोंडदेव, प्रभु देशपांडे, मावळचे देशपांडे, या सर्वांच्या अंतःकरणांत एक विशिष्ट राष्ट्रीय भावना निर्माण होऊन तिच्या योगानें महाराष्ट्रीय वातावरणांत एक नवेंच तेज उत्पन्न झालें, व सन १६४६ च्या सुमारास पुणें जिल्ह्यास वेष्टून शहाजीची जी जहागिरी होती तेवढ्या भागांत एक लहानच पण व्यवस्थित व नमुनेदार, नाममात्र परतंत्र पण वस्तुतः स्वतंत्र असें राज्य निर्माण झालें; व पुढें स्वराज्याचा जो महान् वृक्ष निर्माण झाला त्याचें बीज येथें पेरलें गेलें.

आणि या बीजांतूनच पुढें स्वराज्याचा महान् वृक्ष कसा सिद्ध झाला ही गोष्ट वाचकांस अवगत आहे. विजापूरच्या सत्तेखालील एक मनसबदार, त्यानें क्रमाक्रमानें विजापूर, मोगल यांस शह देऊन महाराष्ट्राचा चक्रवर्ति म्हणून शिवछत्रपतींनीं राज्यारोहण करून घेतला व त्यास प्रबल अशा मोगली सत्तेनें मान्यताहि दिली. छत्रपतींची खरी इच्छा हिंदुस्थानांत हिंदुपदपातशाही स्थापन करणें ही होती, व ती गोष्ट त्यांनीं जयसिंगास लिहिलेल्या पत्रांत अत्यंत उत्कृष्टपणें व्यक्त केली आहे. ते अल्पायुषी झाल्यानें त्यांना आपले मनोरथ पुरे करतां आले नाहींत ही गोष्ट सत्य असली तरी ती त्यांची अंतिम आकांक्षा होती. त्यांचेमागें त्यांच्याच तोलाचा कर्तृत्ववान् पुत्र झाला असता तर मोडकळीस आलेल्या मोगलाईचा केव्हांहि धुव्वा उडाला असता. पण छत्रपति संभाजीराजांकडून ती गोष्ट घडली नाहीं, व छत्रपतींनीं मोठ्या प्रयासानें जोपासलेल्या स्वराज्यतरूवर आघात होऊन तो मुळांतच करपून जातो कीं काय अशी अवस्था निर्माण झाली. परंतु छत्रपतींनीं आपल्या हयातींत मराठ्यांमध्यें जी एक संघटनशक्ति निर्माण केली होती तिनें तो स्वराज्यवृक्ष ढासळूं दिला नाहीं. त्यावर आघात झाले, तथापि 'कीं तोडितां तरु फुटे अणखी भरानें' या न्यायानें हिंदवी स्वराज्याचा वृक्ष वेगानें फोफावूं लागून अल्पावधींतच त्याच्या शीतल छायेंत अखिल भारतवर्ष आराम करूं लागला!

संभाजीराजांच्या वधानंतर मराठामंडळ विस्कळित न होतां तें जास्त

स्नेहबद्ध मात्र झालें व राजाराममहाराजांना अत्यंत दुस्तर परिस्थितींतहि मराठ्यांचा राजा म्हणून वागवून स्वराज्याची जोपासना केली. पुढें शाहूमहाराजांच्या कारकीर्दींत मराठ्यांच्या ध्येयाला व्यक्त स्वरूप येऊं लागलें. शिवछत्रपतींनीं दक्षिणदिग्विजय अगोदरच केला होता. यापुढची दृष्टि उत्तरेवर होती. परंतु थोरल्या महाराजांचें देहावसान झाल्यानंतर कांहीं मुसलमानी सरदार दक्षिणेंत जोरावर येऊं लागले; त्यांचा बंदोबस्त करून त्यांस काबूंत ठेवण्याचें कार्यहि तत्कालिन राज्यकर्त्यांस करावें लागलें. तथापि उत्तरेकडील राजकारणाकडे मराठ्यांचें सर्वथा दुर्लक्ष मात्र झालें नव्हतें. बाळाजी विश्वनाथ यांनीं दिल्लीस चौथाई—सरदेशमुखीच्या सनदा संपादन केल्या होत्या, व त्यांच्या बलावर मराठी फौजा सर्व हिंदुस्थानभर धुडगुस घालूं लागल्या.

बाळाजी विश्वनाथ यानें दिल्लीहून स्वराज्य-चौथाई—सरदेशमुखीच्या सनदा आणल्या, त्या वेळेपासून मराठ्यांच्या उत्तरेकडील राजकारणाचें बीज पेरलें गेलें. त्या सनदांमध्यें दक्षिणेंतील सहा सुभ्यांतून चौथाई वसूल करण्याचा हक्क प्राप्त झाला होता. अर्थात् दिल्लीकडून या सुभ्यावर कोण सुभेदार नेमला जातो याबद्दल पेशव्यांना जागरूक राहणें अगत्याचेंच होतें. कारण सुभेदार अनुकूल असला तर वसूल बिनबोभाट होणार व विरोधी असला तर कटकटी होणार हें ठरल्यासारखेंच होतें, व त्याप्रमाणें झालेंहि. सनदा मिळाल्यानंतर पहिला सुभेदार मुबारीजखान नेमला गेला व तो मराठ्यांना हक्कवसुलीस हरकत करूं लागला. पुढें निजाम सुभेदार झाला तेव्हांहि अशीच कटकट सुरू झाली. पुढें गिरीबहाद्दर सुभा म्हणून आला तोहि मराठ्यांस हरकत करूं लागला, व त्यास दिल्लीदरबारचा पाठिंबा असल्याचेंहि आढळून आलें. तेव्हां ही कटकट कायमची निकालांत काढावी या हेतूनें बाजीरावानें पुणें ते दिल्ली हा मार्गच निष्कंटक करण्याचें ठरवून चिमणाजी आप्पास माळव्यावर पाठविलें; व चिमणाजी आप्पांनीं १७२८ च्या नोव्हेंबरमध्यें आमझरा येथें गिरिधर बहादूर यास गांठून त्याचें सैन्य बुडविलें, व खुद्द गिरीबहाद्दर या युद्धांत ठार झाला. अशा रीतीनें दिल्लीकडे जाणारा राजरस्ता खुला झाला. मराठ्यांच्या या विजयानें दिल्लीदरबार हादरून गेला असला तरी मराठी आक्रमणास विरोध करण्याचा त्यांचा उद्देश चालूच होता. बादशहानें महंमदखान बंगष

याला माळव्याच्या सुभ्यावर पाठविलें व त्यानें पुन: मराठ्यांना व मराठ्यांच्या हितचिंतकांना एकसारखें सतावण्याचें काम सुरू केलें.

यामुळें हा मार्ग निष्कंटक करण्याची संधी लवकरच आलीहि. माळव्याच्या पूर्वोत्तर दिशेला बुंदेलखंड आहे, तेथें पाय रोवतां आला तर पूर्वेकडे काशी-प्रयाग ते बंगालपर्यंत हात पोंहोंचूं शकतो, व पश्चिमेस दिल्लीपर्यंत नजर ठेवतां येते अशी ही भू-रचना आहे. उत्तरेस यमुना नदी, दक्षिणेस नर्मदा, पश्चिमेस बेतवा, यांचा दुआब, पूर्वेला तोंसनदी व बघेलखंड, आणि कैमुर पर्वताची ओळ. या चतु:सीमेंत सामावणारा बुंदेलखंड होय! या बुंदेलखंडाचा अधिपति चंपतराय व त्याचा पुत्र छत्रसाल हे शिवछत्रपतींना समकालीन होते. छत्रसाल हा शिवछत्रपतींना भेटण्यासाठीं मुद्दाम दक्षिणेंत आलाहि होता. त्या वेळीं छत्रपतींनीं त्याला उपदेश केला व हिंदवी स्वराज्याची कल्पना त्याचे अंत:करणांत रुजविली, ही कल्पना छत्रपतींनीं जयसिंगास लिहिलेल्या पत्रांत उत्कृष्टपणें व्यक्त झालेली आहे. 'आम्हीं दक्षिणेंत राहून मुसलमानी सत्तेस आळा घालतों,' तेंच कार्य तुम्हीहि उत्तरेस राहून करा. चोहोंकडून अशी उठावणी झाली म्हणजेच हिंदवी स्वराज्याची संस्थापना होण्यास सुलभ जाईल.' ही कल्पना छत्रसालास पटून त्यानें बुंदेलखंडांत राहून मुसलमानी सत्तेला शह देण्याचा मनस्वी प्रयत्न केला, व प्रसंग पडेल त्याप्रमाणें वर्तून त्यानें राज्यविस्तार केला व आपलें स्वातंत्र्य अबाधित राखलें.

महंमद बंगष याची माळव्याच्या सुभ्यावर नेमणूक होतांच त्यानें मराठ्यांचा चौथाईचा हक्क अमान्य करून बुंदेलखंडावर शिस्त धरली, त्या वेळीं बुंदेलखंडावर छत्रसाल राज्य करीत होता. तो वृद्ध झाला असल्यानें त्याच्यानें मुसलमानी झुंजीस तोंड देतां येईना. तेव्हां त्यानें छत्रपति शिवाजी-महाराज यांचेंच धोरण व नीति यशस्वीपणें पुढें चालवून हिंदुपतपातशाहीचा स्वाभिमानपूर्वक विस्तार करणाऱ्या छत्रपति शाहूमहाराजांचा मुख्य प्रधान बाजीरावसाहेब पेशवे यांस बुंदेलखंडाचें संरक्षण करण्यास येण्याबद्दल आग्रहाची विनंति केली व बाजीरावसाहेबांनीं ती तात्काल मान्य केली. आणि तेव्हांपासून बुंदेलखंडाशीं मराठ्यांचा संबंध येऊन दिल्लीचा मार्ग मोकळा करण्यांत यश मिळालें.

---

# २ : दिल्लीची किल्ली

मागील प्रकरणांत शिवछत्रपतींनीं स्वराज्यसंस्थापना केली व पुढें थोरल्या बाजीरावांनीं उत्तरेकडे आक्रमण केलें व माळवा आणि बुंदेलखंड येथें आपले पाय पक्के रोवून उत्तर हिंद आक्रमणास निर्वेध केली या इतिहासाचें केवळ सिंहावलोकन केलें. शहाजीराजांनीं दक्षिणदिग्विजय केला व सहस्रों महाराष्ट्रीय कुटुंबें आपणाबरोबर नेऊन त्यांची वसाहत त्या सुदूर प्रान्तीं करवली, तीच गोष्ट थोरल्या बाजीराव साहेबाच्या उत्तर-दिग्विजयानें केली व ठायींठायीं आपलीं ठाणीं बसविलीं. त्यासाठीं आपल्या विश्वासाचीं अनेक कुटुंबें त्यांनीं उत्तरेस नेलीं. तीं अद्यापिहि तेथें नान्दत आहेत, पण त्या सर्व प्रपंचाशीं आपणाला कर्तव्य नाहीं. बुंदेलखंडापुरताच आपला विषय मर्यादित असल्यानें त्याबद्दल येथें थोडें निवेदन केलें पाहिजे.

विंध्याचल पर्वताची उत्तर रांग झांशी, बांडा, प्रयाग यांच्या दक्षिणेकडे गेली असून तिची उंची दोन हजार फुटांपेक्षां जास्त नाहीं. या पर्वतांतून उत्तरेकडे बऱ्याच नद्या वाहतात. त्यांत बटवा, धसान, बिरमा, केन, वाघेन, पैशुनी, तान्ता या प्रमुख आहेत. वरील डोंगराच्या टेकड्या व यमुना यांच्यामध्यें अत्यंत काळी जमीन असून तींत गहूं फार चांगला पिकतो. या टापूला 'मार' असें म्हणतात. दऱ्यांच्या अरुंद तोंडावर बांध घालून अनेक तळीं बांधलेलीं या प्रान्तांत जागोजाग आढळतात. महोबाच्या पूर्वेस विजयानगर नांवाचें तळें सर्वांत मोठें आहे.

'बुंदेल' या नांवासंबधीं पुढील आशयाची एक लोककथा रूढ आहे.

"आत्मयज्ञाचा प्रयत्न करणाऱ्या पंचम नांवाच्या एका गहरवाडाचे वंशज ते हे बुंदेले होत. काशीच्या राजघराण्यांत पंचम नांवाचा एक राजा होता. त्याच्या बंधूंनीं त्याला पदभ्रष्ट केलें. तेव्हां तो भटकत भटकत विंध्या-चलावर गेला. तेथें विंध्यवासिनीचें स्थान मोठें जागृत व प्रसिद्ध आहे. तेथें त्यानें उपासना सुरू केली; देवीस प्रसन्न करण्यासाठीं स्वतःचा बळी देण्याचा निश्चय केला व त्यास अनुसरून शरीरावर शस्त्र मारून घेऊं

लागला. ही त्याची भक्ति पाहून देवीनें आपलें रूप प्रकट केलें व त्याच्या हातचें शस्त्र घेऊन 'तुझें राज्य तुला परत मिळेल,' असा आशीर्वाद दिला. त्यानें अंगावर केलेल्या वारांनीं रक्तबिंदु गळत होते. त्याचें स्मरण म्हणून 'बुंदेले' हें नांव त्याच्या वंशजांस पडलें !!"

बुंदेलखंड हें या प्रान्ताचें नांव बुंदेल्यांवरून पडलें असलें तरी ते मूळचें येथील रहिवासी नसून त्यांचें मूळ स्थान राजपुताना होतें. हे गहरवाडाचे वंशज होत अशी समजूत आहे. व असा तर्क आहे कीं चौदाव्या शतकांत त्यांनीं आक्रमणास सुरुवात करून महू, कलिंजर, काल्पी येथें वस्ती केली. पश्चिमेकडे ते जसजसे पसरूं लागले तसतसा मुसलमानांचा व त्यांचा संबंध येऊन उभयतांत घर्षण सुरू झालें. स. १५०७ च्या सुमारास रुद्रप्रताप हा त्यांचा प्रमुख होता व बाबरनें त्याला बुंदेलखंडाचा सुभेदार नेमला. त्याच्या वंशजापासून बुंदेल्यांचीं बहुतेक प्रसिद्ध घराणीं निघालीं. १५४५ मध्यें शीरशहानें बुंदेलखंडावर स्वारी करून कलिंजरला वेढा घातला त्यांत तो मारला गेला. पुढें इस्लामशहानें चंदेलचा राजा कीरतसिंग यास मारून कलिंजर किल्ला हस्तगत केला. पण बुंदेल्यांनीं तो पुनः जिंकून घेतला. अखेर १५६९ त अकबरानें तो आपल्या ताब्यांत घेतला. ओर्छाचा राजा वीरसिंगदेव यानें जहांगीरच्या (सेलिमाच्या) सांगण्यावरून अकबराच्या मर्जींतील अबुलफजल याचा खून करविला. जहांगिराची त्याच्यावर मर्जी होती. परंतु पुढें शहाजहानाविरुद्ध त्यानें युद्ध पुकारलें व त्याच्या राज्यांत लूटमार करूं लागला म्हणून त्याचें सर्व उत्पन्न शहाजहानानें जप्त केलें. त्या वेळीं महोबा येथें चंपतराम राज्य करीत होता तो वीरसिंगदेवास सामील झाला. त्याजवर बादशाही सैन्यानें अनेक हल्ले केले. पुढें त्यानें बादशाही नोकरी पत्करली. औरंगझेबासहि त्यानें साहाय्य केलें. पुढें त्याचा खून झाला तेव्हां त्याच्या गादीवर त्याचा पुत्र छत्रसाल आला.

छत्रसालाचा जन्म १६५० मध्यें झाला. याचें व छत्रपति शिवाजीमहाराज यांच्या चरित्रांत फार साम्य आहे. बुंदेलखंड व महाराष्ट्र यांच्या भू-रचनेंतहि साम्य आहे. महाराष्ट्र जसा पर्वतराजींनीं परिवेष्टित आहे तसाच बुंदेलखंडहि. छत्रपतींच्या अंतःकरणांत स्वधर्म, स्वराज्य-संस्थापनेची तीव्र तळमळ तशीच छत्रसालच्या अंतःकरणांत. छत्रपतींचे गुरु जसे श्रीसमर्थ, त्याचप्रमाणें

छत्रसालाचे गुरुहि प्राणनाथप्रभु हे होते. दोघांनाहि त्यांच्या गुरूकडून स्वराज्यसंस्थापनेसाठीं प्रोत्साहन व उत्तेजन मिळालें. छत्रपतींनीं मोगली सत्तेस तडाखे देण्याचें कार्य दक्षिणेस सुरू केलें, उत्तर हिंदमध्यें छत्रसालहि तेंच कार्य करूं लागला. छत्रसालानें श्रीशिवरायाची ख्याति ऐकून भीमातीरीं त्याची भेट घेतली, तेव्हां शिवाजीनें त्यास हिंदुराज्य स्थापन करण्यास प्रोत्साहन देऊन एक तलवारहि बक्षीस दिली. भूषणकवीनें या भेटीचें वर्णन अत्यंत रसाळ भाषेंत केलें आहे.

छत्रसाल परत बुंदेलखंडांत येतांच त्यानें मुसलमानांशीं झुंजण्याचें आक्रमक धोरण स्वीकारलें. औरंगझेबानें फिदाईखान नांवाचा एक सरदार त्याजवर पाठविला पण त्याचा छत्रसालानें पराभव करून त्यास पिटाळून लावलें. त्याचे पराक्रम दिवसानुदिवस वाढूं लागले, तेव्हां बुंदेलखंडांतील इतर राजेहि छत्रसालाच्या तंत्रानें वागूं लागले. छत्रसालानें अल्पकाळांत सर्व बुंदेलखंड जिंकून घेतला. तेव्हां औरंगझेबानें त्याजवर रणदुल्ला, सदरुद्दीन, तुहव्वर व अन्वर असे चार सेनापति वेगवेगळ्या वेळीं पाठविले, पण त्यांचाहि फडशा छत्रसालानें पाडला! अन्वरखानास तर छत्रसालानें पकडून त्याजकडून भरपूर खंडणी घेतल्यानंतरच त्याची मुक्तता केली. छत्रसाल जिंकला जात नाहीं असें पाहून औरंगझेबानें अखेर त्याच्याशीं मैत्रीचा तह केला. या कामीं छत्रसालाचे गुरु प्राणनाथप्रभु त्यानेंहि मुसलमानांविरुद्ध हिंदूंमध्यें उठावणी करून मोठी जागृति केली. औरंगझेबानंतर बहादुरशहानेंहि छत्रसालाशीं मैत्रीचें धोरण ठेवलें व अनेक प्रसंगीं त्याचें साहाय्यहि घेतलें. छत्रसालाची राजधानी पन्ना येथें होती.

पुढें मराठ्यांनीं उत्तर हिंदवर आक्रमण करण्याचें धोरण ठरवितांच छत्रसाल उघडपणें मराठ्यांचा साहाय्यकर्ता झाला. छत्रसाल अशा रीतीनें डोईजड झाला व तो अगदीं दिल्ली-आग्र्याजवळ म्हणजे घराजवळच असल्यानें त्याची आपण उपेक्षा करणें बरें होणार नाहीं, असें दिल्लीचा बादशहा महमदशहा यानें ठरविलें व त्यानें महमदखान बंगष यास प्रयागजवळ नवी जहागीर देऊन माळव्याचा सुभेदार म्हणून पाठविलें. बंगषाची ही जहागीर छत्रसालाच्या राज्यालगतच असल्यानें उभयतांमध्यें वारंवार कटकटी होऊं लागल्या.

दिल्लीचा रोख धरून राजकारण साधावयाचें हें पहिल्या बाजीरावानें आपलें

राजकीय धोरण आखलें होतें, व तें यशस्वी करावयाचें तर दिल्लीस जाण्याचा मार्ग मोकळा करणें अत्यावश्य होतें. त्या मार्गांत मुख्यतः माळवा हा प्रान्त असून तो मुसलमानांच्या ताब्यांत असल्यानें तो प्रथम जिंकून घेणें हें बाजीरावानें योजलें. मराठ्यांना चौथाईच्या सनदा अगोदरच मिळाल्या होत्या. पण त्याचा वसूल देण्यास माळव्याचे सुभेदार टाळूं लागले. तेव्हां बाजीरावानें चिमाजीअप्पास त्या मोहिमेवर पाठविलें. त्या वेळीं माळव्याच्या सुभ्यावर गिरिधर बहादुर व दयाबहादुर हे दोघे होते. चिमाजीअप्पानें दोघांचा पुरा पराभव करून गिरिधरास ठार केलें. चिमाजीअप्पानें हा अपूर्व असा पराक्रम केला. त्याचें यश मराठमंडळाच्या कानाकोपऱ्यांत दुमदुमलें.

बादशहानें महमदखान बंगषास सुभेदारी दिली. तेव्हां त्यानें आपला मुलगा पीरखान यास छत्रसालावर पाठविलें. त्यास छत्रसालानें ठार करून त्याची फौज बुडविली. तेव्हां बंगषानें आपला दुसरा मुलगा काइमखान यास पुनः छत्रसालावर पाठविलें त्याचाहि छत्रसालानें पराजय करून त्यास पिटाळून लावलें. तेव्हां खुद्द बंगष मोठ्या तयारीनिशीं बुंदेलखंडांत शिरला. छत्रसालानें आपल्या दोन पुत्रांनिशीं मोठ्या निकरानें त्याला तोंड दिलें. पण त्यांत छत्र-सालाचा पराजय होऊन तो जखमी झाला. छत्रसालानें आपणाकडून युद्धाची कसून तयारी केली होती. गोंड, परिहार, जाट यांचें साहाय्य त्यानें मिळवलें होतें. परंतु छत्रसालाच्या दुर्दैवानें त्याचेच भाईबंद ओर्छाचा उदोतसिंग, सेहूड्याचा पृथ्वीसिंग, दतियाचा राय रामचंद्र, चंदेरीचा दुर्जनसिंग आणि मौध्याचा जयसिंग यांनीं बंगषासच साहाय्य दिलें; आणि या घरभेदीपणा-मुळें या वेळीं छत्रसालाला पराभव स्वीकारावा लागला. तेव्हां त्यानें थोरल्या बाजीरावाकडे संधान बांधलें. चिमाजीआप्पा माळव्यांत होतेच. बाजीरावासहि माळव्याचा प्रश्न कायमचा निकालांत काढावयाचा होता. गिरिधर बहादुरचा कांटा निघाला होता. अशाच सुमारास छत्रसालाचा तांतडीचा निरोप बाजीरावास मिळाला.

छत्रसालानें बाजीरावास एक दोहामय पत्र लिहिलें असल्याची आख्यायिका आहे. छत्रसाल हा चांगला कवीहि होता. म्हणून ही दोह्याची कथा त्याला चिकटविण्यांत आली असावी असें दिसतें. हें दोहामय पत्र सुमारें शंभर दोह्यांचें असून त्यांतील आजमितीस फक्त एकच दोहा उपलब्ध

आहे. यावरून असें अनुमान निघतें कीं, छत्रसालानें बाजीरावास आपल्या परिस्थितीचें उत्कट भावनेनें एक पत्र लिहिलें व मदतीची विनंति केली. आणि त्या पत्रांत एक रूपक म्हणून पुढील दोहा घातला तो दोहा असा—

"जो गत ग्राह–गजेंद्रकी सो गत भई है आज।
बाजी जात बुंदेलन्की राखो बाजी लाज॥"

गजेंद्रमोक्षाची कथा भारतवर्षांत सुपरिचित आहे. ती उपमा देऊन म्हणजे बाजीरावाला विष्णूची उपमा देऊन छत्रसाल हा गजेंद्र व बंगष हा नक्र यांच्या तडाख्यांतून बुंदेलखंड मुक्त करून त्याची लाज राख. अशी बाजीरावाची विनवणी केली आहे.

श्री. मा. वि. गुर्जर यांनीं देवास सीनियरचा एक इतिहास लिहिला आहे. त्यांत एक पोवाडा नरू कवीचा दिला आहे, त्यांतहि वरीलप्रमाणेंच विनंति आहे ती अशी—

वृद्ध उमर (छत्रसाल) कैसे बने
लडनो अब ललकार
पेशवाकु अर्जी पेश की,
बाजीराव उबार।
गजको ग्राहन घेरियो
महमद (बंगष) घेऱ्यो मोहि
कृपा प्रभू तापर करे
महिपति तारहु मोहि।

अशा रीतीनें बाजीरावाच्या जणु मनचा हेतु तो छत्रसालानें विनंति-रूपानें मदत मागून सिद्धीस नेण्यास त्यास उद्युक्त केलें. व बाजीरावहि मोठी फौज घेऊन छत्रसालाच्या साहाय्यास धांवून गेला. तेव्हां छत्रसाल बाजीरावास धामोन्यास भेटला व तेथें पुढील आराखडा ठरून शक १६५१ च्या पाडव्याच्या दिवशीं बाजीरावानें महोब्याहून कूच करून तो पंधरा दिवसांनीं जैतापुरास गेला. तेथें बंगष होता. बंगष तेथील गढींत बसला; बाजीरावानें चौफेर चौक्या बसवून बंगषाचा दाणापाणी बंद पाडला. गुरें

मारून खाण्याचा प्रसंग त्यावर आला. तेव्हां त्यानें प्रयागास त्याचा मुलगा काईमखान होता त्यास मदतीसाठीं बोलाविलें. जैतापुराजवळच मराठ्यांनीं काईमखानास अडवून त्याचा धुव्वा उडविला. काईमखानाजवळ तीस हजार फौज होती ती सर्व बुडवून त्याचे तीन हजार घोडे व तेरा हत्ती मराठ्यांना सांपडले.

काईमखानाचा मोड झाला व बंगषाच्या सुटकेची आशा दुरावली. मराठ्यांचा वेढा फार सख्त होता. यासंबंधानें खुद्द बाजीराव ब्रह्मेंद्रस्वामींना लिहितो, 'मोगलाचा अर्गानर्गा केला आहे. दाणागला वैरणकाडी कुलबंद झाली आहे. बंगषाची दुर्दशा उडाली. फौजेचे अत्यंत हाल होऊं लागले तेव्हां त्यानें तहाची याचना केली, व पुनः बुंदेलखंडावर हल्ला करणार नाहीं असा करार करून आपली सुटका करून घेतली.' अशा रीतीनें २३ मे १७२९ ला बंगषप्रकरण निकालीं काढून दक्षिणेकडे जाण्यास बाजीरावानें प्रस्थान ठेविलें.

छत्रसालाला बंगषाच्या तडाक्यांतून मुक्त केल्यानंतर बाजीराव व छत्रसाल पन्ना येथें गेले. तेथें छत्रसालानें मोठा दरबार भरवून त्यास आपला तिसरा पुत्र मानिलें व त्यास दोन–तीन लक्षांचा मुलुख जहागिर म्हणून दिला. भारतवर्षांत 'बुंदेल्याची कैफियत' दिली आहे. तींत छत्रसालानें बाजीरावास ३३ लक्षांचा मुलुख दिला असें म्हटलें आहे त्यासंबंधानें कैफियतींत पुढील हकीकत आहे—

"नंतर राजे पेशव्यास सामोरे येऊन, भेटी होऊन, रावसाहेबांस घेऊन गेले. मजलसी बैठक कचेरीस रावसाहेबास नेल्यावर रावसाहेब बसले नाहींत. उभेच राहिले हें पाहून राजांनीं सांगितलें कीं, 'आपण बसावें'. यांनीं उत्तर केलें कीं, 'आम्हांस बसावयास जागा द्यावी, तेव्हां बसूं.' तेव्हां राजे बोलले कीं, 'तुम्ही चिरंजीवच आहांत.' तेव्हां रावसाहेब यांनीं उत्तर दिलें कीं, 'तुमचे औरस पुत्र दोघे, यांखेरीज चौपन्न पुत्र आणखी आहेत. त्या हिश्शांत जागा आम्हांस दोन लक्षांची मिळणें. आम्ही पंधरा–वीस लाख रुपये खाऊन आज सहा महिने बसलों याचा निकाल न झाल्यास देशीं गेल्यावर महाराज राजे शाहू यांची गैरमर्जी होईल. त्या अर्थीं बसण्यालायख करून द्याल तर बसूं.' तेव्हां राजांनीं उत्तर केलें कीं, 'आमचे दोन चिरंजीव

हिरदेसा व लहान जगतराज; तिसरे तुम्ही बाजीराव. तीन हिस्से करून पूर्वीपासून ज्येष्ठ-कनिष्ठचे हिस्से लागत आले आहेत त्याप्रमाणें करून देऊं.' याप्रमाणें बोलून राजे उठून रावसाहेबांस हातीं धरून जगतराज याचेजवळ बसविलें. नंतर हिस्से राज्याचे छत्रसाल यांनीं करून लेखपट झाले. हिरदेसा वडील पुत्र त्याचा व रावसाहेब यांचा पगबदला झाला. उपरान्त हिस्से रु. ४२ लक्ष हिरदेसा; ३६ लक्ष जगतराज व ३३ लक्ष बाजीराव. ग्रँट डफच्या मताप्रमाणें हा हिस्सा फक्त सव्वादोन लक्षांचा असावा. प्रो. पोतदारहि तसेंच म्हणतात व आपल्या म्हणण्यास त्यांनीं मुधोजी हरी यांच्या पत्राचा दाखला दिला आहे. देवास संस्थानच्या इतिहासांत नरू कवीनेंहि—

नृपछत्रसाल होकर खुशी,
जीवदान तुम मम दियो।
अढायी लाख की उपजको,
परगना एक अर्पण कियो॥

असे उद्गार काढलेले आहेत. बाजीरावास या प्रसंगीं केवढयाचें उत्पन्न मिळालें हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. छत्रसाल व पेशवा यांच्या दोस्तीमुळें मराठ्यांचा पाय बुंदेलखंडांत पक्का रोवला गेला ही गोष्ट मात्र सत्य.

बंगषाचा फडशा पाडल्यानंतर मोगली अंमल मात्र माळव्यांतून उठला. महंमदशाहानें सवाई जयसिंगाला माळव्याची सुभेदारी दिली. जयसिंग हा मराठ्यास खंडणी देतच होता. पुढें निजामला सुभा नेमला पण भोपाळ येथें स. १७३७ मध्यें बाजीरावानें त्याचा पराभव केला, व माळवा पेशव्यास दिल्याच्या कागदावर त्याला सह्या कराव्या लागल्या. परंतु महंमदशहानें आपल्या इभ्रतीसाठीं त्यांत पर्याय काढला. त्यानें आपला शहाजादा अजमशहा याचे नांवें सनदा करून दिल्या व पेशव्याला त्याचा दुय्यम नेमला. अशा रीतीनें मराठे माळव्याचे धनी झाले. सागर, जालवण, झांशी हीं संस्थानें या बुंदेलखंडांतूनच निर्माण झालीं. या स्वारीमुळेंच डिंगणकर, चांदोरकर, खेर, खांडेकर, लघाटे इत्यादि कऱ्हाडी कुटुंबें त्या प्रान्तांत स्थायिक झालीं. खुद्द बाजीराव या स्वारीनंतर बुंदेलखंडांत गेला नाहीं तरी त्याच्या आज्ञेनें बाजी भिवराव प्रभृति सरदार तेथें जात असतच. पुढें बाजीरावांचा काल झाला.

छत्रसालहि कैलासवासी झाला. तोंपर्यंत मराठ्यांनीं आपला सुभा तेथें ठेवला नव्हता. एकादा सरदार जाऊन तेथील थकबाकी घेऊन येई, बाकी व्यवस्था हिरदेसा हाच राखी.

पुढें १७४२ मध्यें मल्हार कृष्ण व राणोजी शिंदे उभयतां वसुलासाठीं तेथें गेले असतां त्यांचा मुक्काम झांशीस होता. तेथें ओर्छेकर बुंदेल्यांनीं रात्रीं आकस्मिकपणें हल्ला करून मल्हार कृष्णाचा खून केला, व मराठ्यांना माघार घ्यावी लागली. तेव्हां पुण्याहून नारो शंकर राजे बहाद्दर यांना पाठविण्यांत आलें. त्यांनीं ओर्छेकर राजास कैद करून ओर्छावर गाढवांचा नांगर फिरविला, व राजास तुरुंगांत कोंडलें. नारो शंकरांनीं तेथील बंदोबस्त उत्तम राखिला. ते १७५६ मध्यें दक्षिणेंत परतले. नंतर महादजीपंत त्या जागीं आले ते १७६० पर्यंत तेथें राहिले. ते दक्षिणेंत गेल्यानंतर बाबुराव कोन्हेर व नंतर विश्वासराव लक्ष्मण हे आले. यांचे कारकीर्दीत मुलखाचा बंदोबस्त नीट राहिला नाहीं. तेव्हां रघुनाथराव हरी नेवाळकर जुन्नरच्या सुभ्यावर होते. ते मोठे शूर होते. त्यांस १७७० मध्यें बुंदेलखंडाचे सुभेदार नेमले. त्यांनीं तेथें जाऊन तेथील बंडावे मोडून शान्तता प्रस्थापित केली. या प्रान्तांत गोसाव्यांनीं बंड केलें होतें, त्यांचा मोड रघुनाथराव हरी यांनीं करून त्यास थोडी जहागीर दिली व पेशव्यांचा अंमल पुनः पूर्ववत् चालू झाला. पुढें पेशव्यांनीं त्यास वंशपरंपरा झांशीची सुभेदारी दिली. रघुनाथराव झांशीचे कायम सुभेदार झाल्यानंतर त्यांनीं बुंदेले राजांच्या बंदोबस्तासाठीं चांगली फौज ठेवून पुंडाव्या करणाऱ्या गोसाव्यांचे आखाडे नोकरीस ठेवले. आखाडे चार होते. त्यांस अनंत, अभान, अखात, व नागा असें म्हणत. प्रत्येक आखाड्यांत एक हजार गोसावी असे व त्यांस दरमहा प्रत्येकीं चार रुपये पगार असे. युद्धाच्या वेळीं त्यांनीं साहाय्य केलें पाहिजे ही अट असे, व लुटींतील निम्मा हिस्सा त्यांचा असे. या गोसावी-सेनेच्या बळावर रघुनाथरावानें बुंदेलखंडांतील तीसबत्तीस संस्थानिकांस आपल्या कह्यांत आणलें होतें. इतकेंच नव्हे तर आपसांतील तंट्याचे वेळीं ते रघुनाथरावाचें साहाय्य घेत. या कामीं त्यांना त्यांचे बंधु लक्ष्मणराव व शिवराम भाऊ यांचें फार साहाय्य असे. या रघुनाथरावांचें आडनांव नेवाळकर असें होतें.

बाजीरावाचा नातू अली बहादुर व गोसावी हिंमत बहादुर यांनींहि बुंदेले राजांचा बंदोबस्त करण्याचा सतत प्रयत्न चालवला होताच. स. १७९० ते १८०२ पर्यंत अलिबहादुरनें कलिंजरचा किल्ला घेण्याचा खूप प्रयत्न केला; अखेरीस त्यांतच तो मरण पावला. सन १८०२ मध्यें वसईचा तह झाला. त्या तहान्वयें बुंदेलखंडाचा कांहीं भाग ब्रिटिशांकडे गेला, परंतु कित्येक मराठा सरदारांनीं हा तह मान्य करण्याचें नाकारलें. अलिबहादुर याचा पुत्र समशेर बहाद्दर दुसरा यानें बुंदेलखंड, बनारस या प्रान्तांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. गोसावी हिंमत बहाद्दर हा ब्रिटिशांस मिळाला व त्या दोघांनीं समशेर बहाद्दरास बटवा नदीपलीकडे घालवून दिलें.

इतर कोणत्याहि प्रान्तांपेक्षां बुंदेलखंडांत आपली सत्ता स्थापन करणें मराठ्यांस कठीण गेलें. बुंदेल्याशीं झगडतांना मराठ्यांस किती त्रास पडला याची यथार्थ कल्पना दिल्ली येथील पेशव्यांचा वकील महादजी गोविंद हिंगणे यानें लिहिलेल्या पत्रांवरून उत्तमपणें येते. (हीं पत्रें राजवाडे खंडाच्या सहाव्या भागांत दिलीं आहेत). ता. १६ एप्रिल १७४४ च्या पत्रांत हिंगणे म्हणतो, "इतके दिवस कितीका शहरींच्या जागा मारल्या व खंडण्याहि घेतल्या. वेगवेगळ्या गर्दीशीं झुंज केलें. ओर्छेकरानें मल्हारकृष्णास दगा करून मारिलें. नागोमहादेव व अंताजीकृष्ण वगैरे दहापांच ब्राह्मण व शें-सवाशें माणूस बारगीर, पौरगे, चाकर नफरकुल कापून काढले, मालमत्ता लुटली. झांशीस वेढा घातला आहे. पर्वतावर धोंडो दत्ताजी आहे, तो तोफा सोडितो. परंतु बाहेरून कुमक पोंचत नाहीं. गोविंदराव सखोजीच्या पत्रांत परिच्छिन्न लिहिलें आहे कीं, मल्हारपंताचा पुत्र च जांवई दोनहि ओर्छांतच होतीं त्यांस जिवें मारलें. कोणाहि राजानें असा घात व दगा श्रीमंतांचे लोकांशीं केला नव्हता ऐसा ओर्च्छेकरानें केला. एका झांशीच्या पर्वतामुळें इतकें झालें. त्याचें पारिपत्य करणार श्रीमंत समर्थ आहेत. मल्हारकृष्ण अर्थेप्राणे लेकरांबाळांसहित स्वामिकार्यावर मारला गेला." ओर्छाच्या राजांची पेशव्यांशीं ही दुस्मनगिरी अगदीं अखेरपर्यन्त कायम होती. झांशीच्या महाराणींनाहि या ओर्छेकरानें मनस्वी त्रास दिला.

पेशव्यांनीं रघुनाथ हरी नेवाळकर याला झांशीच्या सुभेदारीचीं वस्त्रें १७७० मध्यें दिलीं. त्यानें १७९५ पर्यन्त कारभार केला, व नंतर त्यानें आपले बंधु

शिवराम भाऊ यांचे नांवें सुभेदारीचीं वस्त्रें आणवून आपण संन्यास घेऊन काशीवास केला व तेथें जलसमाधी घेतली. शिवरामभाऊहि आपल्या बंधूंच्या तालिमेंत तयार झाले असल्यानें मोठे वीर व मुत्सद्दी होते. ते सुभेदार झाल्यानंतर थोड्याच दिवसांत पुणेंदरबारीं मोठ्या घडामोडी होऊन दुसरे राव बाजी पेशवे झाले. गृहकलहामुळें सर्व सुभ्यांवर त्यांच्यानें योग्य देखरेख ठेववेली नाहीं. ठिकठिकाणचे सुभेदार स्वतंत्रपणें कारभार करूं लागले. तशांतच स. १८०२ मध्यें रावबाजीनें इंग्रजांशीं वसई मुक्कामीं तह करून त्याचें अधिराज्यच मान्य केलें.

झांशीची सुभेदारी रघुनाथराव नेवाळकरास वंशपरंपरेनें दिली होती व तो पेशव्यांचा नोकर होता. त्याप्रमाणें त्यास प्रतिवर्षी आपल्या प्रान्ताचा हिशेब पुणें दरबारीं पाठवावा लागे. पुढें रावबाजीच्या काळांत पुण्यास अंदाधुंदी माजली तेव्हां सुभेदार शिवराम भाऊ यांनीं हिशेब पाठविणें बंद केलें. तेव्हां पेशव्यांचा कैवार घेऊन वेलस्ली, लेक इत्यादि इंग्रज शिपायी मराठे सरदारांशीं कुरापती काढून त्यांना मराठमंडळांतून फोडून काढण्याच्या मार्गाला लागले. याचसाठीं लेक यानें बुंदेलखंडापर्यंत मजल मारिली. परंतु बुंदेले राजे शिवराम भाऊ यांच्या तंत्रानें वागत असल्यानें इंग्रजांना तेथें प्रवेश करणें सहजशक्य नव्हतें. तेव्हां त्यांनीं शिवराम भाऊला फोडण्याचा डाव रचला व ता. १८ नोव्हेंबर १८०३ रोजीं इझलखान नामक एका मुसलमानाच्या मध्यस्थीनें शिवराम भाऊ व इंग्रज यांचा स्नेहदर्शक तह झाला. आणि अशा रीतीनें बुंदेलखंड म्हणजे झांशीचें घराणें व इंग्रज यांचा प्रथम संयोग घडून आला.

२ :

## झांशी व इंग्रज

रघुनाथराव हरी नेवाळकर यांस पेशव्यांनीं झांशीच्या सुभ्यावर नेमलें (१७७०), व त्यानें आपल्यामागून आपला बंधु शिवरामभाऊ यास सुभेदारीचीं वस्त्रें देऊन संन्यास घेतला व जलसमाधी घेतली (१७९६), येथपर्यंत हकीकत मागील प्रकरणीं निवेदन केली.

याच शिवरामभाऊंच्या कारकिर्दींत झांशी व इंग्रज यांचा संबंध आला. स. १८०२ मध्यें रावबाजीनें वसईस तैनाती फौजेबद्दलचा तह करून आपलें व स्वराज्याचें स्वातंत्र्य इंग्रजास विकलें आणि तेव्हांपासून इंग्रजास मराठशाहींत हात घालण्याला एक मोठें प्रभावी अस्त्र सांपडलें व त्यानें त्याचा पुरता उपयोग करून अल्पकाळांतच मराठी सत्ता नामशेष केली. वसईचा तह झाल्यानंतर त्या तहाला कित्येक मराठे सरदार संमति देईनात व बाजीरावाची सत्ताहि जुमानीनात हें कारण पुढें करून इंग्रज सेनापति लेक व वेल्सले यांनीं उत्तर हिंदुस्थानांत मोहीम सुरू करून मराठामंडळ बुडविण्यास सुरुवात केली. त्या क्रमांत स. १८०३ मध्यें बुंदेलखंडांत प्रवेश केला. या वेळीं बुंदेलखंडांत सर्वांत प्रबलसत्ताधारी शिवरामभाऊ हा होता. बुंदेलखंडांतील सर्व संस्थानिक शिवरामभाऊंच्या तंत्रानें वागत. तेव्हां शिवरामभाऊला प्रथम वळवून आपलेकडे घ्यावयाचें असें इंग्रजांनीं योजिलें.

रावबाजी पेशवा झाल्यानंतर पुणें दरबारांत अंदाधुंदी माजली होती. त्यामुळें शिवरामभाऊ पुणें दरबारांत आपल्या सुभ्याचे हिशेब पाठवीनासा झाला होताच. व झांशीचा करभार स्वतंत्रपणेंच तो करूं लागला होता. त्यास हातीं घेण्याच्या कामीं इंग्रजांनीं इझलखान नांवाचा एक वकील मध्यस्थ नेमला व त्याच्या मध्यस्थीनें इंग्रज व शिवरामभाऊ यांच्यामध्यें 'वजीब उल अर्ज' नांवाचा दोस्तीचा तह झाला. शिवरामभाऊच्या साहाय्यानें इंग्रजांनीं बुंदेलखंडावर आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें. पुढें स. १८०४ मध्यें कॅ. बेलीस बुंदेलखंडांत आला, त्या वेळीं शिवरामभाऊ यांनीं इंग्रजांस दिलेला सल्ला सेनापति लेक यांस पसंत पडला. व कठारा येथें इंग्रजकँप पडला असतांना तेथें ता. ६ फेब्रुवारी १८०४ रोजीं इंग्रज व शिवरावभाऊ यांमध्यें पुनः एक

नऊ कलमी तह झाला; त्या तहामुळें परस्पर एकमेकांचे मित्र झाले. संकट-समयीं एकमेकांस साहाय्य करावें, व शिवराम भाऊंनीं इंग्रजांच्या संमतीखेरीज कोणाहि युरोपियन माणसाशीं करार करूं नये अगर त्यास नोकरीस ठेवूं नये असें ठरून शिवरावभाऊंनीं पूर्वीप्रमाणें पेशव्यांस खंडणी देत जावी, इ. करार झाले.

या तहनाम्याप्रमाणें शिवराम भाऊंनीं इंग्रजांस वेळोवेळीं अनेक प्रकारचें उपयुक्त साहाय्य केलें व त्याबद्दल अनेक प्रशंसापूर्वक उल्लेख गव्हर्नर जनरल वेलस्ली यांच्या पत्रांतून आहेत. त्यांतील एका पत्रांत पुढील आशयाचा उल्लेख आहे: "कॅ. बेलीस बुंदेलखंडांत पोहोंचतांच झांशीच्या सुभेदाराकडून त्यांजकडे अशी सूचना आली कीं, यापूर्वी आमचे वरिष्ठ पेशवे होते. त्यांच्याशीं असलेला संबंध आपणांशीं जोडावा, या विनंतीस मान्यता देण्याबद्दल सेनापतीनें कॅ. बेलीस यांस सांगितलें, व त्याप्रमाणें ता. ४ जानेवारी १८०४ रोजीं सुभेदार आमच्या लष्करांत आला व तेथें रीतसर करार करण्यांत आले. तेव्हांपासून झांशीच्या सुभेदाराचें सैन्य बुंदेलखंड व त्याच्या आसपासच्या प्रान्तांत शान्तता राखण्याच्या कामीं आमच्याशीं सहकार्य करीत आहे. सुभेदारानें अशा रीतीनें ब्रिटिशांचें संरक्षण पत्करलें व त्यामुळें त्याचें अनुकरण इतर संस्थानिकहि करूं लागले आहेत." (डिसपॅच गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल टु दि सीक्रेट कमिटी, ता. १२ एप्रिल १८०४).

या रीतीनें शिवराम भाऊनें इंग्रजांवर अनेक प्रकारें उपकार केले. या शिवराम भाऊंनींहि झांशीचा कारभार १८ वर्षे केला. नंतर आपला नातू रामचंद्रराव यास झांशीचे सुभेदार करून ते ब्रह्मावर्त येथें गेले व आपले ज्येष्ठ बंधु रघुनाथराव यांजप्रमाणें सन १८१४ मध्यें जलसमाधी घेतली. शिवराव भाऊंस तीन पुत्र होते. कृष्णाजी, रघुनाथराव व गंगाधरराव. यांतील ज्येष्ठ पुत्र कृष्णराव हे स. १८११ मध्यें वारले होते, त्यामुळें त्यांचा पुत्र रामचंद्रराव हा त्यांचेमागें सुभेदारीवर आला. हे रामचंद्रराव वयानें लहान असल्यानें संस्थानचा कारभार त्यांची आई सखुबाई व दिवाण गोपाळराव हीं पाहात असत. यांचे कारकीर्दीत पेशवाई लयास गेली. पेशवे व इंग्रज यांमध्यें ता. १३ जून स. १८१७ मध्यें एक तह झाला, त्या तहान्वयें बुंदेलखंडाचें स्वामित्व इंग्रजाकडे आलें. त्यांत बुंदेलखंडाला लागू असणारें कलम १३ येणेंप्रमाणें—

"श्रीमंत पंत प्रधान बहादुर या ठरावान्वयें बुंदेलखंडांतील सागर, झांशी व नाना गोविंदराव यांचे स्वाधीन असलेला सर्व प्रदेश, यांवरील व सर्व संस्थानें, जहागिरी इत्यादि संबंधाचे सर्व हक्क ईस्ट इंडिया कंपनीस बहाल करीत आहे." अशा रीतीनें बुंदेलखंडावर इंग्रजांचें स्वामित्व स्थापन होतांच आपला स्वामित्वाचा हक्क प्रस्थापित करण्यासाठीं ईस्ट इंडिया कंपनीनें सुभेदारांशीं १७ नोव्हेंबर १८१७ रोजीं पुनः एक तह केला. सुभेदारांच्या वतीनें गोपाळरावभाऊ व इंग्रजांच्या वतीनें जॉन वॉचॉव यांमध्यें पिप्रीच्या छावणींत नवा दहा कलमी तह झाला. या तहांतील भाषा इंग्रज नीतीची साक्ष उत्कृष्टपणें पटवून देणारी आहे. तो सर्व तह वाचकांनीं वाचण्याजोगा आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें देत आहों:—

ता. १३ जून १८१७ रोजीं पेशव्यांनीं बुंदेलखंडावरील आपले सर्व हक्क ब्रिटिश सरकारास दिले असल्यानें वास्तविक झांशी संस्थान हें नष्टच झालेलें आहे. परंतु कै. सुभेदार शिवरावभाऊ यांचें ब्रिटिश सरकारशीं असलेलें सख्य 'झांशी राज्य माझ्या वंशजाकडे कायम चालवा' अशी त्यांनीं मृत्युसमयीं व्यक्त केलेली इच्छा ध्यानीं घेऊन झांशीराज्य शिवरावभाऊंच्या नातवाच्या वंशाकडे कायम चालविण्याचें ठरविलें आहे. त्याचीं कलमें अशीं—

१. तह राव रामचंद्र व इंग्रज सरकार यांमध्यें.

२. झांशीचे सुभेदार इंग्रजांशीं आतांपर्यंत अत्यंत विश्वासानें वागत आले असल्यानें राव रामचंद्र व त्यांचे पुत्रपौत्रादि वारसाकडे झांशीची रियासत वंशपरंपरागत देण्यांत येत आहे. तिचें संरक्षण ब्रिटिश सरकार करील.

३. झांशी संस्थानशीं कोणाचा वाद उत्पन्न झालाच अगर कोणी त्या प्रान्तावर स्वारी करूं लागला तर झांशीनें इंग्रजाकडे दाद मागावी व त्यांच्या न्यायावर भिस्त ठेवून तसें वागावें.

४. इंग्रजांस लागेल तेव्हां सुभेदारांनीं ससैन्य साहाय्य करावें व त्याचा खर्च सुभ्यांनीं करावा.

५. कसलाहि वाद निर्माण झाला तर ब्रिटिशांचा निर्णय मान्य करण्यांत यावा.

६. आपल्या राज्यांतून कंपनीच्या राज्यांत जाण्यास शत्रुसैन्यास वाट देऊं नये.

७. कंपनीचें सैन्य संस्थानांतून जाईल तेव्हां त्यास अडथळा करूं नये. कंपनीचें सैन्य संस्थानांत तळ देऊन राहिलें किंवा तळासाठीं त्यानें कायम जागा घेतली तरी घेऊं द्यावी, व सैन्यास लागेल तो दाणागोटा द्यावा.

८. कोणाहि परकीयांशीं कसलाहि पत्रव्यवहार कंपनीच्या संमतीखेरीज करूं नये.

९. इंग्रजांच्या शत्रूस रामचंद्ररावानें आश्रय देऊं नये; इ. इ.

सह्या ता. १७ नोव्हेंबर १८१७.

कॅ. बुचॉव. गोपाळराव भाऊ.

या तहांतील कलमें झांशीवाल्यांनीं अत्यंत काटेकोरपणानें पाळलीं. स. १८२५ मध्यें लॉर्ड कोमरमियर यानें भरतपुरास वेढा घातला, तेव्हां पेंढाऱ्यांनीं मोठें बंड उभारलें होतें. तेव्हां त्यांत नाना पंडित म्हणून जालवणच्या गादीवर आपला हक्क सांगण्यास एक इसम उभा राहिला. त्यानें सैन्य जमवून मोठी धामधूम आरंभिली. इंग्रजांशीं युद्ध पुकारून त्यानें त्यांच्या ताब्यांतील कांहीं प्रान्त व काल्पी शहर जिंकून घेतलें. इंग्रजांवर मोठी आपत्ति आली, तेव्हां इंग्रजांनीं राव रामचंद्र यांचें साहाय्य मागितलें. तेव्हां रामचंद्ररावानें ४०० घोडेस्वार, एक हजार पायदळ व दोन तोफा इतकी युद्धसामुग्री मदतीदाखल दिली. या सैन्यानें काल्पी शहर जिंकून घेतलें. बंडखोरांची वाताहात केली. याबद्दल तेव्हांचा गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिंक यानें झांशी येथें मोठा दरबार भरवून मोठ्या कृतज्ञ-भावानें झांशीच्या अधिपतींस महाराजाधिराज व फिदवी बादशहा जानुजा इंग्लिस्तान—(इंग्लंडच्या वैभवशाली राजाचे एकनिष्ठ सेवक) या पदव्या बहाल केल्या! याशिवाय छत्रचामरें, नगारा इत्यादि राजालंकारहि त्यास अर्पण केले. राव रामचंद्र यांनींहि उलट झांशीच्या किल्ल्यावर 'यूनियन जॅक फडकावून' आपली स्वामिभक्ति व्यक्त केली! रामचंद्ररावांनीं २५ वर्षें राज्यकारभार केला. त्यांच्या अज्ञानावस्थेंत त्यांची आई सखूबाई या कारभार पाहात. या बाई मोठ्या रागीट व क्रूर असत. सर्वच राज्याचा

कारभार आपल्या हातीं यावा यासाठीं तिनें आपला पुत्र रामचंद्रराव यास ठार मारण्याचाहि कट केला होता. रामचंद्ररावास पोहोण्याचा फार नाद होता. तो झांशी येथील लक्ष्मी तलावांत नेहमीं पोहोण्यास जाई. ह्या तळ्यांत गुप्त रीतीनें भाले पुरून ठेवले होते असें सांगतात! सुदैवानें रामचंद्ररावाचा एकनिष्ठ नोकर लालु कोदलकर म्हणून होता. रामचंद्रराव पोहोण्यास उडी टाकणार इतक्यांत लालूनें त्यास थोपवून धरून त्याचे प्राण वांचविले. रामचंद्ररावानें लालूस योग्य तें पारितोषिक दिलें, परंतु सखूबाईनें लालूस मारेकरी घालून ठार केलें! रामचंद्ररावांनीं आपल्या मातुश्रीस कसलाहि त्रास दिला नाहीं, परंतु दरबारी मंडळींस ही गोष्ट असह्य होऊन त्यांनीं सखूबाईस कैद करून कठारा येथील किल्ल्यावर आजन्म कैदेंत टाकलें. याबद्दल कर्नल स्लीमन म्हणतो, "झांशीच्या राजांना आतांपर्यंत चांगले नामवन्त कारभारी मिळाले, बुन्देलखंडांतील इतर राजांच्या नशिबीं हें भाग्य नाहीं. केवळ झांशीच्या दरबारींच असे थोर व लायख मुत्सद्दी आढळतात."

रामचन्द्रराव सन १८३५ मध्यें निवर्तले. त्यांस पुत्रसंतति नव्हती म्हणून त्याच्या पत्नीनें सागर प्रान्तांतील मोरेश्वरराव खेर यांचा पुत्र कृष्णराव म्हणून होता त्यांस दत्तक घेतलें. परंतु हें दत्तविधान अशास्त्र असल्याची ओरड होऊन हा वाद ब्रिटिशांकडे गेला व त्यांनीं रामचन्द्र-रावांचे चुलते रघुनाथराव यांस गादीवर बसविलें. हे रघुनाथराव फार व्यसनी असल्यानें त्यांचेभोंवतीं तशाच लोकांचा गराडा पडला, राज्य-कारभाराकडे दुर्लक्ष झालें, उत्पन्न घटलें; संस्थानचा बराच भाग गहाण पडला. तेव्हां स. १८३७ मध्यें ब्रिटिश सरकारनें तेथील कारभार आपल्या हातीं घेऊन सुव्यवस्था लावण्यास प्रारंभ केला. इतक्यांत रघुनाथरावच मयत झाले व गादीबद्दल फिरून वाद निर्माण झाला.

तेव्हां या वादाचा निकाल करण्यासाठीं गव्हर्नर जनरलनें ले. स्पियर्स, ग्वाल्हेरचे रेसिडेन्ट, सायमन फ्रेजर व कॅ. रॉस यांचें कमिशन नेमलें. त्या कमिशननें गंगाधरराव हे शिवरावभाऊंचे पुत्र म्हणून त्यांनाच वारस ठरविलें व झांशी संस्थानास झालेलें कर्ज फिटेपर्यंत राज्याची व्यवस्था ब्रिटिश सरकारनें नेमलेल्या व्यवस्थापकानें पाहावी असें ठरविलें. त्याप्रमाणें

१८४२ मध्यें सर्व कर्ज फिटून संस्थान कर्जमुक्त झालें व ता. २७ डिसेंबर १८४२ मध्यें बुंदेलखंडाचे एजन्ट मि. विलियम हेन्री स्लीमन यांनीं एक नवा तह करून त्यांत २,२७,४५८ रुपयांचा मुलख तैनाती फौजेसाठीं तोडून घेतला व संस्थान गंगाधररावाच्या स्वाधीन केलें. हेच गंगाधरराव आमच्या चरित्रनायिकेचे भ्रतार होत.

---

The gilded Frame of acquisition was complete, it remained only to point out the forms and hues, yet unobliterated, which did not harmonise with the general tone, colouring and perspective of the empire.

Empire in India, P. 359,
by : W. M. Torrence, M. P.

थोरल्या बाजीराव साहेबांनीं उत्तर हिंद आक्रमण करण्याचें ठरविलें, आणि त्यासाठीं पुणें ते दिल्ली हा रस्ता साफ करून माळवा व बुंदेलखंड हे प्रान्त आपल्या कबजांत आणिले; बुंदेलखंडांत रघुनाथराव नेवाळकर याला सुभेदार नेमला व त्याचा नातू गंगाधरराव नेवाळकर त्यास इंग्रजांनीं झांशीचा सुभेदार केलें येथपर्यंतची हकीकत मागील प्रकरणीं कथन केली; यापुढील हकीकत देण्यापूर्वी झांशी प्रान्त व झांशी नगर याचें प्रथम थोडक्यांत वर्णन देऊन आपली चरित्रनायिका इचा या घराण्याशीं कसा संबंध आला हें या प्रकरणांत देऊं.

आज झांशी हा संयुक्त प्रान्तांतील एक जिल्हा असून त्याचें क्षेत्रफळ ३६२८ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस ग्वाल्हेर राज्य व जालन जिल्हा, पूर्वेस धसान नदी, दक्षिणेस ओरछा संस्थान, व पश्चिमेस दतिया, ग्वाल्हेर हीं संस्थानें आहेत. डुकरें, नीलगायी, काळवीट, चितळ, सांबर, लांडगे इत्यादि प्राणी येथें आढळतात. हवा कोरडी व उष्ण आहे. पाऊस सरासरी ३०-३१ इंच पडतो. प्राचीनकाळीं या भागांत परिहार, राजपूत व गोंड यांची वस्ती होती. नवव्या शतकांत महोबा येथील चंदेल उदयास येऊन अकराव्या शतकापर्यंत त्यांनीं राज्यविस्तार बराच केला. त्यांनीं अनेक मंदिरें व तलाव बांधले. ११८२ मध्यें पृथ्वीराजानें चंदेलीचा पराजय केला. पुढें कुतुबुद्दीन व अल्तमश यांनीं या प्रान्तावर स्वाऱ्या केल्या. खंगार नांवाच्या एका वन्य जातीचीहि सत्ता कांहीं भागावर होती व त्यांनींच ओरछा संस्थानांतील करारचा किल्ला बांधला. १३ व १४ व्या शतकांत

बुंदेले प्रामुख्यानें पुढें आले व त्यांनीं खंगारांस हांकून दिलें. या बुंदेल्यांपैकींच रुद्रप्रताप यांची सत्ता बाबरानें मान्य केली होती. रुद्रप्रतापाचा पुत्र भारतीचंद्र यानें ओरछा नगर वसविलें. पुढें बुंदेले बळावत गेले व मोगलांचे नि त्यांचे खटके उडूं लागले. सतराव्या शतकाच्या प्रारंभीं ओरछा संस्थानचा राजा वीरसिंगदेव यानें झांशीचा किल्ला बांधला. पुढें मराठे व बुंदेले यांचा संबंध कसा आला हें मागें निवेदन केलेंच आहे.

पुढें मराठ्यांच्या ताब्यांत हा प्रान्त आल्यानंतर सुभेदार नारो शंकर यानें झांशीचा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला व तेथेंच वास्तव्य केलें; आणि या किल्ल्यास लागूनच नवें नगर झांशी म्हणून वसविलें. पूर्वी किल्ल्याच्या जागीं बळवन्तनगर म्हणून एक गांव होता. झांशी नगर नव्यानें वसविल्याकारणानें तेथें वस्ती नव्हती, तेव्हां नारो शंकरानें वोडसा (ओरछा) येथून लोकांना सक्तीनें आणून त्यांची वस्ती करविली व दक्षिणेंतूनहि बरींच कुटुंबें आणवून तेथील वस्ती वाढविली. माळवा व दिल्ली या हमरस्त्यावर हें नगर असल्यानें अल्पावधींतच तेथील व्यापारउदीम चांगलाच वाढला, व तें नगर सधन आणि समृद्ध झालें.

झांशीच्या किल्ल्याचें वर्णन 'माझा प्रवास' या पुस्तकांत श्री. विष्णुभट गोडशे यांनीं १८५७ मध्यें बंडाच्या धामधुमींत ते तेथें असतांना समक्ष पाहून पुढीलप्रमाणें केलें आहे:

"हें शहर फार सुरेख व टुमदार आहे. तेथील किल्ला मोठा बळकट असून तो नगराच्या पश्चिम बाजूस लहान डोंगरावर बांधलेला आहे. पायथ्याशीं सभोंवार रुंद व खोल खंदक पाण्यानें भरलेला असून एकाच बाजूनें आंत जाण्यास रस्ता आहे. डोंगराच्या माथ्यावर वीस फूट उंचीचा चुनेगच्ची तट असून त्यांत चार हजार माणसें राहतील इतकी जागा आहे. किल्ल्याचा गरगंज नांवाचा बुरूज ८० हात औरस चौरस असून तो १२५ हात उंचीचा आहे. त्यावर चार तोफा व संस्थानचें निशाण आहे. किल्ल्यांत एकंदर ५१ तोफा होत्या. पाण्याचीं टाकीं तर पुष्कळच होतीं. तोफांत कडकबिजली, भवानीशंकर इत्यादि प्रसिद्ध तोफा होत्या. मुख्य वाडा पांच मजली व आठ चौकी असून सभोंवतीं निरनिराळ्या कामाच्या इमारती होत्या. वाड्याच्या पश्चिमेंत कवायतीची जागा होती, व

तेथें त्रिचांचें बनहि मोठें होतें. तटाच्या बुरुजाखालीं मोठालीं भुयारें असून त्यांतून दारुगोळा भरून ठेवीत. मुख्य वाड्याचें काम फार सुरेख मजबूत होतें व तो वाडाहि फार विस्तीर्ण होता. वाड्याच्या दक्षिण बाजूच, बंगला फार उंच व सात मजली होता. उत्तरेकडे एक पाण्याचा हौद होता व त्यांत पाणी विपुल होतें. याच जागेंत एक विस्तीर्ण व रमणीय बाग असून तींत एक बंगला होता, त्यास शंकर बंगला म्हणत.

“ किल्ल्याच्या नैर्ऋत्य कोनापासून दक्षिण बाजूनें पूर्वेकडे व वायव्य कोनापासून उत्तर बाजूनें पश्चिमेकडे असा शहराचा ४॥ मैल घेराचा कोट असून तोहि उंच, रुंद व मजबूत असून जागोजाग बुरुज होते. अंबारीसह हत्ती जाण्याचे पांच दरवाजे होते. बाकी लहान दरवाजे अनेक होते. किल्ल्याच्या पूर्वेस कोटाच्या आंत बरेंच मैदान टाकून शहरास प्रारंभ झाला असून शहराची वस्ती दाट व रस्तेहि अरुंद होते. मात्र कोष्टीपुरा व हलवाईपुरा वगैरे कांहीं मुख्य मुख्य भाग उंच उंच हवेल्यांनीं भरलेले असून ते सुरेख होते. शहराच्या मध्यभागीं भिड्यांचा मोठा बाग असून त्यांत पांचसहा विहिरी आहेत. याशिवाय शहरांत लहानसान अनेक बागा आहेत. शहरांतील मुख्य सरकारी वाडा चार चौकी असून त्याचें कामहि प्रेक्षणीय आहे. शहराच्या दक्षिण दरवाजाबाहेर एक मोठा तलाव असून त्यांत महालक्ष्मीचें एक टोलेजंग सुंदर मंदिर होतें. ही देवी झांशीची कुलस्वामिनी असल्यानें देवस्थानाचा नंदादीप, पूजा, चौघडा वगैरेचा बंदोबस्त फार मोठ्या खर्चाचा ठेवला होता. आषाढापासून तों चैत्रापर्यंत देवीस जाणें तें होडींतून जावें लागे. शहरची रीत चांगली होती. लोकहि श्रीमान, उद्योगी व कसबी होते. गालिचे, रेशमी वस्त्रें, व पितळी सामान या शहरासारखें दुसरें कोठें होत नव्हतें. तसेंच कागदावर चित्रें काढण्याचेंहि काम येथें अप्रतिम होत असे.”

झांशीचे सुभेदार नेवाळकर यांचें घराणें मूळ कोंकणांतील. तेथें मौजे कोट तर्फ पावस, सुभा राजापूर हें त्यांचें मूळ ग्राम. या गांवचे ते अष्टाधिकारी. पेशवाईच्या आरंभास कोंकणांतून अनेक घराणीं देशावर आलीं त्याचप्रमाणें हे नेवाळकर रघुनाथराव धुळें जिल्ह्यांतील साक्री तालुक्यापैकीं बहादरपुर येथें येऊन राहिले. त्यांस दोन पुत्र, खंडेराव व दामोदरराव. यांची स्थिति गरीबीची होती. पुढें त्या दोन मुलांस संतति झाली. तेव्हां बहादुर-

पुन्यासारख्या गांवीं राहून निभणार नाहीं असें ठरवून व त्या काळीं, कर्तब-गार माणसाला कार्यक्षेत्रहि विपुल असल्याकारणानें ते तेथून निघाले. दामोदररावास राघोपन्त, सदाशिवपन्त व हरिपन्त असे तीन पुत्र. यांनीं माळव्याचे सुभेदार मल्हारराव होळकर यांचेकडे जाऊन त्यांची मर्जी संपादन केली, व त्यांजकडून खानदेशांतील चोखड-चोपडें परगणा येथील व अहमदाबाद प्रान्तांतील कांहीं परगण्यांच्या मामलती मिळविल्या व चांगला लौकिक संपादन केला. होळकरांच्या फौजेंत सरदारकीहि केली. या वेळीं त्यांना पारोळें गांवची जहागीर मिळाली.

रघुनाथपंत युद्धांत कामास आले. हरीपन्ताचा वडील मुलगा लक्ष्मण हा पारोळ्यास असे व खुद्द हरीपंत आपला दुसरा मुलगा रघुनाथ यासह पेशव्यांच्या फौजेंत नोकरी करीत. या रघुनाथरावांवर पेशव्यांची फार मर्जी असे. तो जुन्नरच्या सुभ्यावर होता, तेथून त्यास बुंदेलखंडांतील बंडाळी मोडण्यासाठीं ( १७७० ) पेशव्यांनीं पाठवून तेथील सुभेदारी कायमची दिली हा वृत्तान्त मागें आलाच आहे.

अशा प्रकारच्या सुंदर व संपन्न राज्याचे अधिपति महाराज गंगाधरराव हे झाले. त्यांना संस्थानची मुखत्यारी मिळाली तेव्हां संस्थानचें सर्व कर्ज फिटून गेलें असून एकंदर व्यवस्था चांगली लागलेली होती. श्री. गंगाधरराव बाबासाहेब यांना गादीवर बसविलें तेव्हां त्यांच्या राज्याचा बंदोबस्त करण्या-साठीं त्यांच्याच राज्यांतून २,२७,४५८ रुपयांचा मुलख ब्रिटिशांनीं तोडून घेतला! तथापि गंगाधरराव यांनींहि एक ठराव करून घेऊन दोन पलटणी व दोन तोफखाने आपल्या तैनातीस ठेविले. अधिकार मिळाला तेव्हां संस्थानची तीस लक्ष रुपये शिल्लकहि त्यांचे स्वाधीन करण्यांत आली.

गंगाधरराव गादीवर येतांच त्यांनीं प्रजानुरंजनाकडे योग्य तें अवधान दिलें. सर्व कामांची पाहाणी करून सर्वत्र लायख व दक्ष कामगार नेमले. दिवाणगिरीवर राघो रामचंद्र संत नांवाच्या हुशार गृहस्थाची नेमणूक केली व दरबार वकील म्हणून नरसिंहराव कृष्ण यांना नेमलें. अदालतीवर नाना भोपटकर यांची नेमणूक केली. दंगेखोर ठाकूर व बुंदेले यांचा चांगला बंदोबस्त केला. सर्वत्र शान्तता होऊन प्रजा सुखी झाली.

गंगाधरराव हे फार हौशी असून झांशीचें नष्ट झालेलें वैभव पुनः

प्राप्त व्हावें यासाठीं त्यांनीं फार प्रयास केले. संस्थानच्या खजिन्याची स्थिति सुधारली. रत्नभांडार भरून तींत राजलक्ष्मीचा वास होऊं लागला. महाराजांस हत्ती-घोडे यांचा फार नाद होता. त्यांनीं सुमारें २२ हत्ती बाळगले होते. त्यांत सिद्धबक्ष नांवाचा एक सुंदर गजराज होता. त्याचे सर्व अलंकार सुवर्ण-रत्नांचे केले होते. इतरहि हत्ती-घोड्यांचें सर्व सामान सुवर्णाचें व चांदीचें केलें असून अंबाऱ्या, रथ हीं सुवर्ण व रत्नें यांनीं जडविलेलीं होतीं. त्यांनीं काशी येथून एक मेणा कुशल कारागिराकडून तयार करवून आणिला होता. त्याचें नक्षीकाम सर्व सुवर्णमय असून त्या नमुन्याचा मेणा दुसऱ्या कोणत्याहि संस्थानिकापाशीं नव्हता, असा त्या वेळीं लौकिक होता. त्यांचा लवाजमा मोठा व शिबंदी कुशल होती. खुद्द संस्थानची व ठाकूर लोकांजवळील फौज ५००० होती. ५०० घोड्यांचा रिसाला असून खास घोडीं १०० होतीं. तोफखाने चार होते. यावरून त्यांच्या तत्कालीन वैभवाची कल्पना येईल.

गंगाधरराव स्वभावानें दयाळू असले तरी शिस्तीचे अत्यंत भोक्ते होते. त्यामुळें नोकरांस चांगलीच जरब असे. ठरलेलीं कामें त्या त्या वेळीं झालींच पाहिजेत यावर त्यांचा कटाक्ष होता. जरा विलंब झाला तर स्वतः शासन करीत. गोऱ्या लोकांतहि इभ्रतीनें वागत. याबद्दल एक आख्यायिका आहे कीं, एकदां दसरा रविवारीं पडला. कॉन्टिन्जन्ट फौज ठरल्या वेळीं मिरवणुकींत यावयाची ती आली नाहीं. चौकशी करतां 'रविवारीं आम्हीं कमर कशीत नाहीं' असें गोऱ्या अधिकाऱ्यांकडून उत्तर आलें. तें ऐकतांच त्याजला कळविलें कीं, माझे मुलाजमकी तनख्याबद्दल मुलुख दिला. तेव्हां ठरावाप्रमाणें फौजेसह यावें नाहींपेक्षां आजचे मुहूर्तानें मुलुखावर जप्ती पाठवितों. असें बोलून हत्तीवर बसून हत्ती उभा ठेवला. तेव्हां सैन्याधिकाऱ्यास निमूटपणें सैन्यासह यावें लागलें.

ओरछा, दतिया, सीमथर, चरखारी, पन्ना, छत्रपूर वगैरे संस्थानिकांतहि त्यांचें मोठें वजन असून बुंदेले राजे त्यांना 'काका' म्हणत, व तसा त्यांना मान देत. ते १८५० मध्यें काशीयात्रेस गेले असतां त्यांचा योग्य तो बंदोबस्त व मान राखण्याबद्दल ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांस गव्हर्नर-जनरलनें हुकूम पाठविले होते, यावरूनहि त्यांना ब्रिटिश अधिकारी कसे नमून वागत याची कल्पना येईल.

गंगाधरराव यांची प्रथम पत्नी रमाबाई या याच सुमारास कैलासवासी झाल्या. तेव्हां गंगाधररावांनीं द्वितीय संबंध करण्याचें ठरवून वधु-निरीक्षणाच्या कार्यास सुरुवात केली, व त्यांचा विवाह रणगाजी महाराणी लक्ष्मीबाई यांशीं झाला तो इतिहास असा :—

वांई येथें कृष्णराव तांबे नांवाचा कऱ्हाडा ब्राह्मण राहात असे. त्याचा मुलगा बळवंतराव यास पेशव्यांच्या हुजुरातींत सरदारी होती. या तांब्यांप्रमाणें खेर-गोविंदपंत खेर-बुंदेले हेहि वांईजवळील बावधन गांवचे रहिवाशी. हा बावधन गांव आज सातारचे महाराज यांच्या इनाम गांवांत आहे. त्या वेळीं अनेक घराणीं स्वतःच्या मर्दुमकीवर उदयास आलीं, त्यांतच खेर यांचें घराणें उदयास आलें. खेर व तांबे हीं दोन्ही घराणीं समकालीन असून उभयतांहि एकदमच पेशव्यांच्या नोकरींत शिरलीं.

बळवंतराव तांबे हे पेशवाईअखेर हुजुरातींत होते. त्यांना दोन पुत्र, मोरोपंत व सदाशिव. धाकटे चिमणाजी आप्पा पेशवे यांची मर्जी या मोरोपंतांवर विशेष होती. पुढें पेशवाईअखेर बाजीराव ब्रह्मावर्तीं गेले. त्या वेळीं आप्पासाहेब महाराष्ट्रींच होते. तेव्हांचे रेसिडेन्ट एल्फिन्स्टन यांनीं आप्पासाहेबांस सांगितलें कीं, आपणास दहावीस लक्षांचा मुलुख देतों, पुणें संस्थान सांभाळून राहावें. तें चिमाजीअप्पास मान्य न झाल्यानें त्यास वसई येथें नेऊन ठेविलें. तेथें ठेवल्यावर त्यांनीं बोलणें केलें कीं, आपणास वार्षिक नेमणूक ठरवून द्यावी, आपण श्रीक्षेत्र काशी येथें राहतों. तेथून ते काशीस गेले. त्यांचेबरोबरच मोरोपंत तांबेहि काशीस गेले. त्यांना पेशव्यांकडून दरमहा रुपये पन्नास तनखा मिळे. मोरोपन्ताची स्त्री भागीरथीबाई यांना ता. १९ नोव्हेंबर १८३५ रोजीं श्रीक्षेत्रीं एक कन्यारत्न झालें (कार्तिक व. १४ संवत् १८९१). या मुलीचें नांव मनिकर्णिका—मनुताई असें ठेवण्यांत आलें. ही कन्या आपली चरित्र-नायिका होय. मनुताईचा जन्म पारतंत्र्यांत झाला. परंतु पारतंत्र्याचें जंजाळ आपल्या हातांनीं खडाखड तोडून भारताला दास्यमुक्त करण्याचा अट्टाहास करतांना आपली आत्माहुति देऊन आपलें नांव अजरामर करील अशी त्या वेळीं कोणास तरी कल्पना असेल काय !

मनुताई तीन-चार वर्षांची झाली. तोंच तांब्यांचे आश्रयदाते अप्पासाहेब कैलासवासी झाले व त्यांच्या सर्व आश्रितांना रावबाजींनीं ब्रह्मावर्तास

आपणाजवळ नेलें. रावबाजींची सांपत्तिक स्थितीहि चांगलीशी नसल्यानें मोरोपन्तास पेशव्यांच्या होमशाळेंत शिष्याचें काम करावें लागे. याच सुमारास तांबे यांची पत्नी वारली. तेव्हां मुलीस सहजच बापाचा लळा लागला. मनुताईहि सुस्वरूप, बाळसेदार, हंसतमुख व नेहमीं वडिलांच्या मागें मागें असल्यानें आणि तिचे ते विशाल व पाणीदार नेत्र व गौर वर्ण पाहून ती सर्वांसच हवीहवीशी वाटे यांत नवल काय? रावबाजींच्या पद-रची सर्व मंडळी तीस छबेली म्हणत. श्रीमंतांचे पुत्र नाना व रावसाहेब हे साधारणतः तिच्याच वयाचे असल्यानें ती नेहमीं त्यांजबरोबर खेळत असे, व त्यांच्या बाललीला पाहून रावबाजीहि प्रसन्न होत. मनुताई लग्नापूर्वीं पतंग उड-विण्यासारखे पुरुषी खेळ खेळे तर मुलींत राणी बनून त्यांजवर हुकमत गाजवी.

नाना व रावसाहेब यांस शिकविण्यासाठीं शिक्षक असे. त्यांजपाशीं ही बसत असल्यानें तिलाहि अक्षरओळख झाली होती. शिवाय घोड्यावर बसणें, निशाणबाजी करणें, तरवारीचे हात करणें या गोष्टीहि तीस उभयतांबरोबर सहजच साध्य झाल्या. पुढील आयुष्यांत नाना रावसाहेब यांनीं स्वातंत्र्यार्थ जें होमकुंड पेटविलें त्यांत त्यांना सहकार्य देण्याचें शिक्षण तिघांनाहि एकत्र मिळावें अशी जणूं ईश्वरी योजनाच होती! एकदां नाना हत्तीवर बसले तेव्हां हिनेंहि हत्तीवर बसण्याचा हट्ट धरला. बालहट्टच तो! नाना आपल्या हत्तीवर तिला घेईना व श्रीमंतांपाशीं तर दुसरा हत्ती नव्हता. रावबाजींनीं नानास तिला हत्तीवर घेण्यास सांगितलें, तोहि तिला आपल्या-जवळ घेईना. दोघेंहि हट्टास पेटलीं. शेवटीं मोरोपंत त्रासून म्हणाले; 'तुझ्या नशिबीं हत्ती कोठून येणार?' हें ऐकतांच ती बालतेजस्विनी एकदम म्हणाली, 'माझ्या नशिबीं एक सोडून दहा हत्ती आहेत!' आणि देवाची करणी अशी कीं तिचा विवाह झाल्यानंतर तिच्या दारांत दहा-वीस हत्ती झुलत होते! अशा रीतीनें तिचें बालपण गेलें. नाना तर मनुताईला आपली भगिनी मानीत, व दर दिपवाळीस भाऊबिजेला तिजकडून ओवाळून घेत. मनुताईस बालपणापासून आदर्श साहचर्य व भावी आयुष्यक्रमास आवश्यक तें शिक्षण ब्रह्मावर्तीं उत्तमपणें मिळालें.

त्या वेळच्या मानानें मनुताई लग्नास उपवर झाली व मोरोपंत वरसंशोधन करूं लागले. ब्रह्मावर्तीं कोंकणस्थांचीच वस्ती असल्यानें त्यांनीं जालवण, गुलसराई या बुंदेलखंडाच्या भागांत—कारण तेथें कऱ्हाड्यांची वस्ती पुष्कळ

होती.—तेथें वरसंशोधन चालविलें. मुलीचें टिपण प्रख्यात ज्योतिष्यास दाखविलें, त्यांनीं तर राजयोग असल्याचें सांगितलें. याचें सुमारास झांशीचे तात्या दीक्षित नांवाचे विद्वान गृहस्थ ब्रह्मावर्ती आले असतांना त्यांजपाशीं तांबे यांनीं हा प्रश्न काढला. तेव्हां तेहि म्हणाले, "झांशीचे महाराज गंगाधरराव बाबासाहेब यांची पत्नी नुकतीच निर्वतली आहे, व या मुलीसहि राजपदयोग आहे. तेथें या मुलीची योजना झाल्यास पाहा."

ज्योतिषीबुवांचें हें म्हणणें ऐकतांच तांबे यांनीं बाजीरावांमार्फत गंगाधररावांकडे बोलणें चालविलें. तांबे हे दरिद्री, तेव्हां झांशीवाल्यांशीं संबंध जुळून येणें कठीणच, परंतु त्यांनीं नेटानें प्रयत्न चालू ठेवला, व त्यास यश येऊन सुभेदारांनीं मुलीस पाहण्यासाठीं ब्रह्मावर्ती कांहीं दरबारी लोक पाठविले. त्यांनींहि मुलीच्या सद्गुणांची प्रशंसा केली व हा संबंध करण्याचें ठरलें. पुढें झांशी येथें सन १८४२ मध्यें हा मंगल समारंभ मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. मनुताई तांबे आतां झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब झाल्या! विवाह झाल्यानंतर मोरोपंत तांबेहि झांशीसच राहिले. गंगाधररावांनीं त्यांस सरदारकी देऊन दरमहा ३०० रुपये तैनात सुरू केली. येथेंच तांबे यांनीं द्वितीय विवाह केला. गुलसराई संस्थानांतील वासुदेवराव खानविलकर यांच्या कन्येशीं हा विवाह झाला. तिचें नांव चिमाबाई हें होतें.

महाराणी लक्ष्मीबाई यांचा विवाह झाल्यावर झांशी संस्थानची भाग्यश्रीच उदयास आली. नंतर गंगाधरराव व राणीसाहेब यांनीं त्रिस्थळीची यात्रा केली. आपल्या लौकिकास अनुरूप असा दानधर्म केला. लक्ष्मीबाईचें जन्मस्थान काशी येथें, त्यांनीं त्यांचें दर्शन घेतलें. उभयतां यात्रेहून परत आल्यावर नगरांत मोठा उत्सव झाला; व याच वर्षी मार्गशीर्ष शु. ११ सं. १९०८ रोजीं (१८५१) महाराणीसाहेब यांस मुलगा झाला. राणीसाहेबांस या मुलाशिवाय आणखी एक मुलगीहि झाली होती, असें 'माझा प्रवास' या पुस्तकांत लिहिलें आहे. पुत्रजन्मोत्सवाचा मोठा उत्सव झाला. कारण आतांपर्यंत झांशीच्या गादीला औरस वारसच नव्हता. तेव्हां सर्वांनाच फार मोठा आनंद झाला. परंतु हा आनंद फार दिवस टिकला नाहीं, व अवघ्या तीन महिन्यांतच त्यानें अवतारसमाप्ति केली. यामुळें उभयतां पतिपत्नीस मनस्वी दुःख झालें, त्यास पारावार नाहीं.

---

## ५ : झांशी खालसा केली

"To the evils of annexation, growing out of our insatiable love of territorial aggrandisement, we shall probably be wilfully blind, until awakened from a great national illusion by some rude shock to the fabric of our Indian Finance."

Richard Cobdon M. P.
How wars are got up in India, P. 56

पुत्रशोकाचा धक्का राणीसाहेबांस फार जाणवला. कारण पोटचा गोळा व राज्याचा भावी अधिकारी, त्यामुळें त्यांना शोक होणें अपरिहार्य होतें. परंतु श्रीमंत गंगाधरराव यांस हा धक्का फार मोठ्या प्रमाणांत बसला व तेव्हांपासून त्यांची प्रकृति ढासळूं लागली. कधीं जरा बरें वाटावें, तों पुनः प्रकृति बिघडावी असा प्रकार सुरू झाला. १८५३ मध्यें महालक्ष्मीच्या शारदीय महोत्सवाचा मोठा समारंभ झाला. त्या वेळीं गंगाधरराव जातीनिशीं हजर राहिले; पण त्यामुळें प्रकृतीवर ताण पडून ती पुनः बिघडली. अशी प्रकृति बिघडलेली असतांच विजयादशमीच्या दिवशीं सीमोल्लंघन, दरबार इत्यादि प्रकार नेहमींच्या थाटानें करण्यांत आले, परंतु त्यामुळें झालेल्या श्रमांमुळें प्रकृति ढासळून तींत संग्रहणीचा विकार झाला. उत्कृष्ट राजवैद्यांचे औषधोपचार सुरू झाले; नगरवासीयांनीं महालक्ष्मीला अनुष्ठानें सुरू केलीं, जनतेला त्यांच्या प्रकृतीबद्दल फार काळजी वाटूं लागली. गंगाधरराव हे फार लोकप्रिय राजे होते. प्रजानुरंजनासाठीं ते हरएक प्रकारच्या योजना करीत. त्यामुळें त्यांची प्रकृति दिवसानुदिवस क्षीण होऊं लागतांच लोक हवालदिल झाले यांत नवल नाहीं. राणीसाहेबांच्या चिंतेस तर पारावारच नाहींसा झाला. अहोरात्र पतिचरणाजवळ बसून त्या सेवासुश्रुषा करूं लागल्या. अन्नपाण्याचाहि त्यांनीं त्याग केला. परमेश्वराची व जगदंबेची आळवणी सुरूच होती. जनतेवर दुःखाची छाया पडली. अशा रीतीनें नोव्हेंबरचे दोन आठवडे लोटले; तिसऱ्या आठवड्यांत प्रकृतीचीं चिन्हें विपरीतच दिसूं लागलीं. सर्वत्र औदासिन्य उत्पन्न झालें. संस्थानचे दिवाण नरसिंहराव व मोरोपंत तांबे

यांनीं महाराजांजवळ संस्थानच्या व्यवस्थेची गोष्ट काढली. त्या वेळीं श्रीमंत म्हणाले, "मला माझ्या प्रकृतीबद्दल अद्याप निराशा वाटत नाहीं. तथापि दत्तक घ्यावा अशी मात्र इच्छा आहे; करितां आमच्या घराण्यांतील वासुदेवराव नेवाळकर यांचा पुत्र आनंदराव यास दत्तक घ्यावें."

आनंदरावाचें वय या वेळीं अवघें पांच वर्षांचें होतें, तरी ते फार चलाख व हुशार दिसत. तेव्हां त्यांसच दत्तक घेण्याचें ठरलें. दरबारांतील मुत्सद्दी नरसिंहराव दिवाण, श्री. मोरोपंत तांबे, नगरशेठ लाहोरीमल्ल व तदीचंद यांनीं हा समारंभ चांगल्या प्रकारें घडवून आणिला. झांशींतील अनेक प्रमुख गृहस्थ, त्याचप्रमाणें बुंदेलखंडाचे पोलिटिकल एजंट मि. एलिस, लष्करी अधिकारी मेजर मार्टिन, यांनाहि मुद्दाम पाचारण करण्यांत आलें होतें. या सर्वांच्या समक्ष दत्तविधानाचा समारंभ होऊन मुलाचें नांव दामोदरराव गंगाधरराव असें ठेवण्यांत आलें. गंगाधररावांनीं स्वहस्तें मुलाच्या तोंडांत साखर घातली. रीतीप्रमाणें पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन हें दत्तविधान जाहीर करण्यांत आलें. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें आपणास पुत्रलाभ झाला, असें वाटून उभयतां पतिपत्नीस परमानंद झाला!

गंगाधरराव यांची प्रकृति अत्यवस्थ झाल्याची वार्ता झांशीचे पोलिटिकल एजन्ट मेजर एलिस यांस समजतांच त्यानें बुंदेलखंडाचे पोलिटिकल एजन्ट मेजर मालकम यांस सर्व हकीकत कळवून ठेविली होती. दत्तविधान झाल्यानंतर महाराज गंगाधरराव यांनीं दिवाण नरसिंहराव व मोरोपंत यांस बोलावून त्यांना एक खलिता लिहिण्यास सांगितलें. या वेळीं मेजर एलिस महाराजांजवळ बसलेले होते. खलिता लिहून होतांच महाराजांनीं तो स्वहस्तें एलिसच्या स्वाधीन केला. हा खलिता पुढीलप्रमाणें होता:—

"ब्रिटिश सरकारची सत्ता बुंदेलखंडांत प्रस्थापित होण्यास माझे पूर्वजांनीं त्यांना हरएक प्रकारें साहाय्य केलें आहे; व तें साहाय्य कोणत्या प्रकारचें केलें तें युरोपखंडांत सुद्धां माहीत आहे. मीहि त्यांचाच कित्ता गिरवून ब्रिटिश सरकारशीं एकनिष्ठपणें वागत आलों आहे ही गोष्ट येथें आतांपर्यंत आलेल्या पोलिटिकल एजन्टांना माहीत आहे.

"मी हल्लीं आजारी आहे. मी आतांपर्यंत ब्रिटिश सरकारशीं प्रामाणिकपणें वागत आलों असून ब्रिटिश सरकारनें मला चांगल्या प्रकारें वागविलें आहे.

परंतु दुर्दैवानें माझ्या पश्चात् माझ्या घराण्याचा नष्टांश होण्याचा प्रसंग आला आहे; तसें होऊं नये म्हणून मी ब्रिटिश सरकारशीं झालेल्या तह-नाम्यांतील कलम दोन प्रमाणें आनंदराव नामक पांच वर्षांच्या मुलास दत्तक घेऊन त्याचें नांव दामोदरराव असें ठेविलें आहे. हा मुलगा माझ्या पणज्याच्या वंशांतील असून प्रस्तुत तो माझा नातु लागतो.

" ईश्वरकृपेनें मी या दुखण्यांतून उठेन अशी अद्यापि मला आशा वाटते. माझें उतार वय झालेलें नाहीं, व मला संतति होण्याचा संभव आहे. तसें झाल्यास दत्तकाची योग्य ती तजवीज करण्यांत येईल. पण माझें देहावसान झालें तर मात्र आजपर्यंत मी सरकारशीं प्रामाणिकपणानें वागत आलों हें ध्यानीं घेऊन सरकारनें या मुलावर मेहेरनजर ठेवावी व माझ्या बायकोस ती हयात असेपर्यंत संस्थानची मालकीण व या दत्तक मुलाची आई समजून संस्थानची व्यवस्था तिच्याकडे सोपवावी. तिला कोणत्याहि प्रकारें त्रास पोहोचूं देऊं नये."

अत्यंत सद्गदित अंतःकरणानें महाराजांनीं हा खालिता मेजर एलिस याचे हातांत दिला व त्यांतील इच्छा परिपूर्ण करण्याबद्दल त्यास कळवळून सांगितलें. मेजर एलिस यानें ब्रिटिश मुत्सद्दीपणास साजेशा रीतीनें 'मी हा खलिता ब्रिटिश सरकारकडे पाठवून माझ्याकडून होईल तो प्रयत्न करीन!' असें सांगितलें.

या झाल्याप्रकारानें महाराजांस जरा ग्लानी आली. तेव्हां मेजर एलिस व कॅप्टन मार्टिन यांनीं त्यांस औषध देवविलें व आपण निघून गेले. महाराणी या तेथेंच पडद्यामागें बसल्या होत्या. साहेब निघून जातांच त्या महाराजां-जवळ येऊन बसल्या. त्यांची या वेळीं झालेली स्थिति मात्र अत्यंत करुणास्पद अशी होती.

मेजर एलिस परत जातांच त्यांनीं झाल्या प्रकाराची सर्व हकीकत पोलिटिकल एजन्ट मेजर मालकम यांस कळविली. इकडे श्रीमंतांची प्रकृति क्षणभंगुर झाली. महाराणीसाहेब चिंतेनें व्यापून गेल्या. अशा स्थितींत ता. २० नोव्हेंबर १८५३ रोजीं दुपारीं चार वाजले. वाड्यापुढें हजारों लोकांचा तोबा उडून जो तो महाराजांच्या प्रकृतीबद्दल चौकशी करूं लागला. मेजर एलिसहि महाराजांच्या भेटीस निघाल्याचें वृत्त आलें. महाराजांची

वाचा बंद झाली. शुद्धीहि नाहींशी झाली. राणीसाहेबांवर तर आकाश कोसळल्याप्रमाणें होऊन नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्या कुलस्वामिनीचा धांवा करूं लागल्या. इतक्यांत शेजारच्या लोकांनीं श्रीमंतांस मात्रा चाटविली; तेव्हां जरा शुद्धीवर येऊन पहिलाच प्रश्न केला, 'एजन्ट कोठें आहेत?' त्याबरोबर एजन्ट मेजर एलिस व डॉ. ॲलन वाड्यांत येऊन दाखल झाले.

महाराजांस माडीवरील दिवाणखान्यांतून खालीं एका महालांत आणून ठेविलें होतें. एजन्टांस पाहतांच त्यांना फार आनंद होऊन ते त्यांशीं बोलण्याचा प्रयत्न करूं लागले. तेव्हां साहेबांनीं त्यांस त्रास न देतां डॉ. ॲलन यांस प्रकृति पाहाण्यास सांगितलें, व डॉ. ॲलन यांचें औषध घेण्याबद्दल आग्रहपूर्वक विनंति केली. त्या वेळच्या धर्मसमजुतीप्रमाणें इंग्रजी औषध घेण्यास ते तयार नव्हते, परंतु ब्राह्मणाकरवीं व गंगोदक घालून औषध तयार करतों असें आश्वासन दिल्यावर त्यांनीं औषध घेण्याचें कबूल केलें. डॉ. ॲलन यांनीं परत जाऊन औषध तयार करून पाठवून दिलें. मेजर एलिसहि परत गेले.

मृत्यूपूर्वी श्री. गंगाधरराव यांनीं बुंदेलखंडाचे एजन्ट मेजर मालकम यांसहि एक खलिता पाठविला. त्यांतील मजकूर मेजर एलिसच्या खलित्याप्रमाणेंच असून रावरामचंद्र यांजबरोबर १८१७ मध्यें तह झाला होता त्याचा निर्देश केला होता. त्या तहांत असें म्हटलें आहे कीं, "झांशी व ब्रिटिश यांचा स्नेह कायम असावा या हेतूनें ब्रिटिश सरकारचा अंमल बुंदेलखंडांत सुरू झाला त्या वेळीं कै. शिवरावभाऊ यांच्या ताब्यांत असलेल्या व सध्यां झांशी सरकारच्या ताब्यांत असलेल्या सर्व प्रान्तांचे रावरामचंद्र यांस, त्यांचे वारसदारांस व त्या वारसदारांचे जागीं संस्थापित होणारांस, ब्रिटिश सरकार वंशपरंपरागत मालक नेमून ते त्या प्रान्ताचे संस्थानिक आहेत, ही गोष्ट मान्य करीत आहे.

"माझ्या विनंतीप्रमाणें मेजर एलिस व येथील सैन्याचे अधिकारी कॅ. मार्टिन यांनीं माझी भेट घेतली तेव्हां मी त्यांस समक्ष खलित्यांतील सर्व गोष्टी स्पष्ट करून सांगितल्या असून माझ्यामागें आनंदराव यास दत्तक घेऊन त्याची योजना केली आहे, अशाबद्दलचा खलिता त्यांजकडे दिलेला आहे तो आपणांकडे पाठविण्यांत येईलच."

अशा प्रकारें आपणांकडून करावयाची सर्व व्यवस्था व निरवानिरव मनाप्रमाणें झाली. यापुढें झांशी संस्थान आपल्या मुलाकडे चालून आपल्या घराण्याचें नांव चिरकाल राहील, आतां राणीसाहेबांबद्दलहि कांहीं काळजी करावयास नको. सरकार आपली विनंति मान्य करील अशी गंगाधरराव यांना स्वाभाविकच आशा वाटली; कारण सरकारवर त्यांचा भरंवसाहि होता. यासंबंधानें मि. टॉरेन्स हा आपल्या 'एम्पायर इन् एशिया' पुस्तकांत लिहितो:– "राजानें अत्यंत विनम्रभावानें गव्हर्नरजनरलला दत्तक मुलाबद्दल लिहून त्याचें रक्षण करावें व आपली पत्नी लक्ष्मीबाई इला रीजन्ट म्हणून मान्यता द्यावी असें लिहिलें. मागें झालेल्या तहांतील दुसऱ्या कलमाप्रमाणें आपली गादी कायम राखण्याचें सरकारनें मान्य केलें आहे, या गोष्टीकडेहि त्यांचें लक्ष वेधण्यांत आलें व त्यांतील अभिवचनाप्रमाणें आपल्या मुलावर कृपा ठेवावी अशी पुनः विनंति केली. आपण अत्यंत निष्ठेनें वागलों, अर्थात् ब्रिटिश सरकारहि आपणांशीं योग्य रीतीनें वागेल, अशा कल्पनेंतच राजा गंगाधररावाला मरण आलें. या वेळीं कंपनीची सत्ता बलवान झाली होती. तेव्हां तद्देशीयांनीं दाखविलेली निष्ठा विसरण्यास आतां मुळींच प्रत्यवाय नाहीं अशी फोर्ट विलियमची विचारसरणी बनली यांत नवल नाहीं."

—एम्पायर इन् एशिया, पृ. ३७४.

आपलें राज्य आपल्या वंशाकडे चालणार, ब्रिटिश सरकार आपला शब्द मोडणार नाहीं, अशा कल्पनेंत राव गंगाधर होता. त्यांच्या प्रकृतीला उतार पडेना. अखेर ता. २१ नोव्हेंबर १८५३ रोजीं महाराजांनीं कैलासवास केला! मृत्युवार्ता वायुगतीनें नगरांत पसरली. सर्वत्र हाहाःकार उडाला. राजवाड्यांत हलकल्लोळ झाला. महाराणीसाहेबांना तर दुःखावेग सहन न होऊन त्यांचें देहभानच हरपलें!! सर्वत्र दुःखाची अवकळा पसरली. नंतर राजेसाहेबांच्या लौकिकास साजेशा रीतीनें त्यांचा संस्कार करण्यांत आला. पोलिटिकल एजंट एलिस व इतर युरोपियन अधिकारी अशुभ पोशाख धारण करून आले. स्मशानयात्रा संपतांच मेजर एलिस व कॅ. मार्टिन हे महाराणीसाहेब यांच्या भेटीस गेले. त्यांना सान्त्वनाचा उपदेश केला. आपल्या हेतूप्रमाणें सर्व होईल असें आश्वासनहि दिलें व तेथून खजिन्याचा बंदोबस्त करण्यासाठीं किल्ल्याकडे गेले.

झांशीचा किल्ला किती बळकट होता याचें वर्णन मागें केलेंच आहे. तेथेंच संस्थानचे कैदी व खजिना ठेवीत असत. या खजिन्यास एलिसनें मोहोरा करून किल्ल्याच्या रक्षणार्थ शिंद्यांच्या कॉन्टिन्जन्ट पैकीं ६ व्या पलटणींतील एक तुकडी ठेविली. महाराजांच्या मृत्यूनंतर कोठें गडबड होऊं नये, याबद्दल दरबारी लोकांच्या गांठी घेऊन सर्व व्यवस्था आधींच लागली होती व लष्करी बंदोबस्तहि चोख ठेवला होता.

महाराजा गंगाधरराव यांच्या मृत्यूचें वर्तमान मेजर एलिसकडून मेजर मालकम याजला समजतांच त्यानें ता. २५ नोव्हेंबर १८५३ रोजीं हिंदुस्थान सरकारकडे पुढील आशयाची एक यादी पाठविली—

१. झांशीचे महाराज गंगाधरराव हे ता. २१ नोव्हेंबर रोजीं मरण पावले, हें कळविण्यास फार वाईट वाटतें.

२. मृत्यूपूर्वी एक दिवस महाराजांनीं आनंदराव नांवाचा एक पांच वर्षांचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव दामोदरराव गंगाधरराव असें ठेविलें. महाराजांचे पूर्वज रघुनाथराव यांचा हा पांचवा वंशज असून इंग्रजी रीतीप्रमाणें तो महाराजांचा चुलतभाऊ होतो.

३. मेजर एलिस यांजकडून ता. २० रोजीं महाराजांच्या भेटीसंबंधीं मजकडे आलेलें पत्र व त्याचप्रमाणें महाराजांनीं आनंदरावास दत्तक घेतल्याबद्दलच्या हकीकतीचा आलेला सविस्तर खलिता सदर तारखेस मजकडे आला तोहि यासोबत अवलोकनार्थ पाठवीत आहे.

४. दत्तक घेण्याचें एकाएकीं ठरलें याबद्दल झांशी दरबारांतील लोकांस आश्चर्य वाटत असलें पाहिजे; कारण संस्थानची मालमत्ता व संस्थान राणीच्या हयातीपर्यंत तिजकडे ठेवावें अशीच महाराज इंग्रज सरकारास विनंति करतील असा सर्वांचा समज होता. ब्रिटिश सरकारचा ज्यांच्याशीं प्रथम तह झाला ते झांशीचे सुभेदार शिवरामभाऊ यांच्या सरळ वंशामध्यें कोणी वारस पुरुष नाहीं व जवळचा कोणी आप्तहि नाहीं, म्हणून हा दत्तकाचा विचार निघाला असावा असें वाटतें.

५. आपल्या माहितीसाठीं मी संस्थानचा एक वंशवृक्ष सोबत पाठवीत आहे तो बहुधा बरोबर आहे. त्यावरून असें ध्यानीं येईल कीं महाराजा

गंगाधरराव यांनीं घेतलेला दत्तक त्यांचे पूर्वज पहिले रघुनाथराव यांच्या वंशांतील आहे.

६. मेजर एलिस यांस मी ता. २० रोजीं एक सूचनापत्र पाठविलें होतें. व त्याची प्रत ता. ३ रोजीं आपणाकडे रवाना केली आहे, त्यांत केलेल्या सूचनांप्रमाणें मेजर एलिस हे वागत असून सरकारचा अखेरचा हुकूम येईपर्यंत कै. राजेसाहेबांच्या दत्तकासंबंधीं विचारहि करणार नाहींत.

७. झांशी संस्थान व इंग्रज सरकार यांचे संबंध कसे आहेत त्याबद्दलची माहिती पुढें देत आहे; त्यावरून संस्थानिकांस दत्तक घेण्याचा अधिकार आहे कीं नाहीं हें ठरवितांना त्या माहितीचा उपयोग होईल.

८. बुंदेलखंडाचा व आमचा संबंध १८०४ मध्यें प्रथम आला, तेव्हां पेशव्यांचे नोकर या नात्यानें शिवरामभाऊबरोबर आमचा तह झाला. पुढें १८१७ मध्यें झांशी संस्थानावरील सर्व हक्क पेशव्यांनीं इंग्रजास दिले त्या वेळीं शिवरावभाऊंचे नातू रामचंद्रराव यांस झांशी संस्थानचे वंशपरंपरागत मालक कबूल केलें, आणि त्याप्रमाणें त्यांस १८३२ सालीं सुभेदाराऐवजीं "राजा" हा किताब दिला.

९. रामचंद्रराव १८३५ सालीं मरण पावले. ते निपुत्रिक असल्यानें त्यांचें संस्थान खालसा करावें कीं कसें याबद्दल त्या वेळीं वाटाघाट झाली असावी असें वाटतें. परंतु त्या वेळीं शिवरावभाऊंचे रघुनाथराव व गंगाधरराव असे दोन औरस पुत्र असल्यामुळें त्यांजकडे संस्थान चालविण्याचें ठरलें. परंतु आतां गंगाधररावच मरण पावल्यानें शिवरावभाऊंचा निर्वंश झाला आहे.

१०. राव रामचंद्र मृत्यु पावले त्या वेळीं संस्थानावर त्यांचा दत्तक मुलगा व त्यांच्या बायकोनें घेतलेला दत्तक असे दोघे हक्क सांगू लागले; तेव्हां दोघांचेहि हक्क रद्द ठरवून टाकले. यावरून असें स्पष्ट म्हणतां येईल कीं झांशी संस्थान पूर्णपणें इंग्रजांच्या हुकमतीखालीं असून दत्तक घेणें तो सार्वभौम सरकारच्या संमतीखेरीज घेतां येत नाहीं.

११. कै. गंगाधरराव महाराज यांची अशी इच्छा होती कीं, आपल्यामागें आपल्या स्त्रीच्या हातीं सर्व राज्यव्यवस्था द्यावी. ती स्त्री फार हुशार

व लोकप्रिय असून सर्व कारभार योग्य प्रकारें करण्यास समर्थ आहे. परंतु एकंदर परिस्थितीनुरूप सरकार हें संस्थान खालसा करणार असें वाटतें. म्हणून सूचना अशी कीं राणीसाहेबांस त्यांच्या मृतपतीची सर्व खासगी मिळकत व झांशींतील राजवाडा सरकारनें देऊन त्यांच्या शानशौकतीसाठीं व कुटुंबियांना योग्यतेनें व सुखानें राहतां येईल अशा प्रकारची नेमणूक करून देण्याची मला परवानगी मिळावी.

१२. महाराणीसाहेबांस किती रक्कम द्यावी हें ठरविणें कठीण आहे. तथापि बुंदेलखंडांतील संस्थापित असें हें शेवटचें मराठ्यांचें घराणें आहे. पेशव्यांकडूनहि त्यांस कांहीं द्रव्य मिळेल अशी आशा नाहीं. राजांचे आश्रित उदरभरणासाठीं राणीसाहेबांकडेच येतील, या गोष्टी सरकारनें ध्यानीं घेऊन सरकार जो तनखा ठरवील तो दरमहा पांच हजारापेक्षां कमी नसावा अशी माझी सूचना आहे.

१३. हें संस्थान मी आपल्या ताब्यांत घ्यावें असें सरकारास वाटल्यास मी तसें करीन. परंतु मी अगर मेजर एलिस यांना जमाबंदीच्या कामाचा कांहींच अनुभव नसल्यानें बुंदेलखंडांतील जे जिल्हे जबलपूरच्या कमिशनर-कडे दिले आहेत त्यांतच हें संस्थान समाविष्ट करावें.

कँप पन्ना,
२५-११-१८५३

(सही) डी. ए. मालकम
पोलिटिकल एजंट, ग्वाल्हेर, बुंदेलखंड व रीवा.

मेजर मालकम याच्या वरील खलित्यावरून झांशी राज्याचें भवितव्य ठरून गेलें ! यापूर्वीच दलहौसीनें सातारा, तंजावर, नागपूर हीं मराठी राज्यें स्वाहा केलीं होतीं. तेव्हां त्याचें स्वाहाकारी धोरण पाहूनच मेजर मालकम यानें त्या धोरणास पुष्टि देणारा खलिता लिहिला हें स्वाभाविकच झालें. हा खलिता रवाना होतांच संस्थानचा कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला. झांशी व करेरा येथील किल्ल्यावर चार जादा पलटणी ठेवण्यांत आल्या.

इंग्रजी दरबारांत संस्थानाविषयीं काय शिजत आहे याची माहिती राणीसाहेबांस मुळींच नव्हती. १८१७ सालीं झालेल्या करारान्वयें आपला दत्तक मान्य होऊन, व सरकारास आपण वेळोवेळीं केलेलें साहाय्य लक्षांत

घेऊन इंग्रज सरकार आपलें म्हणणें मान्य करील अशी भोळी आशा राणीसाहेबांस वाटत होती. मेजर मालकमनें आपला रिपोर्ट केला तेव्हां लॉर्ड दलहौसी कलकत्ता येथें नव्हता, तो अयोध्या प्रान्तांत गेला होता. तो येईपर्यंत खलित्याचा विचार करूं नये असें कौन्सिलचे सभासद ऑ. जे. डोरीन, जे. लो., व फ्रेडरिक जे. हालीडे यांनीं ठरवून झांशी दत्तकाचा प्रश्न तसाच ठेवला; व पोलिटिकल एजन्टानें योग्य ती दक्षता घेऊन राज्यकारभार पूर्ववत् चालू द्यावा, कोठें गडबड व शान्तताभंग होऊं देऊं नये, असें एजन्ट मेजर मालकम यांस कळविण्यांत आलें.

परंतु राणीसाहेब या प्रकरणाबाबत स्वस्थ बसल्या नव्हत्या. त्यांनीं ता. १६ फेब्रुवारी १८५४ रोजीं गव्हर्नर जनरलकडे पुढील आशयाचा एक अर्ज पाठविला:—

"माझे प्रिय पति निवर्तल्याच्या दुःखांत मी चूर असल्याकारणानें ता. ३ डिसेंबर रोजीं मेहेरबानांस मी लिहिलेल्या खलित्यांत कांहीं गोष्टी नमूद करण्याचें राहून गेलें, त्या मी या अर्जद्वारें कळवीत आहे—

"माझे श्वशुर शिवरावभाऊ यांचा व ब्रिटिश सरकारचा प्रथमतः संबंध आला व तो स्नेहसंबंध पुढें चांगला दृढ होऊन लॉर्ड लेक यानें महाराजांस आपल्या व आपल्या वंशजांच्या हितासंबंधीं एक अर्ज सरकारांस करावा असें सुचविलें, व त्याप्रमाणें एक सात कलमी वजीब-उल् अर्ज तयार करून तो त्या वेळचे पोलिटिकल एजन्ट कॅप्टन जॉन बेली यांजकडे पाठविला व तो अर्ज ना. गव्हर्नर जनरल यांनीं सर्वस्वीं मान्य केला. शिवराव भाऊ यांनीं केलेल्या अर्जांत कांहीं गोष्टींचा तपशील द्यावयाचा राहून गेला. पुढें सरकारास त्यांनीं चांगलें साहाय्य केलें व नंतर राहिलेल्या उणीवा भरून काढण्यासाठीं एक नवा करार करण्यांत आला. यांत ९ कलमें आहेत. दोन जादा कलमें घालण्यांत आलीं व त्यावर ना. गव्हर्नर जनरल यांनीं आपली शिक्कामोर्तब केली आहे, तो करार कोट्रा येथें कॅ. जॉन बेली यानें दिला.

"वजीब-उल् अर्जच्या सहाव्या कलमांत असें म्हटलें आहे कीं, वोडसा, दातिया, चंदेरी व इतर संस्थानिकहि इंग्रजांचें स्वामित्व मान्य करण्यास तयार आहेत. फक्त त्यांच्या ताब्यांत आज जो मुलुख आहे तो त्यांनीं

त्यांजकडेच ठेवावा. ती गोष्ट मान्य करण्यांतहि आली व तसा हुकूम काढण्यांत आला.

"आमच्या घराण्यानें अनेक साहाय्यक कामें केल्याबद्दल राव रामचंद्रराव यांना पारितोषिक देण्याच्या हेतूनें एक तह करण्यांत येऊन (१८१७) त्यांतील दुसऱ्या कलमान्वयें झांशीचें राज्य वंशपरंपरागत कायम राखावयाचें आश्वासन देण्यांत आलें. ( The second article of which acknowledges, Rao Ramchandra Rao, his heirs and Successors, as hereditary rulers in perpetuity of the Jhansi principality and guaranteed its protection to them from foreign aggression.)

"सन १८२४ वर्षी ब्रह्मी युद्धाचे वेळीं राव रामचंद्रराव यानें सत्तर हजार रुपये देऊन वंजाऱ्यांकडून ब्रह्मदेशांत धान्यसामुग्री पुरविली. मि. आइनस्लो यानें या गोष्टीची तारीफ गव्हर्नर जनरलकडे केली तेव्हां ही रक्कम परत देण्याबद्दल कळविलें असतां, आपण इंग्रजांचे दोस्त आहोंत व उभयतांचे हितसंबंध एकच आहेत, असें सांगून राव रामचंद्ररावानें रक्कम घेण्याचें नाकारलें. गव्हर्नर जनरलनें या गोष्टीबद्दल त्यांना बहुमानाचा पोषाख पाठवून त्यांचा गौरव केला.

"नंतर भरतपूरचा वेढा, नाना पंडितानें काल्पींत केलेलें बंड, या वेळींहि झांशी संस्थाननें दोन तोफा, ४०० स्वार, एक हजार पायदळ पाठवून काल्पी शहराचा बचाव केला. याबद्दलहि सरकारनें संस्थानचे आभार मानले आहेत. अशा रीतीनें प्रत्येक अडचणीच्या वेळीं संस्थाननें इंग्रजांस साहाय्य केलेलें आहे.

"स. १८३२ सालीं लॉर्ड बेंटिंग झांशी येथें आले असतां त्यांचें ता. ९ डिसेंबर रोजीं राव रामचंद्र यांना 'महाराजाधिराज फिदवी बादशहा जनुहा इंग्लिस्तान, महाराज रामचंद्रराव बहादुर', ही किताबत देऊन ही पदवी आपल्या शिक्क्यावर खोदण्यास फर्माविलें; शिवाय नगारा, चामरें देऊन भर दरबारांत असें जाहीर केलें कीं, महाराजांचे चुलते शिवराव भाऊ यांनीं इंग्रज सरकारास उत्कृष्ट प्रकारें साहाय्य केलें असून त्याचें पारितोषिक ब्रिटिश

सरकार देत आहे. दरबारांत केलेल्या घोषणा पुनः एका सुवर्णकिनारीच्या पत्रांत (२० डिसेंबर) लिहून तें पत्र सागर येथून दरबारांत पाठविलें.

"पुढें रघुनाथराव गादीवर आले. ते मरण पावल्यानंतर माझ्या पतींना वारस म्हणून मान्य करण्यांत आलें त्या वेळीं संस्थानकडून २,५५,८९१ रुपयांचा मुलुख फौजेच्या खर्चासाठीं म्हणून घेण्यांत आला. वारसाचा हक्क सरकारनें मान्य केलेलाच असल्यानें माझ्या पतीनीं मृत्युपूर्वी मेजर एलिस व कॅ. मार्टिन यांच्यासमक्ष आनंदराव यांस दत्तक घेतलें व त्याच वेळीं खलिता लिहून ती गोष्ट आपणांस निवेदनहि केली.

"अशा प्रकारचे दत्तक बुंदेलखंडांत इतर राजांनीं घेतल्याचे कांहीं दाखले मी यासोबत पाठवीत आहे. औरस पुत्र नसला तर दत्तक पुत्र घेण्याचा हिंदुधर्मांत रिवाज आहे, व इंग्रज सरकार योग्य तो न्याय या कामीं देईल अशी आशा आहे. शिवराव भाऊंच्या मुलाच्या पत्नीची ही विनंति वाया जाणार नाहीं अशी आशा आहे."

अशा प्रकारें राणीसाहेबांनीं आपणाकडूनहि जारीनें प्रयत्न चालविले होते. परंतु लॉर्ड दलहौसीच्या स्वाहाकारी धोरणाला झांशी राज्य बळी पडून झांशीच्या राज्यलक्ष्मीचा शेवट व्हावा अशीच भगवंताची इच्छा होती!

मेजर मालकम यानें लॉर्ड दलहौसीकडे अहवाल सादर केला तेव्हां दलहौसी अयोध्या प्रान्तांत फिरतीवर गेला होता. कारण त्याला तेंहि राज्य खालसा करावयाचें असल्यानें खालसा करण्याचीं कारणें उत्पन्न करण्यासाठींच त्यानें हा दौरा काढला होता! दलहौसी तेथून परत येईपर्यंत म्हणजे सुमारें सहा महिने झांशीप्रकरण पडूनच होतें. दरम्यान गंगाधरराव मरण पावले असें पाहून पारोळें येथील नेवाळकर घराण्यांतील सदाशिवराव नांवाचे एक गृहस्थ झांशीस येऊन तेहि गादीवर आपला हक्क सांगूं लागले. कै. रामचंद्रराव यांनीं एक मुलगा दत्तक घेतलेला होता. परंतु तो त्या वेळीं सरकारनें नामंजूर केला होता, त्यानें व दुसरा नेवाळकरांचा असे दोन अर्ज राज्यावर हक्क सांगणारे हिंदुस्थान सरकारकडे करण्यांत आले.

महाराणीसाहेबांची विनंति मान्य करावी अशाबद्दल एक पत्र मेजर एलिस यानें ता. २४ डिसेंबर १८५३ रोजीं पाठवून त्यांत असें म्हटलें होतें कीं, ओरछा संस्थानाप्रमाणेंच झांशीबरोबर आपला सख्यत्वाचा व

दोस्तीचा तह झाला असून दोन्ही तहांतील कलमें अगदीं सारखींच आहेत. तेव्हां एका संस्थानाला दत्तकाचा हक्क मिळावा व दुसऱ्यास तो मिळूं नये असा भेद करण्याचें कारण नाहीं. कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनीं ता. २७ मार्च १८३९ मध्यें पाठविलेल्या यादींतील कलमें १६, १७ याप्रमाणें एतद्देशीय संस्थानांस दत्तक घेण्याचा पूर्ण हक्क आहे असें मान्य केलें आहे. ज्या घराण्यास त्यांनीं पूर्वीं केलेल्या मदतीबद्दल ब्रिटिश सरकारनें संस्थानिक केलें आहे तीं घराणीं इतरांप्रमाणें प्राचीन नाहींत अशी सबब सांगून त्यांचा हक्क नाकबूल करणें ही गोष्ट डायरेक्टर्सच्या हुकुमाविरुद्ध असून त्यायोगानें त्यांच्या औदार्याचा भंग केल्याप्रमाणें होईल, असें मला वाटतें." मेजर एलिस यांचें हें पत्र योग्य वेळीं कलकत्त्यास रवानाच झालें नाहीं.

स. १८५४ मध्यें दलहौसी अयोध्या प्रान्तांतून परत आल्यानंतर झांशी-प्रकरण त्यांनीं हातीं घेतलें व एक खर्डा तयार केला. त्यांत झांशी संस्थान व ब्रिटिश सरकार यांचा संबंध कसा आला याबद्दलचा इतिहास दिला होता व त्या माहितीच्या आधारें दलहौसी व त्याचे सल्लागार यांनीं पुढील आशयाचा ठराव केला :—

१. राजे गंगाधरराव मरण पावले, त्यांना औरस संतति नाहीं, त्यांनीं मृत्यूचे आदले दिवशीं दत्तक घेतला. त्यास झांशी संस्थानचे वारस करावें अशी राणी लक्ष्मीबाई यांची विनंति आहे.

२. झांशी संस्थानची जी माहिती तयार करण्यांत आली आहे तीमध्यें झांशी संस्थान व सरकार यांचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे याचा स्पष्ट खुलासा केला आहे. त्यावरून विचार करतां झांशीच्या राजेसाहेबांच्या ताब्यांत जो प्रान्त होता त्याची काय व्यवस्था करावी यासंबंधानें मी आपलें मत सादर करतों.

३. या प्रान्ताची मालकी ब्रिटिश सरकारकडे आली असून ही हक्कानें व राजकीय कारणासाठीं सरकारनें आपणांकडेच ठेवणें इष्ट आहे.

४. संस्थानांसंबंधानें सर चार्लस मेटकाफ् यांनीं एक धोरण ठरविलें होतें. तें मुख्य सरकारनें १८३७ मध्यें मान्य केलें व त्याची बजावणी १८४९ मध्यें करण्यांतहि आली. त्यास अनुसरून झांशी संस्थान बेवारस ठरवून ब्रिटिश सरकारनें आपल्या ताब्यांत घेणें गैर होणार नाहीं.

५. यासंबंधीं खुलासा असा:— कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं,—

हिंदुस्थानांतील सर्वसाधारण कायद्याप्रमाणें व रूढीप्रमाणें सातार्‍याप्रमाणें जीं स्वतंत्र राज्यें नाहींत अशीं कांहीं संस्थानें आहेत; त्यांची मालकी सार्वभौम सरकारच्या मान्यतेशिवाय दत्तकवारसाकडे जावयाची नाहीं, व अशी मान्यता देण्यास आम्हीं बांधले गेलों नाहीं. आणि अशी मान्यता न देण्यानेंच जे प्रान्त आमच्या ताब्यांत आले आहेत त्यांचें हित केलेंसें होणार आहे.

बुंदेलखंडांतील संस्थानांसंबंधानें सर् चार्लस मेटकाफ् लिहितात, ज्या संस्थानिकांना औरस वारस नाहीं त्यांना दत्तक घेऊन इतर कोणाचाहि वारस हक्क नसतां, सार्वभौम सरकारकडे आपोआप येणारा वारसा हक्क बुडवितां येईल काय? व असें दत्तविधान मान्य करण्यास सरकार बांधलें गेलें आहे काय? हा आहे मुख्य प्रश्न!

याचें उत्तर देतांना वंशपरंपरागत गादीचे वारसदार आणि अशा राजाकडून वा सार्वभौम सरकारकडून ज्यांना जहागिरी मिळाल्या आहेत असे जहागिरदार यांत मोठा फरक आहे हें ध्यानीं घेतलें पाहिजे.

म्हणून माझें असें म्हणणें कीं, हिंदु राजांना जर औरस संतति नसेल तर तेढे वारस बाजूस सारून दत्तक घेण्याचा हक्क आहे व असें दत्तविधान हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें सशास्त्र व कायदेशीर असल्यास त्यास सरकारनें मान्यता दिली पाहिजे.

परंतु जे जहागिरदार अगर सरंजामदार आहेत त्यांच्या वारसाची व्यवस्था करण्याचा अधिकार जहागीर देणाराचा आहे. त्यांत औरस संततीला वारसा मिळावा, दत्तकाला ती जहागीर चालू नये असा हेतु असतो. म्हणून ज्या राजानें देणग्या दिल्या आहेत त्याला अगर त्याच्या जागीं आलेल्या दुसर्‍या सत्ताधीशाला औरस संतति नसेल तर जहागिरी परत घेण्याचा हक्क आहे.

६. झांशी हें मांडलिक संस्थान आहे, व सार्वभौमत्वाच्या नात्यानें ब्रिटिश सरकारांनीं तें देणगीदाखल दिलेलें म्हणून चालत होतें. त्या संस्थानिकाची औरस संतति नष्ट झाल्याकारणानें ती जहागीर परत घेण्याचा सरकारास हक्क पोहोंचतो.

७. सन १८०४ मध्यें शिवरावभाऊंनीं ब्रिटिश सरकारशीं तह केला त्यांत झांशीचे सुभेदार पेशव्यांचे मांडलिक आहेत असेंच म्हटलें आहे. पेशव्यांच्या हुकुमावरून ते या प्रान्ताचा कारभार करीत होते असेंच वजीब-उल्-अर्ज मध्येंहि म्हटलें आहे. त्यांच्याशीं इंग्रजांनीं तह केला तोहि ' पेशव्यांकरितां ' असेंच म्हटलें आहे.

आपल्या नातवाला तहाप्रमाणें गादी मिळावी असा अर्ज शिवरामभाऊंनीं हिंदुस्थान सरकारकडे केला होता. त्याचें उत्तर देतांना " आम्हांला पेशव्यांच्या संमतिखेरीज झांशी संस्थान वंशपरंपरेनें चालविण्याचें आश्वासन देतां येत नाहीं " असेंच म्हटलें आहे. यावरून झांशी संस्थानचा दर्जा स्पष्ट झाला आहे. झांशीची सुभेदारी ही पेशव्यांच्या ताब्यांतील एक मांडलिक जहागिर आहे असें मानून ती भाऊंच्या वंशाकडे चालविण्याचा हक्क पेशव्यांचा आहे व याच कारणासाठीं १८१५ मध्यें रामचंद्रराव यांस सुभेदारीचीं वस्त्रें देण्याचें नाकारलें. पुढें १८१७ मध्यें झांशी संस्थानवरील सर्व स्वामित्व पेशव्यांनीं केलेल्या तहान्वयें इंग्रजाकडे आलें, व तशी इंग्रज सरकारची मालकी झाल्यानंतर शिवरामभाऊंच्या इच्छेप्रमाणें या संस्थानचें स्वामित्व राव रामचंद्र यांजकडे वंशपरंपरेनें दिलें.

पुढें १८३७ मध्यें राव रामचंद्र वारले. त्यांनीं मरणापूर्वी एक दत्तक घेतला होता पण त्यास सरकारनें मान्यता दिली नाहीं, व त्यांचे चुलते रघुनाथराव व त्यांच्या मृत्यूनंतर गंगाधरराव यांस गादी देण्यांत आली. आतां गंगाधरराव मरण पावले आहेत.

८. त्यांस औरस संतति नाहीं म्हणून वंशपरंपरा चालणाऱ्या झांशीच्या गादीला कोणी वारस नाहीं.

९. राजेसाहेबांनीं मरणाअगोदर एका मुलास दत्तक घेतलें होतें. वंश-वृक्ष पाहातां तो त्यांचा लांबचा आप्त आहे. शिवाय राजेसाहेबांचा दत्तक घेण्याचा विचार अगोदरपासून नव्हता. त्यांनीं हा दत्तक घेतला हें ऐकून खुद्द दरबारी लोकांनाच आश्चर्य वाटलें असावें.

१०. राणीसाहेबांनीं पाठविलेल्या खलित्यांत बुंदेलखंडांतील तेहेरी, दतिया, जालवण या संस्थानांचा दत्तक मान्य करण्यांत आला त्याप्रमाणें झांशीचा करावा असें म्हटलें आहे.

११. परंतु तेहेरी व दतिया हीं संस्थानें स्वतंत्र आहेत. झांशीप्रमाणें मांडलिक नाहींत.

१२. स. १८१७ च्या तहांतील दुसऱ्या कलमोप्रमाणें झांशी हेच जहागिरदार वंशपरंपरागत असल्यानें हा दत्तक मान्य करावा असें महाराणीसाहेबांनीं आपल्या खलित्यांत लिहिलें आहे. पण त्यांनीं कोणत्याहि मुलास दत्तक घेतला तरी सरकार त्यास मान्यता देईल अशी त्यांची चुकीची समजूत झालीसें दिसतें. झांशी हें मांडलिक संस्थान आहे, व मांडलिकांचे हक्क मर्यादित करण्याचा अधिकार सार्वभौम सरकारला आहे. मूळ हेतु औरस वंशाकडे संस्थान चालवावें असा होता व आतां तसा वारस राहिलेला नाहीं. तेव्हां गंगाधरराव यांनीं घेतलेला दत्तक अमान्य करण्याचा हक्क निर्विघ्नपणें सरकारास आहे.

१३. औरस संतति नसल्यामुळें संस्थान खालसा करण्याचा सरकारला हक्क आहे. झांशी संस्थान आमचे ताब्यांत आल्यानें प्रजेचें कल्याणच होईल. ही गोष्ट राव रामचंद्र हे अधिकारावर असतां तेथें झालेल्या अव्यवस्थित कारभारावरून सहज ध्यानीं येईल. जालवण संस्थानचीहि अशीच गोष्ट आहे. संस्थानचा वसूल कमी कमी होत जाऊन संस्थानला मनस्वी कर्ज झालें, अंदाधुंदी माजली ही स्थिति चांगली नव्हे.

१४. यासाठीं राजकीय धोरण व कर्तव्यकर्म यांकडे लक्ष देऊन मी असा ठराव करतों कीं, झांशी संस्थान बेवारस समजून खालसा करावें.

पोलिटिकल एजंटांनीं सुचविल्याप्रमाणें राणीसाहेबांस भरपूर तनखा द्यावा व प्रान्ताची व्यवस्था मे. गव्हर्नरकडे सोंपवावी."

लॉर्ड दलहौसीच्या ठरावास डोरिन, कर्नल लो व हॉलिडे यांनींहि अनुमती दिली, व झांशी राज्य खालसा करण्याचें ठरून त्याप्रमाणें पोलिटिकल एजन्टास लिहून गेलें!

"मनसा चिंतितं कार्यं दैवं अन्यत्र चिंतयेत्"

विधिघटना काय आहे हें मानवी बुद्धीच्या आकलनापलीकडील असल्यानें मनुष्य आपल्या इच्छेप्रमाणें नाना प्रकारचीं मनोराज्यें उभारीत असतो. परंतु सृष्टीची नियंत्रणशक्ति म्हणून जी एक शक्ति तिचें मानवी इच्छेशीं नेहमींच जमतें असें नाहीं. किंबहुना सामान्यतः या दोन्ही इच्छांचा मेळ फारसा बसतच नाहीं असें म्हटलें असतां त्यांत अतिशयोक्तिहि नाहीं.

गंगाधरराव अशा समजुतींत मृत्यु पावले कीं, आपल्यामागें आपलें संस्थान चालवणार. राणीसाहेबांचीहि तशीच अपेक्षा असणें स्वाभाविक होतें. इंग्रजांशीं झालेले पूर्वींचे तह—करार, इंग्रजांस आपत्प्रसंगीं आपल्या घराण्यानें वेळोवेळीं दिलेलें अनुपम साहाय्य, व अधिकाऱ्यांनीं अनेकदां दिलेलीं अभिवचनें, यांमुळें आपण हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें घेतलेला दत्तक इंग्रज सरकार मान्य करणारच अशी त्यांना खात्री वाटत होती. तरीहि त्यांनीं आपले प्रयत्न सुरू ठेवलेच होते. त्यांनीं ता. ३ डिसेंबर रोजीं केलेला अर्ज यामागें दिलाच आहे. तो अर्ज, त्यासोबत पाठविलेले पुराव्याचे दाखले, इत्यादि कागदपत्र त्यांनीं मेजर मालकम यांचेमार्फत हिंदुस्थान सरकारकडे पाठविलेच होते; व मेजर मालकमनेंहि पूर्वीं दिलेला आपला अभिप्राय बाजूस ठेवून एक नवा अभिप्राय लॉर्ड दलहौसीकडे ता. २८ डिसेंबर १८५४ रोजीं पाठविला. या अभिप्रायांत दामोदरराव यांच्या दत्तविधास मान्यता द्यावी अशी सूचना केली होती. परंतु काय दैवयोग पहा, मेजर मालकम यांचें अनुकूल पत्र लॉर्ड दलहौसीच्या हातीं त्यानें खालसाचा ठराव केल्यानंतर दुसऱ्या दिवशीं पडलें! योगायोग म्हणतात तो हा असा! मालकमच्या विनंतीचा दलहौसीकडे उपयोग किती झाला असता हा प्रश्न वेगळा आहे. कारण त्याचें आतांपर्यंतचें धोरण कांहीं ना कांहीं सबब काढून देशी राज्यें खालसा करावयाचीं व अखेर हिंदुस्थानचा नकाशा एकरंगी करावयाचा हें होतें. त्यास मालकमचा दुसरा अभिप्राय रुचणें शक्यच नव्हतें. पण मालकमनें आपली बाजू मांडली एवढेंच श्रेय फार तर मालकमच्या पदरीं पडतें.

मेजर मालकम यानें लिहिलेल्या पत्राचा सारांश असा :—

"सन १८१७च्या तहान्वयें लक्ष्मीबाईसाहेब आपला दत्तक पुत्र मान्य करावा असें म्हणतात. झांशीचें घराणें आतांपर्यंत आपणांशीं अत्यंत निष्ठेनें वागत आलें आहे ही गोष्टहि अखेरचा निर्णय देतांना विचारांत घेणें अगत्याचें आहे.

"सन १८१७ च्या तहांतील दुसऱ्या कलमान्वयें झांशीचे वारस मान्य केले आहेत व झांशीच्या राणीनें पाठविलेल्या खलित्यांतहि तिनें अत्यंत राजनिष्ठा व्यक्त केलेली आहे."

Papers on the annexation of Jhanshi

परंतु या कशाचाहि कांहीं एक उपयोग न होतां लॉर्ड दलहौसीनें झांशी संस्थान खालसा करावें असां हुकूम मेजर मालकम याला पाठविला व मेजर मालकमनें ता. १५ मार्च १८५४ रोजीं झांशी संस्थान खालसा केले अशाबद्दल पुढीलप्रमाणें जाहीरनामा प्रसिद्ध केला.

" मेजर डी. ए. मालकम, पोलिटिकल एजन्ट ग्वाल्हेर, बुंदेलखंड व रेवा, यांजकडून पुढीलप्रमाणें जाहीरनामा काढण्यांत येत आहे :—

" झांशीचे महाराज गंगाधरराव हे ता. २१ नोव्हेंबर १८५३ रोजीं कैलासवासी झाले. त्यांनीं मरणापूर्वीं दामोदरराव यांस दत्तक घेतले आहे. परंतु नामदार गव्हर्नर जनरल यांनीं तें दत्तविधान नामंजूर केल्यामुळें हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी यांनीं ता. ७ मार्च १८५४ चा हुकूम काढला त्याप्रमाणें झांशी संस्थान ब्रिटिश सरकारचे राज्यांत सामील करण्यांत आलें आहे. या जाहीरनाम्याचे द्वारें सर्व जनतेस कळविण्यांत येतें कीं, झांशी प्रान्त तूर्त बुंदेलखंडाचे एजन्ट मेजर एलिस यांच्या ताब्यांत दिला आहे; तेव्हां झांशी संस्थानांतील सर्व प्रजेनें आपण ब्रिटिश सरकारचे अंमलाखालीं आहों असें समजून यापुढें मेजर एलिस यांस वसूल देत जावा, आणि सुखी व संतुष्ट असावें. "

(सही) डी. ए. मालकम

हा जाहीरनामा प्रसिद्ध होतांच झांशीच्या नागरिकांची स्थिति अत्यंत दुःखमय झाली. शिवरावभाऊचा राजवंश लेखणीच्या एका फटकान्या-सरशीं नष्ट केला याबद्दल जनतेस परमावधीचें दुःख झालें! इंग्रज सरकारशीं आतांपर्यंत आपण अत्यंत निष्ठेने वागलों, त्यांस अनेकदा पदरमोड करून साहाय्य केलें त्याचें कटु फल मिळेल अशी सहजच कोणाची कल्पना नव्हती.

हा जाहीरनामा राणीसाहेबांस देण्यासाठीं मेजर एलिस राजवाड्यांत गेला. महाराणीसाहेब चिकाच्या पडद्याआड बसल्या होत्या. मेजर एलिस यांनीं कारभारीमंडळामार्फत गव्हर्नर जनरलचा ठराव राणीसाहेबांस वाचून दाखविला, व झांशी संस्थान खालसा करण्यांत आलें असून आपणास आपल्या इतमामाप्रमाणें भरपूर तनखा देण्यांत येईल असें आश्वासन देण्यांत आलें. संस्थान खालसा केल्याची दुःखवार्ता त्यांच्या कानीं पडतांच

त्यांना अनावर शोक होऊन त्या कष्टी झाल्या. मेजर एलिसनें अनेक प्रकारें त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला व शेवटीं जाण्याची परवानगी मागितली, तेव्हां 'मेरी झांशी नहीं देऊंगी,' असे आवेशयुक्त उद्गार त्यांचे तोंडून बाहेर पडले! तेव्हां मेजर एलिस यानें पुनः एकवार झांशी खालसा केल्याचें सांगून त्यांचा निरोप घेतला. या प्रकारामुळें राणीसाहेबांच्या मनांत काय कल्लोळ उठले असतील त्याची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. आपल्या घराण्याची आतांपर्यंतची निष्ठा, आपण केलेली मदत, मिळालेलीं आश्वासनें, यामुळें दामोदरराव हे धनी होणार अशी त्यांना खात्री वाटत होती, परंतु वाऱ्याच्या झुळुकेनें पत्त्याचा बंगला पडावा, त्या प्रमाणें अखेरीस त्यांचें मनोराज्य ठरून त्या दुःखसागरांत बुडून गेल्या.

हा जाहीरनामा काढल्यानंतर मेजर मालकम यांनीं राणीसाहेबांची पुढीलप्रमाणें व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें केली असल्याचें त्यांस कळविलें.

(१) राणीसाहेबांस दरमहा पांच हजार रुपये तनखा तहाहयात द्यावा.

(२) झांशींतील राजवाडा त्यांस राहण्यासाठीं द्यावा. ती त्यांची मिळकत समजावी.

(३) राणीसाहेब व त्यांचे आश्रित यांजवर ब्रिटिश कोर्टाचा अंमल चालूं नये.

(४) संस्थानचें सर्व जवाहीर, खासगी शिल्लक यांचा हिशेब होऊन ती राणीसाहेबांस द्यावी.

(५) राणीसाहेबांच्या नातेवाइकांची यादी करून त्यांना चरितार्थाला मिळावें यासाठीं ती यादी हिंदुस्थान सरकारकडे पाठविण्यांत यावी.

याप्रमाणें व्यवस्था केली असतां ता. २५ मार्च १८५४ रोजीं पुनः एक हुकूम काढून दलहौसीनें राणीसाहेबांस कळविलें कीं, "कायद्याप्रमाणें राज्य चालविण्याचा अधिकार दत्तकास नसला तरी गंगाधरराव यांच्या मिळकतीवरील हक्क व वारसा दत्तक मुलाचा असल्यानें तो वयांत येईपर्यंत संस्थानचें जवाहीर व खासगी मिळकत इंग्रजांच्या ताब्यांत असावी, व मुलगा वयांत आल्यावर ती त्याजकडे देण्यांत यावी."

झांशीचे खजिन्यांत रोख सहा लक्ष रुपये होते ते दत्तक मुलाच्या नांवानें इंग्रजी खजिन्यांत ठेवण्यांत आले व दामोदरराव वयांत येतांच त्याजा-

सुद्धां ही रक्कम त्यांस द्यावी असें ठरविलें. संस्थानचें जवाहीर, सोन्यारुप्याचें सामान, भांडीं हीं दामोदररावासाठीं राणीसाहेबांच्या स्वाधीन करण्यांत आलीं. नगरांतील थोरला वाडा त्यांना देण्यांत आला. किल्ला खालीं करून तो इंग्रजांच्या ताब्यांत देण्यांत आला.

झांशीचा ताबा घेतांच झांशी सैन्याला सहा महिन्यांचा पगार देऊन नोकरींतून मुक्त केलें व त्याऐवजीं इंग्रजी सैन्य किल्ल्यावर ठेवलें. झांशीच्या किल्ल्यांतील युद्धसामुग्रीचा नाश केला. तोफा निरुपयोगी करून टाकल्या.

अद्यापिहि आपणास न्याय मिळेल अशी राणीसाहेबांस आशा वाटत होती, म्हणून त्यांनीं पांच हजार रुपये तनखा घेण्याचें नाकारलें व विलायत सरकारकडे खटपट चालविली. त्यासाठीं त्यांनीं उमेशचंद्र बानर्जी व आणखी एक युरोपियन यांस साठ हजार रुपये देऊन विलायतेस पाठविलें. त्याचबरोबर संस्थान खालसा कां करूं नये अशाबद्दल एक अर्ज दिला होता, परंतु या वकीलद्वयानें विलायतेंत काय काम केलें हें अखेरपर्यंत समजलें नाहीं. रुपये मात्र बुडाले!

कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं हिंदुस्थान सरकारचा निर्णय मान्य करून झांशी खालसा करण्यास मान्यता दिली, व तसा हुकूम २ ऑगस्ट १८५४ रोजीं करण्यांत आला. यासंबंधांत इतिहासकार 'के' हा म्हणतो:—

In vain the widow of the late Rajah, whom the Political Agent described as "a lady bearing a high character and much respected by every one at Jhanshi," protested that her husband's house had ever been faithful to the British Government, in vain she dwelt upon services rendered in former days to that Government and the acknowledgements which they had elicited from our rulers,—in vain she pointed to the terms of the treaty, which did not to her *simple* understanding, bar successors in

accordance with laws and usage of her country—in vain she quoted precedents to show the grace and favour sought for Jhanshi had been yielded to other states. The feat was irrevocable. It had been ruled that the interest both of the Jhanshi and the British Government imperatively demanded annexation." So it lies in the midst of other British Districts; said Lord Dalhausie, "the possession of it as our own will tend to the improvements of the general internal administration of our possessions in Bundelkhand that its incorporation with the people of Jhanshi, a reference to the results of experience which suffice to show." The results of experience have since shown to what extent the people of Jhanshi appreciated the benefits of that incorporation."

Kaye : History of Sepoy War P. 92 Vol. I

आपणांस हिंदुस्थानांत प्रतिकार करण्यासाठीं एकहि शक्ति उरली नाहीं. अशा उन्मादांत दलहौसीनें अत्यंत हीनपणानें न्यायान्याय बाजूस सारून झांशी व इतर प्रान्त खालसा केले. झांशी खालसा करूनच तो न राहतां राणीसाहेबांच्या दुःखावर डागण्या दिल्याप्रमाणें आणखी एक कृत्य घडलें, त्यामुळें त्या स्वाभिमानी आर्यमहिलेचा स्वाभिमान डिवचला गेला असल्यास त्यांत आश्चर्य काय ?

झांशी संस्थान खालसा करण्यांत आल्यावर सर्व दरबारी लोकांस रजा देण्यांत आली. राणीसाहेबांचा कारभार त्यांचे पिते श्री. मोरोपंत तांबे व लक्ष्मणराव बांडे हे पहात. राणीसाहेबांनीं आपला दत्तक पुत्र दामोदरराव याचा व्रतबंध करण्याचें ठरविलें. त्यांच्याजवळ तर पैसा नव्हता, सरकारनें सर्व शिल्लक अडकवून ठेविली होती; म्हणून मुंजीसाठीं एक लक्ष रुपये त्यांनीं सरकारजवळ मागितले. सरकारनें शिल्लक असलेले सहा लक्ष रुपये

दामोदरराव यांचें नांवें बँकेंत ठेवले होते त्यांतून ही रक्कम त्यांनीं मागितली. परंतु ही अज्ञानाची शिल्लक आहे, पुढें तो सज्ञान झाल्यावर त्यानें आपली रक्कम मागितली तर सरकारास द्यावी लागेल. तेव्हां अज्ञानानें आपली रक्कम मागितल्यास आपण ती परत देऊं असें अभिवचन देत असल्यास रक्कम देण्यांत येईल, असें हिंदुस्थान सरकारनें पोलिटिकल एजन्टामार्फत कळविलें. तेव्हां राणीसाहेबांना सर्व अपमान गिळून चार प्रतिष्ठित लोकांना जामीन देऊन ही रक्कम मिळवावी लागली व नंतर मुंजीचा समारंभ माघमासीं उरकण्यांत आला!

दलहौसीच्या या राजनीतीचें अखेर पर्यवसान काय झालें हें पुढें यथाकालीं निवेदन करण्यांत येईलच; पण दलहौसीनें झांशी खालसा करण्याचें तेवढें एकच कृत्य केलेलें नाहीं, त्याच्या जोडीला त्याच्या पापकृत्यांची एक मालिकाच गुंफावी लागेल. तो इतिहास पुढील प्रकरणांत देण्यांत येत आहे.

## ६ : डलहौसीचें धोरण

I take occasion of recording my strong and deliberate opinion, that in the excrcise of a wise and sound policy, the British Government is bound not to put aside or neglect such rightful opportunities of acquiring territory or revenue, as may from time to time present themselves, whether they arise from the lapse of subordinate states, by the falture of all heirs of every deseription whatsover or from the failure of heirs natural where the succession can be sustained only by the sanction of the Government being given to the ceremony of adoption, according to Hindu law."

Lord Dalhausie's Despatch.

कुसलीहि संधी येतांच आपला राज्यविस्तार केला पाहिजे हें हिंदुस्थानांतील राजकारणाचें धोरण दलहौसीचे वरील सूत्रांत ग्रथित केलें होतें व संधी येतांच त्यानें त्याची बजावणी करण्यास सुरुवात केली. ही सुरुवात करण्यापूर्वी हिंदुस्थानांतील परिस्थितीहि त्याला सर्वतोपरी अनुकूल अशीच झाली होती. इंग्रजी सत्तेचा प्रतिकार करील अशी एकहि शक्ति उरली नसल्यानें तो ठरवील तें धोरण सुरू झालें. आणि हें धोरण अंगिकारतांना त्याला हातीं शस्त्रहि फारसें घ्यावें लागलें नाहीं. फक्त पंजाब व ब्रह्मदेश हे देश घेण्यासाठीं त्यानें शस्त्राचा उपयोग केला. हिंदुस्थान त्यानें जिंकला, अनेक हिंदी राज्यें ब्रिटिश राज्यांत मिसळविलीं, त्यासाठीं त्यानें शस्त्राचा उपयोग मुळींच केला नाहीं. त्याला बळाचा उपयोग करावा लागला नाहीं. त्यानें सर्वथा वाममार्ग अंगिकारला. यासंबंधानें प्रसिद्ध इतिहासकार 'के' म्हणतो,

"He (Dalhausie) had then done with foreign wars; his after-career was one of peaceful invasion.

# डलहौसीचें धोरण

अनुक्रम
विभाग ५५
क्रमांक

Ere long there was a word which came to be more dreaded than that of conquest. The native mind is really convinced by the inexorable logic of the sword. There was no appeal from such arbitration. To be invaded and to be conquered is a state of things appreciable by the inhabitants of India. It is his "Kismet" his fate, God's will. One stronger than he cometh and taketh all that he hath. There are, however manifest compensations. His religion is not invaded, his institutions are not voilated. Life is short, and the weak man, patient and philosophical is strong to endure and mighty to wait. But lapse is a dreadful and an appalling word for it persues the viction beyond the grave. Its significance in his eyes is nothing short of eternal condemnation.

'लॅप्स' या शब्दाला हिंदुस्थानच्या इतिहासांत एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. तलवारीपेक्षांहि लॅप्स या शब्दाला हिंदी राजे फार भिऊं लागले! हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्तेशीं देशी राजांनीं स्नेहभावाचा तह केला कीं, त्यांचें अस्तित्वच गव्हर्नर जनरलच्या लहरीनें नष्ट व्हावयाचें असाच याचा अर्थ ठरून गेला होता. या धोरणाचा मनःपूत पुरस्कार करणारा लॉर्ड दलहौसी हा मूळ स्कॉटलन्डचा. त्याचें उपनांव रॅम्से, व हाच लॉर्ड दलहौसी झाल्यानंतर त्यानेंच आज हिंदुस्थानांत जें इंग्रजी राज्य विस्तारलेलें दिसत आहे तें संपादन केलें; कारण त्याच्यानंतर मग हें स्वाहाकारी धोरण सोडण्यांत आलें.

या स्कॉच सरदाराजवळ सूक्तासूक्त विचार, न्यायान्याय, या गोष्टींचा मागमूसहि नव्हता. फलावरून साधनांची योग्यता ठरविणारा तो असून मॅकएव्हेलीचा पट्टछात्र शोभेसा होता. अर्ल एल्जिन हाहि हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल असतांना त्यानें असे उद्गार काढले कीं, 'आम्हाला धोरण

वगैरे कांहीं नाहीं. वरून भारतमंत्र्याकडून येणाऱ्या हुकुमांची बजावणी करणें एवढेंच आमचें काम.' या धोरणाप्रमाणें दलहौसीच्या कारकीर्दीकडे पाहतां असें आढळून येतें कीं, स्वाहाकारी धोरणाचा तो एकटाच पुरस्कार करणारा नव्हता. मेकॉले, लॅन्सडौन, कॉब्डेन व ब्राइट यासारखे प्रसिद्ध मुत्सद्दी याच धोरणाचा पुरस्कार करणारे होते. आणि त्यांत हिंदुस्थानचें दुर्दैव असें कीं लॉर्ड दलहौसी गव्हर्नर जनरल असतांना भारतवर्षाचीं सूत्रें सर जॉन हॉब हौस–लॉर्ड ब्रोटन–याच्या हातीं होतीं. या गृहस्थापाशीं सारासार विचार मुळींच नव्हता. एकदां तर त्यांना कैदेची शिक्षाहि झाली होती, असें एका इतिहासकारानें त्याबद्दल म्हटलें आहे. आणि हे लॉर्ड ब्रोटन दलहौसीचे काका होते. अर्थात् हिंदुस्थानांतील राजघराणीं नष्ट करण्यामुळें त्यांना कसलेंच सुखदुःख वाटण्याचें कारण नव्हतें. दलहौसीनें देशांतील निरनिराळीं राज्यें खालसा केलीं तीं सैन्य प्रदर्शनानें, अविश्वासानें, तहनामे गुंडाळून व विश्वासघात करून!

अशा रीतीनें सातारा, नागपूर, झांशी हीं मराठी राज्यें व इतर अनेक राज्यें त्यानें खालसा केलीं. त्यानें खालसा केलेलीं राज्यें—

| | | | |
|---|---|---|---|
| सिंध | –सन १८४३; | झांशी | –सन १८५४; |
| कैथाल (पंजाब) | – ,, १८४३; | नागपूर | – ,, १८५४; |
| सातारा | – ,, १८४७; | कर्णाटक | – ,, १८५५; |
| पंजाब | – ,, १८४९; | अयोध्या | – ,, १८५५. |
| संबलपूर | – ,, १८४९; | | |

दलहौसीच्या पूर्वींहि तंजावर–१७९६; पुणें–१८१८; सुरत–१८०० याशिवाय कुलाबा, मांडवी, अंबाला हीं राज्यें व जहागिरी त्याच्यापूर्वींच्या इंग्रज मुत्सद्द्यांनीं 'Lapse' च्या नांवाखालीं जप्त केल्या होत्याच. सन १८३४ ईस्ट कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं पुढीलप्रमाणें एक नियमच आंखून दिला होता तो असा:—

"Whenever it is optional with you to give or to withhold your consent to adoptions the indulgence should be exception and not the rule and should never be granted but as a special mark of approbation."

दत्तकाचा अधिकार देतांना तो हक्क म्हणून देऊं नका, असा हा आदेश होता, आणि घालून दिलेल्या धड्याबरहुकूम दलहौसीनें कारभार केला.

दोन तृतीयांश हिंदुस्थान अशा रीतीनें रक्तवर्णाचा झाला, व असें कां, अशी विचारणारी शक्ति उरली नाहीं! असें असतांहि पुष्कळ हिंदु - मुसलमान राजे आपआपल्या राज्यांत स्वतंत्रपणें कारभार करीत, कर बसवीत, सैन्य ठेवीत, दरबार भरवीत, व आपल्या प्रजेकडून योग्य तो मानमरातब राखून घेत. त्यांच्या प्रजेच्या जीवितवित्ताचे ते धनी होते! परंतु असें असलें तरी त्यांच्या आंवतींभोंवतीं इंग्रजी सत्ता पसरली होती व त्यांचीं राज्यें ब्रिटिश सत्ता-समुद्रांतील बेटाप्रमाणें होती. त्यांच्या भोंवतालीं ते स्वतःच एका काळीं सत्ताधारी असलेला प्रान्त विखुरला होता. त्यांना नाममात्र स्वातंत्र्य असलें तरी इंग्रजी सत्ता झुगारून स्वतंत्र होण्याची कल्पनाहि त्यांच्या मनांत येणें शक्य नव्हतें, इतके ते हतबल झाले होते, व आपल्या नशिबाला बोल लावून ब्रिटिश सत्तेपुढें निमूटपणें माना लववीत होते.

या सर्व राजांशीं ब्रिटिश सत्ताधारी तहांनीं बद्ध झाले होते. त्या तहांत त्यांचें संस्थानान्तर्गत स्वातंत्र्य मान्य करण्यांत आलें असून त्यांचें राज्य कायम राखण्याची हमीहि ब्रिटिशांनीं घेतली होती. अर्थातच अशा तहांतून वारसा हक्क म्हणजे काय, दत्तक कोणाला म्हणावयाचें इत्यादि प्रश्नांचा तपशील नव्हता. कारण उघडच आहे. आणि असा तपशील कोणत्याहि तहांत नमूद करण्याची प्रथा नाहीं. तह करावयाचे ते शक्य तेवढ्या थोड्या भाषेंत व मुख्य मुद्दा ध्यानीं घेऊन केले जातात, उगाच काल्पनिक गोष्टी डोळ्यांसमोर ठेवून त्यांच्या तपशील त्यांत नोंदीत नाहींत. परस्परांत शान्तता व स्नेह नांदेल अशा गोष्टी अल्पाक्षरांत लिहिल्या जातात, व त्यांतून कांहीं विवादात्मक प्रश्न निर्माण झालेच तर सामान्यतः सारासार-बुद्धी चालवून त्याप्रमाणें त्यांचा उलगडा करावयाचा असतो. हा सर्व-साधारण नियम, व त्यास अनुसरून चिरकालिन वंश चालविणें याचा अर्थ त्याचे असतील ते हक्क, पदव्या व सत्ता चालविणें हा आहे. व तो अर्थ ज्या देशांतील तें राज्य असेल त्या देशांतील रूढी - व्यवहार ध्यानीं घेऊन करावयाचा असतो. देशांतील बहुतेक सर्व बलिष्ठ राज्यें पादाक्रान्त होईपर्यंत कंपनी सरकारनें आपलें धोरण असेंच मोघम ठेवलें होतें.

सातारा राज्य दलहौसीनें खालसा केलें तें १८१८ व १८१९ चे दोन्ही तह घाब्यावर बसवून. हिंदुसमाजांत दत्तकाचा हक्क हा धर्माप्रमाणें त्रिकालाबाधित मानला जातो. एखाद्या राजाला पुत्रसंतति होत नाहीं असें वाटतांच तो दत्तकपुत्र घेतो हा चिरनियम आहे. परंतु नीतिनियम, सारालार विचार, न्यायान्याय, धर्म–रूढी या सर्व गोष्टी बाजूला ठेवून गव्हर्नर जनरल साहेबांनीं आपल्या लहरीप्रमाणें राज्यें बिनवारस ठरवून तीं खालसा करण्याचें सत्र सुरू केलें आणि त्यांत पहिला बळी घेतला सातारा राज्याचा. प्रतापसिंहांस हद्पार करून अप्पासाहेबांस गादीवर बसविलें. प्रतापसिंहांनीं एक दत्तक घेतला होता. अप्पासाहेब यांनींहि मृत्युसमयीं एक दत्तक घेऊन त्याला वारस नेमिलें. प्रतापसिंहास हद्पार करण्यांत आलें तेव्हांच सर रॉबर्ट ग्रँट यांचें तर म्हणणें असें कीं, 'सातारा हें स्वतंत्र राज्य ठेवल्यानें ब्रिटिश प्रदेशांत उगाच खंड पडतो. आतां अनायासें संधी आली आहे, तेव्हां राज्य खालसा करावें हें बरें.' व या गोष्टीस पोषक अशीं उदाहरणेंहि कांहीं कमी नव्हतींच. या ब्रिटिश नीतीसंबंधीं मि. टॉरेन्स म्हणतो :—

"The history of British connection with India recorded the names of many chiefs and princes whom we began with advancing to honour or at least supporting with our protection and ending with deposing, destroying, depriving of a great part of their territories or reducing to political annihilation."

पहिल्या प्रथम राजांचा खूप गौरव करावयाचा व ते पुरे काबूंत आले म्हणजे त्यांना गिळंकृत करावयाचें.

महाराज प्रतापसिंहांच्या वेळींच सातारा खालसा व्हावयाचें परंतु गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑक्लंड त्या वेळीं अफगाणिस्तानाच्या मोहिमेंत गुंतला असल्यानें तें लांबणीवर पडलें व लॉर्ड दलहौसीनें तें १८४७ सालीं महाराज आप्पासाहेब कैलासवासी होतांच पुरें केलें. सातारा राज्य खालसा केल्याची वार्ता हिंदुस्थानांत पसरतांच देशी राजांचीं धाबीं दणाणलीं. माळवा व राजपुताना येथें तर आश्चर्य व संताप उत्पन्न झाला. सर्वच राजांना आपल्या राज्याबद्दल चिंता उत्पन्न झाली. 'देशी राजांचा विश्वास उडाला', असल्या-

बद्दल सर जॉन लोनें एका पत्रांत लिहिलें. कर्नल मॅकफर्सन यानें शिंद्याबद्दल असें म्हटलें कीं, शिंदे व इतर हिंदु राजे यांना आपल्या वारसाबद्दल मोठी चिंता उत्पन्न झाली आहे.' बंगाल कौन्सिलचा सभासद सर फ्रेडरिक करी यानें असें नमूद केले कीं "साताराच्या निर्णयामुळें सर्व देशाला आश्चर्याचा झटका बसला असून सर्वत्र हाहा:कार उडाला आहे." दत्तक प्रश्नाबद्दलच ही चिंता उत्पन्न झाली असें नसून ज्यांना औरस संतति होती तेहि असेच घाबरून गेले. कारण राज्यावर कोणी बसावयाचें हें ठरविण्याचा हक्क सार्वभौम सत्तेनें आपल्या हातीं घेतला.*

यानंतरची आहुती नागपूरची पडली. नागपुर राज्याविषयीं तेथील रेसिडेन्ट सर रिचर्ड जेन्किन्स यानें असे उद्गार काढले होते कीं, तें खालसा करणें आपणास हितावह होणार आहे. अर्थात् या राज्याला वारस नाहीं म्हणून तें खालसा करणें या म्हणण्यांत कांहींच अर्थ नव्हता! परंतु गव्हर्नर-जनरलनें कौन्सिलच्या संमतीनें नागपूरहि खालसा केलें. राण्यांना पेन्शनें ठरविलीं. जडजवाहिराची मोजदाद केली. गादीवर बसविण्यांत आलेले दत्तक राजे जसवंत अहीराव यांचा हक्क बुडविण्यांत आला. गादीला वारस नाहीं म्हणून राज्य खालसा करण्यांत येऊन तें एका कमिशनरच्या स्वाधीन करण्यांत आलें. महाराणी बंकाबाई यांनीं आपल्या यत्नाची पराकाष्ठा केली. सामोपचार, धाक, त्रागा सर्व प्रकार त्यांनीं केले, परंतु अखेरीस त्याना सर्व-सत्ताधारी इंग्रजी सत्तेपुढें नमावें लागून राज्यावरील हक्क सोडावा लागला.

परंतु एवढ्यानें नागपुरच्या राज्यलक्ष्मीची विटंबना थांबली नाहीं. रघूजी-राजांपासून अनेक पिढ्यांचें जें जडजवाहीर नागपूरच्या खजिन्यांत होतें त्याचा कलकत्ता येथील 'मॉर्निंग क्रॉनिकल' पत्रांत जाहीरनामा काढून जाहीर लिलांव करण्यांत आला! या प्रकाराचा परिणाम हिंदी लोकांच्या मनावर कशा प्रकारचा झाला असेल याची कल्पना सहज करतां येण्याजोगी आहे. आपला एक विश्वासु दोस्त, त्याच्या दौलतीचा असा जाहीर लिलांव करणें ही गोष्ट हिंदी संस्कृतीला सर्वथा अपरिचित होती; व त्याचे पडसाद प्रत्येक

---

* यासंबंधानें जास्त माहिती वाचकांनीं Thoughts on the policy of the Crown by J. M. Ludlow. या पुस्तकांत व मेजर इव्हान्स बेल यांच्या Restrospects and prospects of Indian policy या पुस्तकांत पहावी.

राजनगरींत, बाजारपेठांतून, जनानखान्यांतून उमटल्याशिवाय राहिले नाहींत; व यापुढें कोणाची पाळी येणार याची धास्ती मात्र सर्वत्र उत्पन्न झाली.

यानंतर झांशीचा घांस कसा घेण्यांत आला ती हकीकत तपशीलवार मागें दिलीच आहे. यानंतर मोठा घांस घेण्यांत आला अयोध्येचा. दलहौसीच्या स्वाहाकारांतील शेवटची पूर्णाहुती अयोध्येची पडली. अयोध्या प्रान्त खालसा करण्याला कसलेंहि कारण नव्हतें. नीतिदृष्ट्या व राजकीय दृष्ट्याहि हें कृत्य अन्यायाचें होतें. याला तर अनेक इतिहासकारांनी Decoity in Excelis असेंच म्हटलें आहे. यापुढें जें स्वातंत्र्ययुद्ध झालें त्याला हें एक महत्त्वाचें कारण झालें असें इतिहासज्ञांचें म्हणणें आहे.

अयोध्येच्या नबाब वजिरांनीं मोडकळीस आलेल्या मोगली सत्तेचें जूं फेकून देण्यास कंपनीनें प्रारंभापासूनच साहाय्य देऊन प्रोत्साहन दिलें. मार्क्विस ऑफ हेस्टिंग्जनें तर अयोध्येच्या नबाबांना हिज् मॅजेस्टी म्हणण्यासच सुरवात करून दिल्ली सत्तेशी अयोध्येचा कांहीं हितसंबंध नाहीं असें उघड जाहीर केलें. अर्थात् इंग्रजांच्या कृपेनें त्याला हें राजपद मिळालें असल्यानें तेथील नबाब केवळ नाममात्र सत्ताधारी होता हें सहज ध्यानीं येईल. यासंबंधानें हेनरी लॉरेन्सनें सन १८४५ च्या जानेवारीच्या कलकत्ता रिव्ह्यूमध्यें असे उद्गार काढले आहेत कीं :—

No portion of India has been more discussed in England than Oudh. × × nominally independent in its home relations but periodically used as a wet-nurse to relieve the difficulties of the East India Company's finances. Oudh affords but a discreditable chapter in our Indian annuals and furnishes a fearful warning of the lengths to which a statesman may be carried, when once he substitutes expediency and his own view of public advantage for the simple rule of right and wrong. British interference with that province has been as prejudical to its court and people, as it has been disgraceful to the British name, to quote the

words of colonel Sutherland an able and temperate writer, 'there is no state in India with whose Government we have interferred so systematically and so uselessly as with that of Oudh.'

वॉरन हेस्टिंग्जच्या कारकीर्दीपासून अयोध्येचा कारभारांत इंग्रज सत्ताधीशांनी सारखी ढवळाढवळ चालविली होती. ती कशी, तिचे परिणाम काय हें निवेदन करण्याचें हें स्थळ नाहीं. स.१८०१ मध्यें इंग्रजांनीं नबाबाशीं तह करून " to defend the territory which will remain to his excellency the Vizirs against all foreign and domestic enemies " असें बांधून घेतलें होतें. परंतु इंग्रजांचा या प्रान्तावर फार दिवसांपासून डोळा होता. अयोध्या प्रान्त हा इंग्रजांना हवापाण्याच्या दृष्टीनें हितकर वाटत होता. या कारणामुळें अयोध्येचा नबाब राज्यकारभारास नालायक ठरविणें ही गोष्ट क्रमप्राप्तच होती, व त्याप्रमाणें स. १८५५ मध्यें अयोध्याप्रान्त खालसा करून दलहौसी इंग्लंडला परत गेला, व हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यावर गंडान्तराची योग्य प्रकारें तरतूद करून तो निवृत्त झाला !

# ७ : कमलवासिनी लक्ष्मी

कमल आणि लक्ष्मी, लक्ष्मी आणि कमल यांचें साहचर्य अखण्ड, अनादि कालापासून आहे. कमलाधिष्ठित लक्ष्मी हें हिंदुमात्राचें वैभवसंपन्नतेचें प्रतीक मानलें जातें! आणि ही लक्ष्मी तर अशी कीं मनुष्यमात्राच्या जीवितांतील आत्यंतिक साध्य तें प्राप्त करून देणारी, तें कसें प्राप्त करून घ्यावयाचें हें स्वतःच्या उदाहरणानें दाखविणारी! आणि म्हणून कमलाला सोडून लक्ष्मी कशी व कोठें निवास करणार! 'मेरी झांशी नहीं देऊंगी'—मी आपलें कमलासन सोडून कोठेंच जाणार नाहीं. पाहूं या मला तेथून कोण काढून टाकतो तें!" हे त्या तेजस्विनीनें उद्गार काढले व आपलें कमलासन न सोडण्याचा तिला निर्धार करावा लागला. तिच्या भक्तांना तिनें आपलें कमलासन सोडून जाऊंच नये असें वाटे, आणि तो आग्रह त्यांनीं पुरा केला.

हें कमल म्हणजे झांशी व त्याची अधिष्ठात्री देवता आपली चरित्रनायिका महाराणी लक्ष्मीबाई! पतिनिधनानंतर आपलें राज्य आपणाकडे कायम राहावें, आपला वंश झांशीमध्येंच अखंड चालावा, आपल्या पूर्वजांनीं बुंदेलखंडांत ब्रिटिश राजसत्ता दृढ होण्यासाठीं व ज्या ज्या वेळीं ब्रिटिशांवर आपत्ति कोसळली, त्या त्या वेळीं कायेनें नि धनानें आपण त्यांना सर्वतोपरी साहाय्य केलें व इंग्रजांनींहि आपण झांशीचा वंश चिरकाल चालवूं असें वेळोवेळीं आश्वासन दिलें; तहनामे करून तसें बांधून घेतलें, तो इंग्रज आपणाशीं कृतघ्नपणानें वागणार नाहीं, अशी एक भोळी आशा महाराणीसाहेबांस वाटत होती, व त्यासाठीं आपणाकडून करावयाचे ते सर्व प्रयत्न त्यांनीं केले, रेसिडेन्ट, कलकत्ता कौन्सिल यांची मनधरणी केली, वस्तुस्थिति त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, विलायतेंत कोर्ट ऑफ डायरेक्टरांकडेहि वकील पाठवून तक्रार करण्याचा यत्न केला. परंतु त्यांच्या कोणत्याच प्रयत्नास यश न येतां केवळ परमेश्वरावर भिस्त ठेवून त्यांना राहण्याचा प्रसंग ओढवला!

आपलेंच दुर्दैव म्हणून नशिबाला हात लावून तूर्त तरी त्यांना बसावें

लागलें हें खरें; इंग्रजी न्यायावरचा त्यांचा विश्वास साफ उडाला व अशा रीतीनें खितपत पडण्यापेक्षां दोन हात करून 'हतो वा प्राप्स्यसी स्वर्गम् जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' असे विचारहि त्या स्वाभिमानी व तेजस्विनीच्या अंत:करणांत उत्स्फूर्त झाले नसतील असें नाहीं. परंतु त्यांनीं विवेक करून होणाऱ्या घडामोडींकडे सूक्ष्मपणें अवलोकन करण्याचें ठरविलें असावें, आणि म्हणून कांहीं काळ त्यांनीं पड खाऊन आपला आयुष्यक्रम आखला. या कालांत त्यांचा आयुष्यक्रम कसा असे याबद्दल 'माझा प्रवास' या पुस्तकाचे कर्ते लिहितात, बाईसाहेबांचा नित्यक्रम येणेंप्रमाणें होता;—

"त्यांस शरीराचा शोक लहानपणापासून होता. तो त्यांनीं स्वतंत्रता मिळाल्यावर पूर्ण केला. पहाटेस उठून कसरत-शाळेंत जाऊन जोर-जोडी, मलखांब करावा, नंतर घोड्यावर बसून फिरावयास जावें व घोडा मंडळावर धरावा, कुंपणावरून उडवावा, खंदकाचे पार घालवावा, एकदम खालीं बसवावा, इत्यादि नाना प्रकारच्या घोड्याच्या कसरती कराव्या. कधीं कधीं हत्तीवरहि बसत असत. नंतर याप्रमाणें सातआठ वाजेपर्यंत मेहनत झाल्यावर नेहमीं खुराक खात असत. नंतर तासभर कधीं निजत असत, कधीं तशाच स्नानास जात. स्नानाविषयीं बाईसाहेब फार हौशी असत. नेहमीं पंधरा वीस हांडे कडकडीत पाणी लागत असे. दर आठ दिवसांनीं नाहाणाचे दिवशीं उत्तम सुवासिक द्रव्यानें स्नान इतका वेळ करीत असत कीं, स्नानाचें पाणी नळांनीं बाहेर स्वच्छ कुंडींत सोडलें होतें तेथें पुष्कळ बायकांचें नाहाण होत असे. स्नान झाल्यावर स्वच्छ पांढरें चंदेरी पातळ परिधान करून आसनारूढ होऊन भस्म धारण करीत. प्रथम पति मरणानंतर केश राखण्याबद्दल तीन कृच्छ्रें प्रायश्चित आहे, त्याचें उदक सोडून नंतर रुप्याच्या तुळशीवृन्दावनांत तुळशीची पूजा करीत असत. नंतर श्रीपार्थिव लिंगपूजेस आरंभ होत असे. ते समयीं सरकारी गवई गात असत; पुराणिकाचें पुराणहि त्यांत सुरू असे व सरदार व आश्रित लोकांचे मुजरे होत असत. परंतु बाईसाहेबांचें लक्ष चोहींकडे सारखें असे. जर एखादे दिवशीं दीडशें मुजरे करणारांपैकीं कोणी आला नाहीं तर दुसरे दिवशीं काल आपण कां आलां नाहीं ही चौकशी झाल्याशिवाय राहात नसे. याप्रमाणें बारा वाजावयाचे सुमारास देवार्चन आटोपून जेवण होत असे, नंतर कांहीं वेळ इकडे तिकडे काढल्या-

वर कधीं वामकुक्षि झाल्यावर सकाळीं आलेले नजराणे रुप्याचे ताटांत रेशमी वस्त्रांनीं आच्छादून ठेवले असत ते आपलेसमोर आणवून मनास आवडतील ते पदार्थ ग्रहण करून बाकीचे आश्रित मंडळीकरितां कोठीवाल्याचे स्वाधीन करीत. तीन वाजण्याचे सुमारास कचेरींत जात असत. त्या वेळेस कधीं पुरुषवेष धारण करीत. पायांत पायजमा, अंगांत जांभळे आंबव्याची बंडी, डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बांधलेली वत्ती, कमरेस काच्या किंवा जरीचा दुपेटा व त्यास लटकलेली तरवार, या प्रकारच्या पोषाखानें ती गौरवर्ण उंच मूर्ती गौरीप्रमाणें दिसत असे. कधीं बायकांचा पेहेराव असे, परंतु पतिमरणानंतर नथ वगैरे अलंकार त्यांनीं बिलकुल घातले नाहींत. फक्त हातांत सोन्याच्या बांगड्या व गोठ, गळ्यांत एक मोत्याचें पेंडें व अनामिकेंत एक हिऱ्याची आंगठी, याशिवाय दुसरे अलंकार आम्हीं बाईसाहेबांचे अंगावर कधींच पाहिले नाहींत. केशांचा नेहमीं बुचडा बांधलेला असे. व नेसावयास पांढरा शालू व अंगांत पांढरी स्वच्छ चोळी असे. याप्रमाणें कधीं पुरुषवेषानें तर कधीं स्त्रीवेषानें दरबारांत येऊन, एक खोलीसारखी पडत पोशीची जागा होती व त्याच्या दरवाजास बाहेरून सोनेरी मेहेराब होती. या दरवाजाचे आंत गादी घालून सरपोस घातलेल्या जागेवर लोडाशीं टेकून बसावें. दरवाजाचे बाहेर दोन भालदार रुप्याची काठी घेऊन हजर असत. समोर राजेश्री लक्ष्मणराव दिवाणजी कंबर बांधून हातांत कागदांचें पुडकें घेऊन उभा असे व पलिकडे हुजूरचे सात आठ कारकून बसलेले असत. लक्ष्मणराव जातीचा देशस्थ ब्राह्मण होता. तो अगदीं अक्षरशत्रु असे. त्यांस लिहितां किंवा वाचतां बिलकुल येत नसे. परंतु तोंडची पाटिलकी करणारा मात्र फार हुषार होता. एखादें पत्र वाचा किंवा लिहा म्हटलें म्हणजे लागलीच आपल्या हाताखालच्या कारकुनाकडे नजर. कचेरींत सर्व दिवाणी, फौजदारी, मुलकी कामें होत असत. बाईसाहेब बुद्धीच्या फार चपळ असल्यामुळें हकीकत ताबडतोब समजून भराभर हुकूम सांगत असत. कधीं स्वतः लिहितां वाचतां येत असल्यामुळें मजकूर जुळवून आपण हुकूम लिहीत असत. बाईसाहेब न्यायाच्या कामांत फार दक्ष व कडक होत्या; व अपराध्यास कधीं कधीं स्वतः छडी घेऊन शिक्षा करीत. दर शुक्रवारीं व मंगळवारीं सर्व स्वारी तयार करवून मुलास बरोबर घेऊन संध्याकाळीं महालक्ष्मीचे दर्शनास जाण्याचा नियम होता.

राणीसाहेबांच्या स्वारीसारखा थाट पुन्हां नजरेस पडणार नाहीं. बाईसाहेब कधीं मेण्यांत तर कधीं घोड्यावरून दर्शनास जात. मेण्यावर किनखापी कापडास जरीनें बांधलेले चिकाचे पडदे असल्यामुळें मेणा फारच सुशोभित दिसे. कधीं स्वारी स्त्रीवेषानें असे. त्या वेळेस पांढरें पातळ नेसून जुजवी मोत्याचे दागिने अंगावर असत. पुरुषवेषानें असल्यास अंगांत अंबऱ्याची बंडी असून पायांत पायजमा, डोकीस टोपी, व टोपीवरून भरजरी पागोट्याची बत्ती बांधलेली असून पाठीवर बत्तीचा पदर जरीचा लोळत असे तो फार मनोहर दिसत असे. अशी स्वारी मेण्यांत बसून मेणा झरझर चालवीत असतां मेण्याचे खूर धरून दोन किंवा चार सुंदर दासी दवडत असत. या दासी लहानपणापासून याच कामाकरितां बाळगल्या असत. दक्षिणेंतून लहानपणीं सुरेख कुणब्यांच्या मुली विकत आणून त्यांस उत्तम खावयास घालून १५–१६ वर्षांचे सुमारास या कामावर नेमीत. त्या अविवाहित असल्यामुळें तारुण्यमदानें रसरसलेल्या असत. पांचसहा वर्षं काम केल्यावर बहुतकरून त्या रतीसारख्या सुंदर दासी एखाद्या लुच्च्याच्या नादास भुलून फसून जात, व एकदां त्या गर्भार राहिल्या म्हणजे मग या कामावरून दूर होऊन त्यांची गणना कुळंबिणींत होत असे. त्यांनीं जामदारखान्यांत जाऊन सोनें, मोतीं, हिरे यांचे दागिने नखशिखान्त घालून, भरजरीच्या चोळ्या घालून, हिरव्या-तांबड्या, भस्मी रंगाच्या पैठण्या नेसाव्या. पायांत मोठमोठे तोडे घालून तांबडे लाल नवे उत्तम चर्मी जोडे घालावे, कधीं लुगड्याची कांस मारावी, आणि एका हातांत रुप्याच्या किंवा सोन्याच्या दांड्याची चवरी घेऊन एक हात मेण्याचे दारास लावून मेण्याबरोबर दवडावे. तेव्हां त्या अविवाहित सुंदर सिंहकटी, सर्वालंकारयुक्त दासीकडे कोणाची टक लागत नसे. स्वारीपुढें डंका निशाण असून रणवाद्यें हलके वाजत असत. निशाणामागून सुमारें दोनशें विलायती लोक असत; व मागेंपुढें सुमारें शंभर स्वार असत. स्वारी निघण्याची वेळ झाली म्हणजे बाईसाहेब दोघींस किंवा चौघींस बरोबर येण्याचा हुकूम करीत. मग मेण्याबरोबर घोड्यावर कारभारी, मुत्सद्दी, मानकरी, भय्या-साहेब उपासने व कांहीं आश्रित मंडळी असत. बरोबर शिबंदीचे लोकहि असत.

याप्रमाणें थाटानें शिंगें कर्णे वाजत, बंदुकीचे शेंकडों आवाज काढीत स्वारी किल्ल्याचे बाहेर पडली म्हणजे किल्ल्याचे बुरुजावरील चौघडा सुरू होई, तो स्वारी परत येईपर्यंत वाजत असे, व तसाच महालक्ष्मीचे

देवालयाचे नगारखान्यांतील चौघडा सुरू होत असे. किल्ल्यांतून निघून भर बाजारांतून महालक्ष्मीस स्वारी जाऊन परत येत असे. कधीं कधीं सडी स्वारी घोड्यावरून जाई; त्या वेळेस दासी, आश्रित, कारकून, पायदळ वगैरे कोणी बरोबर नसत. फक्त घोडेस्वार व विलायती लोक असत. स्वारी परत येतांना रात्र झाली तर मशाली पेटवीत. परंतु घोड्यावर स्वारी असल्यास मशाली न लावितां दवडत दवडत किल्ल्यांत परत येत.

बाईसाहेबांची आश्रित मंडळीवर फार श्रद्धा असे. त्यांस खावयास चांगलें मिळावें, कपडेलत्ते चांगले असावे, त्यांस सर्व प्रकारचें सुख असावें, यांजविषयीं त्यांची नजर फार दक्ष असे. त्यांस गुणांची परीक्षा असून चहा असे. जवळ मोठमोठाले शास्त्री, विद्वान, वैदिक, याज्ञिक होते. वडिलोपार्जित किंत्याप्रमाणें पुस्तकांचा संग्रह फार अमोलिक केला होता. चांगले पुराणिक, गवई, सतार वाजविणारे वगैरे लोक, निरनिराळ्या कसबांचे नामांकित कारागीर, त्यांच्या पदरीं होते. बाईसाहेब स्वतः फार निष्कपट व निर्मल मनाच्या वृत्तीनें रहात असत; तरी त्यांस सर्व प्रकारची हौस असे. कोणी उत्तम गवई आल्यास त्याचें गाणें करून बिदागी पोंचविल्याशिवाय राहात नसत. शिमग्यांत रंगाचा खेळ चांगला होत असे. दत्तकपुत्र रावसाहेब यांचे स्वारीबरोबर मी त्या वर्षीचे शिमग्यांत शहरांत गेलों होतों. जागोजाग मुत्सद्दी लोकांकडे पानसुपारी होऊन, रंग खेळून पुन्हां किल्ल्यांत परत आलों. त्याच दिवसांत ग्वाल्हेरीस कोंकणची नाटक मंडळी सुमारें पन्नास आली होती. त्यांस शहरांतील लोकांनीं पत्र पाठवून झांशीस बोलावून आणविलें. त्यांचे खेळ शहरांत पुष्कळ झाले. तेव्हां बाईसाहेबांनीं त्यांस सरकारांतून शिधा चालू करवून किल्ल्यांत पुष्कळ नाटकें करविलीं. एकदां हरिश्चंद्राचें आख्यान झालें, त्या वेळेस सदोबा नाटकवाला यानें विचारलें कीं, या नाटकांत डोंबाचे वरीं हरिश्चंद्रानें डोक्यावर मडकें फोडावें लागतें, तर त्याजबद्दल परवानगी असल्यास मडकें आणून फोडीन. त्यावर विचार होऊन बाईसाहेबांनीं परवानगी दिली. परंतु जेव्हां नाटकांत बैठकीवर घागर फोडली तेव्हांच वृद्ध मंडळी बसली होती त्यांस हा अपशकुन आहे असा चरका बसला. नाटकें फार सुरेख होत असत. नाटकवाल्यास संध्याकाळीं किल्ल्यांत घेऊन सर्व सरकारी खजिना त्याचेपुढें मोकळा ठेविला असे. मग खरे हिऱ्याचे अलंकार व जरीचीं वस्त्रें मिळाल्या-

वर पात्रें कां खुलणार नाहींत? नाटक झाल्यावर सर्वांचा झाडा घेऊन नंतर किल्ल्याबाहेर पाठवीत असत. कांहीं नाटकें झाल्यावर दोन-तीन नाटकें दरबारच्या मंडळीच्या बायका बोलावून त्यांस दाखविलीं. शेवटीं नाटकवाल्यास एक मेजवानी करून बिदागी देऊन रवाना केलें. कोणास पागोटीं, कोणास धोतरजोडे दिले व सदोबा मॅनेजर यांस रोख चार हजार रुपये दिले. बाईसाहेबांस अश्वपरीक्षा चांगली होती. उत्तर हिंदुस्थानांत त्या वेळेस तिघांचें नांव गाजत असे. एक नानासाहेब पेशवे, एक बाबासाहेब आपटे, व एक लक्ष्मीबाई झांशीवाली. एके दिवशीं एक सौदागर फार देखणे व चलाख दोन घोडे विकावयास घेऊन आला. बाईसाहेबांनीं त्याजवर बसून मंडळावर धरून किंमत ठरविली ती एकाची हजार व दुसऱ्याची पन्नास! व असें सांगितलें कीं, दुसरा घोडा जरी दिसण्यांत फार उमदा व चलाख आहे तरी तो छातींत फुटला आहे. याजमुळें अगदीं नादान आहे. त्याजवर सौदागरानें बाईसाहेबांच्या कुशलतेची तारीफ करून कबूल केलें कीं, या घोड्यास मी उत्तम मसाला देऊन देखणाऊ ठेविला आहे. याची परीक्षा मी पुष्कळ फिरलों परंतु कोठें झाली नाहीं. बाईसाहेबांनीं दोन्ही घोडे ठरविलेल्या किंमतीस विकत घेतले, व सौदागरास बक्षीस देऊन मार्गस्थ केलें.

बाईसाहेब रयत लोकांची काळजी फार वाहात असत. राजकारणाकरितां स्वतः मेहनत घेण्यास कधीं मागेंपुढें पहात नसत. बलवासागर म्हणून एक लहानसें शहर झांशीचे अंमलांत आहे, तेथें चोरट्यांचा फार उपद्रव होऊन प्रजेस पीडा होऊं लागली. तेव्हां स्वतः स्वारी तयार करून बलवासागरास जाऊन, पंधरा दिवस मुक्काम करून चोरांचा ठिकाणा लाविला व कांहींस फांशीं देऊन, कांहींना कैद केलें, व प्रान्त निर्भय केला. अशा अनेक गुणांनीं भरलेल्या त्या स्त्री-रत्नाचें औदार्य व शौर्य हे गुण तर निरुपमच होते. कोणीहि दरिद्री भिक्षुक कधींहि विन्मुख गेला नाहीं. एके दिवशीं एक काशीकर विद्वान ब्राह्मण उपाध्यांचे मार्फत किल्ल्यांत नित्यदानास गेला. तेथें लालू भाऊ ढेकरे यांनीं त्याची विद्येविषयीं व शीलाविषयीं फार स्तुति केली व असेंहि सांगितलें कीं, प्रथम-स्त्री मरण पावल्यामुळें व वय अल्प असल्यामुळें दुसरा विवाह करण्याची भटजींची फार इच्छा आहे. परंतु मुलगीस पैसा फार पडतो, सबब फार दुःखी आहेत. हें ऐकून बाईसाहेबांनीं प्रश्न केला कीं, रुपये देऊन मुलगी देणारा आहे कीं काय? त्यावर भटजी

नम्रतेनें बोलले, आमचे जातीचा एक देशस्थ ब्राह्मण काशीस आहे. त्याची मुलगी सुमारें बारा वर्षांची असून रूपानें बरी आहे. रास, घटित वगैरे सर्व जमलें आहे. परंतु त्यास मुलीबद्दल रुपये ४०० दिले पाहिजेत. ते मी गरीबानें कोठून आणावे ? शिवाय लग्नाचे खर्चाकरितां सुमारें शंभर लागतील. हें ऐकतांच बाईसाहेबांनीं पांचशें रुपये ताम्हनांत आणवून उदक सोडून भटजींचे पदरांत ओतले व सांगितलें कीं, लग्न होईल ते वेळेस आम्हांस कुंकुमपत्र पाठविण्यास विसरूं नये. याप्रमाणें त्या भटजी-बोवाचें नशीब उदयास आल्यावर तो मोठ्या उत्कंठेनें काशीस गेला, व लग्नसमारंभाची तयारी करून बाईसाहेबांस मूळ धाडिलें.

"एके दिवशीं बाईसाहेबांबरोबर मी महालक्ष्मीचे दर्शनास गेलों होतों. स्वारी परत येतांना दक्षिण दरवाजांतून आंत शिरली तों हजारों भिकारी रस्ता आडवून उभे आहेत व गलका करीत आहेत. हें पाहून बाईसाहेबांनीं दिवाणजीस कारण पुसतां लक्ष्मणराव यांनीं विदित केलें कीं, महाराज, हे लोक गरीब भिकारी आहेत. हल्लीं थंडी फार पडते व यांस पांघरूण नसल्यामुळें त्यांचे फार हाल होत आहेत. याजबद्दल विचार होण्याविषयीं सरकारचे पायांपाशीं यांचा अर्ज आहे. हें ऐकून बाईसाहेबांस फार वाईट वाटलें व लागलींच हुकूम केला कीं, आजपासून चवथे दिवशीं भिकारी लोकांचा रमणा करावा व दर मनुष्यास एक रुदार टोपी, एक रुदार बंडी, व एक काळी किंवा पांढरी घोंगडी द्यावी. असा हुकूम होतांच दुसरे दिवशीं शहरचे दर्जी जमा करून टोप्या व बंड्या शिवण्यास आरंभ केला. व नेमिलेल्या दिवशीं दवंडी पिटवून शहरचे वाड्यासमोर भिकारी लोक जमा केले. त्यांत सामान्य गरीब लोकहि शिरले होते. दर एकास टोपी, बंडी व घोंगडी वांटली. सुमारें चार हजार टोपी वांटली गेली असेल." असो.

दैवगतीपुढें मान लववून वरीलप्रमाणें राणीसाहेबांचा नित्यक्रम चालला असला तरी दैव दुसऱ्याच रीतीनें त्यांचा आयुष्यक्रम ठरवीत होतें. झांशीचा ग्रास गिळून कंपनीनें देशांतील अनेक संस्थानिकांस डिवचलें. त्यांच्यांत असंतोष निर्माण झाला होताच, आणखी त्यांतच भरीला भर म्हणून कंपनीनें हिंदी सैन्यासंबंधीं घातुक धोरणाची भर पाडली व त्याचा पुढें डोंबाळा कसा उडाला ही हकीकत पुढील प्रकरणांत येईल.

Vengence sleeps long, but never dies.

An Italian proverb.

आपल्या धर्माखेरीज अन्य धर्मीयांच्या चालीरीती, आचारविचार, त्यांच्या मनोभावना यांना कांहींहि महत्त्व द्यावयाचें नाहीं असा तत्कालीन ख्रिस्ती सत्ताधाऱ्यांचा रिवाजच पडून गेला होता व त्याचें पर्यवसान वेलोर येथें सैनिकांनीं केलेल्या दंग्यांत झालें. परंतु पुढें ख्रिस्ती लोकांच्या हातीं हिंदुस्थानचा जसजसा जास्त भाग पडूं लागला, तसतसा त्यांना देशी लोकांच्या समजुतीकडे लक्ष देण्याची मुळींसुद्धां आवश्यकता वाटूं लागली नाहीं. ख्रिस्ती मिशनऱ्यांना उघड उघड प्रोत्साहन देण्यांत येऊं लागलें; त्यामुळें हिंदु आणि मुसलमान यांचा सहजच असा समज झाला कीं, ख्रिस्ती सरकारला आपला धर्मच बुडवावयाचा आहे. असा समज त्या वेळीं कसा होता त्याचें वर्णन 'हिस्टरी ऑफ दि ब्रिटिश एम्पायर, भाग २ रा, पृ. ७०६' येथें मि. नोलन यानें पुढील आशयाचें केलें आहे. "सैनिकाच्या धर्मसमजुती दुखविल्या गेल्या तरी सरकार तिकडे विशेष लक्ष देईनासें झालें, अनेक मार्गांनीं हे प्रकार होते. परंतु आपल्या प्रत्येक कृत्यानें लोकक्षोभ सारखा गुपचीपपणें पसरत मात्र होता."

चरबीच्या काडतुसासंबंधींच पाहा. त्याबद्दल सैनिकांच्या धार्मिक कल्पनांवर आघात होतील अशी कल्पनाच नसल्यानें सैनिकांच्या भावनांची उपेक्षा करण्यांत आली. यासंबंधानें ता. २२ जानेवारी १८५७, डमडम येथील दहाव्या पायदळ पलटणीवरील कॅप्टन राइट यानें पुढीलप्रमाणें रिपोर्ट केला होता :– "कारखान्यांत असलेल्या देशी सैनिकांमध्यें काडतुसें तयार करतांना त्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या चरबीबद्दल प्रतिकूल भावना निर्माण झाल्या आहेत. त्यांत डुकर व गाय यांची चरबी असते, अशा वार्ताहि पसरल्या आहेत."

ही जी वार्ता पसरलेली होती ती निराधार मात्र नव्हती. काडतुसांत त्याज्य वस्तु नसाव्यात अशी दक्षताहि घेण्यांत आलेली नव्हती. लॉर्ड

दलहौसी व त्याचे आधींचे अधिकारी यांनीं अगोदरच असंतोषरूपी दारूचें कोठार भरगच्च भरून तयार ठेवलें होतें. त्याला ठिणगी या चरबीच्या काडतुसानें लावली, इतकेंच. सैनिकांशीं गोरे अधिकारी कसे वागत, त्यांची देशी लोकांशीं वागणूक उद्धटपणाची कशी असे, याबद्दल पार्लमेंटचे एक सभासद मि. ड्रमॉन्ड यानें ता. ७ जून १८५८ रोजीं हिंदुस्थान सरकारच्या कारभारावर भाषण करतांना झोड उठविली आहे, तींत मि. ड्रमॉन्ड म्हणतोः—

"आमचे तरुण अधिकारी तद्देशीयांशीं अत्यंत निष्ठुरतेनें व जुलुमानें वागत, असें मि. रीस साहेब म्हणतात. युरोपियनांची वागणूक गर्विष्ठपणा व उद्धटपणा यांचा नमुनाच होय, असें लंडन क्वार्टर्ली म्हणतो. लॉर्ड विलियम बेंटिंक म्हणतो. आमच्या लोकांना तेथील लोकांच्या चालीरीतींची किंचितहि माहिती नसते. मि. फ्रेजर टॅटलर म्हणतो, कंपनीचे नोकर तेथील वस्तुस्थिति कळविण्याच्या कामीं कुचकामाचे आहेत. तुम्हांला आपल्या सरदारदरकदारांबद्दल मोठा अभिमान वाटत असेल व त्यांच्या इभ्रतीची तुम्हांला चाड असेलहि. परंतु अलेक्झांडरच्या आधींच्याहि प्राचीन काळापासून ज्या लोकांचे वंश तेथें नांदत आहेत व त्यांना आपल्या देशाबद्दल प्रेम वाटत आहे, त्यांच्या अंतःकरणांत तुमच्या या वागण्यामुळें काय भावना उत्पन्न होत असतील याचा तुम्ही कधीं विचार केला आहे! आज उत्तरास प्रत्युत्तर त्यांना देतां येत नसेल, व अपमानाचा बदलाहि ते घेऊं शकत नसतील; म्हणून त्यांना अपमान जाणवत नाहीं अशी तुमची मूर्खपणाची कल्पना आहे कीं काय? इटालियन भाषेंत एक म्हण आहे ती ध्यानीं ठेवा—'सूडबुद्धि कदाचित् दीर्घकाल सुप्तावस्थेंत राहील पण ती कधींहि नष्ट मात्र होत नाहीं!' हिंदी लोकांना तुम्ही अशा प्रकारें वागवूनसुद्धां त्यांनीं तुमचा द्वेष करूं नये अशी तुमची अपेक्षा मात्र आश्चर्य करण्यासारखी आहे. मि. फ्रेजर म्हणतो, लोक अत्यंत असंतुष्ट झालेले आहेत, व असंतुष्ट राहण्यास कारणेंहि तशींच आहेत. इतकेंच नव्हे तर अशीं दहा-बारा बण्डें करण्यास पुरतील अशीं कारणें तुम्हीं निर्माण करून ठेविलीं आहेत!

"आणि या सर्वांचें मूळ कारण असें कीं, सिव्हिल सर्व्हिससाठीं हिंदुस्थानची लूट करावयाची हें तत्त्व घातुक आहे. इंग्रज अधिकाऱ्यांच्या

लुटीचें एक क्षेत्र म्हणूनच हिंदुस्थानाकडे आतांपर्यंत तुम्हीं पाहात आलां, तीच दृष्टि यापुढेंहि कायम ठेवावयाची असेल तर हिंदुस्थान तुम्हीं गमावून बसाल व तसा तो गमावण्याला आपण योग्यहि आहोंत!"

आजचा हिंदुस्थान हा इंग्रजानें बनविला आहे. इंग्रज या देशांत येण्यापूर्वीं हिंदुस्थान असा नव्हताच. मुसलमान हिंदूंचे गळे कापीत असत, असें ऐकण्याची संवय आपणांस लागली आहे; पण वस्तुस्थिति अशीच असती तर इंग्रज या देशीं आला म्हणून त्याचे धन्यवाद गायिले असते व झालें त्या स्वातंत्र्ययुद्धाचेंहि कारण नव्हतें. परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती हें उघड आहे. या ब्रिटिश राजवटीसंबंधीं सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर काय म्हणतो तें पहा. हर्बर्ट स्पेन्सर हा कांहीं एखादा भावना-प्रधान कादंबरीलेखक नव्हता; तो मोठा तत्त्वज्ञ व विचारी म्हणून प्रसिद्ध आहे व त्याच्या वाङ्मयाला ब्रिटिश वाङ्मयांत उच्च स्थान आहे. तो काय म्हणतो तें पहा:—

"गेल्या शतकांतील अँग्लो इंडियन्सचें वर्णन बर्कनें 'बर्डस् ऑफ प्रे ॲण्ड पॅसेज इन् इंडिया' असें केलेलें आहे. पेरू व मेक्सिकोमध्यें गेलेल्या त्यांच्या जातभाईपेक्षां हे लोक किंचितहि कमी निष्ठुर नव्हते. त्यांच्या कृष्णकृत्यांसंबंधानें कंपनीच्या डायरेक्टरांचेच असे उद्गार आहेत कीं, त्या देशांत व्यापार करून जें अपार धन त्यांनीं संपादन केलें तें संपादन करतांना त्यांनीं इतका जुलूम व छळ केला कीं त्याला जगांत तोड नाहीं. व्हॅन्सिटार्ट यानें असें वर्णन केलें आहे कीं, देशी माणसानें इंग्रज मागेल त्या भावानेंच माल दिला पाहिजे. तसा तो न देईल तर त्याला फटके अगर तुरुंगवास मिळे; यावरून तेथील लोकांची काय दुर्दशा उडाली असेल याची कल्पनाच करा. वॉरन हेस्टिंग्ज म्हणतो, 'आम्ही एकाद्या गांवाजवळ अगर सराईजवळ जातांच तो गांव अगर ती सराई ओस पडे. उघड उघड विश्वासघात करणें हा तर अधिकाऱ्यांचा नियमच होऊन बसला होता. देशी राजांना एकमेकांत युद्ध करण्यास प्रवृत्त करण्यांत येई. त्यांतील एकाला हाताशीं धरून दुसऱ्याचा पाडाव करण्यांत येई. नंतर ज्याला साहाय्य केलें असेल त्याला कांहीं तरी पोकळ सबबीवर पदच्युत करण्यांत येई. 'लांडगा आणि कोंकरूं' याची एखादी सबब नेहमीं तयार असे.

संस्थानिकांचें राज्य पाहिजे असल्यास त्यांजवर इतक्या भयंकर द्रव्याच्या मागण्या करण्यांत येत कीं त्याच्यानें त्या देववत नसत; व त्यानें त्या न दिल्या कीं त्यावर राजद्रोहाचा गुन्हा आरोपून त्यास पदच्युत करण्यांत येई. आजतागायत असे प्रकार सुरूच आहेत. मिठावरील कर व इतर करांचे बोजे यामुळें शेतकरी पिकवितो त्यांतील निम्मे तरी सरकारांत करापायीं जातें." अशा किती गोष्टी वर्णाव्या !

हर्बर्ट स्पेन्सरचे हे उद्गार थोडक्यांत वर सांगितले. वस्तुस्थितीचें यापेक्षां जास्त ज्ञान पाहिजे असणारांनीं, 'सर जॉन के' यांचा 'शिपायांच्या युद्धाचा इतिहास' हा ग्रंथ अवश्य वाचावा. त्यांत कंपनीच्या कारभाराची निःपक्षपातानें छाननी केलेली आहे. सदर ग्रंथकार दलहौसीसंबंधानें लिहितो :—

"आपणास ज्या देशावर राज्य करण्यासाठीं पाठविण्यांत आलें आहे त्या देशाचा नकाशा एकरंगी-रक्तरंगी-करण्यांत इंग्लंडचा व हिंदुस्थानचा फायदा आहे याबद्दल त्याच्या (दलहौसीच्या) मनांत शंकाहि नव्हती. आणि सुदैवानें या कार्यसिद्धीला योग्य असे हस्तकहि त्याला मिळाले असल्यानें साम्राज्यांतील इतर भागांत जी गोष्ट कोणाला करतां आली नाहीं ती यानें हिंदुस्थानांत केली. दलहौसी हा अत्यंत जुलमी, कोणापुढेंहि न लवणारा, व विरोधाला धुडकावणारा असा होता. त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या आड कोणीहि न आल्या-कारणानें त्याचे सर्व हेतु सुफलित झाले. दलहौसी दूरदृष्टीचा नव्हता. ज्या लोकांशीं त्याचा संबंध आला ते लोक कसे आहेत हें त्याला समजलेंच नाहीं. त्यांच्याबद्दल (हिंदी लोकांबद्दल) त्याची एकच कल्पना कीं, ते दुसऱ्याचे गुलाम होण्यासच पात्र आहेत. अशा लोकांनीं आपल्या परंपरागत रूढींना चिकटून कां बसावें हेंच त्याला समजेना. आपल्या प्राचीन राजवंशाबद्दल त्यांनीं आदर कां दाखवावा हेंहि दलहौसीला समजेना. आपल्या देशाच्या चालीरीती, आचारविचार यांवर या लोकांची निष्ठा कां असावी हेंहि त्यास गूढ वाटे ! लोकांचें म्हणणें अगर सांगणें त्याला मुळीं पटतच नसे. अर्थात् कोणाचाहि सल्ला त्यास रुचत नसे; मग इतरांच्या भावनांना तो तुच्छ लेखी हें सांगण्याचीहि आवश्यकता नाहीं. लोकांना परंपरागत वांशिक अभिमान, राष्ट्रप्रेम या गोष्टी असतात हें त्याच्या मनांतहि येत नसे.

"आशिया खंडांतील लोकांस स्वातंत्र्याचें वारें उत्पन्न झालें आहे, लोकांत देशप्रेमाची आवड उत्पन्न झाली आहे, व या भावना व्यक्त करणें या गोष्टी मोठेपणाच्या समजल्या जातात असे कोणी उद्गार काढले कीं त्यावर 'ब्रिटिशद्रोही' असा छाप पडलाच म्हणून समजावें, अशीच विचारसरणी इंग्लंडांत तेव्हां रूढ होती, व असें कोणी म्हणालाच तर त्याला 'व्हाइट निगर्स' म्हणून पुष्पांजलि मिळे."

अशा रीतीचें इंग्लंडमध्यें वातावरण होतें. म्हणून हिंदी लोकांच्याकडे कोणीहि लक्ष दिलें नाहीं, त्यांच्या तक्रारी दूर झाल्या नाहींत आणि त्यामुळें त्यांतूनच स्वातंत्र्ययुद्ध निर्माण झालें. हें स्वातंत्र्ययुद्ध करणारे कोण होते? त्यांत प्रमुख मराठे. इंग्रजांच्याकडून यांचें सर्वस्वी नुकसान झालें होतें. त्यांचा जुलूम सर्व मराठ्यांना सोसावा लागला होता. पेशव्यांना पदच्युत करण्यांत आलें. त्याचा दत्तक पुत्र नानासाहेब याला कंपनीकडून न्याय मिळाला नाहीं. सातारा, नागपुर या राज्यांची अशीच गत झाली. झांशीलाहि त्याच मालिकेंत गोवण्यांत आलें. मराठ्यांच्यानंतर मुसलमान. नंतर दिल्लीची विल्हेवाट लावण्यांत आली. दिल्लीनंतर लखनौ बुडविण्यांत आलें. हीं प्रबळ राज्यें नष्ट झाल्याबरोबर त्यांच्यावर अवलंबून असणारे सरदार सैनिक बेकार झाले. नवीन राजवट अशा रीतीनें अविश्वासाच्या वातावरणांत सुरू झाली. इंग्रजांबद्दल कोणास विश्वास वाटेना. संस्थानें नष्ट करण्यांत आलीं; त्यांतच काडतुसाचें निमित्त होऊन तयार झालेल्या असंतोषावर ठिणगी पडतांच उत्तर हिंदुस्थानांत एकच डोंबाळा उडाला!

'दलहौसीज ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ ब्रिटिश इंडिया' भाग १, पृ. १०८ वर इंग्रजांच्या या धोरणासंबंधानें असें म्हटलें आहे कीं, "सातारा, नागपुर, व झांशी या तीन उदाहरणांमुळें देशी राजे तर भयचकित झालेच पण हिंदुधर्माच्या मूळावरच भयंकर आघात झाला." दलहौसीनें हिंदुस्थानचा कारभार लॉर्ड कॅनिंग याचे हातीं सुपूर्त करून तो येथून चालता झाला. पण आपणास हिंदुस्थानांतील कारभार वाटतो तसा सुखाचा होणार नाहीं, व लवकरच आपणास एका प्रलयकारी संकटाला तोंड द्यावें लागेल अशी कल्पना लॉर्ड कॅनिंगला होतीच; व ती त्यानें कोर्ट ऑफ डायरेक्टरांचा निरोप घेतांना व्यक्तहि केली होती. आणि दुर्दैवानें त्याचें तें भविष्य लवकरच खरें झालेंहि!

स. १८५७ साल उजाडलें. देशी लष्करांत अस्वस्थता वाढूं लागली. गुप्त मनसुबे होऊं लागले. देशांत ठिकठिकाणीं हलक्या आवाजांत कानगोष्टी होऊं लागल्या. पलटणींतील लोकांनीं सर्वत्र एकदम एका दिवशीं उठावणी करावी असें ठरविण्यांत आलें; आणि त्याप्रमाणें ठरल्या दिवशीं व वेळीं तशी उठावणी झाली असती तर युद्धाचा रंग पालटलाच असता. परंतु ठरल्या दिवसाच्या अगोदर पंधरा दिवस या युद्धाचा स्फोट झाला. बऱ्हाणपूर येथील १९ व्या पायदळ पलटणीनें प्रथम निशाण उभारिलें व हें वृत्त वायुगतीनें सर्वत्र पसरलें, आणि त्याबरोबरच धुमसत असलेली अशान्तता एकदम भडकली! ता. २४ एप्रिल रोजीं मीरत येथील तिसऱ्या घोडदळ पलटणीनें काडतुसें वापरण्याचें नाकारलें. तेथील सैन्यानें युद्धाचा झेंडा फडकविला व ब्रिटिश सत्ता अल्पावधींतच नष्ट करून दिल्लीकडे चाल केली!

दिल्लीसहि सिद्धता होतीच. दोन्ही ठिकाणच्या वार्ता पसरतांच सर्वत्रच रणकुंड पेटलें व चोहोंकडून युद्धाचा डोंबाळा उसळल्याच्या बातम्या येऊं लागल्या. फेरोजपूर, बरेली, मुरादाबाद, कानपूर, लखनौ इत्यादि शहरांतून असलेल्या असंतोषाला व्यक्त स्वरूप आलें. श्रीमंत नानासाहेब पेशवे, अयोध्येचे नबाब, दिल्लीचे पादशहा, यांजवर इंग्रजांनीं विविध प्रकारें अन्याय केले असल्यानें ते या क्रान्तियुद्धांत सामील झाले. त्यांत तात्या टोपे, लखनौचा वाजीदअली शहा, बिहारचे कुंवरसिंग, अमरसिंग, मौलवी अहमदशहा इत्यादि रणगाजी या युद्धाच्या अग्रभागीं होते. वस्तुतः हें युद्ध सैनिकांनीं सुरू केलें होतें व त्यास कारण काडतुसांखेरीज त्यांना मिळत असलेली पक्षपातित्वाची वागणूक हेंहि एक होतेंच. शिपायांना वरील पुढाऱ्यांचें साहाय्य झालें याचें कारण त्यांजवर झालेला राजकीय अन्याय. अर्थात् या उभयतांचें अगोदरपासून संगनमत नसेलच असें सांगवत नाहीं, किंबहुना तसें तें असावेंहि. आणि अशा रीतीनें उभयतांचा संयोग झाल्याकारणानें हें स्वातंत्र्यसंगर चांगलेंच पेटलें!

मेरठ व दिल्ली येथील दंग्याची वार्ता झांशी येथें येऊन पोहोंचली. या वेळीं झांशी येथें बंगाली पायदळाची १२ वी पलटण, व १४ वें घोडदळ आणि तोफखाना, एवढें सैन्य कॅप्टन डन्लप याच्या आधिपत्याखालीं

असून झांशी प्रान्ताचे कमिशनर कॅप्टन अलेक्झांडर स्कीन हे होते. मे महिन्यापासून देशी पलटणींत गुप्तपणें खलबतें चाललीं होतीं. परंतु सर्व ठिकाणचें सैन्य बिथरलें तरी झांशी येथील सैन्य बिथरणार नाहीं अशी तेथील अधिकाऱ्यांची कल्पना होती. कमिशनर कॅ. स्कीन, सैन्याधिकारी कॅ. डन्लप, डेप्युटी कमिशनर कॅ. गॉर्डन हे तिघेहि एका विचारानें वागत होते. त्यांना सैन्याच्या बेदिलीबद्दल किंचितहि अंदेशा आला नाहीं. उलट येथें सर्वत्र शान्तता आहे, आमचें सैन्य विश्वासार्ह आहे, अशा आशयाचीं पत्रें त्यांनीं सरकारकडे रवाना केलीं. 'के' यांच्या 'सीपॉय वॉर' या पुस्तकावरून झांशी येथें बंडाचीं चिन्हें उत्पन्न झालीं होतीं अशी शंकाहि वाटत नाहीं. झांशीच्या महाराणीसाहेब एक अबला, संस्थान खालसा झाल्यानंतर दैवाला बोल लावून स्वस्थ बसल्या होत्या; व त्या पूर्ण राजनिष्ठ असल्याबद्दल खुद्द कमिशनर कॅ. स्कीन यांचीहि खात्री होती!

परंतु ही सर्व बाह्यात्कारीची शान्तता ठरली. इंग्रज अधिकारी बेसावध आहेत असें पाहून ता. १ जून रोजीं सैनिकांनीं आपल्या योजनेस प्रारंभ केला. त्या दिवशीं एका बंगल्यास आग लावण्यांत आली, पण ती आकस्मिक कारणानें लागली असेल अशा समजुतीनें तिकडे कोणी फारसें लक्ष दिलें नाहीं. पुढें दोनतीन दिवस अगदीं शान्ततेंत गेले. ता. ४ रोजीं पायदळ पलटणीच्या ७ व्या तुकडीनें पुढाकार घेतला. या पलटणीचा हवलदार गुरुबक्ष यांनीं कांहीं सैन्य घेऊन 'स्टार फोर्ट' मध्यें प्रवेश केला. ही इमारत छोटीशी असून तींत दारूगोळा व खजिना ठेवीत. कॅ. डन्लप यानें हे लोक ताळ्यावर आणण्याचे प्रयत्न केले, परंतु पहारेकरीच फितले व खजिना बळकावून बसले! त्याबरोबर हें प्रकरण ठीक नव्हे असें ओळखून सर्व युरोपियन्स छावणींतून शहरांत आले व तेथून कॅ. स्कीन यानें त्यांस किल्ल्यांत जाण्याबद्दल सूचना दिली.

दुसरे दिवशीं सकाळीं कॅ. डन्लप कवायतीच्या मैदानावर गेला असतां १२ व्या पायदळ पलटणींतील सैनिकांनीं त्यास गोळ्या घालून ठार केलें! जणुं पूर्वसूचना समजून सैनिकांनीं युरोपियन लोकांवर शिस्त धरली. इतर गोरे लष्करी अधिकारी, कमिशनर स्कीन हे एकामागून एक सैनिकांच्या गोळीबारांत बळी पडले. उरलेले लोक किल्ल्यांत आश्रयाला गेले.

व राणीसाहेबांकडे साहाय्य मागण्यासाठीं कांहीं इसम पाठविण्यांत आले. पण राणीसाहेबांकडे मदत मागण्यास गेलेल्या इसमांस सैनिकांनीं मध्यंतरीं पकडून त्यांचा वध केला! नागोड, ग्वाल्हेर इकडे मदतीची मागणी करण्यांत आली, परंतु तिकडूनहि वेळेवर साहाय्य आलें नाहीं. तें येण्यापूर्वी बिथरलेल्या लोकांनीं किल्ल्यावर हल्ला करून तो घेतला. तेव्हां किल्ल्यांतील उरलेल्या लोकांनीं तहाचें निशाण उभारलें. ता. ८ जून रोजीं स्कीन साहेबानें किल्ला खालीं करून सैन्याच्या स्वाधीन केला. पुढें या शरण आलेल्या गोऱ्या लोकांसहि सैनिकांनीं ठार केलें असें म्हणतात!

झांशीला झालेल्या दंग्यांत राणीसाहेबांचें प्रथमतः मुळींच अंग नव्हतें; त्यांस नाइलाजास्तव या रणकुंडांत उडी घ्यावी लागली. असें असलें किंवा त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें या महायज्ञांत भाग घेतला असला तरीहि त्यांजवर झालेला अन्याय लक्षांत घेतां तो मुळींच गैर ठरत नाहीं. 'मॅलेसन' हा इतिहासकार कांहीं निःपक्षपाती म्हणून प्रसिद्ध नाहीं. राणीसाहेबांना या युद्धांत कां भाग घ्यावा लागला यासंबंधानें लिहितांना तो म्हणतो, 'राणीसाहेबांनीं केलेल्या विनवण्या, व त्या निष्फळ ठरल्यामुळें त्यांना आलेला संताप, यांची ब्रिटिश सरकारनें मुळींच फिकीर केली नाहीं; इतकेंच नव्हे तर तिच्या अपमानांत आणखी भरच घालीत गेले! राज्य जप्त केल्यानंतर विधवा राणीला वार्षिक पांच हजार पौंड पेनशन देण्यांत येत होतें. ते राणीसाहेबांनीं प्रथम घेण्याचें नाकारलें, पण अखेरीस तें घेण्याचें त्यांनीं मान्य केलें. पण त्यानंतर तिचा पति गंगाधरराव याच्या कर्जाच्या फेडीसाठीं म्हणून त्यांतली रक्कम कापून घेण्यांत येऊं लागली व तिला ठरलेलें पेनशनहि मिळेना. तिच्या अर्ज–विनंतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. झांशी नगरांत गोवध करूं नका, अशी राणीसाहेबांची मागणी असतां ती धुडकावून लावण्यांत आली. कुलस्वामिनीच्या मंदिराला दिलेलीं दोन गांवेंहि जप्त करण्यांत आलीं. या सर्व प्रकारांमुळें त्या तेजस्विनीच्या अंतःकरणांत द्वेषाग्नि प्रज्ज्वलित होऊन तिनें सैनिकांच्या उठावणीला प्रोत्साहन दिलें तर त्यांत नवल तें काय?'

केवळ काकतालीय न्यायानें या गोष्टी घडत गेल्या. राणीसाहेबांनीं इंग्रजांना त्यांच्या आपत्कालीं साहाय्यच केलेलें आहे. सैनिकांत बेदिलीची

विभाग ........ ७७

चिन्हें दिसतांच जूनच्या आरंभीं कॅ. गॉर्डन राणीसाहेबांच्या भेटीस गेला, " व आमच्यावर विपरीत प्रसंग येणार असें वाटत आहे. तेव्हां आमचें रक्षण करा व झांशीचा २५ लक्षांचा मुलूख सुरक्षित राखण्यासाठीं आपण साहाय्य करा अशी त्यानें राणीसाहेबांस विनंति केली ! "तुम्हांस आश्रय दिला तर सैनिक आम्हांस लुटून फस्त करतील; तथापि होईल ती मदत आम्ही अवश्य करूं!' असें आश्वासन राणीसाहेबांनीं दिलें.

"राणीसाहेबांनीं मुनशी अयोध्याप्रसाद यांस किल्ल्यांत पाठवून अशी विनंति केली कीं, आम्हांस उपयोगाचें आपण कांहींच ठेविलें नाहीं. परंतु जर परवानगी देत असाल तर ठाकूर वगैरे लोक जमवून साहाय्य करूं. त्यावर गॉर्डनसाहेबांनीं उत्तर दिलें, 'तुमची मदत आम्हांस नको. तुम्ही मात्र आपला बंदोबस्त नीट ठेवा.' असेंहि एका ठिकाणीं नमूद आहे. अर्थात् अशा स्थितींत राणीसाहेब काय करणार ? पुढें गॉर्डनसाहेब राणीसाहेबांच्या भेटीस गेला व 'आमचें कांहीं झालें तरी हरकत नाहीं, परंतु आमच्या बायकामुलांचें आपण रक्षण करा; त्यांना वाड्यांत आश्रय द्या,' अशी त्यानें विनंति केली. त्यावर राणीसाहेबांनीं, काळजी करूं नका, असें आश्वासन दिलें. वाड्यांत त्यांना जागा देऊन वर पाहारा ठेवला. पुढें गोरे अधिकारी किल्ल्यांत गेल्यानंतर त्यांनीं आपल्या बायकामुलांना किल्ल्यांत नेलें. किल्ल्यांत गेल्यावरहि राणीसाहेबांनीं गोऱ्या लोकांस वारंवार धीर देऊन दोनतीन दिवसपर्यन्त रात्रीच्या वेळीं अन्नसामुग्री पाठविली. राणीसाहेबांजवळ पुरेसें सैन्य असतें तर त्यांनीं गोऱ्या लोकांच्या केसालाहि धक्का लागूं दिला नसता; अशा कनवाळू अंतःकरणाच्या त्या होत्या. झांशी येथें जून १८५७ मध्यें झालेल्या कत्तलींत राणीसाहेबांचा कांहींहि संबंध नव्हता असें पत्र त्या वेळीं त्या दंग्यांत सांपडून वांचलेल्या टी. ए. मार्टिन नांवाच्या इंग्रजानें स. १८८९ सालीं राणीसाहेबांचे चिरंजीव दामोदरराव यांस लिहिल्याचें प्रसिद्ध आहे.

दुसरा पुरावा 'के' यांचा प्रसिद्ध इतिहास. तो असें म्हणतो, "या कत्तलींत राणीसाहेबांचा एकहि नोकर सामील झाला नव्हता अशी मला साधार माहिती मिळाली आहे. आमच्याच सैनिकांचें तें काम आहे. इरेग्युलर घोडदळानें हुकूम सोडला व आमच्या जेल दरोग्यानें पुढाकार घेऊन कत्तल केली." (के. पृ. ३६९).

# ९ : झांशी भोंवऱ्यांत सांपडली !

महाराणीसाहेबांनीं शिपायांच्या दंग्यांत स्वयंस्फूर्तीनें भाग घेतला नाहीं इतकेंच नव्हे तर इंग्रज सरकारशीं सलोख्यानें संबंध ठेवण्याचा अट्टाहास केला. त्यांनीं, झांशी येथें सैनिकांनीं गोऱ्या लोकांचे खून केले त्याबद्दल जबलपूरच्या कमिशनरला व इतर अधिकाऱ्यांना पत्रें लिहून खेद प्रकट करून या प्रकाराशीं आपला कसलाहि संबंध नाहीं, ही गोष्ट त्यांचे नजरेस आणून इंग्रज सरकार झांशी सुभ्याची सुव्यवस्था लावीपर्यंतच आपण तेथील कारभार हातीं घेतला आहे, असेंहि कळविल्याचें झांशीचा कमिशनर कॅ. पिक्ने यानें लिहिलें आहे.

परंतु सैनिकांनीं युरोपियन अधिकाऱ्यास ठार केल्यानंतर एकदम राजवाड्यावर चाल केली व त्यास वेढा देऊन राणीसाहेबांस निरोप पाठविला कीं 'आम्हांस दिल्लीस जावयाचें आहे, त्या खर्चासाठीं तीन लक्ष रुपये द्या नाहीं तर वाडा तोफा डागून उडवून टाकतों;' हें ऐकतांच वडील मोरोपंत तांबे व कारभारी लक्ष्मणराव चिंतातुर झाले, व या प्रसंगीं काय करावें हें त्यांनींच राणीसाहेबांस विचारलें. राणीसाहेबांनीं घाबरून न जातां त्यांनीं सैनिकांस निरोप पाठवून कळविलें कीं, 'आमचें राज्य खालसा करण्यांत आलें असल्यानें आमचेपाशीं द्रव्य नाहीं. आमचीच स्थिति हलाखीची झाली आहे. आम्हास त्रास देण्यांत पुरुषार्थ नाहीं.' पण या निरोपाचा कांहींएक उपयोग न होतां उलट 'पैसा न दिल्यास वाडा लुटून फस्त करूं व झांशी प्रान्त आपले भाऊबंद सदाशिव नारायण यांस देऊं.' अशी तंबी दिली. दंगेखोरांपुढें आपला निभाव लागणार नाहीं हें पाहतांच राणीसाहेबांनीं आपल्या खासगींतील एक लक्ष रुपयांचा ऐवज दंगेखोरांच्या स्वाधीन केला; तेव्हां दंगेखोरांनीं वेढा उठविला व नगरांत 'खुल्क खुदाका, मुल्क बादशहाका, अमल राणी लक्ष्मीबाईका' अशी द्वाही फिरवून सैन्य दिल्लीच्या मार्गाला लागलें.

हा प्रकार झाल्यानंतर पुढें काय करावें, याचा विचार करण्यासाठीं प्रमुख लोकांना बोलावलें, त्यांत कमिशनरचे इंग्रजी जाणणारे शिरस्तेदारहि

होते. त्यांनीं सांगितलें कीं, सागर येथील कमिशनरला सर्व हकीकत कळवून झांशीचा बंदोबस्त कसा करावा याबद्दल त्यांनाच विचारावें. याप्रमाणें एका गृहस्थास सर्व हकीकतीचा खलिता देऊन तिकडे रवाना केला. झांशी राज्य खालसा केल्यानंतर तेथें हुषार, धोरणी व मुत्सद्दी असे लोक कोणी राहिले नव्हते; लक्ष्मणराव हे कारभारी असत. पण त्यांच्यांत मुत्सद्दीपणा मुळींच नसल्यानें बाहेरची वस्तुस्थिति राणीसाहेबांच्या कानावरहि जात नसे. त्यांनीं झांशीकडील हकीकत वेळोवेळीं इंग्रज अधिकाऱ्यांना कळविण्याची दक्षता न घेतल्यानें राणीसाहेबांचा हेतु इंग्रजांस कळण्याचा मार्ग नाहींसा झाला व आपण वेळोवेळीं इंग्रजांस इकडील हकीकती कळवीत आहोंत अशा समजुतींत राणीसाहेब राहिल्या. राणीसाहेब वेळोवेळीं घडणाऱ्या हकीकती अधिकाऱ्यास कळवीत होत्या ही गोष्ट कमिशनर पिक्ने यांच्या उद्गारावरून ध्यानीं येईल.

अशा रीतीनें अयाचितपणें राणीसाहेबांच्या हातीं झांशीची सत्ता आली. राणीसाहेब एक अबला! ती आतां काय करणार, अशा कल्पनेनें त्यांस त्यांच्या शत्रूंकडून वेळोवेळीं फार त्रास झाला. राणीसाहेबांचे एक दूरचे भाऊबंद सदाशिवराव यांनीं झांशीवर वारसा सांगून कांहीं गुंड लोकांना हाताशीं धरून दंगा आरंभिला. झांशीजवळ ३० मैलांवर करेरा म्हणून किल्ला आहे, तेथील ठाणेदारास हुसकून त्यानें तो घेतला; व आपणास राज्याभिषेक करून ‘महाराजा सदाशिवराव नारायण’ ही पदवी धारण केली. जागजागच्या ठाणेदारांस फर्मान पाठविण्यास सुरुवात केली. अशा रीतीनें झांशी राज्यांत त्यानें धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. तेव्हां राणीसाहेब यांनीं नवें एक हजार सैन्य उभें करून करेरा किल्ल्यास वेढा देऊन तो घेतला. त्या धांदलींत सदाशिवराव पळाला. तेव्हां त्यावर पुनः सैन्य पाठवून त्यास पकडून आणून झांशीच्या तुरुंगांत ठेवलें. याप्रमाणें राणीसाहेबांचा दरारा बसून बुंदेले व ठाकूर शान्त राहिले.

हा दंगा हातानिराळा करतात तोंच ओरछा या संस्थानचा दिवाण नथेखा म्हणून होता त्यानें वीस हजार सैन्य घेऊन झांशीवर स्वारी करण्यासाठीं वेत्रवतीजवळ तळ दिला. राणीसाहेबांस आपण काय बोल बोल म्हणतां शरण आणूं! ती एक अबला; ती काय करणार? अशा घमेंडीनें

नथेखानें राणीसाहेबांस निरोप पाठविला कीं, 'इंग्रज सरकार तुम्हांस तैनात देत आहे ती आम्ही तुम्हांस देऊं, तुम्हीं आमचे मांडलिक व्हावें व किल्ला आणि नगर आमचे स्वाधीन करावें.' राणीसाहेबांनीं मुत्सद्दी मंडळींना सल्ला विचारला. परंतु राणीसाहेबांजवळ स्वाभिमानी व तेजस्वी माणूस कोणीच राहिला नसल्यानें, ओर्छाची राणी देत असलेलें पेन्शन स्वीकारून स्वस्थ बसावें असा त्यांनीं नामर्दपणाचा सल्ला दिला. परंतु महाराणीसाहेब सामान्य नव्हत्या. त्यांच्या नसानसांतून वीरश्री वाहात होती. त्या तेजस्विनीला असलें अपमानास्पद जिणें सहन कसें होणार! तिनें नथेखाला निरोप पाठविला, 'मी शिवरावभाऊंची सून आहे. तुमच्यासारख्यास बायका बनविण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं आहे हें ओळखून अवश्य तर युद्धास या!' राणीसाहेबांनीं नथूखाच्या चढाईची वार्ता सेंट्रल इंडियाचे पोलिटिकल एजन्ट मि. हॅमिल्टन यांनाहि कळविण्याची व्यवस्था केली, परंतु नथूखानें त्यांचे दूत मध्यंतरीं पकडून हॅमिल्टनपर्यंत ही वार्ताच पोहोंचूं दिली नाहीं, व झांशीवर हल्ला करण्याची तयारी केली. राणीसाहेबांनीं आपल्या पिढीजाद सरदारांस, ठाकूर व बुंदेले जहागीरदारांस निमंत्रण देऊन बोलावून घेतलें. त्यांनींहि आश्वासन दिलें कीं, "झांशीचें सार्वभौमत्व इंग्रजाकडे असल्यानें, व ओर्छावरहि इंग्रजी हुकमत असल्यानें तें राज्य आपल्या बरोबरीचें आहे. त्याच्याकडे सार्वभौमत्वाचे अधिकार देणें योग्य नाहीं. झांशी राज्यरक्षणासाठीं आम्ही प्राणार्पणहि करण्यास सिद्ध आहोंत!"

अशा रीतीनें झांशीस सिद्धता झाली. नथेखाहि तयार होताच. झांशीनें तयारी केली तीहि जुजबी स्वरूपाची. जुनें सैन्य काढून टाकलें होतें. तोफा दारुगोळा नष्ट केला होता. यामुळें नथेखाशीं टक्कर देणें जरा कठीणच होतें. तथापि राणीसाहेब महा चतुर व प्रसंगावधानी होत्या. त्यांनीं सदाशिवरावांचें बंड मोडण्यासाठीं थोडें सैन्य उभारलें होतें त्यांत भर घालून तें पांच हजार केलें. कांहीं तोफा लपवून ठेवल्या होत्या, त्या बाहेर काढून बुरुजावर चढविल्या. जागजागच्या सरदारांस निमंत्रणें देऊन बोलावून घेतलें व जवाहरसिंग कटिलेवाले यांस सेनापति करून सैन्य तयार ठेवलें. राणीसाहेबांनीं स्वतः मर्दानी वेष धारण करून बुरुजावर जातीनें हजर राहिल्या. भगवा झेंडा व यूनियन जॅक हीं पुनः किल्ल्यावर फडकूं लागलीं.

नथुखां मोठ्या दिमाखानें चाल करून येऊं लागला. किल्ल्याचे दक्षिणेस तोफांच्या माऱ्यांत तो येतांच त्यांजवर किल्ल्यांतील तोफांनीं असा भयंकर अग्निवर्षाव केला कीं, नथेखांस माघार घ्यावी लागली. तथापि त्यानें किल्ल्यास वेढा घातला. युद्धाच्या आरंभींच त्याचें निशाण व मरातबाचे हत्ती राणीसाहेबांच्या सैन्यानें जिंकून घेतले त्यामुळें त्याच्या सैन्याचें अवसान खचलें. राणीसाहेबांसारखी एक स्त्री आपला पराजय करते ही गोष्ट नथेखांस फार लागली व त्यानें एकदम चौफेर चढाई करण्यास सुरुवात केली. तेव्हां राणीसाहेबांनी किल्ल्यांतील प्रचंड तोफ कडकबिजली बुरुजावर आणून गोलंदाजास सुवर्णालंकार बक्षिस देऊन नथेखांच्या सैन्यावर प्रचंड मारा सुरू केला. ही तोफ सुरू होतांच शत्रुसैन्यास दे माय धरणी ठाय होऊन त्यानें पलायन केलें ! ओर्छा सैन्याचा संपूर्ण पराजय झाला. त्यांचे अनेक लोक पाडाव झाले. तेव्हां ओर्छेकरांनीं तहाचें बोलणें सुरू केलें व राणीसाहेबांनींहि ओर्छाच्या राणीशीं मित्रत्वाचा तह केला, व युद्धाचा सर्व खर्च घेतला.

अशा रीतीनें झांशीवर आलेलें दुसरें संकट राणीसाहेबांनीं मोठ्या कौशल्यानें, हिमतीनें व शौर्यानें परतवून लावलें व सर्व बुंदेलखंडांत आपल्या नांवाचा दरारा उत्पन्न केला. झांशी येथें घडत असलेल्या सर्व गोष्टी राणीसाहेब हॅमिल्टनला लिहून कळवीत असत. परंतु नथेखां हा त्यांच्या वाइटावर असल्यानें राणीसाहेबांचा पत्रव्यवहार मधल्यामध्येंच लुटून वस्तुस्थिति इंग्रजांना त्यानें कळूं दिली नाहीं. याखेरीज राणीसाहेबांनीं इंग्रजांकडे आपला एक वकील पाठवून ओर्छेकरांनीं झांशीवर चढाई कशी केली व त्याचा पराजय कसा झाला इत्यादि सर्व माहिती त्यांस कळविण्याची व्यवस्था केली. परंतु सदर वकीलमहाशय इंग्रजांकडे न जातां वाटेंतच एका गांवीं राहून तेथून बनावट पत्रें लिहून तीं राणीसाहेबांकडे पाठवूं लागले; यामुळें इंग्रज अधिकाऱ्यांस वस्तुस्थिति मुळींच समजली नाहीं व राणीसाहेबांस त्यांनीं बंडखोर ठरविलें !

शिपायांनीं स्वातंत्र्ययुद्ध सुरू केल्यानंतर त्यांत राणीसाहेबांना पडावें लागलें; व नंतर इंग्रजांनीं झांशीला बंड ठरवून झांशीवर हल्ला करण्यासाटीं सैन्य रवाना केलें. या दरम्यान सुमारें अकरा महिने गेले. या अकरा

महिन्यांत राणीसाहेबांचा नित्यक्रम कसा असे, त्यांचें प्रजावात्सल्य कसें असे, त्या राजकाज कोणत्या पद्धतीनें करीत, इत्यादि माहिती प्रकरण सात मध्यें दिलेली आहे. तीवरून राणीसाहेबांच्या अल्पकालीन राजवटीची यथार्थ कल्पना येईल.

नथेखांचा पराजय केल्यानंतर नथेखां स्वस्थ बसला नाहीं. त्यानें इंग्रज अधिकाऱ्यांस पत्रें पाठवून, राणीसाहेबांनीं आपणाविरुद्ध बंड पुकारलें आहे म्हणून मी त्यांच्याशीं लढत आहे, असा उलट पत्रव्यवहार त्यानें सुरू ठेवला व त्याचा परिणाम त्याला अपेक्षित असाच झाला. राणीसाहेबांनीं झांशी प्रान्त स्वतःच्या बाहुबलावर जिंकून घेतला. लुटारू, दंगेखोर यांचा बंदोबस्त केला. सर्वत्र शान्तता प्रस्थापित केली, परंतु या सर्व गोष्टी त्यांनीं इंग्रजांचे वतीनें केल्या, व इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांचे हेतु योग्य रीतीनें कळविण्यांत आले असते तर झांशीवर स्वारी होती ना, कदाचित् झांशी राज्य कायम राहिलेंहि असतें; पण हें घडलें नाहीं. त्यांनीं दूरदृष्टि ठेवून ग्वाल्हेर व इंदूर येथील पोलिटिकल एजन्टाकडे इंग्रजी जाणणारा एक वकीलहि पाठविला; परंतु तो कृतघ्न ठरून त्यानें एजन्टाची भेट न घेतां मध्येंच इसागड या शिंद्यांच्या ताब्यांतील एका गांवीं राहून तेथून झांशीस खोटींच पत्रें पाठवूं लागला. झांशी दरबारांत मुत्सद्द्यांचा अभाव असल्यानें त्यांनींहि या पत्रांवर विश्वास ठेवला व ते स्वस्थ राहिले; आणि याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला !

नानासाहेब, रावसाहेब पेशवे, अयोध्येचे नबाब यांजवर अन्याय झाल्याकारणानें त्यांनीं स्वातंत्र्ययुद्धांत पुढाकार घेतला. झांशीवरहि अन्याय झाला असल्यानें त्याहि युद्धांत सामील झाल्या असल्याच पाहिजेत; व त्यांनीं झांशींतील बंडाई मोडली, नथुखाला पाणी पाजलें या गोष्टीहि इंग्रजद्रोही आहेत अशीच इंग्रज अधिकाऱ्यांची कल्पना झाली. झांशी येथें शिपायांनीं अनेक इंग्रज ठार केले, यांत राणीसाहेबांचा हात असलाच पाहिजे अशी त्यांची कल्पना झाली. राणीसाहेबांनीं ओर्छाचें बंड मोडलें यासंबंधांत मि. मार्टिन हे गृहस्थ आपल्या ता. २० ऑगस्ट १८८९ रोजीं दामोदरराव यांना लिहिलेल्या पत्रांत म्हणतात—

"बंडखोरांनीं झांशी सोडल्यानंतर राणीसाहेबांनीं झांशीचा कारभार आपल्या हातीं घेतला हें सत्य आहे. दतिया व ओर्छा या संस्थानांना झांशीचें

रक्षण खास करतां आलें असतें; परंतु त्यांनीं काडीइतकेंहि साहाय्य केलें नाहीं. इतकेंच नव्हे तर राणी काय एक स्त्री ! तिजकडून तिचा मुलूख आपण सहज जिंकून घेऊं, अशा कल्पनेनें दोन्ही संस्थानच्या सैन्यानें झांशीवर हल्ला केला, पण त्या रणशूर स्त्रीनें दोघांनाहि खडे चारले !"

राणीसाहेबांच्या सहानुभूतीपूर्वक वागण्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. लॉर्ड कॅनिंग हे त्या वेळीं गव्हर्नर जनरल होते, व सर सेनापति होते सर कॉलीन कॅम्बेल. त्यांनीं हें स्वातंत्र्ययुद्ध कसें मोडून काढावयाचें हें ठरविलें. मध्य हिंदुस्थानांत झांशी हें नगर इंग्रजांच्या दृष्टीनें बंडवाल्यांचें मुख्य केंद्र होतें. झांशीचा किल्लाहि बळकट असल्यानें तें नगर प्रथम जिंकावयाची योजना सिद्ध केली. मुंबई व मद्रास येथून येणाऱ्या सैन्याचे दोन भाग करण्यांत आले. पैकीं एका भागाचें मुख्य ठिकाण महू हें करून त्या सैन्यानें महूपासून काल्पीपर्यन्त सर्व प्रान्त जिंकून घ्यावा, दुसऱ्या विभागाचें मुख्य ठाणें जबलपूर करून प्रयाग व मिर्झापूर येथील सैन्याशीं पूर्ववत् दळणवळण सुरू करून बुंदेलखंडांत शिरून बांदापर्यन्त सर्व प्रान्त हस्तगत करावा. त्याप्रमाणें पहिल्या भागावर सर ह्यू रोज यांची नेमणूक होऊन दुसऱ्या भागाच्या सैन्याचें आधिपत्य ब्रिगेडियर जनरल व्हिटलॉक यांजकडे देण्यांत आलें.

लखनौ, दिल्ली, कानपूर येथील युद्धासाठीं इंग्रजांना दक्षिणेंतील सैन्याचें साहाय्य पाहिजे होतें. कारण नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व माळवा आणि बुंदेलखंड हे प्रान्त सैनिकांच्या ताब्यांत होते. काल्पीहि आसमंत भागासुद्धां सैनिकांनीं आपल्या स्वाधीन ठेविली होती. सर ह्यू रोज यांनीं आपल्या सैन्याचे दोन भाग केले. पहिल्या तुकडीवर ब्रिगेडिअर स्टुअर्ट यांस नेमलें. व दुसऱ्या तुकडीवर ब्रिगेडिअर स्टुवर्ट नांवाच्या दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. पहिल्या तुकडींतील मुंबईचा ३ रा रिसाला, १४ वी लाइट ड्रगून्स, हैद्राबाद घोडदळ, ८६ व्या पलटणीचे दोन भाग, मुंबई देशी पायदळ २५ वी पलटण व तीन तोफखाने होते. दुसऱ्या तुकडींत मुंबई रिसाला मुख्य विभाग, हैद्राबाद घोडदळ, भोपाळचा तोफखाना, व मद्रास सॅपर्सची एक तुकडी इतकें सैन्य होतें. पहिल्या तुकडीचा तळ महू व दुसरीचा तळ सिहोर

येथें ठेवण्यांत आला व ता. १७ डिसेंबर १८५७ रोजीं सर ह्यू रोज यांनीं या सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें.

ता. ६ जानेवारी रोजीं सर ह्यू रोज व सर रॉबर्ट हॅमिल्टन यांनीं सिहोर येथील दुसऱ्या तुकडीला मिळण्यासाठीं महू येथून कूच केलें. वाटेंत भोपाळचे बेगमेनें ८०० सैनिक पाठविले तेहि या सैन्यास मिळाले. या सर्व सैन्यासुद्धां सर ह्यू रोज सागरकडे वळले व वाटेंत सागरपासून २४ मैलांवर असलेला रहाटगड येथें येऊन पोहोंचले. हा किल्ला चांगला लढाऊ असून अफगाण पठाणांनीं त्याचा उत्तम बंदोबस्त ठेवला होता. परंतु अवघ्या चार दिवसांत इंग्रजांनीं तो किल्ला जिंकून घेतला. तेथून सर ह्यूनें पुढें आक्रमण सुरू करून, वाटेंत बाणपूर येथील राजानें त्यास अडविलें त्याचाहि पराजय करून इंग्रज सैन्य सागरवर ता. ३ फेब्रुआरी रोजीं उतरलें. तेथील तुरुंगांत असलेल्या इंग्रज कैद्यांची मुक्तता झाली, मोठा जयजयकार झाला. अवघ्या एका महिन्याच्या आंत सागरपर्यंत सर्व प्रान्त इंग्रजांनीं पुनः आपल्या सत्तेखालीं आणला. सागरपाशीं गडाकोटा म्हणून किल्ला होता तोहि जिंकून घेतला. तेथें इंग्रजांस पुष्कळ दारुगोळा व इतर सामुग्री सांपडली.

आतां बुंदेलखंडावर स्वारी करण्यास हरकत नाहीं, व त्यासाठीं प्रथम झांशी सर करतां आली तर बण्डवाले नामशेष होतील, तेव्हां प्रथम झांशी-वर जा अशी सूचना सरसेनापति कॅम्बेल यांनीं रोज साहेबांस केली. परंतु तें काम तितकेंसें सुलभ नव्हतें. कारण सागरपासून कानपूरपर्यंतचा सर्व प्रान्त बण्डवाल्यांच्या स्वामित्वाखालीं होता.

मागें बाणपूर इंग्रजांनीं घेतल्याची हकीकत दिली त्याबद्दलचा तपशील येथें जरा जास्त विस्तारानें सांगणें इष्ट आहे. कारण बाणपूरचा राजा मर्दनसिंग महाराणीसाहेबांचा मानलेला भाऊ होता. हें छोटेखानी बाणपूर राज्य झांशीचें मांडलिक असून झांशीच्या पश्चिमेस वेत्रवतीच्या कांठीं आहे. हा राजा शिपायांच्या युद्धांत सामील झाला असून त्यानें पलटणींतील लोकांना आश्रयहि दिला होता. तो मोठा शूरहि होता. ह्यूजचें सैन्य बुंदेलखंडाचा रस्ता चालूं लागलें. त्यांचा हल्ला आपणांवर होणार हें जाणून त्यानें नगरांतील लोकांना बाहेर जाण्यास सुचविलें व आपल्या कुटुंबीयांची झांशीला रवानगी केली. राणीसाहेबांनींहि त्यांची नीट व्यवस्था लावली. इतक्यांत बाणपुरावर

इंग्रज सैन्य आलें, तेथें लढाई होऊन बाणपूर पडलें. तेथें दोनप्रहरपर्यंत इंग्रजी फौजांनीं कत्तल केली. इंग्रजांची द्वाही फिरविली. तेव्हां बाणपूरचा राजा आपलें सैन्य घेऊन वेत्रवतीच्या बेहेड्यांत दबा धरून बसला. वेत्रवतीच्या कांठीं मोठमोठे बेहेडे म्हणजे खांचा असून त्यांत हजारों फौजा राहतील इतक्या त्या मोठ्या असतात. बाणपूरच्या राजाचा पराजय होऊन तो कोठें निघून गेल्याची वार्ता झांशीस समजतांच तेथें मोठी गडबड उडाली. इंग्रज सैन्य आतां झांशीवर चालून येणार अशी राणीसाहेबांची खात्री झाली व त्याहि झांशीच्या बचावाच्या प्रयत्नास लागल्या. तटबंदी भक्कम करण्यांत आली. शिबंदींत जास्त भरती करण्यांत आली; तटावर तोफा लावून रोखून ठेवल्या. दारूगोळा तयार करण्याचें काम झपाट्यानें सुरू झालें. अन्नसामुग्रीहि भरून त्याची तरतूद करून ठेवण्यांत आली. खजिना रिताच होता. तेव्हां खासगीकडील चांदीचीं घंगाळीं, पातेलीं, घागरी इत्यादि आटवून त्यांचें नाणें करण्यांत आलें; आणि युद्धांत जयप्राप्ती व्हावी म्हणून अनुष्ठानेंहि सुरू केलीं. अशा रीतीनें मानुषी व दैवी प्रयत्नांस राणीसाहेब जारीनें लागल्या !

इकडे ह्यूजनें सागर घेऊन पुढें सरकण्याचा प्रयत्न केला. पुढें जातांना वाटेंत नारुत, मालथोन, मदनपूर, धयोनी इत्यादि मोठेमोठे घाट लागतात. ते सर्व क्रान्तिकारकांच्या सैन्यानें व्यापून टाकले होते, व सर्वत्र नाकेबंदी केली होती. नारुत घाट हा त्यांतल्या त्यांत जास्त कठीण समजला जातो; व तेथें बाणपूरचा राजा आपल्या सैन्यानिशीं तयार होता. यामुळें तो रस्ता ओलांडणें अशक्य होतें. तेव्हां ह्यूज साहेबांनीं शहागडच्या ताब्यांतील मदनपूरच्या घाटानें सैन्य नेण्याचें ठरविलें. शहागडच्या राजाच्या मदतीस बाणपूरचा राजा येऊं नये म्हणून त्यानें नारुतच्या बाजूस थोडेंसें सैन्य पाठवून हुलकावणी दिली; आणि आपण स्वतः मदनपूर घांटाकडे वळला, व तेथें शहागड सैन्याची दाणादाण उडविली ! या प्रसंगीं क्रान्तिकारकांनीं मोठ्या जवांमर्दीनें संग्राम केला कीं ह्यूजसाहेबहि चकित झाला ! पण अखेरीस शहागडसैन्याचा पराभव झाला, व ह्यूजचें सैन्य शहागड संस्थानांतील सराई या किल्ल्याजवळ येऊन ठेपलें. किल्ल्याच्या पायथ्याशीं राजाचा सुंदर बाग होता. तेथं सैन्याला विश्रान्ति देण्यांत आली, व दुसरे

दिवशीं मुरीवरा हा किल्ला हस्तगत केला. सर रॉबर्ट हॅमिल्टन यानें शहागडच्या राजाला बंडखोर ठरवून त्याचें संस्थान खालसा केलें! शहागडप्रमाणेंच बाणपूर लुटून फस्त केलें. व तेथील सुंदर राजवाडा जाळून नष्ट केला!

ता. १२ रोजीं ह्यूजचें सैन्य ताल बेहूतला निघालें. तेथील किल्लाहि विनायासें स्वाधीन झाला. ता. १७ मार्च रोजीं इंग्रज सैन्य बेटवा नदी ओलांडून पैलतीरीं पोहोंचलें. चंदेरीचा किल्ला जिंकून घेतला. तेथील सैन्य झांशीस पळून गेलें. या चंदेरीच्या प्रसंगीं ब्रिटिश सैन्यानें फार क्रूरपणा करून अनेक निरपराधी लोकांना ठार केलें. ता. १९ मार्च रोजीं ह्यूजचा तळ चंचनपुरास पडला. तेथून झांशी नगरी अवघ्या १४ मैलांवर राहिली. आतां झांशी जिंकली कीं आपला कार्यभाग झालाच, अशा आशेंत व विजयश्रीच्या धुंदींत इंग्रज सैन्य बेहोष झालें! या वेळीं सर ह्यूज रोज याजपुढें एक पेंचप्रसंग उत्पन्न झाला. बुंदेलखंडांतील चरखारी संस्थानचा राजा रतनसिंग हा इंग्रजांचा दोस्त होता. त्याच्या राजधानीला क्रान्तिकारकांचा सेनानी तात्या टोपे यांनीं वेढा घातला होता. त्याची प्रथम सुटका करा, व नंतर झांशी हस्तगत करा, असा सर सेनापतीनें सर रोज याला निरोप पाठविला. चंचनपुराहून झांशी अवघी १४ मैल व चरखारी ८० मैल दूर; तेव्हां हातचें सोडून चरखारीच्या मागें गेल्यास दोन्हीकडचें यश नाहींसें होणार, अशी चिंता सर रोज यांस वाटली; व काय करावें अशी विवंचना उत्पन्न झाली. तेव्हां सर रॉबर्ट हॅमिल्टन यानें सर्व जबाबदारी आपणावर घेऊन प्रथम झांशी घ्यावी व ती घेणें इष्ट कसें आहे ही गोष्ट सर सेनापतीस कळविली व चरखारीचा प्रश्न तूर्त बाजूस ठेवून झांशीकडे मोर्चे वळविले!

---

This She well knew, and - not one iota undaunted - prepared a commensurate resistance, such as one, indeed, as would have shed honour and fame upon the name of any prince, whose hands were unstained by the blood of the innocent and unoffending.

Dr. Low : Central India, P. 237.

झांशी नगरास सर ह्यू रोज यानें मोर्चे लावले ते दिवस चैत्राचे होते. महाराष्ट्रीय महिलांस चैत्रमास किती मंगल वाटतो, त्यानिमित्त सर्वत्र चैत्रांगणें काढून वसंतऋतूचें सुस्वागत कसें करण्यांत येतें, घरोघर सुवासिनींच्या हळदीकुंकवाचे थाट कशा प्रकारचे होतात हें सर्वश्रुतच आहे. घरंदाज लोकांच्या घरीं वसंतपूजा, मंत्रजागर हे उत्सवहि होत असतात. राणीसाहेबांनीं आपण होऊन इंग्रजांची कुरापत न काढतां त्यांस साहाय्य दिलें परंतु तें सर्व विसरून इंग्रज झांशी नगरीवर हल्ला करणार ही गोष्ट निश्चित होतांच. झांशींतील कमलाधिष्ठित महिषासुरमर्दिनीहि आवेशानें युद्धोन्मुख झाली यांत नवल काय? युद्ध होणार, तें कांहीं टळत नाहीं अशी खात्री पटतांच, आज राजैश्वर्य अनुकूल आहे, उद्यां दिवस कसा येणार कोणी सांगावें! असा विचार करून राणीसाहेबांनीं चैत्रागौरीचा हळदीकुंकू-समारंभ मोठ्या थाटानें करण्याचें ठरविलें. शिवाय महालक्ष्मी त्यांची कुलस्वामिनी; तिची सेवा सर्व राजवैभव हातीं आहे तोंच करून घ्यावी, ही राणीसाहेबांची मनीषा. यासाठीं त्यांनीं हळदीकुंकवाची मोठ्या कडाक्याची सिद्धता केली. चार पांच खंडी हरभरे भिजत घातले, शुक्रवारीं समारंभ करण्याचें ठरविलें. नगरांतील सर्व सुवासिनींना निमंत्रणें गेलीं. ब्राह्मण, वैश्य, शूद्र—सर्व जातींच्या स्त्रियांस पाचारण करण्यांत आलें. सर्वांस हळदीकुंकू, सुवासिक पुष्पें, चन्दनलेप, खिरापत, रुप्याचे ताह्मनभर दाणे, अत्तरगुलाब, पानसुपारी सर्वांस यथास्थित दिलें. सर्व जातींच्या स्त्रिया उत्तम प्रकारचीं वस्त्रें नेसून, अंगावर अलंकार घालून दुपारीं दोन वाजल्या-

पासून रात्रीं नऊपर्यंत किल्ल्यांत जात होत्या. कोणी मेण्यांत, कोणी पालखीत अशा आपआपल्या इतमामाप्रमाणें जात येत. या वेळीं जणुं झांशी नगरीची राजलक्ष्मी अखेरचें दर्शन देण्यासाठींच बाहेर पडली होती! दिवाणखान्यांत एका मजल्याइतकी उंच व उतरती जमिनीपर्यंत गौर सजवून शोभिवंत आरास केली होती. त्या राजवैभवाचें काय वर्णन करावयाचें? जिकडे तिकडे लक्ष्मी प्रसन्नमुखानें खेळत बागडत आहे असाच भास व्हावा!

झांशीच्या महालक्ष्मी! आतां हें तुझें शेवटचेंच मंगलकार्य! स्वतंत्र झांशींतील हा अखेरचाच वसंतोत्सव!! म्हणून तर तूं इतकी वैभवानें नटलीस नाहींस ना? परंतु झांशीच्या कमलवासिनी लक्ष्मीनें आतां नवावतार धारण केला. वसंतोत्सव तर तिला अत्यंत प्रिय, पण आतां ती साधी रांगोळी घालून हा वसंतोत्सव साजरा करणार नसून त्यासाठीं तिच्या स्वातंत्र्यावर आघात करणारांच्या रुधिराचे सडे घालणार व त्यावर रुंड-पुष्पांच्या माला अर्पण करून महिषासुरमर्दिनी आदिशक्तीची पूजा बांधणार! आणि असा मंगलांतील मंगल वसंतोत्सव साजरा करणार!!

आपल्या घराण्यानें इंग्रजांशीं आतांपर्यंत अत्यंत निष्ठेनें वर्तन केलें. आपणहि प्राप्त परिस्थितीपुढें मान लववून स्वस्थ बसलों; व इंग्रजी राज्य नष्ट झालें असतां इंग्रजासाठीं म्हणून आपण हातीं राजदंड धारण केला व झांशी प्रान्त शान्त राखला! परंतु या कशाचीहि दखल न घेतां इंग्रजांनीं झांशीवर मोर्चे लावले, हें पाहतांच ती स्वाभिमानी सिंहीण गर्जना करून उठावी, यांत आश्चर्य काय? तिच्या नसानसांतून स्वातंत्र्याचें रक्त वाहात होतें. त्याला हा अपमान सहन कसा होणार? 'हतोवा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' ही तर हिंदुधर्माची शिकवण. आपल्या वीरवर पूर्वजांनीं हातीं क्षत्रियकर्माचें कंकण बांधलें तें सत्य करून दाखविण्याची ही सुवर्णसंधीच दैवयोगें आली!

कोणाचा आधार नसलेली एक महाराष्ट्र महिला; पदरीं समंजस, जाणत्या, अनुभवी लोकांचा अभाव व स्वतःचें वयहि अवघें २२ वर्षांचें; नाहीं जगाचा अनुभव, नाहीं जवळ पैसा, ना सामुग्री—अशी स्वतःची बाजू, तर दुसरी बाजू इंग्रजांची किती तरी सबळ. चोंहोंकडून लोकांना बंडवाले ठरवून सहस्रों लोकांचा वध करून त्यांनीं जिंकलेला

प्रदेश पुनः जिंकून घेतल्यानें विजयोन्मदानें बेहोष झालेलें इंग्रजी सैन्य, साधन सामुग्रीचा तर सागर पाठीशीं. देशी राजेरजवाड्यांचा पाठिंबा व अनेक युद्धांत नांव गाजविलेले रणकुशल योद्धे युद्ध चालविण्याला. दोन्ही पक्षांची तुलना तरी कशी करावयाची!

परंतु ही परिस्थिति उघड उघड दिसत असूनसुद्धां ती अपमानानें डिंवचलेली सिंहीण झांशीच्या कुहरांतून मोठ्या त्वेषानें उसळून उठली व झांशी लढविण्याचा तिनें निश्चय केला. राणीसाहेबांनीं झांशीचा कारभार आपल्या हातीं घेतल्यापासून आपला मुक्काम झांशीच्या किल्ल्यांतच ठेवलेला होता. तत्कालीन स्थितीच्या मानानें तो लढाऊ किल्ला म्हणूनच प्रसिद्ध होता. किल्ल्यावरील तटावर जागोजाग सुमारें ५१ तोफा लावून ठेवल्या. त्या तोफांत भवानीशंकर, कडकबिजली, घनगर्ज व नालदार इत्यादि तोफा नामांकित होत्या. नथेखांचें बंड मोडण्यासाठीं राणीसाहेबांनीं सैन्य ठेवलें होतेंच, तेव्हांपासून तोफांची व्यवस्थाहि चांगली ठेवण्यांत येत होती. सैन्यहि शिस्तींत व हुशारींत ठेवण्यांत आलें होतें. राणीसाहेबांना वस्तुतः युद्धाचा अनुभव फार थोडा. प्रत्यक्ष रणाचें शिक्षणहि त्यांना मिळण्याचा प्रसंग आलेला नव्हता. परंतु प्रसंगानें मनुष्याची परीक्षा होते हेंच सत्य. कसलाहि अनुभव नाहीं, वयहि अल्प, साधनसामुग्रीचा सर्वतोपरी अभाव; अशी सगळीकडून असमाधानकारक व प्रतिकूल स्थिति असतांहि राणीसाहेबांचें धैर्य किंचितहि विचलित न होतां, संकटें आलीं म्हणजे तें उफाळून उठावें, किंवा सुवर्ण अग्नींत घालतांच त्याचें तेज वाढतें तीच स्थिति राणीसाहेबांची झाली. नथेखांचें बंड मोडतांना त्यांना जो कांहीं अनुभव आला तो त्यांना या मोठ्या रणकंदनाला चांगला उपयोगी पडला. महूपासून काल्पीपर्यंत आपल्या फौजा मोठ्या विजयोन्मदानें नेणारा रणपंडित सर ह्यू रोज कोणीकडे व त्याच्याशीं टक्कर देणारी अल्प-वयीन व अननुभवी महाराष्ट्रीय तरुणी कोणीकडे!!

परंतु परमेश्वराची इच्छाच अशी,—महाराष्ट्रीयांतील शौर्यवीर्यादि गुण लोपले नाहींत, फक्त ते सुप्तावस्थेंत आहेत. त्याला कोणी डिंवचतांच ते गर्जना करून शत्रूचा संहार करण्यास अग्रसर होतात, ही गोष्ट जगाला पटवून द्यावी, जगानें मुक्तकंठानें या महाराष्ट्रीय महिलारत्नाचे पोवाडे गावे,

भविष्यकालांतील अभागी, भीरू बनलेल्या महाराष्ट्रीयांना त्या स्फूर्तिदायक चरित्रापासून स्फूर्ति मिळावी, अशीच परमेश्वराची शुभेच्छा असावी असें कां म्हणूं नये? एरवीं झांशीचा संग्राम हा बरोबरीचा सामना नव्हे! एखाद्या भारतीय वीरानें तर महिलांवर शस्त्र उचलीत नाहीं म्हणून हा समरप्रसंग टाळला असता! परंतु न घडणारी गोष्ट घडली; एका हिंदु अबलेनें एका रणगाजी इंग्रजाला ची ची करावयास लावलें, आणि भारतवर्षाचें नांव उज्ज्वल केलें! असो.

सर रोज याचें सैन्य झांशीं भोंवतालच्या मैदानांत येऊन उतरलें. त्यानें ता. २१ मार्च रोजीं झांशीच्या किल्ल्याची व शहराच्या परिसराची सूक्ष्मपणें पाहणी केली. माऱ्याच्या जागा शोधून काढून तेथें मोर्चे उभारले. एका उंच ठिकाणीं तारायंत्र उभारून तेथून दुर्बिणीच्या साहाय्यानें किल्ल्याची टेहेळणी करण्यासाठीं एक तळ उभारला. त्यानें सैन्याचे एकदर सात विभाग केले व ते सात अधिकाऱ्यांकडे वांटून देऊन त्यांना त्यांचीं ठाणीं नेमून दिलीं. कांहीं सैन्य राखीव म्हणून बाजूला ठेवलें. झांशीभोंवतालचीं सर्व मैदानें, टेकड्या ब्रिटिश सैन्यानें व्यापून टाकल्या.

आतां राणीसाहेब पुन्या सावध झाल्या होत्या. त्यांनीं परिस्थिति नीट पाहिली, व आपणाकडून कसून तयारी चालविली. यासंबंधानें डॉ. लो म्हणतो, “आमचें सैन्य आलेलें पाहतांच राणीसाहेबांनीं किल्ल्याच्या दक्षिण दरवाजाच्या पूर्वेस तीन मोठे मोर्चे उभे केले. या कामीं पुरुषांच्या बरोबरीनें बायकाहि कामें करीत होत्या. त्या अगदीं मधमाशांप्रमाणें कामांत गर्क होत्या. इतक्या झटपटीनें काम झालेलें माझ्या तर पाहण्यांत नाहीं. लवकरच हे मोर्चे उत्तम प्रकारें शिल्पशास्त्राबरहुकूम तयार झाले.” सर रोज म्हणतो, “मोर्चांवर बायका काम करीत होत्या, दारुगोळ्याची वाहतुकहि त्याच करीत होत्या. तेथील कामाच्या स्वरूपावरून प्रतिकार फार सख्त होणार अशी आमची खात्री झाली!”

इंग्रज सैन्यानें झांशीच्या तटापासून ३०० यार्डांवर कांहीं तोफा रोखून ठेवल्या. एका देवळावरहि तोफांचा मोर्चा बांधला. किल्ल्यांत व नगरांत अत्यंत जागरूकतेनें पाहारा सुरू होता. रात्रीच्या वेळीं तिसऱ्या युरोपियन पलटणीनें पुढें चाल केली. झांशीचें सैन्यहि तयार होतें, व त्यांनीं तोफा

सुरू केल्या. प्रथम त्या नीट लागू पडेनात. इंग्रज सैन्याच्या डोक्यावरून गोळे जाऊं लागले. तेव्हां घनगर्ज तोफ सुरू करण्यांत आली. त्याबरोबर इंग्रज सैन्याची दाणादाण उडाली. ता. २५ रोजीं इंग्रजांनीं नवे मोर्चे बांधून तोफा सुरू केल्या, त्याबरोबर किल्ल्यांत गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. झांशीचे अनेक गोलंदाज ठार झाले व कांहीं तोफाहि बंद पडल्या, पण शहरावर मोर्चा लागू होईना. अखेरीस हिंदुस्थानांतील इतिहासांतील नेहमीं घडणारी घटना घडून आली! इंग्रजास एक बुंदेला फितुर होऊन त्यानें मोर्चा लावण्याला योग्य स्थळ दाखवून दिलें! मग काय, इंग्रजांनीं शहरावर आग ओतण्यास सुरवात केली. शहरांत एकच आकान्त उडाला. कित्येक घरें धुळीस मिळालीं. आगीनेंहि प्रलय मांडला. आणि हा प्रकोप पाहून राणी-साहेबांस काय दुःखवेदना झाल्या असतील हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे! परंतु अशा प्रसंगीं त्यांनीं आपला धीर खचूं दिला नाहीं. ठिक-ठिकाणीं जास्त माणसें ठेवून योग्य बंदोबस्त केला. अग्नीच्या प्रलयामुळें नगरांतील प्रजाजन दीन होऊन गेले होते. त्या सर्व अनाथांना अन्न देण्याची व्यवस्था केली. गणपतीच्या मंदिरांत अन्नछत्र सुरू केलें. चणे-फुटाणेहि वांटण्याची व्यवस्था केली. राणीसाहेबांनीं प्रयत्नांची शिकस्त केली. इंग्रजांकडील पुष्कळ लोक मारले; चौथे दिवशीं इंग्रजानें दक्षिण बुरुजावरची तोफ बंद पाडली. तेथें माणूस ठरेना. परंतु राणीसाहेबांनीं गोलंदाजांस उत्तेजन, शाबासकी व पारितोषिकें देऊन गौरविलें. त्यांनींहि मोठ्या हिरीरीनें तोफ पुनः चालू करून इंग्रजी तोफ बंद केली! ता. ३१ मार्चपर्यंत अशा रीतीनें हें रणकंदन चाललें होतें. त्याचें वर्णन डॉ. लो यानें पुढील आशयाचें केलें आहे:—

"ता. २८ रोजीं दोन्हीकडील तोफखान्यांची सारखी झुंज सुरू होती. किल्ल्यावरून चौफेर व अविरत मारा चालू होता. कित्येक वेळां आम्ही शत्रूच्या तोफा बंद पाडल्या, पण तितक्या वेळां मोठ्या ईर्षेनें त्या चालू करण्यांत येत. अशा रीतीनें हलकल्लोळ उडाला असतांना किल्ल्याच्या पूर्व अंगाला मोठा स्फोट झाला. मग त्याच जागेवर आमचा सारखा मारा सुरू झाला. स्फोटाच्या धडाक्यानें किल्ल्यांतील इमारतींना हादरे बसून त्या खिळखिळ्या झाल्या. अशा रीतीनें मारा करून ता. २९ रोजीं किल्ल्या-वरील डाव्या बाजूचा तोफखाना निकामी केला व किल्ल्याजवळील शहराच्या

तटबंदीलाहि खिंडार पाडलें. आम्ही अटीतटीनें सामना सुरू केला. परंतु शत्रूहि निग्रहानें प्रतिकार करीत होता. शत्रु तर आमच्यावर नुसती आग फेकीत होता. किल्ल्यांतील बागेंत एक मोर्चा उभारला होता. येथें शत्रूच्या नेहमीं हालचाली चालत. ता. ३० व ३१ रोजीं सतत तोफा डागणें चालू होतें. शत्रूनें आग ओतण्याची परमावधी केली. शत्रूनें प्रतिकार अत्यंत दृढतापूर्वक चालविला असून त्याची जागरूकताहि स्पृहणीय होती. इतकेंच नव्हे तर जों जों संकटें जास्त तों तों त्याचें धैर्य सारखें वाढतच चालल्याचें दिसूं लागलें !"

राणीसाहेबांच्या शत्रुपक्षाकडील एका जबाबदार अधिकाऱ्यानें हें वर्णन रेखाटलें आहे. यावरून राणीसाहेबांचें धैर्य, चपळाई व जागरूकता काय मोलाची होती हें ध्यानीं येईल. यासंबंधानें 'माझा प्रवास' या पुस्तकांत लिहिलें आहे कीं,—

"याप्रमाणें पांचवे व सहावे दिवशीं युद्ध झालें; प्रहर—दीड प्रहरपर्यंत राणीसाहेबांचा जय होऊन इंग्रजांचा फार नाश होत असे, व त्यांच्या तोफाहि कांहीं काळ बंद पडत. कांहीं वेळ इंग्रजांचा जय व्हावा. सातवे दिवशीं सूर्यास्तापासून पश्चिम बाजूची तोफ बंद झाली; तेथें मनुष्य ठरेना. शत्रुतोफेनें मोर्चाहि पाडून टाकला. नंतर रात्रीं हुशार गवंडी लोक आणून युक्तीनें घोंगड्या पांघरून हळू हळू बुरुजावर चढविले; विटा वगैरे सामान खालपासून माणसांची माळ लावून त्यांस जमिनीवर निजवून, त्यांनीं निजून निजून मोर्चा बांधला. याप्रमाणें इंग्रजांस कळूं न देतां मोर्चा बांधल्यावर तोफ मोर्चावर ठेवून मारा चालू ठेविला. या वेळीं इंग्रज गाफील होता; त्याचें फार नुकसान झालें.

"उजाडते आठवे दिवशीं, इंग्रजी फौजेनें शंकर किल्ल्यावर (किल्ल्यांतील एका भागास हें नांव आहे.) मारा सुरू केला. इंग्रजाजवळ मोठाल्या दुर्बिणी होत्या, त्यांनीं टेहळणी करून किल्ल्यांतील पाण्याची जागा होती ती रोखून मारा केला. पाणके लोक ठार झाले. किल्ल्यांत पाण्याची हाकाटी सुरू झाली. तेव्हां पश्चिम व दक्षिण बुरुजावरचे गोलंदाजांनीं इंग्रजांवर भडिमार करून त्यांच्या तोफा बंद पाडल्या व पाण्याचा मार्ग निर्वेध केला. जेवणें वगैरे होऊन कांहीं वेळ गेला नाहीं तोंच एकदम मोठा आवाज

होऊन जिकडे तिकडे धूळ व धूर उसळला. दशदिशा गुंग होऊन कोणास कांहींच दिसेनासें झालें. मागाहून चौकशी करतां असें आढळून आलें कीं, वाड्यापुढील मैदानांत दारूचा कारखाना आहे तेथें गोळा पडून हा स्फोट झाला! येथें दारू तयार करीत, व दोन मण दारू तयार झाली म्हणजे बुरुजाखालील तळघरांत नेऊन ठेवावी. या दारूचा भयंकर स्फोट झाला.

"अष्टम दिवशीं फार कहर झाला. युद्ध फार तुंबळ झालें. वीर मोठमोठ्यानें आरोळ्या देत होते. बंदुका, कडामिनींचे व तोफांचे आवाज अगणित होत होते. शिंगें, कर्णे, बिगुल जिकडे तिकडे वाजत होते. धुळीनें, धुरानें व नाना प्रकारच्या ध्वनीनें सर्व दिशा भरून राहिल्या होत्या. इंग्रजी फौजेनें फार शिकस्त केली. रात्रीं शहरावर गोळ्यांची एकसारखी वृष्टि होत होती. शहरांत हजारों माणसें मरण पावलीं. तटावरचे शिपायी, गोलंदाज पुष्कळच मेले. त्यांचे जागेवर दुसरे उभे केले. राणीसाहेबांस फार मेहेनत पडत होती. चोहोंकडे नजर ठेवून जी जी उणीव पडेल ती ती पुरविण्याचे स्वतः हुकूम करीत होत्या. तेणेंकरून सैन्यास विशेष स्फुरण चढून तें दृढनिश्चयानें लढत असे. ता. ३१ पर्यंत त्यांच्या दृढनिश्चयामुळेंच शत्रूचा किल्ल्यांत प्रवेश होऊं शकला नाहीं."

झांशीचें युद्ध सुरू होतांच राणीसाहेबांनीं पेशव्यांचेकडे साहाय्यार्थ पत्रें रवाना केलीं होतीं. व त्याप्रमाणें सेनापती तात्या टोपे सुमारें वीस हजार सैन्य घेऊन राणीसाहेबांच्या साहाय्यार्थ निघालाहि. वाटेंत चरखारी संस्थानावर हल्ला करून तेथील राजापासून तीन लक्ष रुपये खंडणी व २४ तोफा त्यानें हस्तगत केल्या व मोठ्या विजयश्रीनें तात्या झांशीकडे निघाले! पेशव्यांच्या मदतीची वाट राणीसाहेब डोळ्यांत तेल घालून पाहात होत्या. त्यांच्याजवळील सैन्यबल व दारुगोळा संपत आला होता. त्यांना अत्यंत दगदग पडत होती. म्हणून त्या किंचित् आरामासाठीं दिवाणखान्यांत टेकल्या. तोंच त्यांना एक स्वप्न पडलें: "कोणी एक मध्यम वयाची सुवासिनी, गौरवर्णाची, नाक सरळ, कपाळ मोठें, डोळे काळे व विशाल, अशी रूपवान स्त्री अंगावर सर्व मोत्यांचे दागिने घालून, तांबडें मोठें कांठाचें लुगडें नेसून, अंगांत पांढरी रेशिमकांठाची चोळी घालून, पदर बांधून, ओच्याची कास मारून किल्ल्याचे बुरुजावर उभी आहे व मोठ्या कठोर मुद्रेनें तोफेचे लाल गोळे

झेलीत आहे! गोळे झेलतां झेलतां काळे ठिक्कर पडलेले ते हात राणी-साहेबांस दाखवून म्हणत आहे कीं, मीच म्हणून हे गोळे झेलीत आहे!" असें स्वप्न पाहतांच राणीसाहेब जाग्या झाल्या व आश्रितांस हें स्वप्न सांगितलें तेव्हां सर्वांसच आश्चर्य वाटलें.

इकडे तात्या टोपे दरमजल करीत झांशीजवळ येऊन पोहोंचला. तात्याचें आगमन इंग्रजांस अगोदरच समजलें असल्यानें त्याचा प्रतिकार करण्याची योजना रोजसाहेबानें आगाऊच ठरवून ठेविली होती. नाहीं तर झांशी व तात्या यांच्या सैन्यांत सांपडून इंग्रज सैन्याचा चक्काचूरच उडाला असता. रोजनें कांहीं सैन्य ओर्छाच्या मार्गावर नेऊन ठेवलें व कांहीं सैन्य काल्पीच्या रस्त्यावर ठेवलें. परंतु या योजनेमुळें आपलें सैन्य पांगलें आहे अशी कल्पनाहि किल्ल्यावरील लोकांची होऊं दिली नाहीं. इंग्रजी फौजेची व तात्याच्या सैन्याची गांठ ता. १ एप्रिल रोजीं पडली. पेशव्यांची फौज पुढें सरतांच रोजसाहेबानें त्यावर उजव्या व डाव्या बाजूनीं एकदम मारा सुरू केला तो टोपे याच्या सैन्यास सहन न होतां तें पळूं लागलें. या वेळीं टोपे यांच्या सैन्यानें जरा धिमेपणा दाखविला असता तर युद्धाचें पारडें खात्रीनें फिरलें असतें. परंतु ती गोष्ट न घडल्यानें आपल्या तोफा व इतर साहित्य शत्रूच्या हातीं टाकून टोपे याच्या सैन्यानें रणांगण सोडलें, व झांशीचें ग्रहण कायम राहिलें इतकेंच नव्हे तर तें खग्रास होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं!

'क्षणविध्वंसिनी काया कां चिंता मरणें रणें' अशा प्रकारचा दृढनिश्चय राणीसाहेबांनीं केलेलाच होता. तात्या टोपे यांचें सैन्य साहाय्यार्थ आलेलें पाहून राणीसाहेबांना विशेष आनंद वाटला. पण त्याची अशी वाताहात झालेली पाहून त्यांस पराकाष्ठेचें दुःख झालें. आपण युद्धक्षेत्रांत उतरलों तें कांहीं पेशव्याच्या साहाय्याच्या अपेक्षेनें उतरलों नाहीं. आपलें कर्म आपणाबरोबर. अशा दृढनिश्चयानें राणीसाहेबांनीं संग्राम झुंजण्याचें ठरविलें. ता. २३ मार्च ते ता. ३ एप्रिल पर्यंत इंग्रज बहादरांचें रणझुंजार सैन्य झांशी-च्या सिंहिणीला तिच्या कुहरांत कोंडून बसलें होतें. इंग्रज अगदीं घाईला आला होता. जवळची युद्धसामुग्री संपुष्टांत आली होती. आणखी चार दिवसहि त्याच्यानें दम धरणें शक्य नव्हतें. पण त्यास दैव अनुकूल.

इंग्रजांचा पराजय करण्यासाठीं म्हणून शस्त्रास्त्रबलयुक्त तात्या टोपे आला, आणि पराजय पावून व शत्रूला अत्यावश्यक असा शस्त्रसंभार रणक्षेत्रावर सोडून पळाला!

वेढा देऊन झांशी हस्तगत होत नाहीं अशी इंग्रजांची खात्रीच झाली, तेव्हां एकदां सोक्षमोक्ष केला पाहिजे, या दृष्टीनें झांशी सैन्यास एकीकडे हुलकावणी दाखवून निराळ्याच बाजूनें तट हस्तगत करण्याची योजना रोजनें आंखली. राणीसाहेबांनींहि कडेकोट तयारी केली. किल्ल्यांतील वाड्यावर तोफांचे गोळे सारखे येऊन आदळत होते. वाड्याची नुसती चाळण झाली. अकरा दिवस याप्रमाणें घोर सग्राम झाला. अखेरीस इंग्राजानें गुप्तपणानें तयारी करून तटावर शिड्या लावून तो जिंकण्याचें ठरविलें.

तटाच्या मुख्य दरवाजाकडे इंग्रजी सैन्य येत असल्याचें पाहतांच तटावरील पाहारेकऱ्यानें भयसूचक रणवाद्यें वाजवून सूचना दिली. त्याबरोबर सर्व लोक सिद्ध झाले. ११ दिवसपर्यंत तोफांच्या माऱ्यानें तटबंदी जर्जर झाली होती. राणीसाहेबांकडील अनेक वीर धाराशायी झाले होते. झांशीच्या लोकांत निराशा उत्पन्न झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं तेव्हां त्या धैर्याचा मेरूच अशा रणरागिणीनें सर्वांस एकत्र बोलावून सांगितलें. आतांपर्यंत झांशी लढली ती कांहीं पेशव्यांच्या बळावर नाहीं. आजपर्यंत तुम्ही आपला स्वाभिमान, हिंमत, धैर्य आणि शौर्य उत्कृष्टपणें व्यक्त करून आपलें नांव गाजविलें त्याचप्रमाणें यापुढेंहि आपण आपलें कर्तव्य केलें पाहिजे. येणेंप्रमाणें भाषण करून लोकांस पोशाक, सुवर्णवलयें आदि बक्षिसें दिलीं; त्यामुळें झांशीकरांस मोठें अवसान व स्फुरण चढलें. त्यांची निराशा नाहींशी झाली. तोफखाना पुनः पूर्ववत् नेटानें सुरू झाला. राणीसाहेब स्वतः वाऱ्यासारख्या सर्वत्र फिरत होत्या.

इंग्रजी तोफखानाहि चांगला लागू होऊं लागला. वाड्याची व मंदिराची मनस्वी खराबी झाली. इंग्रज सैन्य मुख्य दरवाजाकडे येत आहे असें पाहतांच मुख्य बुरुजावरून तेथें भडिमार सुरू झाला. इंग्रजी सैन्याची पुनः दाणादाण झाली. तटाला शिड्या लावण्याच्या प्रयत्नांत कित्येक इंग्रजी सैन्य गारद झालें. इंग्रजाला तटावर ठरूं दिलें नाहीं. डॉ. लो यानें 'सेंट्रल इंडिया' या पुस्तकांत पृ. २५४ वर हें वर्णन फार बहारीनें

दिलें आहे. इकडे इंग्रजांची दाणादाण उडत असतां ओर्छा दरवाजा इंग्रज सैन्यानें हस्तगत करून दक्षिण बाजू जिंकली. त्यांनीं मोर्चे मारून काढले त्याबरोबर इतर ठिकाणींहि इंग्रज सैन्य गवताच्या भाऱ्यावरून तटावर चढूं लागलें. दक्षिण तट हातचा गेला व त्या जागीं सर रोज व इतर सैन्य येऊन दाखल होतांच त्यानें झांशीचें त्या तटावरील सैन्य नष्ट करून इंग्रज शहरांत शिरला. हा तट स्वाधीन करण्याचे कामींहि फितुरीच उपयोगी पडली. दुलाजी ठाकूर नांवाच्या एका बुंदेल्यानें इंग्रजास मार्ग दाखविला, त्यामुळें इंग्रजांस सहज प्रवेश मिळाला व या कामाबद्दल दुलाजीस दोन गांवें इंग्रजाकडून इनाम मिळालीं असें सांगतात!

दक्षिण तट इंग्रजांनीं आक्रमण केल्याची वार्ता राणीसाहेबांस समजतांच त्यांच्या सर्वांगास सहस्र वृश्चिकदंश झाल्याच्या वेदना झाल्या. त्यांनीं दक्षिण बाजूस पाहिलें, गोऱ्या सैनिकांच्या आगमनामुळें नगरांत हाहाःकार उडाला असें त्यांनीं पाहिलें! निराशा, भीति, हीं पार पळालीं; असुरमर्दिनी जगदंबाच जणुं त्यांच्या अंगीं अवतरली. सुमारें दीड हजार विलायती लोक घेऊन स्वतः घोड्यावर स्वार झाल्या व लागलीच त्यांनीं शहराकडे कूच केलें. त्या किल्ल्याखालीं उतरल्या, आणि मोठ्या दरवाजांतून बाहेर पडून दक्षिण बाजूकडे वळल्या. शहराचे दक्षिण तटावरून गोरे सैनिक नगरांत उतरले होते त्यावर रोख धरला. तलवारीला तलवार झडली, विद्युल्लतेप्रमाणें एकदम चकचकाट झाला! लोक एकमेकांत मिसळून गेले. पन्नास अंक मोजण्यासहि उशीर लागेल इतक्या अल्पावधींत शेंकडों गोरा कापून काढण्यांत आला. गोऱ्या सैन्यानें माघार घेतली! ते लांबून गोळया घालूं लागले. मागाहून गोरें सैन्य येतच होतें. त्यांनींहि बंदूक सुरू केली. गोरें सैन्य शहरांत घुसलें. सर्व दरवाजे खुले झाले. आतां येथें लढण्यांत अर्थ नाहीं असें पाहून राणीसाहेब आपलें सैन्य घेऊन किल्ल्यांत परतल्या, व किल्ल्याचे दरवाजे बंद करून बसल्या. या वेळची अशी गोष्ट सांगतात, राणीसाहेब केवळ महिषासुरमर्दिनी प्रमाणें शत्रुसंहार करीत होत्या, तरी शत्रु आटोपेना. तेव्हां त्यांच्या पदरचा एक वृद्ध सरदार पुढें आला; त्यानें राणीसाहेबांचा हात धरून 'अशा गोळीनें मरण्यांत अर्थ नाहीं, आतां परत फिरणेंच इष्ट', असें सांगितलें तेव्हांच त्या परत फिरल्या.

गोरे लोक दरवाजांतून आंत शिरले ते संहार करीतच निघाले. त्याला 'बिजन' असें म्हणतात. या प्रसंगासंबंधानें डॉ. लो म्हणतो, "जिकडे तिकडे मृत्यूचें साम्राज्य माजलें. गोऱ्या लोकांच्या नजरेस पडेल त्याला ते ठार करीत. रस्त्यावरून रक्ताचे पाट वाहूं लागले. राजवाड्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंचीं घरें पेटवून देण्यांत आलीं. आकाशांत सहस्ररश्मि तळपत होता, त्याची उष्णता व आगीची उष्णता फार भयंकर होती. या आगींतून राजवाडयाच्या चौकांत आम्हाला आश्रय घ्यावयाचा होता; कारण या रस्त्यावर किल्ल्यांतून चांगला मारा होत असल्यानें आम्हाला पळतच राजवाडा गांठावा लागला.

"रस्तोरस्तीं कत्तल भयंकर रीतीनें सुरूच होती. ज्यांना आपली सुटका होणें अशक्य वाटलें त्यांच्या बायकामुलांनीं अब्रुरक्षणार्थ विहिरीचा आश्रय घेतला. घरोघर आम्हांला सख्त प्रतिकार झाला. नागरिक केवळ वाघासारखे लढत होते. हत्याकांड संगिनी चालवून दिवस मावळेपर्यंत चाललें होतें.

"झांशीचें यश कांहीं अपूर्वच म्हटलें पाहिजे. कारण त्यामुळें एक बळकट किल्ला हस्तगत झाला व बंडखोरांना बाहेर पडणेंहि अशक्य झालें. जिकडे पाहावें तिकडे मृत्यु आ वासून उभाच होता! रस्त्यावरून रक्ताचे पाट वाहात होते, या माझ्या म्हणण्यांत किंचितहि अतिशयोक्ति नाहीं." (डॉ. लो: सेंट्रल इंडिया, पृ. २६२-६३).

यासंबंधांत 'माझा प्रवास' कर्तेहि असेंच म्हणतात:—

"इकडे गोरे लोक चोहों दरवाजांतून आंत शिरले ते बिजन करीत चालले. जितका ५ वर्षांवर व ८० वर्षांचे आंत पुरुष दिसला तितका गोळीनें अगर तलवारीनें मारीत चालले! एकीकडून शहरास आग लावून दिली, ती प्रथम हलवाईपुऱ्यास लाविली. ते वेळेस शहरांत दुःखाचा जो कल्लोळ उसळून गेला त्यास पारावार नाहीं. लोक भयानें आतुर होऊन जिकडे तिकडे सैरावैरा धावूं लागले. कोणी या गल्लींत शीर, कोणी घरांत अडचणींत लप, जशी ज्यास जीव वांचविण्याची युक्ति सुचली तसें तो करूं लागला. गोरे लोक शहरांत शिरून बिजन करूं लागले असें

समजतांच शहराचे मध्यभागीं भिडयांचा* बाग होता त्यांत हजारों लोक चोहोंकडून शिरले. 'आम्ही लढवई नाहीं, आम्हांस मारूं नये,' अशी त्यांनीं करुणा भाकली व सुदैवानें ते तेवढे वांचले. या बागेंत सुमारें वीस हजार लोकांनीं आश्रय घेतला.

"दुसरीकडे गोरे लोक घरांत शिरून माणसास ठार करून सोनें व रुपें यांची लूट करूं लागले. अर्थ कोणी कोणी लवकर दिला नाहीं तर लोकांचे गळ्यास त्यांचेच धोतराचा फांस देऊन रस्त्यांत ओढीत नेत व मारझोड करीत. घराला खणत्या लावीत. जो पुरुष अर्थ देऊन सुटला तो पुनः दुसऱ्या गोऱ्या लोकांच्या हातीं सांपडला म्हणजे गोळीनें मारला जावा! सायंकाळपर्यंत याप्रमाणें विजन करून व लूट मारून यमस्वरूपी गोरे शिपाई रात्रीबद्दल शहराचा बंदोबस्त करून आपले गोटांत परत गेले." (माझा प्रवास, पृ. ११०–१२).

शहरांत इंग्रजांचा अंमल सुरू झाल्यानंतर सर ह्यू रोज व कर्नल लो हे ८६ व्या पलटणीचे लोक घेऊन राजवाडा सर करण्यासाठीं निघाले. राजवाड्यामध्यें राणीसाहेबांचे कित्येक निष्ठावंत पहारेकरी होते. त्यांनीं मोठ्या निकरानें सामना दिला. पण इंग्रजांनीं वाड्याला वेढा दिल्यानें त्यांचा निरुपाय झाला. इंग्रजी हल्ल्यामुळें त्या इतिहासप्रसिद्ध व वैभवसंपन्न राजवाड्याचा सर्वस्वी नाश झाला. राजवाड्यांतील सर्व लोकांना ठार करण्यांत आलें. राणीसाहेबांच्या बागेंत ५० मोतद्दार होते. त्यांनीं मोठ्या

---

*आज झांशी येथें तपास करतां भिड्यांच्या बागेसंबंधीं पुढील माहिति माझे स्नेही श्री. का. मा. टोळे, वकील, सागर, यांनीं कळविली आहे. "भिड्यांची बाग म्हणून आज प्रसिद्ध नाहीं. एक बाग आहे व ती भेडिया बाग नांवानें प्रसिद्ध आहे. अर्थात् हीच ती भिडयांची बाग! इकडील रांगड्या मंडळीना आपल्या मराठी शब्दाचा अर्थ व उच्चार नीट येत नसल्यानें भिडयांची बाग या शब्दाचा अपभ्रंश 'भेडिया बाग' झाला. हिंदींत 'भेडिया' म्हणजे लांडगा, पण बागेचा लांडग्याशीं कांहीं संबंध जुळवूनहि सांगतां येत नाहीं. भिडया - भेडया - भेडिया - बाग, असा कांहींसा उच्चारांत फरक झालेला स्पष्ट दिसतो. अर्थात् या बागेसंबंधीं ही एक गंमत झाली. हल्लीं बागेंत शिबंदी व देऊळ आहे. परवानगीशिवाय आंत जातां येत नाहीं. मात्र वर्षांतून एकदां–शिवरात्रीला–मात्र परवानगी लागत नाहीं."

निकरानें तोंड दिलें व त्यांतील एकहि मनुष्य जिवंत असतां त्यांनीं इंग्रजांना पाऊल टाकूं दिलें नाहीं व हे सर्व मर्द यमसदनीं गेल्यानंतर पागा इंग्रजांच्या हातीं आली. वाडा हातीं आल्यावर तेथें सैनिकांनीं भयंकर लूट केली.

इकडे राणीसाहेब किल्ल्यांत आल्यावर अत्यंत शोकविव्हळ झाल्या. त्या तेजस्विनीची त्या वेळची स्थिति व तिचा अमानुष पराक्रमाचा असा दुःखकारक परिणाम मनांत आणून आश्रित मंडळींसहि परम दुःख झालें! प्रत्यक्ष राणीसाहेबांपाशीं बोलण्याचें कोणाचेंहि धैर्य झालें नाहीं. सुमारें प्रहरानंतर राणीसाहेब शहराची हालहवाल पाहण्यासाठीं गच्चीवर गेल्या, त्या वेळीं नगराची दीन व हृदयद्रावक स्थिति पाहून त्यांच्या अंतःकरणांत वेदना होऊन नेत्रांवाटे अश्रु वाहूं लागले! हलवाईपुरा हा नगरांतील संपन्न वस्तीचा भाग होता. तोच पेटल्यानें मोठा आकान्त उडाला. जिकडे तिकडे रडारड, आरडाओरड, पळापळ चालली होती. बंदुकीचे सारखे आवाज एका-मागून एक होत असून त्यामुळें निरपराधी माणसांचे प्राण पटापट जात होते. आपल्याकरितां या निरपराधी प्राण्यांचे असे भयंकर हाल होत आहेत असें वाटून बाईसाहेबांस दे माय धरणी ठाय झालें! आपणच पातकी आहोंत असें त्यांस वाटूं लागून त्यांनीं पदरच्या मंडळींस बोलावून आणून मी वाड्यांत दारूगोळा घालून पेटवून मरून जाणार, असें त्यांनीं निर्वाणीचें सांगितलें! ज्यांस मरणें असेल त्यानें येथें राहावें, बाकीच्यांनीं रात्र होतांच किल्ला सोडून शहरांत जाऊन जीव बचावण्याची सोय पाहावी. राणीसाहेबांचे हे निर्वाणीचे बोल ऐकतांच एका वृद्ध सरदारानें राणीसाहेबांस दिवाणखान्यांत नेऊन बसविलें व म्हणाला, 'महाराज शान्त व्हा; ईश्वरानेंच हें दुःख शहरावर आणलें, त्यास आपला इलाज नाहीं! आत्महत्या करणें महापातक आहे! आपण शूर आहांत, रात्रीं तयारी करून शहराबाहेर निघून जाऊं. प्रसंगीं शत्रूचा घेर फोडून युद्ध करून पेशव्यांस मिळूं. मध्यंतरीं युद्धांत मृत्यु आला तर उत्तमच, आत्महत्येपेक्षां धारातीर्थीं शयन करून स्वर्ग जिंकणें श्रेयस्कर! आपण स्नान, भोजन करून तयारीस लागावें.' हे शब्द ऐकतांच राणीसाहेबांस समाधान वाटून पुनः प्राप्तकर्तव्य करण्यास त्या सज्ज झाल्या.

सर्वत्रांचीं भोजनें झालीं. राणीसाहेबांनीं सर्व आश्रितांस बोलावून त्यांचा दुःखद अंतःकरणानें निरोप घेतला! सर्वांना योग्य अशीं पारितोषिकें दिलीं,

व सर्वांस किल्ल्याच्या गुप्त दरवाजानें शहरांत पाठवून दिलें. राणीसाहेबांच्या आश्रित मंडळींस हें वियोगदुःख फार जाणवलें. त्यांनीं डोळ्यांत अश्रु आणून त्यांचें पादवंदन केलें. कित्येक निस्सीम भक्त होते ते राणीसाहेबांबरोबर जाण्यास सिद्ध झाले. अवशींचे बारा घटकांचे सुमारास सर्व तयारी करून स्वारी किल्ल्याबाहेर निघाली. मोरोपंत तांबे व इतर सरदार हत्यारबंद होऊन घोड्यावर स्वार झाले. प्रत्येकाजवळ कमरेशी बांधण्यास मोहोरा' पुतळ्या दिल्या. जें कांहीं द्रव्य खजिन्यांत होतें तें हत्तीवर लादून हत्ती मध्यभागीं घेतला. बरोबर जिवास जीव देणारे निवडक दोनशें स्वार व सुमारें १२०० अरब ( विलायती ) लोक होते. राणीसाहेबांनीं मर्दानी वेष धारण केला. स्वतःचा त्यांचा आवडता जणुं राजरत्नच असा शुभ्र घोडा होता त्यावर त्या आरूढ झाल्या. बरोबर फक्त एक चांदीचा पेला पदरांत बांधून घेतला, कमरेस तलवार व पाठीशीं दत्तक पुत्र दामोदरराव यांस बांधून घेतला व 'जय शंकर!' असा जयघोष करून सर्व मंडळी किल्ल्याखालीं उतरून दरवाज्यांतून बाहेर पडली. शहरांत लोक दुतर्फा राणीसाहेबांचें दर्शन घेण्यास उभे होते. कमलवासिनीचें कमल भृंगानें कुरतडलें, कमल नाहींसें झालें, मग ती मानिनी कमलाखेरीज कोठें निवास करणार! ज्या नगराचा ममत्वानें सांभाळ केला, अपत्यवत् अशा प्रेमानें नगरवासीयांना त्यांनीं वागविलें त्यांना आपत्तींत सोडून जाण्याचा भयंकर प्रसंग त्यांजवर आला.

राणीसाहेब शहराबाहेर पडतात तोंच शहरांतील इंग्रज पाहारेकऱ्यांनीं हाकाहांक सुरू केली, गोरे सैनिक राणीसाहेबांवर धांवून गेले; त्यांच्याशीं दोन हात करीत राणीसाहेबांनीं वायुवेगानें घोडा पिटाळला! रात्रीची वेळ असल्यानें कोण कोठें गेला याचा पत्ताहि लागेना. रोजसाहेबास ही वार्ता समजतांच तो तर आश्चर्यचकित झाला. आपण ऐवढा रणपंडित, त्यास एका सामान्य स्त्रीनें बोलबोल म्हणतां डोळ्यात धूळ फेकून निघून जावें, यामुळें त्यास आश्चर्य वाटल्यास नवल नाहीं. त्यानें राणीसाहेबांचा पाठलाग करण्यासाठीं ले. बौकर यांच्या हाताखालीं कांहीं स्वार देऊन रवाना केलें. राणीसाहेबांबरोबर जाणाऱ्या सैन्याची व इंग्रजी सेनेची चकमक सुरू झाली. त्यांत महाराणीच्या स्वारांनीं फार पराक्रम गाजविला! विलायती लोकांनीं धारातीर्थी शयन केलें. अशा रीतीनें एका अबलेनें आपल्या बुद्धिचातुर्याची चमक दाखवून इंग्रजांस चकित करून सोडलें!

मध्यंतरीं ले. बौकर यानें राणीसाहेबांच्या राहिलेल्या दहाबारा लोकांशीं लगट करण्याचा प्रयत्न केला, परंतु ले. बौकर यांस राणीसाहेबांच्या तलवारीचा फटका बसतांच तो घोड्यावरून कोसळला व त्याच्या बरोबरच्या लोकांनीं पलायन करून आपला जीव वांचविला !

उजाडतां उजाडतां राणीसाहेब झांशीच्या मुलुखाच्या हद्दीवर एके गांवीं पोहोंचल्या. तेथें महालकऱ्यास सर्व हकीकत सांगून मुलास फराळास दिलें व लागलीच तशाच काल्पीच्या मार्गास लागल्या. त्या सुमारें बारा घटका रात्रीस काल्पीस पोहोंचल्या. म्हणजे सबंध चोवीस तास झांशी ते काल्पी हें १०२ मैलांचें अंतर त्यांनीं तोडलें. धन्य त्या वीर स्त्रीची !

राणीसाहेबांचे वडील मोरोपन्त हे खजिन्याचा हत्ती बरोबर घेऊन जात असतां त्यांस मांडीवर वार लागून ती पार कापून निघाली. तशाहि स्थितींत घोडा पळवीत ते चालले असतां पहांटेच्या वेळीं दतिया शहराजवळ आले. झांशीहून ते आले असें समजतांच दतियाच्या राजानें त्यांजवळील सर्व ऐवज घेऊन त्यांस झांशीस पाठवून दिलें व रोजसाहेबानें त्यांस झांशीच्या राजवाड्यापुढें भर दुपारीं दोन वाजतां फांशीं दिलें !

# ११ : झांशीचा विध्वंस

In the first moments of excitement our troops smashed and destroyed every thing before them. Doors inlaid with plate-glass, mirrors, chandeliers, chairs and other native furniture, went to a thousand pieces in a moment; every room ransacked and covered with heaps of things broken and torn to atoms; carpets, mats, velvet and satin beds, bedsteads with silver feet, velvet cushioned chairs, a brazon throne of excellent old workmanship; golden and silver handled tulwars, spears, silver mounted sticks, silver bird cages, ivory footstools. lamp-shades, marble slabs, dozens of pagrees and shawls, silver candlesticks, crockeryware and a thousand other things such a luxurious woman would have laid here and there in chaotic confusion in every part of the building.

Dr. Low : Central India.

उत्साहाच्या भरांत आमच्या सैनिकांनीं जें सांपडेल त्याचा विध्वंस केला. उत्तम नक्षीकाम केलेलीं तावदानें, आरसे, खुर्च्या, कोचें व अशाच प्रकारचें इतर सामान यांचे सहस्रों तुकडे तुकडे त्यांनीं करून टाकले. प्रत्येक दालन न् दालन धुंडाळलें व जिकडे तिकडे फोडलेल्या वस्तूंचा नुसता खच पडला. गालिचे, जाजमें, रुजामे, किनखापी बिछाने, चांदीच्या पायाचे पलंग, कलाबतूचीं कामें केलेलीं कोचें, उत्कृष्ट नक्षीकाम केलेलें एक सिंहासन, सोन्याचांदीच्या मुठीच्या तलवारी, भाले, भालदाराच्या सोन्यारुप्याच्या काठ्या, चांदीचे पिंजरे (पक्ष्यांचे), चांदीचीं शामदानें, दुपेटे, शालजोड्या, एक ना दोन— हजारों वस्तूंचा संहार, नाश करण्यांत आला. सर्व वाडाभर जिकडे तिकडे वस्तूंचा नुसता खच पडला होता.

शौर्यशाली इंग्रजांच्या हातावर बोलबोल म्हणतां तुरी देऊन झांशीची

स्वातंत्र्य लक्ष्मी वायुगतीनें पसार झाली, व इकडे इंग्रजांच्या बहाद्दर सैन्यानें झांशीच्या विध्वंसनाचें काम हातीं घेतलें! त्याचें वर्णन चक्षुर्वै सत्यं या नात्यानें डॉ. लो यानेंच केलेलें वर दिलें आहे. अर्थात् यांत अतिशयोक्तीचा भाग काडीइतकाहि असणें शक्य नाहीं. इंग्रजांचे कांहीं अधिकारी झांशींत क्रान्तिकारकांकडून मारले गेले, त्यांची संख्या इंग्रज लेखकांच्या माहितीप्रमाणेंच ७६ पेक्षां जास्त नव्हती; पण रणशूर इंग्रजांनीं झांशींत प्रवेश करतांच तेथील निःशस्त्र, असाहाय्य असे कमींतकमी पांच हजार लोक यमसदनास पाठविले असें इंग्रज इतिहासकाराचें म्हणणें आहे! याखेरीज भीतीनें व अब्रुसंरक्षणार्थ शेंकडों स्त्रियांनीं बलिदान केलें तें वेगळेंच! आगींतहि बरेच लोक मरण पावले. राणीसाहेबांनीं झांशी नगर सोडल्यानंतर ता. ५ रोजीं ले. वेग्री यानें किल्ल्यांत प्रवेश केला. नगरांत प्रतिकार असा नंतर झालाच नाहीं. इंग्रजी सैन्य झांशींत शिरल्याबरोबर दिसेल त्या माणसास ठार करण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. एकीकडे अग्निनारायणाचें तांडव सुरूच होतें. कृतान्तस्वरूपी सैनिकांनीं माणुसकीलाहि न साजेशा रीतीनें निरपराधी लोकांची कत्तल चालविली, व झांशीची राजलक्ष्मी अशा रीतीनें हातीं सांपडतांच तिची मनमुराद लूट करण्यांत गोरें सैन्य दंग होऊन गेलें!

यासंबंधांत 'माझा प्रवास' कर्ते म्हणतात, 'राणीसाहेब झांशी सोडून गेल्यानंतर त्या शहारास स्मशानस्वरूप प्राप्त झालें! नगरवासी लोक गोऱ्या कृतान्त दूतांच्या सपाट्यांतून प्राणसंरक्षण करण्यासाठीं घरांच्या भिंतीमधील बंड्यामध्यें लपून बसले. (झांशीमध्यें घराच्या भिंती फार रुंद असून त्यांत मोठमोठीं बळदें असतात. पूर्वी त्या प्रान्तांत चोरांचें भय फार असल्याकारणानें या बळदांत सर्व चीजवस्त व प्रसंगीं माणसेंहि लपून बसत.) रस्तोरस्तीं प्रेतराशी पडल्या होत्या. आप्तजन दुःखानें वेडे होऊन करुणस्वरानें आकान्त करीत होते. गरीब लोक अन्नाकरितां ओरडत फिरत होते. घोडे, उंट वगैरे जनावरें निराश्रित होऊन दीनवाण्या मुद्रेनें चोहोंकडे फिरत होतीं. सर्व शहरामधून अग्नीच्या ज्वाला नभोमंडळापर्यंत भडकत होत्या. हलवाईपुऱ्यांतील सर्व धनाढ्य लोकांचीं घरें अग्नीच्या भक्षस्थानीं पडल्यानें जिकडेतिकडे मोठा कहर उसळला होता. पहिले दिवशीं सूर्यास्तानंतर बिजनचा पहिला दिवस संपला; दुसरा दिवस

उजाडतांच पुनः बंदुकीचे आवाज व त्याबरोबरच मृत्यूच्या हृदयद्रावक किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. प्रेतांच्या राशी रस्तोरस्तीं पुनः दिसूं लागल्या. स्वकीयजन त्यांस उचलून घरांतच तुळशीच्या अंगणांत त्यांचा दहनविधि करूं लागले. त्यांतच गोऱ्या शिपायांची दृष्टि त्यांजकडे वळली तर त्यांसहि स्वर्गवास आपोआप घडूं लागे! स्त्रियांची स्थिति तर अत्यंत हृदयद्रावक, करुणास्पद झाली. त्यांच्या शोकानें लपून बसलेल्याना वेड लागण्याची पाळी आली!

कित्येक लोक गंजींत लपले. परंतु शिपायांनीं गंजी पेटवून त्यांना स्वर्गद्वार खुलें करून दिलें. गोरा आला असें पाहतांच कित्येकांनीं विहिरींत उड्या घातल्या. गोरे लोक विहिरीवर बसून डोकें दिसतांच गोळ्या घालून प्राण घेऊं लागले. कोठेंहि लपून बसणें अशक्य झालें. याप्रमाणें तीन दिवस कत्तल झाली. नंतर लुटीस सुरुवात झाली. शहरांतील सोनें, रुपें, हिरे, पाच, मोतीं, अशा रीतीनें कोट्यवधि रुपयांची लूट गोऱ्या शिपायांनीं केली. सरकारवाडा लुटून फस्त केला. पोथ्यांचीं वेष्टणेंसुद्धां लुटून नेलीं! झांशीची ग्रंथशाला फार मोठी व प्रसिद्ध; सर्व प्रकारचे विविध ग्रंथ या ग्रंथशाळेंत होते. कोठेंहि एकादा नवा ग्रंथ असल्याचें समजल्यास तेथून तो नकलून आणविण्यांत येई. ग्रंथाचीं वेष्टणें फार मजबुतीचीं व फळ्या शिशवीच्या होत्या. इंग्रजांनीं वेष्टणें व फळ्या काढून घेऊन ते अमूल्य ग्रंथ रस्त्यांत फेकून दिले! सर्व प्रकारचें कापडसामान लुटून नेलें. नगारे, नौबती फोडून त्याचीं तांब्याचीं भांडीं लुटलीं. इतकेंच काय, देवालयें, मंदिरें यांचीहि मनमुराद लूट करण्यांत आली. यासंबंधांत या युद्धांत प्रत्यक्ष हजर असलेले डॉ. जॉन हेनरी सिल्व्हेस्टर हे 'रिकलेक्शन्स ऑफ दि कॅम्पेन इन् मालवा ॲन्ड सेंट्रल इंडिया' या पुस्तकांत (पृ. १०८) म्हणतात, "युद्ध संपतांच शिपायांनीं घर न् घर शोधलें. घरांतील कोंपराहि शोधण्याचें ठेवलें नाहीं. घरांत एकादें नवें बांधकाम दृष्टीस पडतांच तें पाडून पाहण्यांत येई. या लुटींत एक चीज मात्र लूट करण्याजोगी मला वाटली व ती म्हणजे देवालयांतील मूर्ति. अशा शेंकडों मूर्ति जमा करण्यांत आल्या, व त्यांतील एक तरी मूर्ति आपणांस असावी अशी धडपड अधिकारी व सैनिक करूं लागले. गणपति, विष्णु, यांच्या अनेक धातूंच्या अगणित मूर्ति सांपडल्या. त्यांतील कित्येक तर अलंकारासारख्या होत्या. अनेक मूर्तींच्या

अंगावर सुवर्णालंकार होते, व कित्येक तर घड्याळाच्या छेड्याला शोभा म्हणून लावण्यायोग्य होत्या व त्यांचें नक्षीकामहि अप्रतिम होतें."

'सेंट्रल इंडिया' या पुस्तकाच्या पृ. २६४ वर या लुटीसंबंधानें पुढील उल्लेख आहे— 'शिपाई लोक सांपडतील त्या वस्तु तुडवीत चालले होते. त्यांपैकीं किती तरी रत्नें त्यांच्या खिशांत पडलीं; परंतु अशा प्रसंगीं अशा गोष्टी घडावयाच्याच ! झांशीमधील इतर ठिकाणची लूट झाल्यावर झांशीवाल्यांची कुलस्वामिनी श्रीमहालक्ष्मी इच्या मंदिराकडे लुटारूंची दृष्टि गेली. तेथील सर्व अलंकार, मूल्यवान् जिन्नस लुटून नेण्यांत आले. राजवाड्यांतील अपार संपत्ति अशा रीतीनें इंग्रजांच्या हातीं आली. हत्ती घोडेहि पुष्कळ लुटींत मिळाले. किल्ल्यांत सुमारें ४० तोफा, अगणित तलवारी, बंदुका व दारूगोळा इंग्रजांस मिळाला.'

पहिले तीन दिवस इंग्रजांच्या बहाद्दर सैनिकांनीं नगरांत कत्तल व लूट केल्यानंतर चौथे दिवशीं मद्रासी पलटणी लुटीस सोडल्या. त्यांनीं नगरांतील तांबें पितळ यांची मनस्वी लूट केली. कोणी आपलीं भांडीं विहिरींत टाकलीं तर तीं गळ लावून काढण्यांत येत. नंतर हैद्राबाद पलटणींना लूट करण्यास सोडलें. त्यांनीं वस्त्रांची लूट केली. नगरांतील हरएक प्रकारचें कापड भरभरून त्यांनीं नेलें; तिसरे दिवशीं शहरांत पलटणी लोक शिरले व त्यांनीं नगरांतील सर्व धान्य लुटून नेलें. चौथे दिवशीं शहरांत कांहीं लुटण्यासारख्या वस्तु असल्यास त्या लुटून नेण्यासाठीं पलटणी येऊन हातीं सांपडेल त्याची लूट त्यांनीं केली. विहिरीचे रहाट, पाट, खुर्च्या, झाडावरचीं फळें इत्यादि सर्व प्रकारची लूट करण्यांत आली; अशा रीतीनें ते सात दिवस इंग्रज बहाद्दरांनीं मोठ्या खुषींत घालविले ! प्रथम सर्व पैसा, सोनें, चांदी, नंतर वस्त्रें, नंतर धान्य व आणखी कांहीं राहिलें असल्यास तें सर्व लुटून नेलें. आतां नगरांत लुटण्यायोग्य एकहि वस्तु व मारण्याजोगा एकहि मनुष्य राहिला नाहीं असें पाहतांच मोठ्या दयार्द्र अंतःकरणानें सेनापतिसाहेबांनीं शहरांत शान्तता प्रस्थापित झाल्याचें जाहीर केलें !!

आठव्या दिवशीं शहरांत दवंडी देऊन 'खुल्क् खुदाका, मुल्क बादशहाका, अंमल इंग्रज सरकारका' असें जाहीर करण्यांत आलें ! ज्याचें त्यानें प्रेत नेऊन त्याचा संस्कार करावा असेंहि फर्मावण्यांत आलें.

हजारों भंगी लावून रस्ते स्वच्छ करण्यास सुरुवात केली. हलवाईपुऱ्यापासून कोष्टीपुऱ्यापर्यंत भयंकर आग भडकत होती, ती विझविण्यासाठीं पाण्याचे बंब सुरू करून आग विझविण्यांत आली. कित्येक चव्हाट्यावर प्रेतें पडलीं होतीं त्यांचे ढीग रचण्यांत आले, व लोकांचे घरांत शिरून जितकीं जळाऊ लांकडें सांपडलीं तितकीं घेऊन तीं ढिगावर रचलीं. दाराच्या फळ्या, सुटे तक्ते, पाळणें, झोपाळे, बाजा, लांकडी कठडे, जें मिळालें तें सर्व लांकडी सामान चितेंत टाकून अग्नि पेटवून दिला! दर चवाठ्यावर अशीं प्रेतें जळूं लागलीं. ज्यांस प्रेतसंस्कार देण्याची इच्छा व ऐपत होती ते स्वकीयांचीं प्रेतें उचलून नेत, बाकीचीं खाईंत टाकलीं जात. हजारों बैल, उंट, हत्ती, घोडे, गायी, म्हशी मरून पडलीं होतीं. त्यासाठीं शहराबाहेर मोठा खंदक खणला होता. त्यांत त्यांना टाकून वर माती लोटण्यांत आली.

दुसरे दिवशीं वाड्यापुढें सर्व प्रकारचीं दुकानें उघडण्यांत आलीं. तेथून आपल्या प्रपंचास आवश्यक असे पदार्थ लोक विकत घेऊन येऊं लागले. या दुकानांत मांडलेले जिन्नस शहरवासीयांची लूट करूनच जमा केलेले होते. ते परत त्याच लोकांना विकून, कोणापाशीं कांहीं अर्थ उरला असल्यास तोहि या निमित्तानें लुटावा असेंहि धोरण यांत नव्हतें असें म्हणतां येणार नाहीं. यानंतर शहरांत लुटलेल्या मौल्यवान वस्तूंचा जाहीर लिलांव सुरू करण्यांत आला. हत्ती, उंट, घोडे वगैरे सामान शिंद्यांनीं विकत घेतलें. दुसरें मोठमोठ्या किंमतीचें मौल्यवान सामान इतर राजेरजवाड्यांनीं विकत घेतलें. एक अत्युत्कृष्ट पितळी पाळणा झांशीचा पिढीजाद होता, तो शिंद्यांनीं घेतला! तामझाम नांवाचा राणीसाहेबांचा उत्कृष्ट चांदीचा मेणा होता तोहि लिलांवांत विकण्यांत आला! या सर्व वस्तूंचा लिलांव करून कोट्यवधि रुपये उत्पन्न केले. झांशी नगरी शब्दशः धुवून काढण्यांत आली!

यासंबंधांत 'सेंट्रल इंडिया' या पुस्तकांत पृ. २६५ वर पुढील आशयाचा मजकूर आहे—" लुटीच्या मौल्यवान वस्तूंचा लिलांव करण्यांत दलाल लोक अगदीं गर्क झाले होते. या वस्तूंत जवाहिर व इतर मूल्यवान वस्तु राजघराण्यांतील व सरदार दरकदारांच्या होत्या!"

झांशी येथें जे घोर प्रकार झाले त्याबद्दल डॉ. लो 'सेंट्रल इंडिया' या पुस्तकांत पृ. २६१ वर म्हणतो, "झांशीमध्यें आम्हीं सुमारें एक हजार माणसांना मूठमाती दिली व युद्धारंभापासूनचा आंकडा हिशेबांत घेतला तर आम्हीच तीन हजारांवर माणसें ठार केलीं असावीं, असें म्हणण्यांत कांहीं चूक नाहीं."

दुसरा मि. मार्टिन नांवाचा गृहस्थ 'मार्टिन्स इंडियन एम्पायर' या पुस्तकांत (पृ. ४०५) म्हणतो, "ता. ४ एप्रिल रोजीं आमच्या सैन्यानें किल्ला व नगर काबीज केलें. त्यानंतर आमच्या सैन्यानें भयंकर कत्तल केली. कमींतकमी पांच हजार माणसें तरी आमच्या सैनिकांनीं ठार केलीं असतील. किल्ला व शहर येथें सांपडलेली लूट अतीशयच होती!"

येणेंप्रमाणें झांशीचा विध्वंस करून सर रोज यानें मोठा विजय संपादन केला! झांशीचा बंदोबस्त केला. गोऱ्या मृतांना विधिपूर्वक संस्कार दिला. या रोजसाहेबाच्या विजयाबद्दल त्याचा सर्वत्र गौरव झाला. इंग्रजी सैन्यानें झांशी नगरामध्यें हे जे अनन्वित प्रकार केले व लूट केली त्याचा उल्लेखहि मॅलिसननें आपल्या पुस्तकांत केला नाहीं हें ध्यानीं घेण्याजोगें आहे!

Whatever faults in British eyes may have been, her countrymen will ever believe that she was driven by ill treatment into rebellion, that her cause was a righteous cause, and that the treatment she received at the hands of Lord Dalhousie was one of the main causes of the disaffection in Bundelcand and Central India in 1857-58. To them she will always be a heroine.

Malleson's History of the Indian Mutiny.

[ब्रिटिशांच्या दृष्टीनें राणीचे कांहींहि दोष असले तरी तिच्यासंबंधानें तिचे देशबांधव असेंच म्हणतील कीं, तिचा पक्ष सत्य होता; लॉर्ड दलहौसीनें तिला अत्यंत वाईट प्रकारें वागविलें म्हणूनच ती युद्धास प्रवृत्त झाली. हिंदी लोक तिला शौर्यशालिनी देवता म्हणूनच मानतील!]

राणीसाहेब झांशीच्या किल्ल्यांतून बाहेर पडल्या तेव्हां त्यांजबरोबर १२०० अरब (विलायती) व दोनशें खास विश्वासू स्वार होते. परंतु नगरांतून बाहेर पडत असतां इंग्रजी टेहेळ्यांस संशय येऊन त्यांनीं पुकारा केला व तेथें मोठीच झुंज माजली. परंतु राणीसाहेब बरोबर एक घोडेस्वार, दासी व दहाबारा घोडेस्वारांनिशीं शीरसलामत पार पडल्या. ही गोष्ट रोजच्या ध्यानीं येतांच त्यानें ले. बौकर व हैद्राबादपैकीं एक घोडेस्वार पलटण त्यांच्या पाठलागासाठीं पाठविली. परंतु राणीसाहेब या पट्टीच्या अश्वारोहणपटु, त्या त्यांना थोडीच दाद देणार! एकदां तर ले. बौकर व त्याच्याबरोबरचे स्वार यांनीं राणीसाहेबांस गांठलें. राणीसाहेबांनीं आपली विजयी समशेर निष्कोषित केली व एका फटक्यासरशीं बौकरला जमिनीवर लोळविलें, व आपला अश्व वायुगतीनें पुढें काढला! आपला पुढारी जखमी होऊन धराशायी झालेला पाहतांच त्याच्या घोडेस्वारांनीं पाठलाग सोडून दिला,— नाहीं, त्यांना तो सोडून द्यावा लागला. कारण राणीसाहेबांच्या समशेरीचा तिखटपणा त्यांच्या चांगलाच प्रत्ययास आला होता!

दुसरे दिवशीं सकाळीं राणीसाहेब झांशी संस्थानच्या हद्दीवरील भांडेर नामक गांवीं गेल्या. तेथील महालकऱ्याची भेट घेऊन दामोदररावास खाऊं घातलें व घोडा पुढें घातला. राणीसाहेबांचें या प्रसंगाचें अश्वारोहणपटुत्व व रणपांडित्य इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे. प्राणावर संकट आलेलें, व त्यासाठीं जोखमीचा प्रवास पत्करलेला, पाठीशीं सात वर्षांचा बाळ दामोदर बांधलेला; व आपत्तीचा कळस म्हणजे ले. बौकरसारखा रणबहाद्दर निवडक स्वारांची पलटण घेऊन नेटानें पाठलाग करीत असलेला! पण ही अल्पवयी रणपंडिता किंचितहि न डगमगतां बौकरसारख्याला पाणी पाजून त्याच्या स्वारांची फळी फोडून निर्वेधपणें व बेगुमानपणें जाते, याला इतिहासांत तोड सांपडणें कठीण! राणीसाहेब या स्वतः कसरत करीत; मर्दानी खेळाची त्यांना आवड असून त्यांनीं तें शिक्षण संपादन केलें असलें तरी तत्कालीन रिवाजाप्रमाणें त्या म्हणजे एक पडदानशीन महिला; नाहीं फारसें जगाचें ज्ञान; पण त्यांजपाशीं परमेश्वरानें एका गोष्टीचें भांडार मात्र अमूप भरून ठेविलें होतें, व तें म्हणजे अपूर्व स्वाभिभानाचें. स्वतःच्या कुटुंबाच्या, स्वधर्माच्या व स्वदेशाच्या स्वाभिमानाला कोणीहि धक्का लावलेला कधींहि सहन करणार नाहीं अशी त्यांची वृत्ति! आणि त्यासाठीं त्यांनीं अक्षरशः सर्वस्वाचा होम केला; आणि आपल्या देशाचें, धर्माचें नांव उज्ज्वल, तेजःपुज केलें! अवघी २१-२२ वर्षांची तरुणी; सर्व राजैश्वर्य हात जोडून पुढें उभें, राणीसाहेबांनीं मनांत आणलें असतें तर त्यांनाहि सुखानें राहतां आलें नसतें असें थोडेंच आहे! पण मग त्यांचा यशसौरभ दिगंतीं दरवळला नसता; सामान्य स्त्रियांप्रमाणें त्याहि गणल्या गेल्या असत्या! परंतु भारतवर्षाच्या अधःपाताच्या काळांत आपल्या परीनें सर्वस्वत्याग करून भारत-मातेचें मंगल करण्यासाठीं त्यांनीं आत्माहुति दिली. स्वाभिमान जगवावा कसा, ही गोष्ट स्वोदाहरणानें त्यांनीं जगास पटवून दिली. सर्व ब्रिटिश सत्ता विरोधी असतां तिला कस्पटाप्रमाणें लेखून आपलें स्वातंत्र्य कायम टिकविण्याचा तेजस्वी प्रयत्न राणीसाहेबांनीं केला, त्याला जगाच्या इतिहासांत तोड सांपडणें कठीण!

बौकरचा समाचार घेऊन अवघ्या चार स्वारांनिशीं राणीसाहेब रात्रींच्या बारा घटकांच्या सुमारास काल्पीस पोहोंचल्या. चोवीस तास अहोरात्र

त्या घोड्याच्या पाठीवर होत्या, व १०२ मैलांचें अंतर मोठ्या बहादुरीनें त्यांनीं कापलें. या एकाच गोष्टीवरून त्यांची हिंमत, धाडस व अश्वारोहण-पटुत्व यांची यथार्थ कल्पना येते. राणीसाहेब मध्यरात्रींच्या सुमारास काल्पीस पोहोंचल्या व तेथें पेशव्याच्या छबिन्यावरील लोकांना वर्दी देऊन प्रातःकाल-पावेतों त्यांनीं विश्रान्ति घेतली. राणीसाहेबांच्या घोड्यानें अपूर्व कामगिरी केली होती. सतत चोवीस तास दोघां माणसांचें ओझें वाहून व शत्रूला धूळ चारून तो अश्व थकला होता. राणीसाहेब उतरतांच त्यानें धरणीवर अंग टाकलें! तेव्हां लागलींच सातआठ शिपाई त्याच्या शिरा मळण्यासाठीं दोनप्रहरपर्यंत लावल्यानंतर तें अश्वरत्न पूर्ववत् हुशार झालें. राणीसाहेबांचें आपल्या घोड्यावर अपार प्रेम होतें!

राणीसाहेब पेशव्यांच्या तळावर काल्पीस पोहोंचल्या. ती काल्पी अशी होती :—

"काल्पी हें लहानसें टुमदार शहर यमुना नदीच्या कांठीं आहे. यमुना उत्तरदक्षिण वाहात असून पश्चिम किनाऱ्यावर काल्पीचा किल्ला बांधलेला आहे. त्यास तीनहि अंगांनीं मोठा मजबूत कोट आहे व चौथे बाजूस यमुना फार खोल आहे. यामुळें हा किल्ला फार शोभिवन्त असून तसाच बळकट आहे. किल्ल्याच्या पश्चिमेस मैदान असून त्यापलीकडे शहर वसलें आहे. तेथें साखरेचा मोठा व्यापार चालतो. त्यामुळें मोठमोठ्या धनिक व्यापाऱ्यांच्या हवेल्या शहरांत लागून राहिल्या आहेत. यमुना फार खोल असल्यानें शहरांतील विहिरीहि फार खोल आहेत. शहराचे पश्चिमेस मोठें विस्तीर्ण मैदान आहे, त्यास चौऱ्यायशीं घुमटांचें मैदान म्हणतात. तेथें पूर्वीं बादशाहींत मोठी लढाई झाली, तींत बादशहाचा जय झाला तरी त्याचे चौऱ्यायशीं सरदार ठार झाले. त्यांस तेथें पुरून त्यांजवर सुबक कबरी बांधलेल्या आहेत! यामुळें या मैदानास शोभा आली आहे." पुढें हें शहर पेशव्यांचे सुभे गोविंदपन्त बुंदेले यांजकडे होतें. तें पुढें त्यांचे वंशज जालवणकर जहागीरदार यांजकडे गेलें. स. १८०६ त इंग्रज व जालवणकर यांचा तह होऊन हें शहर इंग्रजाकडे गेलें. पुढें १८२५ मध्यें नाना पंडिताचें बंड झालें व त्यानें तें आपल्या ताब्यांत घेतलें. हें बंड झांशीचे सुभेदार राव रामचंद्र यांनीं मोडून शहर इंग्रजास दिलें. सन

१८५७ च्या जूनमध्यें क्रान्तिकारकांनीं हें शहर आपल्या ताब्यांत घेतलें, तेव्हांपासून तें पेशव्यांचे बंधु रावसाहेब यांचे ताब्यांत असून त्यांनीं तेथें आपला मुख्य तळ केला. युद्धसामुग्रीहि चांगली सिद्ध केली. याच शहरीं राणीसाहेब पेशव्यांस मिळाल्या.

श्री. नानासाहेब पेशवे या क्रान्तियुद्धांत समाविष्ट होण्याला काय कारणें घडलीं तीं सर्वज्ञात आहेत. तथापि त्यासंबंधीं थोडी माहिती येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं. बाजीराव पेशव्यांनीं राज्यत्याग केला तेव्हां मालकम-बरोबर झालेल्या तहांत एक असें कलम होतें कीं, "बाजीराव स्वखुषीनें या करारास मान्य झाला तर त्याला कंपनीकडून भरपूर पेन्शन देण्यांत येईल. तें त्यांच्या स्वतःसाठीं व त्यांच्या कुटुंबपोषणासाठीं देण्यांत येईल. ही रक्कम गव्हर्नर जनरल ठरवील; तथापि ही रक्कम आठ लक्षांपेक्षां कमी असणार नाहीं, अशी हमी ब्रिगेडियर जनरल मालकम घेत आहे."

आणि या कराराप्रमाणें रावबाजीस आठ लक्षांचें वार्षिक पेन्शन सुरू झालें व ते ब्रह्मावर्तीं राहिले. रावबाजींनीं पेन्शन घेतल्यानंतर अफगाणि-स्तानच्या लढाईच्या वेळीं इंग्रजास सहा लक्ष रुपयांची मदत त्यांनीं केली. शीखांच्या लढाईच्या वेळीं एक हजार स्वार व एक हजार पायदळ देण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें अडचणीच्या वेळीं इंग्रजांस त्यांनीं साहाय्य केलें असतांहि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचें पेन्शन त्यांच्या चिरंजीवांस चालू ठेवलें नाहीं. रावबाजी वारले तेव्हां त्यांजपाशीं १६ लक्षांची रोकड, तीहि सरकारी खजिन्यांत होती. १० लक्षांचें जवाहीर, ३ लक्षांच्या मोहोरा, ८० हजारांचें सोनें व २० हजारांचीं चांदीचीं भांडीं होतीं. हीच मिळकत फार मोठी आहे असें कानपूरचे कलेक्टर मि. मोर्लन्ड यांस वाटून त्यानें पेन्शन न दिलें तरी आहे या जिनगीवर जन्मोजन्म पेशव्यांचा निर्वाह चालेल असें सुचवून पेन्शन बंद करण्याची शिफारस केली! त्यावर दलहौसीनें पुढील आशयाचा ठराव केला:—

"पेशव्याला सतत ३३ वर्षें प्रतिवर्षी ८०,००० पौंड तैनात मिळत होती. शिवाय जहागिरीचें उत्पन्न होतेंच. या अवधींत त्याला पचवीस लक्ष पौंड मिळाले. ही रक्कम कांहीं थोडथोडकी नाहीं. त्याच्यावर अवलंबून असणारीं माणसेंहि फार नाहींत. त्याला स्वतःचे मुलगेहि नाहींत. आपल्या

कुटुंबीयांसाठीं २८ लक्षांची जिनगी त्यानें ठेविली आहे. जे विद्यमान आहेत त्यांच्या हक्कांचा विचार सरकार करीत नाहीं. पेशव्यानें पुष्कळ मिळकत मागें ठेविली आहे."

या ठरावावर नानासाहेबांनीं कोर्ट ऑफ डायरेक्टरापर्यन्त प्रयत्न केले व ते सर्व निष्फळ ठरले. तेव्हां निराशेच्या भरांत नानांनीं क्रान्तीचा पुढाकार घेतला असल्यास त्यांत आश्चर्य काय? यासंबंधांत 'दलहौसीची ब्रिटिश हिंदुस्थानांतील कारकीर्द,' पृ. १२३ वर असें लिहिलें आहे:—

"It is enough to say he was an adopted Hindoo son; he claimed the city and pension by right of adoption; the first was prolonged to him for a time; the last was refused him altogether, and Cawnpore told in 1857 how a Hindoo prince's heart regarded Lord Daulhousies doctrine of expedient escheats."

दुसरे दिवशीं रावसाहेब पेशव्यांची व राणीसाहेबांची भेट झाली. त्या वेळीं उभयतांच्या अंतःकरणांत कोणत्या भावनांचा कल्लोळ उडाला असेल याची सहज कल्पना करतां येण्याजोगी आहे. रावसाहेब व राणी-साहेब उभयतां बालपणासून संवगडी, उभयतां एकत्र वाढलेले, खेळलेले, शिक्षण घेतलेले, फारां दिवसांनीं त्यांची ही भेट झालेली, व तीहि अशी चमत्कारिक प्रसंगानें. पेशव्यांचे एका काळचे सुभेदार झांशीवाले, आज नानासाहेब व रावसाहेब यांनीं विशिष्ट हेतूनें या स्वातंत्र्ययुद्धाची उठावणी केलेली. या युद्धांत राणीसाहेबांना इच्छेनें असो वा अनिच्छेनें असो पडावें लागलें. पुनश्च पेशव्यांचा व राणीसाहेबांचा एका ध्येयपूर्तीनिमित्तानें संबंध आलेला. राणीसाहेबांनीं या ध्येयनिष्ठेसाठीं असीम पराक्रम गाजवून धन्य धन्य म्हणवून घेतलें व त्या आज रावसाहेबांपाशीं आपल्या कामाची हजेरी द्यावयासाठीं उपस्थित झाल्या. एका काळीं उभयतांच्या पूर्वजांनीं मराठ्यांचा झेंडा आसेतु हिमाचल मोठ्या दिमाखानें फडकविला, ते दिवस त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहणें अस्वाभाविक नव्हतें. तो भूमिशायी झालेला जरिपटका आज पुनः तोलून त्यासाठीं प्रचंड रणयज्ञ पेटवून त्यांत आत्माहुति देण्यासाठीं कंकण बांधून सुसज्ज झालेली ही वीरमहिला दुसऱ्या एका पुरुषसिंहास भेटत आहे!

राणीसाहेबांनीं आपली तलवार रावसाहेबांपुढें ठेविली व सांगितलें, 'आपल्या पूर्वजांनीं ही आम्हांस दिली. तिचा आतांपर्यंत योग्य प्रकारें उपयोग आम्हीं केला. यापुढें आम्हांस आपलें साहाय्य मिळण्याची आशा नसल्यानें ही तलवार आपण परत घ्यावी.' मानधन अशा राणीसाहेबांचे हे उद्गार ऐकून रावसाहेबांस गहिंवरून आलें, व 'यापुढें साहाय्याची आमचेकडून हेळसांड होणार नाहीं. आपण आपल्या पूर्वजांच्या लौकिकास साजेसा पराक्रम गाजविला. इंग्रजास दाद न देतां मोठ्या हिंमतीनें व धैर्यानें आपण झांशीचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, व आपली मोठ्या चातुर्यानें सुटका करून घेतली, यावरूनच आपलें कर्तृत्व दिसून आलें. आपल्यासारख्यांच्या साहाय्यावरच हें क्रान्तियुद्ध लढावयाचें आहे. आपण तलवार खालीं ठेवली तर मग आम्हांस साहाय्यकारी कोण?' रावसाहेबांचे हे उद्गार ऐकून राणीसाहेबांनीं तलवार परत घेतली, व सुरू झालेला रणसंग्राम अखेरपर्यंत लढावयाचा असें ठरवून त्या पुढील उद्योगास लागल्या.

काल्पीस रावसाहेबांचा मुक्काम आहे व राणीसाहेबहि त्यांस मिळाल्या आहेत, हें ऐकून बांद्याचे नबाब, बाणपूरचे राजे, शाहगडचे राजे हेहि ससैन्य येऊन पेशव्यास मिळाले. तात्या टोपेहि ग्वाल्हेर येथून कॉन्टिजंट सैन्य घेऊन या सैन्यास मिळाले. काल्पीस युद्धाची तयारी सुरू झाली. झांशीस जें गमावलें तें येथें कमावण्याची आशा राणीसाहेबांस वाटूं लागली. रावसाहेबांच्या मागें त्यांनीं सैन्यांत शिस्त राखा, त्यास चांगलें तयार करा, असा तगादा लावला. काल्पीस सैन्य पुष्कळ जमलें, पण त्यांत असावी तशी संघटना नव्हती. योजनेंतहि एकसूत्रीपणा नव्हता. त्यामुळें हेतु सफल होत नसे. राणीसाहेबांच्या हातीं युद्धसूत्रें दिलीं असतीं तर त्यांनीं क्रान्तियुद्धाचें स्वरूपच पालटून टाकलें असतें! युद्धाचें जें धोरण त्यांस होतें तें इतरांस नव्हतें. त्यामुळें सैन्य-सामुग्री भरपूर असूनहि केवळ विस्कळितपणामुळें क्रान्तिकारकांना पराभवामागून पराभव घ्यावे लागले.

याच्या उलट इंग्रजी लष्कराची स्थिति होती. सर ह्यू रोज याला या युद्धाचा सेनापति नेमण्याबद्दल जेव्हां चर्चा झाली, तेव्हां त्याला नेमावा-

नेमूं नये याबद्दल खूप चर्चा झाली. पण एकदां त्याला प्रमुख म्हणून नेमल्यानंतर मग त्याच्या हाताखालीं काम करण्यांत कोणी कसूर केली नाहीं. त्याच्या कार्यपद्धतींत नियमबद्धता व एकसूत्रीपणा होता. त्याचे हुकूम बरोबर असोत वा चुकीचे असोत, त्यावर वाद-चर्चा नव्हती. त्यामुळें एखादा सेनापति कमकुवत असला तरी त्याचा हुकूम एकमतानें व एकजुटीनें पाळण्याची शिस्त असल्याकारणानें अंतीं त्याचा विजय ठरलेला. अगदीं याच्या उलट क्रान्तिकारकांच्या सैन्याची स्थिति होती. नुसता सेनापति हुशार असून काय कामाचा? त्याचे हुकूम दक्षतेनें व निष्ठेनें पार पाडणारे खालचे अधिकारी पाहिजेत, त्यांचाच येथें अभाव होता.

राणीसाहेब पेशव्यांस मिळाल्या असून त्यांचें साहाय्य घेऊन त्या झांशी-वर चालून येत आहेत अशा वार्ता सर रोजच्या कानीं आल्या. रोजनें झांशीचा बंदोबस्त करून तो काल्पीवर चालून जाण्याच्या उद्योगांत होता, तोंच ही वार्ता त्याला समजली व तात्या टोपे व राणीसाहेब कुंच या गांवापर्यंत थडकल्याची बातमीहि पाठोपाठ आली. सर रोज यामुळें मोठ्या चिंतेंत पडला. कारण ते दिवस उन्हाळ्याचे असून इंग्रज शिपायांस हें कडक ऊन मुळींच सहन होत नसे; व राणीसाहेबांनीं तर आपल्या सैन्यास हुकूम देऊन ठेवला कीं फिरंग्याशीं युद्ध करावयाचें तें सकाळीं दहाच्या नंतर! यामुळें इंग्रजी सैन्यांत मोठा आकान्त उठला. अगोदर उन्हानें अनेक सैनिक आजारी पडले होते. त्यांतच त्यांस युद्धास तोंड देण्याचा प्रसंग आलेला.

काल्पीपासून कुंच गांव हें ४२ मैलांवर आहे. तेथें झाडी बरीच होती. तेव्हां रोजनें जवळच्या पुंज या गांवावर हल्ला करून तें घेतलें, व कुंचपासून १० मैलांवर लोहारी नांवाचा किल्ला आहे तोहि घेतला, आणि तेथून कुंचची लढाई करण्याचें ठरविलें. याशिवाय क्रान्तिकारकांच्या मागच्या बाजूस जाऊन नागपुरा, चुमेर व उम्री या गांवावर कबजा बसवून क्रान्तिकारकांस चोहों बाजूंनीं कोंडून मग त्यानें हल्ल्यास सुरुवात केली.

तात्या टोपे व बांद्याचे नबाब यांचें सैन्य कुंच गांवच्या झाडीजवळ उतरलें होतें. त्यांनीं इंग्रजी सैन्य आल्याचें समजतांच एकदम तोफांना सरबत्ती दिली. सर रोजनें आपलें सैन्य सर्वत्र पांगून ठेवलें असल्यानें फक्त समोरच्या सैन्यावर तोफा लागू होऊन बाकीचें सैन्य सुरक्षित होतें. या

ठिकाणीं उभय पक्षीं तुंबळ युद्ध झालें. पेशव्यांच्या पठाणी सैन्यानें चांगलीच करामत केली. परंतु तात्या टोपे व बांद्याचे नबाब यांचें सैन्य इंग्रजांच्या कात्रींत सांपडल्यानें त्याची दाणादाण उडून तें पळून गेलें. या वेळीं क्रान्तिकारकांच्या वीस हजार सैन्याचा पराजय होऊन आठ तोफा, पुष्कळ दारुगोळा व अन्नसामुग्री इंग्रजांस मिळाली!

आपणांपाशीं इतकें सैन्य व सामुग्री असतां माघार घ्यावी लागली या गोष्टीचें राणीसाहेबांस परम दुःख झालें; परंतु या युद्धाचीं सूत्रें त्यांजकडे नसल्यानें त्यांना कांहीं करतांहि येईना. काल्पीस परत येतांच त्यांनीं रावसाहेब पेशव्यांची योग्य शब्दांत कानउघाडणी केली, व सैन्याची अशीच व्यवस्था ठेवावयाची असेल तर जयाची आशा नको, असें स्पष्टपणें बजाविलें! इंग्रजांनीं कुंचचें युद्ध जिंकलें तें केवळ त्यांची शिस्त वाखाणण्याजोगी होती म्हणून; तरी यापुढें दक्ष अधिकारी नेमून योग्य बंदोबस्त ठेवा, अशीहि त्यांनीं सूचना केली. राणीसाहेबांच्या भाषणाचा सैन्यावर चांगला परिणाम झाला. 'जमुना मैय्या' ची शपथ घेऊन आपण रणांगण सोडणार नाहीं अशी प्रतिज्ञा सैनिकांनीं केली. सर्वत्र मोर्चे बांधून काल्पी शहर लढविण्यास सज्ज करण्यांत आलें.

इंग्रज सेनापति हे मुरलेले; युद्धकलाशास्त्रांत पारंगत होते. क्रान्तिकारकांत सर्वच अननुभवी, त्यांजजवळ नुसता उत्साह, पण तोहि कुंचच्या पराजयानें ओसरलेला. सर्व गोष्टी इंग्रजांस अनुकूल, क्रान्तिकारकांस प्रतिकूल. सर रोजसाहेबानें आपल्या सैन्याची उत्कृष्ट रचना केली. काल्पीपासून सहा मैलांवर असलेल्या गलावली या गांवीं त्यानें तळ दिला. क्रान्तिकारकांचें सैन्य बेहोष होऊन एकदम पुढें सरकलें. त्याबरोबर इंग्रज सैन्यानें पाचोळ्याप्रमाणें त्याचा संहार चालविला. क्रान्तिकारकांस माघार घ्यावी लागली. पेशवे, बांदेवाले पलायनाचा विचार करूं लागले; त्या वेळीं महाराणीसाहेब आपलें निवडक सैन्य घेऊन एकदम त्वेषानें पुढें सरसावल्या व त्यांनीं इतकें निकरानें युद्ध केलें कीं इंग्रजी तोफा बंद पडून गोलंदाज पळूं लागले. राणीसाहेबांनीं जोर धरतांच क्रान्तिकारकांचें दुसरें सैन्यहि येऊन इंग्रजावर आदळलें. मोठी अटीतटीची लढाई झाली. राणीसाहेबांनीं विजयश्री जवळजवळ जिंकली, इतक्यांत सर रोज आपलें उंटावरचें

राखीव सैन्य घेऊन धांवला, व त्यानें जयश्री पुनः हिस्कावून घेतली. लढाईचें पारडें अकस्मात् फिरलें; इंग्रजांचा जय झाला, व इंग्रजी सैन्य काल्पी शहरांत घुसलें !

श्री. पेशवे, राणीसाहेब, बांदेवाले इत्यादि मंडळी मोठ्या युक्तीनें तेथून निघून गेली. काल्पी शहरांत इंग्रजांना अगणित लूट सांपडली. बंदुका, दारूगोळा, तोफा यांची भरभक्कम तयारी पेशव्यांनीं एक वर्षापासून चालविली होती ती अनायासें इंग्रजांच्या हातीं लागली. दिल्ली, लखनौ, कानपूर, झांशी येथें क्रान्तिकारकांचा पराजय झाल्याच्या वार्ता सर्वत्र पसरल्या, व जे सैनिक युद्ध सोडून परत येतील त्यांना माफी दिल्याचे जाहीरनामे प्रकट झाल्याकारणानें क्रान्तिकारकांचें सैन्यहि त्यांना सोडून जाऊं लागलें. काल्पीमध्यें असे अनेक लोक पेशव्यांच्या लष्करांत होते. त्यांनीं पेशव्यांचा पराजय होतो असें पाहतांच सैन्य सोडून शहरांत लुटालूट आरंभिली. अशा रीतीनें काल्पीचें युद्ध मोडून राणीसाहेब पेशव्याबरोबर ग्वाल्हेर येथें गेल्या.

# ग्वाल्हेरचें युद्ध व अखेर

क्रान्तिकारकांचा काल्पीस पराजय झाला. जवळ सैन्य नाहीं, सामुग्री नाहीं; आतां पुढें काय करावयाचें असा प्रश्न रावसाहेबप्रभृतींपुढें उभा राहिला. राणीसाहेबांस समजून चुकलें होतें कीं, पेशव्यांच्या बेशिस्त कारभारामुळें युद्धास यश येणें कठीण, पण त्याहि त्यांजबरोबर काल्पीहून निघाल्या व सर्वांनीं गोपाळपूर येथें मुक्काम केला. पुढें काय? हा प्रश्न सर्वांना भेडसावत होता. बांदेकर नबाब, रावसाहेब हताश झाले होते. त्यांना राणीसाहेबांनीं धीर दिला, व यापुढें इंग्रजांशीं टक्कर द्यावयाची असेल तर एकादा भक्कम किल्ला हातीं असल्याशिवाय चालावयाचें नाहीं. यासाठीं आपण ग्वाल्हेरीवर चाल करून जाऊं, तेथील सैन्य व दरबारी आपणांस अनुकूल आहेत. किल्लाहि भक्कम असून युद्धसामुग्रीहि मुबलक आहे. तेव्हां तेथें प्रथम जाऊं या. निराश झालेल्या रावसाहेबांस या उपदेशानें मोठी आशा उत्पन्न झाली. राणीसाहेबांनीं ही जी मसलत दिली तीबद्दल मॅलेसन आपल्या 'शिपायांच्या बंडाच्या इतिहासां'त (भा. ५, पृ. १४३-४४) म्हणतो —

"बंडखोर पुढाऱ्यांपुढें मोठा विकट प्रश्न उत्पन्न झाला. परंतु संकटाच्या वेळीं युक्त्याहि तशाच निधडेपणाच्या सुचतात, आणि अशा प्रकारची युक्ति त्यांपैकीं एका बुद्धिमानाच्या डोक्यांतील निघाली. ही युक्ति कोणाची ही गोष्ट अद्याप कोणास ज्ञात नसली तरी बंडखोरांतील पुढारी लक्षांत घेतां अशा प्रकारचा धाडशी सल्ला देणारी एकच व्यक्ति असावी व ती म्हणजे झांशीची राणी! केवळ राणीलाच ही युक्ति सुचणें शक्य होतें. निराशा झाल्यानें महत्कार्य करण्याची बुद्धि आपोआप सुचते. तिच्या अंतःकरणांत द्वेषाग्नि धुमसत होता, व अखेरची संधि मिळणें शक्य तोंपर्यंत प्रयत्न करावा अशा विचाराची ती असल्यानें तिनेंच ही युक्ति सुचविली. आपला हा उपाय यशस्वी झाला तर युद्धाचें गाडें कदाचित् एकदम फिरण्याची शक्यताहि तिनें ओळखली. शिवाय तिचें रावसाहेबांवर वजनहि चांगलें होतें. गोपाळपूर येथें ग्वाल्हेरवर हल्ला करण्याचा सल्ला दिला तो राणीनेंच दिला, ही गोष्ट निश्चित होय."

मॅलेसननें राणीसाहेबांच्या दूरदर्शीपणाबद्दल जे उद्गार काढले ते सर्वथा यथार्थ होते. तात्या टोपे, रावसाहेब, यांनीं राणीसाहेबांच्या धोरणाची प्रशंसा केली व ग्वाल्हेरवर स्वारी करण्याचें ठरवून ता. ३० मे सन १८५८ रोजीं मुरारच्या छावणीजवळ तळ दिला. तात्या टोपे यांनीं ग्वाल्हेरचें सैन्य व दरबार पूर्वींच आपलासा करून घेतला होता, पण ग्वाल्हेरचे अधिपति जयाजीराव शिंदे व त्यांचे दिवाण दिनकरराव राजवाडे हे मात्र पूर्णतः इंग्रजांच्या बाजूचे होते. दिनकरराव हा पूर्वी एक सामान्य कारकून होता, परंतु इंग्रज सरकारला त्यानें अनेक प्रसंगीं अमूल्य साहाय्य केलें असल्यानें तो त्यांच्या कृपेनें महत्पदास चढला होता. त्यानें महाराजांस कह्याबाहेर न जाऊं देतां रेसिडेन्टाशीं पूर्ण संगनमत ठेवून कारभार चालविला होता.

मीरत, दिल्ली येथील देशी फौज बिथरली तेव्हां ग्वाल्हेरच्या राजानें आग्रा, इटावा येथें सैन्य पाठवून इंग्रजांचें रक्षण केलें. पण पुढें ग्वाल्हेर येथील सैन्य बिथरलें व त्यांनीं इंग्रजी छावणीस आग लावून लष्करी अधिकाऱ्यांचा वध केला. तेव्हां रेसिडेन्ट मॅकफर्सन यानें महाराजांच्या संमतीनें सर्व गोरे लोक आग्रा येथें पाठविले. इंग्रज ग्वाल्हेरमधून गेल्यानंतर कॉन्टिन्जन्ट फौजेनें महाराजांस इंग्रजांचा पक्ष सोडून आपला पक्ष घेण्याबद्दल विनंति केली. महाराजांना घेऊन आग्र्यावर स्वारी करावी असा या सैन्याचा हेतु होता. आग्रा येथें सैन्याचा बंदोबस्त मुळींच नसल्यानें तेथें हें सैन्य जाणें धोक्याचें होतें. म्हणून, कसेंहि करून सैन्य इकडे येऊं देऊं नका, अशी विनंति रेसिडेन्टनें जयाजीरावांस केली, व महाराजांनींहि सैन्यास थापा मारून, आमिषें दाखवून ग्वाल्हेरीसच ठेवून घेतलें.

पुढें तात्या टोपे यांनीं ही फौज कानपुरास नेली. अशा रीतीनें ७-८ महिने लोटले. आग्र्याचें संकट टळलें, तरी ग्वाल्हेरचें मात्र टळलें नाहीं. ग्वाल्हेर दरबार या युद्धासंबंधानें काय धोरण ठरवितो त्यावर इतर म्हणजे इंदूर, भोपाळ यांचें धोरण अवलंबून होतें. येथें उठाव होता तर ही आग दक्षिणेंतहि भडकली असती. तेथेंहि अस्वस्थता धुमसत होतीच. परंतु ग्वाल्हेरच्या सरकारनें या युद्धांत इंग्रजांना साथ दिल्याकारणानें युद्धानें नर्मदा ओलांडली नाहीं, व इंग्रजांची सत्ता या देशांत दृढमूल राहिली. या-

संबंधांत खुद्द गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यानें ' If the Scindia joins the mutiny, I shall have to pack off tomorrow. ' 'जर शिंदे बंडांत सामील होतील तर मला उद्यांच आपला गाशा गुंडाळावा लागेल.' अशी तारहि पाठविली होती असें म्हणतात.

पेशव्यांचें सैन्य दरमजल करीत ग्वाल्हेरजवळ येतांच त्यांनीं आपल्या आगमनाचें वर्तमान महाराजांस कळवून योग्य तें साहाय्य करण्यास सुचविलें. ग्वाल्हेर दरबार पेशव्यांस अनुकूल होता, फक्त दिनकरराव व त्याच्यामुळें जयाजीराव प्रतिकूल होते; व त्यांनीं सर ह्यू रोजचें सैन्य मदतीस येण्याबद्दल पत्रव्यवहारहि सुरू ठेवून तें सैन्य येईपर्यंत ग्वाल्हेरचा बचाव करावा असें ठरविलें. ता. १ जून रोजीं खुद्द जयाजीरावांनीं आपलें बालघाटी पथक घेऊन पेशव्यांवर हल्ला करण्यासाठीं कूच केलें व एकदम पेशव्याच्या सैन्यावर तोफांचा मारा सुरू केला. असा मारा सुरू होतांच सैन्यांत एकच धांदल होऊन पळापळ सुरू झाली. कित्येकांनीं असेंहि सुचविलें कीं, शिंदे सरकार पेशव्यांच्या भेटीस येत असून या सलामीच्या तोफा आहेत. त्यामुळेंहि गोंधळ माजला. अखेरीस एकसारखा मारा सुरू झालेला पाहतांच ऐन वेळीं राणीसाहेबच आपले मूठभर स्वार घेऊन आवेशानें पुढें झाल्या, शिंद्याच्या तोफखान्यावर हल्ला चढवून गोलंदाज कापून काढले, व तोफखाना बंद पाडून जयाजीरावाच्या खास पथकावर हल्ला चढविला! बालघाटी पलटणीस तो मारा सहन न झाल्यानें शिंद्यांनीं माघार घेऊन आग्र्यास इंग्रजांच्या आश्रयार्थ ते पळून गेले. अशा रीतीनें ग्वाल्हेर पेशव्यासाठीं जिंकण्याचें कार्यहि महाराणीसाहेबांनींच केलें!

श्रीमंत रावसाहेब पेशवे मोठ्या समारंभानें राजवाड्यांत गेले; तात्या टोपे यानें किल्लाहि घेतला. श्रीमंतांनीं सर्व राजमंडळ जमा केलें. गंगाजळीवरील मुख्य अधिकारी अमरचंद भाठ्या याजला अनुकूल करून घेतल्यानें द्रव्याचा प्रश्नहि सुटला. अशा रीतीनें सैन्य, खजिना, युद्धसामुग्री मनमुराद जमल्यानतर तात्या टोपे यांच्या विचारानें ता. ३ जून १८५८ रोजीं रावसाहेबांस राज्याभिषेक करण्याचें ठरलें. हा समारंभ घडवून आणण्यांत तात्या टोपे याचा मोठा राजकारणी डाव होता. पेशवाई नष्ट झाली ती आपण स्वसामर्थ्यावर पुनः स्थापन केली तर त्या गोष्टीचा प्रभाव

दक्षिणेंतील राजेरजवाड्यांवर पडून कित्येक देशी राजे अनिश्चित धोरणांत आहेत ते सहजासहजीं पेशव्यांच्या जरिपटक्याखालीं जमा होतील! आणि असें सामर्थ्य जमा झालें म्हणजे इंग्रजांना खडे चारणें हातचा मळ आहे! अशी मनोभूमिका या राज्यारोहणाच्या पाठीशीं होती.

ता. ३ रोजीं फुलबाग राजवाड्यांत मोठा दरबार भरला. श्रीमंतांस अनुकूल असलेले तमाम सरदार आपापल्या स्थानावर येऊन बसले. तात्या टोपे ससैन्य उपस्थित झाला. खुद्द श्रीमंतांनीं पेशवाई वस्त्रें धारण करून पागोट्याला शिरपेंच, कलगीतुरा, कानांत मोत्यांचे चौकडे, गळ्यांत मौक्तिकहार व एक रत्नहार धारण करून समग्र वैभवानिशीं भालदार चोपदार ललकारत व मोर्चेलें वारींत असतां दरबारांत येऊन दाखल झाले. रीतीप्रमाणें खडी ताजीम होऊन दरबारी लोकांचे मुजरे झाल्यावर सिंहासनारूढ होण्याचा एकंदर विधि झाला. सर्व सरदारांचें अभिनंदन केलें, व त्यांस मानाचे पोषाक दिले. रामराव गोविंद यांस मुख्य प्रधान व तात्या टोपे यांस मुख्य सेनापति नेमून त्यास एक रत्नखचित तरवार बक्षीस दिली. अष्टप्रधानांची नेमणूक करण्यांत आली. सैन्यास वीस लक्ष रुपये वांटण्यांत आले. दरबारचा थाट अप्रतिम झाला. तोफांच्या सरबत्त्या झाल्या. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. या आनंदाप्रीत्यर्थ मुक्तद्वार भोजनें सुरू झालीं. त्या वेळीं दशाहार होता. त्यानिमित्त ग्वाल्हेर येथें गंगापूजनाचें विशेष महत्त्व असल्यानें तेंहि एक कारण भोजनास सांपडलें.

अद्याप आपण निर्भय झालों नाहीं, पाठीशीं बलाढ्य शत्रु उभा आहे, त्याच्या प्रतिकाराचे उपाय अगोदर योजावयाचे, सैन्याची नीट सुव्यवस्था करावयाची, या आवश्यक गोष्टी न करतां श्रीमंत असल्या भलत्या उद्योगधंद्यांत मग्न झालेले पाहून राणीसाहेबांस परम दुःख झालें. त्या दरबारांतहि गेल्या नाहींत व त्या उत्सवांतहि सामील झाल्या नाहींत. हीं ब्राह्मणभोजनें बंद करा, सैन्याकडे प्रथम लक्ष द्या, असे किती तरी निरोप त्यांनीं पेशव्यांस पाठविले. सुदैवानें योग्य संधि तुम्हांस सांपडली आहे तिचा सदुपयोग करा, काळाचा असा अपव्यय करूं नका. असा अनेक प्रकारें त्यांनीं पेशव्यांस बोध केला. परंतु 'बुद्धिः कर्मानुसारिणी' हेंच सत्य असल्यानें राणी-

साहेबांच्या या हितोपदेशाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आणि या परिस्थितीचा पुरा फायदा इंग्रजांनीं मात्र घेतला.

इंग्रजांच्या सैन्यानें क्रान्तिकारकांचा या वेळपर्यंत सर्वत्र पाडाव केला होता. नर्मदा ते यमुना व यमुना ते हिमालयापर्यंत त्यांनीं सर्व प्रदेश पुनः जिंकून घेतला होता; व आतां क्रान्तिकारकांचें युद्ध आटोपलेंच अशा समजुतीनें सर ह्यू रोज यानें रजा घेऊन तो मुंबईस निघण्याच्या विचारांत होता. इतक्यांत त्याला ग्वाल्हेरची वार्ता समजली. त्याबरोबर त्यानें आपली रजा रद्द करून पुनः युद्धाचीं सूत्रें हातीं घेतलीं व धडाडीनें तो कामास लागला. ग्वाल्हेरच्या युद्धांत त्याला ब्रिगेडियर जनरल नेपियर हा साहाय्यक होता. ग्वाल्हेरचें महत्त्व इंग्रजांस किती वाटत होतें याबद्दल इतिहासकार मॅलेसन म्हणतो (भाग ५, पृ. १५०)—"बंडखोरांच्या हातून ग्वाल्हेर परत न घेतल्यास किती भयंकर परिणाम होतील हें सांगवत नाहीं. त्यांच्या हातीं मुबलक माणसें व युद्धसामुग्री सांपडली आहे. अशा वेळीं तात्या टोपेला जर आपण सवड दिली तर तो प्रचंड सैन्य उभें करून सर्व हिंदुस्थानभर मराठ्यांची उठावणी करील. तात्या महाधोरणी आहे, तो पेशव्यांच्या झेंड्याखालीं सर्व दक्षिण आणल्याखेरीज राहणार नाहीं. दक्षिणेंतील सैन्यांतहि चलबिचल आहे. मध्यहिंदुस्थानांत त्याला जर मोठा जय मिळाला तर तेथील लोकहि त्याच्या बाजूचे झाल्याखेरीज राहणार नाहींत."

सर रोज व नेपियर यांनीं तडकाफडकीं ही मोहीम हातीं घेण्याचें हें कारण होतें. त्यांनीं आपल्या सैन्याचे वेगळाले विभाग करून सर्वांनीं निरनिराळ्या मार्गांनीं ग्वाल्हेरीस जाण्याचें ठरविलें. ता. ६ रोजीं सर रोज काल्पीहून ससैन्य निघाला. त्याच्याबरोबर ग्वाल्हेरचे रेसिडेन्ट मॅकफर्सन असल्यानें ग्वाल्हेरीवरील हल्ला करण्यास उपयुक्त अशी माहिती त्याला अचूक होती. हें सर्व सैन्य ता. १६ रोजीं जयाजीरावाचा ज्या ठिकाणीं पराभव झाला त्या बहादरपुर गांवीं येऊन थडकलें, व तेथून सर्व पाहणी करून एकदम मुरार छावणीवर हल्ला करण्याचें ठरविलें.

मुरारच्या छावणींतील पलटणी या शिंद्यांच्या नामांकित पलटणी असून त्या सर्व क्रान्तिकारकांस मिळाल्या होत्या. त्यांची व्यवस्था स्वतःच्या हातीं

न घेतां पेशव्यांनीं त्यावरील जुने अधिकारीच कायम ठेवले होते. इतरहि पुष्कळ सैन्य होतें, परंतु त्याची रचना योग्य रीतीनें करण्यांत आली नसून सर्वत्र अंदाधुंदी माजली होती. यामुळें युद्धाचा सरंजाम भरपूर व सैन्यहि मुबलक असून योग्य योजकाच्या अभावीं हीं सर्व साधनें निरुपयोगी ठरलीं. मुरारवर इंग्रजी सैन्य येऊन ठेपलें तरी पेशव्यांस त्याची वार्ताहि नव्हती! ते आपल्या नादांत गुंग होऊन गेले होते. सर रोज मुरार छावणीजवळ आला असें समजतांच तात्या टोपे यांनीं सैन्याची जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली. ठिकठिकाणीं मोर्चे बांधण्याच्या योजनेला ते लागले. परंतु सर रोज यानें एकदम हल्ला चढवून क्रान्तिकारकांच्या सैन्याची दाणादाण उडविली. शिंद्यांच्या सैन्यानें इंग्रजी सैन्यावर गोळ्यांचा भडिमार केला. परंतु रोजनें मान्याच्या सर्व जागा अगोदरच हस्तगत करून घेतल्या असल्यानें अखेरीस क्रान्तिकारकांना माघार घ्यावी लागली! क्रान्तिकारकांतील कित्येक वीरांनीं या युद्धांत फारच बहादुरी गाजविली. ले. कीट यांस घायाळ केलें व ७१ व्या हायलँडर्सची दाणादाण उडविली. मुरारच्या रणभूमीवर दोन तासपर्यंत चांगली खडाजंगी झाली, पण अखेरीस इंग्रजांना यश मिळून त्यांनीं आपला तळ तेथें ठेवला. या प्रसंगीं इंग्रजांनीं एका युक्तीचा अवलंब केला व त्यामुळें त्यांस यश मिळालें असें म्हणतात. ती युक्ति अशी: क्रान्तिकारकांकडे बरेंच लष्कर शिंद्यांचें होतें. इंग्रज अधिकाऱ्यांनीं ताबडतोब शिंद्यांस बोलावून त्यांजकडून एक जाहीरनामा काढविला; त्यांत इंग्रज शिंद्यांच्या वतीनें लढत असून आपण आपल्या सर्व सैन्यास माफी दिली असल्याची घोषणा केली. अर्थात् आपल्या सरकारविरुद्ध शिंद्यांचें सैन्य लढेनासें झाल्यानें युद्धाचें पारडें फिरलें!

आतां कोठें पेशवे, बांदेवाले, नबाब जागे झाले! महाराणी लक्ष्मीबाईसाहेबांनीं परोपरीनें विनवणी केली तेव्हां ते महोत्सवांत गुंग होऊन राणीसाहेबांच्या हितोपदेशाकडे त्यांनीं कानाडोळा केला. तात्या टोपे यांनीं राणीसाहेबांची विनवणी केली तेव्हां त्या म्हणाल्या, "आजपर्यन्त एवढा आटोकाट विभू रचून जिवापाड श्रम केले ते फलद्रूप होण्याची आशा राहिली नाहीं! ऐन रंगांत आलेली मसलत श्रीमतांच्या दुराग्रही स्वभावामुळें व अकालीं विजयरंग केल्यानें सर्वस्वीं फसली! इंग्रजी सैन्य तोंडाशीं येऊन भिडलें तरी सैन्याची व्यवस्था नाहीं; आतां सामना देऊन काय होणार तें दिसतच

आहे. तथापि चालू प्रसंगीं धीर सोडून उपयोगी नाहीं. तुम्ही आपापल्या फौजा मुकाबल्यासाठीं बाहेर काढा व चौफेर चांगले हुषार सरदार बंदोबस्तास ठेवून शत्रूस आपणावर चढाई करूं देऊं नका. मी आपलें कर्तव्य करीन; तुम्ही आपलें करा म्हणजे झालें!"

राणीसाहेबांच्या या म्हणण्याचा उपयोग झाला. त्यांच्याकडे ग्वाल्हेरचे पूर्वबाजूचें रक्षण करण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली. आतां हें युद्ध अखेरचेंच आहे असें समजून राणीसाहेबांनीं आपली सिद्धता केली. नेहमींचा लष्करी पोषाख अंगावर चढविला. आपल्या उमद्या घोड्यावर आरोहण केलें व एखाद्या मुरब्बी योद्धयाप्रमाणें सैन्याची कवायत घेऊं लागल्या. राणीसाहेबांचें तें जाज्वल्य व उग्र रूप पाहून त्यांच्या सैनिकांत रणावेश उत्पन्न झाला!

सर ह्यू रोज यानें आपल्या सैन्याची आंखणी केली होती. त्याप्रमाणें ग्वाल्हेरच्या आग्नेय दिशेस ५ मैलांवर कोटाकी सराई येथें ब्रिगेडियर स्मिथ व मेजर ऑर यांनीं तळ दिला. सर ह्यू रोज व जनरल नेपियर यांनीं मुरारची छावणी हस्तगत करून ग्वाल्हेरला शह दिला. ग्वाल्हेरच्या दक्षिणेकडून ते स्मिथला मदत करण्यासाठीं सज्ज होते. राणीसाहेबांच्या बाजूला युद्धाची तयारी उत्कृष्ट होती. मोर्चे वगैरे मोक्याच्या जागीं लावून ठेवले होते. आघाडीवर चांगले हिंमतवान लोक ठेवून अंतराअंतरावर लाल रिसाल्याचे लोक व पायदळ यांची उत्कृष्ट फळी बांधली होती. यामुळें ही बाजू सर करणें कठिण होतें.

ता. १७ रोजीं ब्रिगेडियर स्मिथनें युद्धारंभ केला. त्याबरोबर राणीसाहेबांनीं इषारा देतांच गोलंदाजी तोफांची अशी मारगिरी केली कीं, इंग्रजसैन्य मागें हटूं लागलें. त्याबरोबर राणीसाहेबांचे तुरुकस्वार पुढें होऊन त्यांनीं इंग्रजांची लांडगेतोड चालविली. राणीसाहेबांचा हा पराक्रम पाहून त्यांच्या सैन्याच्या पिछाडीवर कर्नल रेन्स हा सैन्य घेऊन आला. राणीसाहेब स्वतः युद्धाच्या अग्रभागीं असून आपल्या सैन्यास प्रोत्साहन देत होत्या. कर्नल स्मिथ हा कोटाकी सराईपासून फुलबागेपर्यंतचा रस्ता हस्तगत करून घेण्यासाठीं निघाला, त्याबरोबर राणीसाहेबांनीं त्याच्यावर कहर मारा केला. सारा दिवस त्या शत्रूशीं झुंज देत होत्या. अखेरीस त्यांचा अभिद्य सेनाव्यूह इंग्रजास फोडणें

अशक्य होऊन त्याला तेथून आपलें सैन्य काढून घ्यावें लागलें! ता. १७ रोजीं तरी महाराणीसाहेबांनीं विजय संपादन केला.

ता. १८ उजाडली; राणीसाहेबांच्या रणसंचलनामुळें आंग्लवीर मूढ व मुग्ध होऊन गेले. आतां इंग्रजांनीं युद्धाचा पवित्रा बदलून निरनिराळ्या बाजूंनीं हल्ला करण्याचें ठरविलें. राणीसाहेबहि युद्धास सुसज्ज झाल्याच होत्या. त्यांनीं आपला लष्करी वेष धारण केला. डोक्यास भरजरी चंदेरी बत्ती, अंगांत तमामी अंगरखा, पायांत पायजमा, गळ्यांत मोत्याचा कंठा घालून ती रणचंडिका एका देखण्या अश्वावर आरूढ होऊन सैन्याच्या अग्रभागीं उपस्थित झाली.

ग्वाल्हेर हातची गेली म्हणजे इंग्रजी सत्ता भारतवर्षांतून बुडाली; तेव्हां कांहींहि करून ग्वाल्हेर जिंकण्याच्या ईर्षेनें इंग्रज सैन्य चोहोंकडून वावटळी-प्रमाणें उठलें. राणीसाहेबहि मोठ्या आवेशानें लढूं लागल्या. विद्युल्लतेप्रमाणें त्या सर्वत्र चमकूं लागल्या. या वेळीं राणीसाहेबांबरोबर त्यांचे अत्यंत विश्वासू असे चारसहा सेवक व बरोबर काशी व मुंदर या दोन दासी पुरुषवेषांत होत्या. या युद्धासंबंधानें 'नॅशनल गार्डियन' या पत्रांत ता. ११ डिसेंबर १८९१ रोजीं बराच मजकूर आला आहे. त्यांत लेखक जी. एम्. डी. हा म्हणतो:—

"राणीसाहेबांनीं एकामागून सारखे हल्ले प्रतिहल्ले चढविले. पळोपळीं त्यांचें सैन्य कमी कमी होत होतें. परंतु आपलें अवशिष्ट सैन्य घेऊन त्या अग्रभागीं चमकत होत्या. त्या वेळचें त्यांचें शौर्य काय वर्णावें! पण त्याचा काय उपयोग? सर ह्यू रोजचें उंटाचें सैन्य पुढें येऊन त्यानें राणीसाहेबांची अखेरची फळी फोडली. तरीहि त्या धैर्याच्या मेरूपर्वतानें आपली जागा सोडली नाहीं."

सर रोज यानें मुरारकडून हल्ला करून पेशव्यांच्या सैन्याची दाणादाण उडविली हें वर्तमान राणीसाहेबांस समजतांच त्यांचें धैर्य खचलें. कर्नल हिक्स व कॅ. हेनेज यांनीं ह्यूजर्स पलटणींतील लढवय्ये पुढें काढून राणी-साहेबांच्या पायदळी पलटणीवर हल्ला केला. त्याबरोबर पायदळानें कच खाल्ला. इंग्रजी सैन्याचा चोहों बाजूंनीं वेढा पडला. चोहों बाजूंकडे इंग्रज सेना-सागर पसरलेला त्यांनीं पाहिला. अशा प्रसंगीं आपले राहिलेले दहावीस

स्वार घेऊन इंग्रज सैन्याची फळी फोडण्याच्या प्रयत्नास त्या लागल्या. इंग्रजी सैन्याचा जमाव मोठा. तरी त्यांतूनहि मोठ्या वेगानें फळी फोडून त्या निसटल्या. त्यांच्यामागें ह्यूजर्सपैकीं कांहीं स्वार चित्त्याप्रमाणें लागले.

सतत तीन दिवस तुमुल युद्ध चालल्यामुळें राणीसाहेब अत्यंत श्रान्त झालेल्या होत्या. परंतु त्यांचा स्वाभिमान व उत्साह अपूर्व असल्यामुळेंच त्यांनीं इंग्रजी सैन्यास खडे चारले! राणीसाहेबांच्या रणकौशल्याबद्दल सर ह्यू रोज याच्याहि मनांत अत्यंत आदरभाव प्रकट झाला होता. त्यानें झांशी–काल्पीपासून त्यांचें रणचातुर्य पाहिलें होतें.

आपण इंग्रजांच्या सेनासागरांतून सुरक्षित बाहेर पडत नाहीं अशी राणीसाहेबांची खात्री झाली होती. आपणांस मृत्यु आला तर आपल्या देहास विधर्मीयांचा स्पर्शहि होतां कामा नये, असें अभिवचन त्यांनीं रामचंद्रराव देशमुख व रघुनाथसिंग यांजपासून घेतलें होतें. बरोबर मुंदर व काशी या दोन दासीहि या रणधुमाळींत आपल्या मालकिणीची साथ करीत होत्याच. राणीसाहेबांनीं आपला घोडा भरधांव फेकला. मागें त्यांचे निष्ठावान सेवकहि शत्रूला तुडवीत चाललेच होते. दामोदररावहि रामचंद्ररावाबरोबर होते. राणीसाहेबांचा अश्व वायूशीं स्पर्धा करीत जात होता. ह्यूजर्स स्वारांनीं गोळ्यांची वृष्टीहि चालविली होती. इतक्यांत, "बाईसाहेब! मेल्यें, मेल्यें—" असा मुंदरचा करुणस्वर ऐकूं आला. राणीसाहेबांच्या हृदयावर वज्राघातच झाला! मृत्यूबरोबर झगडत झगडत आपणाला साथ देणाऱ्या दासीचा हा वध पाहतांच त्यांनीं आपला घोडा एकदम वळवून त्या वध करणाराला एका क्षणांत यमराजाकडे रवाना केलें! पुनः घोडा भरधांव सोडला. परंतु–झाला—घात झाला!! दुर्दैव आड आलें! वाटेंत एक लहानसा जलप्रवाह आडवा आला. ज्या अश्वावर आज राणीसाहेब आरूढ झाल्या होत्या तो त्यांचा नेहमींचा हा अश्व नव्हता. तीन दिवसांच्या युद्धानें तो श्रान्त झाल्याकारणानें त्यांनीं हा दुसरा अश्व घेतला होता, तो अडला! पाण्याचा ओहोळ ओलांडीना. भारतीय युद्धांतील कर्णाप्रमाणें स्थिति झाली!

घोड्यास चुचकारलें तरीहि तो पुढें पाऊल टाकीना. राणीसाहेबांचा घोडा अडखळतांच प्रतिपक्षांना ही मोठीच संधि मिळाली. ते राणीसाहेबांवर

आवेशानें तुटून पडले. राणीसाहेबांनींहि आपली समशेर परजून त्यांना पाणी पाजण्यास सुरुवात केली, तेव्हां एका ह्यूजर्स स्वारानें पाठीमागून राणीसाहेबांवर वार केला व दुसऱ्यानें छातीवर किराचीची दूण मारली. राणीसाहेबांच्या मस्तकावर वार बसतांच डोक्याचा दक्षिण भाग छिन्नविच्छिन्न झाला! पण अशाहि स्थितींत त्या महालक्ष्मीनें आपला वध करूं पाहाणारास एका फटक्यासरशीं धारातीर्थीं लोळविलें!!

आपला अंतकाल आला असें राणीसाहेबांस कळून चुकलें! त्याबरोबर त्यांनीं विश्वासू सेवक रामचंद्रराव यांस हातानें इशारत केली, व त्या महान् स्वामिभक्तानें मोठ्या शिकस्तीनें त्यांना रणक्षेत्रावरून जवळच गंगादास बाबा नांवाचा कोणी साधु होता त्याच्या पर्णकुटींत नेलें. तेथें त्यांच्या मुखांत गंगोदक घातलें. आपला पुत्र दामोदरराव याचें संगोपन नीट करा, असा अखेरीचा संदेश देऊन त्यांनीं परलोकचा मार्ग धरला!

रामचंद्ररावांनीं जवळच गवताची गंज होती तींत तो परमपवित्र देह ठेवून त्यास अग्नि दिला! रामचंद्रराव देशमुख, रघुनाथसिंग, दासी काशी यांची मनःस्थिति या वेळीं काय झाली असेल याची कल्पना करण्यानेंहि अंतःकरण विदीर्ण झाल्याखेरीज राहाणार नाहीं!

भारतवर्ष पारतंत्र्याच्या अंधारांत लुप्त झाला असतां भारताच्या क्षितिजावर एक महान् तेजस्वी तारा चमकून गेला, तेव्हां क्षणमात्र त्यानें जगताचे नेत्र दिपवून टाकले! भारतांतहि स्वाभिमानाचा स्फुलिंग आहे. त्याला पाहिजे—तो प्रदीप्त करणारी अदमनीय आकांक्षा! एका महाराष्ट्रीय तरुणीनें, नाहीं जवळ सेनाभार, शस्त्रसंभार, कुशल रणगाजी,—पण अशाहि स्थितींत विजयानें उन्मत्त झालेल्या इंग्रजांना तिनें संभ्रमांत पाडून दिपवून टाकलें ही गोष्ट काय कमी महत्त्वाची आहे? आणि म्हणूनच ता. १८ जून १८५८ हा दिवस स्वातंत्र्याचा मंगल दिन म्हणून भारताच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं व चिरकालीन स्वरूपाचा म्हणून लिहिला जाईल!

अशा रीतीनें राणीसाहेबांनीं घोर युद्ध केलें. त्यांचा हेतु एक प्रकारें सफलच झाला. त्यांनीं आपला निश्चय तडीस नेला. देशांत असा एखादा वीर जन्माला आला तरी देशाचें भाग्य तो उजळतो. देशाचा हेतु जगापुढें मांडतो. राणीसाहेब म्हणजे सर्व सद्गुणांची खाणच होत! एक स्त्री

अवघ्या २२ वर्षांची, गुलाबपुष्पाप्रमाणें सुंदर व सुकुमार, अत्यंत चारित्र्य-संपन्न, पराकाष्ठेच्या संघटनाचतुर, त्यांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याचा वह्नि सारखा प्रज्वलित होता. त्याप्रमाणें युद्धांत सतत अग्रसर राहून आपल्या राष्ट्राच्या गौरवासाठीं त्यांनीं प्राणार्पणहि केलें! अशा प्रकारचें महिलारत्न देशांत उत्पन्न होणें हें त्या देशाचें परम भाग्यच होय! असें भाग्य कोणत्याहि देशाच्या–इंग्लडच्याहि नशिबीं आलेलें नाहीं. इतरत्रहि असा भाग्यसूर्य कोठें उदयाचलीं आलेला आढळत नाहीं.

अशा प्रकारचें रत्न परम भाग्यानें भारतांत निर्माण झालें! अग्नीपेक्षांहि तेजःपुंज, गंगादासबावाच्या कुटिरांतून प्रज्वलित झालेल्या ज्वालांतून तें तेज अद्यापिहि भारतवर्ष उज्ज्वलित करीत आहे! स्वातंत्र्ययुद्धामुळें हें रत्न जगापुढें आलें तरी! समुद्रगर्भात अनेक रत्नें असतात पण तीं पृष्ठावर तरंगत नसतात. त्यासाठीं सागरोदराचा ठाव घ्यावा लागतो. प्रतिकाराशिवाय तेज निर्माण होत नाहीं. अन्यायाच्या चिडीनें मन अस्वस्थ झालें पाहिजे. रक्ताचा बिंदु न् बिंदु उसळला पाहिजे. असंतोष हा उकळत्या भांड्याप्रमाणें, त्याला अन्यायाचा वन्हि मिळत गेला म्हणजे सारखा उकळत राहतो, आणि मग त्याच्या ज्वाला एकामागून एक सारख्या फोफावतात! व त्यांतून खरें तेज निर्माण होतें!!

१८५७ च्या युद्धानें हा खरा वन्हि भडकविला! त्यांत असत्यता नव्हती, आणि म्हणून त्याचा भयंकर, जगाच्या कानठळ्या बसवील असा स्फोट झाला! पाहा, त्याच्या ज्वाला कशा उसळत गेल्या त्या! मीरत येथें एक स्फुलिंग उत्पन्न झाला. दलहौसीच्या रुळाखालीं सर्व देश बेचिराख झालासा दिसला तरी त्याखालीं दारूचें कोठार होतें, व आकाशांत दारूचा बाण सोडला म्हणजे तो फुटून त्यापासून जसे अनेक स्फोट होतात तीच अवस्था या वेळींहि झाली. मिरत ते विंध्य, पेशावर ते डमडम—हा स्फोट एकदम झाला! दिल्लीचा वेढा, कानपूर, लखनौ येथें हजारों सैनिक प्राणत्यागास सिद्ध झाले! शेंकडों, हजारों, लक्षावधि सैनिक या महायज्ञांत सामील होतात. केवढा तो प्रचंड ज्वालामुखी!

आणि त्या ज्वालामुखीची अखेरची ज्योत बाबा गंगादासच्या कुटिरांतून जगाला जाहीर करीत गेली कीं– १८५७ चें युद्ध स्वातंत्र्यार्थ होतें!!!

---

## १४ : पुढील हकीकत

राणीसाहेबांना वीरोचित मृत्यु आला. त्या वेळीं त्यांजपाशीं त्यांचे दत्तक चिरंजीव दामोदरराव होते. मृत्युसमयीं राणीसाहेबांना बोलणें अशक्य झाल्यानें त्यांनीं दामोदररावाच्या तोंडावरून हात फिरविला, व रामचंद्ररावांस त्याचा प्रतिपाल करण्यास खुणेनें सांगून त्यांचा आत्मा कुडी सोडून गेला !

ज्या ठिकाणीं राणीसाहेबांनीं देह ठेविला तेथेंच त्यांचें दहन करण्यांत आलें. त्या जागीं तुळशीवृंदावन बांधण्यांत आलें असून त्यावर सुप्रसिद्ध कवि कै. भा. रा. ताम्बे यांनीं रचलेलीं स्तुतिसुमनें पुढीलप्रमाणें खोदलीं आहेत :—

"रे हिन्दबालका थाम्ब। या स्थळीं अश्रु दोन ढाळीं ॥
ताम्बे-कुल-वीर-स्त्री ती
नेवाळकरांची कीर्ती
हिंद-भू-ध्वजा जणुं जळती
मर्दांनी राणी लक्ष्मीबाई मूर्त महाकाली ॥

कडकडा कडाडे बिजली
शत्रूंचीं लष्करें थिजलीं
मग कीर्तीरूपें उरली
ती पराक्रमाची ज्योत मालवे इथें झांशीवाली ॥
गाती इथें शाहीर
लववितात माना वीर
तरु झरे ढाळितिल नीर
या दगडा फुटतिल जीभा कथाया कथा सर्वकालीं ॥

नंतर रामचंद्रराव देशमुख, रघुनाथसिंग, गणपतराव नांवाचा एक मराठा गृहस्थ, रिसालदार न्हनेखां, व दासी काशी यांसह तेथून प्रयाण केलें. तेव्हां-पासून दामोदररावांच्या वनवासास प्रारंभ झाला. ती हकीकत त्यांनीं आपल्या

आत्म-चरित्रांत दिलेली आहे. तिच्या आधारें माझे मित्र श्री. यशवन्त नरसिंह केळकर यांनीं ता. ३-४-३६ रोजीं केसरींत त्यांची थोडक्यांत करुण-कहाणी दिली आहे तीच पुढें देत आहें :—

माझा जन्म १५ नोव्हेंबर १८४९ सालीं झांशी येथें झाला. ज्या नेवाळकर घराण्यांत माझा जन्म झाला, तें घराणें झांशीच्या अधिपतींच्या नात्यापैकींच होतें. अगदीं लहानपणींच माझें जातक ज्योतिष्यांनीं वर्तविलें. तें असें कीं, मुलाला राजयोग नक्की आहे; तथापि तो योग अत्यंत कष्टतर ठरणार. दुर्दैवानें तें भविष्य तंतोतंत बरोबर ठरावयाचें होतें !

मी तीन वर्षांचा असतां झांशीच्या गंगाधरराव महाराजांनीं मला दत्तक घेतलें व इंग्रज सरकारची त्याला रीतसर परवानगी आणण्याकरितां त्यांनीं बुंदेलखंडच्या पोलिटिकल एजंटास खलिता पाठविला.

नंतर लवकरच गंगाधरराव महाराज वारले. त्यानंतर आमच्या मातोश्री महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांनीं दत्तविधानाला मान्यता आणण्यासाठीं बुंदेल-खंडच्या पोलिटिकल एजंटामार्फत बडे लाट लॉर्ड डलहौसीसाहेब यांना खलिता पाठविला. पण एवढ्या साध्या मागणीलाहि होकारार्थी पत्र आलें नाहीं.

दोन महिन्यांनंतर फिरून पोलिटिकल एजंटाची शिफारस घेऊन आणखी एक खलिता त्यांनीं कलकत्त्यास पाठवला. त्यांत गादीचा वारस म्हणून घेतलेला दत्तक सरकारनें मान्य करणें किती अगत्याचें आहे, माजी महाराज गंगाधरराव व त्यांचे बापजादे यांनीं इंग्रज सरकारशीं अखंड सलोखा व इमान कसें राखलें होतें व इंग्रज सरकारचा पाय कायम होण्याच्या आधींच्या स्थितींत अनेक आमिषें डोळ्यांपुढें दिसत असतांहि त्यांनीं इंग्रज सरकारचा पक्ष कसा सोडला नाहीं वगैरे पुष्कळच युक्तिवाद लिहिला होता.

पण हा खलिता पोंचण्याचे आदलेच दिवशीं माझें नशीब फुटलें होतें, कारण माझे गादीवरील सर्व वारसाहक्क जप्त होऊन मुलुख खालसा करावा व मातोश्रीसाहेबांना दरमहा पांच हजारांचें पेन्शन द्यावें असा ठराव इंग्रज सरकारनें तिकडे पास केला होता. आमच्या मातोश्रीनें मरेपर्यंत पेन्शन घेण्याचें निश्चयानें नाकारलें. पेन्शनखेरीज खाजगी मिळकत म्हणून मातोश्रींना पुढील बाबी देण्याचा ठराव झाला. सर्व जवाहीर, सोन्याचांदीची

मालमत्ता आणि राजवाडा. ही खाजगी मिळकत दत्तक म्हणून मला मिळावी, जहागीर मात्र मिळूं नये असें डलहौसीसाहेबानें ठरविलें. याखेरीज खजिन्यांत सात लाख रुपये होते ते इंग्रज सरकारनें मी वयांत येईपर्यंत ठेव म्हणून ठेवून घ्यावे असें ठरविलें. पुढें १८५४ सालीं वयाच्या पांचव्या वर्षीं माझी मुंज आईसाहेबांनीं केली. त्या वेळीं त्यांनीं सरकारांत अर्ज करून एक लाख रुपये खर्चास मागितले. पण सरकारनें त्या सात लाखांपैकींच दिले! मुंज आमच्या इतमामास शोभेल अशी मोठ्या डामडौलानेंच आईसाहेबांनीं केली.

पुढें १८५७ साल उजाडलें आणि तेथून आमच्या ग्रहदशेला सुरवात झाली. आमचा सारा मुलूख जप्तींत काढल्यामुळें आईसाहेबांनीं दंश धरलाच होता. त्यांतच तडजोडीच्या सर्व कारवाया निष्फळ ठरल्यामुळें अखेर त्यांनीं इंग्रज सरकारविरुद्ध जंग पुकारला. त्यांतच त्यांचा अंत झाला. मी लहानच होतों. पण लोक सांगतात कीं, आईसाहेबांनीं युद्धाच्या गर्दींत मला पाठीशीं बांधून बाळगिलें होतें. ग्वाल्हेरच्या लढाईत मातोश्री कामास आल्या, आणि मीं पोरका झालों!

मातोश्रींनीं वीरस्वर्ग पाहिला. त्यानंतर मी तीन दिवस ग्वाल्हेरांत होतों. मातोश्रींच्या विश्वासू लोकांपैकीं या वेळीं फक्त साठ इसमच शिल्लक राहिले होते. त्यांच्याजवळ बावीस घोडीं व सहा उंटें होतीं. नानेखा रिसालदार, गणपतराव नांवाचा मराठा, रघुनाथसिंग आणि रामचंद्रराव देशमुख यांनीं मला ताब्यांत घेतलें व ब्रिठूरच्या नानासाहेब पेशव्यांचा बंधु रावसाहेब यांच्यापासून फुटून ती मंडळी लपतछपत निर्मनुष्य जंगली घाट–खिंडींतून मला घेऊन चंदेरीच्या रोखें निघाली. वाटेनें क्वचित् गांवखेडीं लागत, पण आम्ही झांशीवालीचे लोक आहोंत, हें कळतांच ते आमच्या थाऱ्यासहि उभे राहात नसत, मग मदत करणें दूरच. कारण तसें करावें तर कंपनी सरकारची इतराजी होण्याची त्यांना सहजच भीति वाटे.

गांवखेड्यांच्या आश्रयास गुप्तपणेंहि राहणें अशक्य झाल्यामुळें अखेर आम्ही निर्मनुष्य वेत्रावती नदीच्या तीरीं गुप्तपणें जाऊन राहिलों. आम्हा-जवळ डेऱ्या–राहुट्या, पालपडताळ कांहींच नसल्यामुळें ते उन्हाळ्याचे गर्मीचे दिवस फारच कष्टांत काढले. उन्हाचा कडाका असह्य झाला म्हणजे

वन्य श्वापदांनीं भरलेल्या गर्द जंगलांत नाइलाजानें जाऊन पडावें असेंहि भाग झालें. खाण्यापिण्याचा कोठलाच जिन्नस जवळपास मिळण्याची सोय नसल्यामुळें केवळ फळामुळावरहि दिवस गुजरावे लागत. निसर्गानें तेवढी कृपा मात्र भरपूर केली. कारण वन्य फळांचा तेथें तोटा नव्हता. जंगलांतील स्थान सोडून जिन्नसपान्नस कोठें दूरच्या खेड्यांत जाऊन आणावयाचा तरी आमच्या नोकरांना मोठें संकट वाटे. कारण मुलखांत जिकडे तिकडे इंग्रज फौजा बंडखोरांचा पाठलाग करीत पसरल्या होत्या. यामुळें अगदीं नाइलाज झाला म्हणजे आमचे लोक जीव मुठींत धरून चोरीछपीनें एखाद्या गांवखेड्यांत जाऊन केव्हां थोडाबहुत जिन्नस आणीत. उन्हाळ्यापर्यंत असेंहि निभलें. पण पाऊसकाळ लागल्यावर आमची फारच वाईट स्थिति झाली. जंगलांतल्या सर्व वाटा पाण्यानें भरून बुजून गेल्या. यामुळें चार हात बाहेर फिरकण्याचीहि मुष्कील झाली. ते दिवस आम्ही कसे काढले असतील तें आमचें आम्हांसच ठाऊक. अखेर आमच्या दैवानें थोडीशी मेहेरनजर केली. आमची विलक्षण दैन्यावस्था पाहून एका खेड्याच्या पाटलाला द्रव आला व त्यानें होऊन आम्हांस असें सांगून पाठविलें कीं, तुम्ही झांशीवालीचे लोक आहांत खरे, पण इंग्रज सरकारची छावणी ललितपुरावर पडली आहे. व या खेड्यापर्यंत त्याची पायरव पडली आहे. म्हणून उघडपणें तुम्हांस मला कांहीं मदत करतां येणार नाहीं.' पण नजीकच्या जंगलांत अमुक अमुक जागीं तुम्ही येऊन राहा. म्हणजे मी मदत पोचवूं शकेन. आम्ही लगेच त्या ठिकाणीं जाऊन राहिलों, हें सांगणें नकोच. आमच्या टोळीचा नाईक रघुनाथसिंग असे. त्याच्या सांगण्यावरून या वेळीं आम्ही आमचा जमाव फोडला, व दहा-दहा बारा-बारा जणांच्या टोळ्या करून संकेतानें निरनिराळ्या ठिकाणीं फुटून राहूं लागलों. वर सांगितलेल्या गांवपाटलाशीं आमचा करार ठरला होता, तो असा—आम्ही पाटलाला दरमहा पांचशें रुपये द्यावे. तसेंच नऊ घोडीं व चार उंटेंहि द्यावीं. त्याच्या बदल्यांत त्यानें हरएक जिन्नस आम्हांस पुरवावा. व इंग्रज फौजेची बातमी राखून आम्हांस सावध करीत असावें. मी ज्या टोळींत राहिलों होतों तींत एकंदर ११ माणसें होतीं. रघुनाथसिंग, लक्ष्मण आचारी, बाळू गोडबोले, खटपट्या पोरगा आणि काशी नांवाची कुणबीण इतकी मंडळी माझ्या दिमतीस होती. रामचंद्रराव

देशमुख हे दुसऱ्या टोळींत निघून गेले. मला सोडतांना त्यांना फार वाईट वाटलें.

ठरल्याप्रमाणें आम्ही एका कड्यांत अवघड जागीं एक गुहा होती तींत जाऊन राहिलों. गुहेच्या खालीं वेत्रावती नदी होती. या जागीं एक महादेवाचें देऊळहि होतें. येथें कांहीं दिवस आम्ही क्रमिले. या ठिकाणीं वेत्रावती नदी अतिशय वेगानें वाहाते, व पुढें सुमारें पन्नास हातांवरून खालीं उडी घेते असें हें रम्य ठिकाण होतें. भोंवतालीं सर्वत्र तळीं तडागें असल्यामुळें आम्ही अक्षरशः एकान्तवास भोगीत होतों. हें ठिकाण अत्यंत रमणीय असल्यामुळें तेथें असतां आम्ही आमचीं दुःखेंहि कांहीं दिवस विसरून गेलों. या ठिकाणीं एक चमत्कार पाहाण्यास मिळाला तो सांगण्यासारखा आहे. आसपास जीं तळीं–तडागें होतीं त्यांत नेहमीं मासे मुळींच नसत, पण भाद्रपद महिना लागतांच तीं माशांनीं अगदीं भरून जात, आणि थोड्याच दिवसांत ते सर्व मासे मरून पाण्यावर तरंगू लागत. आणि भाद्रपद महिना सरतांच फिरून तेथें एकहि मासा दिसत नसे. आणखीहि दुसरा चमत्कार म्हणजे या ठिकाणापासून चारपांच मैलांवर सिद्धनाथ नांवाचा कडा म्हणून आहे, त्यावर एक टांकें होतें. तें हातभर लांबरुंद असेल नसेल. पण त्याचें पाणी मात्र केवळ अमृतोपम होतें. त्यांतलें पाणी पशांनीं उपसून कोरडें केलें तरी फिरून थोड्याच वेळांत तुडुंब भरून वाहूं लागे.

असो; अशा स्थितींत आम्ही २ वर्षें घालविलीं. जन्मापासून राजवैभवांत वाढलेल्या मला या काळांत किती कष्ट पडले असतील तें सांगावयास नको. तथापि प्रभूचीच इच्छा. शिवाय हीं गेलीं दोन वर्षें मी सतत आजारीच होतों. आणि अखेर भाद्रपद महिन्यांत तर माझी प्रकृति फारच बिघडली. इतकी कीं, माझ्या विश्वासु नोकर–चाकरांना मी दुखण्यांतून कसा उठतों अशी धास्ती वाटूं लागली. उघडपणें बाहेर मला कोठें नेऊन ठेवून औषधोपचार करण्याची सोयच नव्हती. म्हणून त्यांनीं फिरून आमच्या त्या पाटलाला गळ घालून माझ्या समाचारास आणलें. मी अत्यवस्थ होतों. माझी अवस्था पाहून त्याला कळवळा आला व त्यानें गुप्तपणें एक वैद्य मला औषधोपचार करण्यास पाठवून दिला. तो त्या पाटलाचा मामाच लागत होता.

थोडासा बरा होतों न होतों तोंच आणखी एक संकट उभें राहिलें, तें असें—आम्ही येतांना ७० हजार रुपये बरोबर घेतले होते. ते हा वेळ-पर्यंत बहुतेक खलास झाले होते. ह्यामुळें ठरावाप्रमाणें पाटलाला महिनेमहा रकम आमच्याकडून पोंचती होईनाशी झाली. त्याबरोबर त्यानें निष्ठुरपणें, आपल्या हद्दींतून बाडबिशाद घेऊन चालूं लागा म्हणून सांगितलें. करतां काय? मुक्कास्थानें उठून दुसरीकडे आसऱ्यास गेलों. आमच्या लोकांनीं आपल्या सामानापैकीं कांहीं विकून कसेबसे २०० रुपये उभे केले. ते देऊं करून त्या भुम्याला आमचीं घोडीं व उंटें परत दे म्हणून सांगितलें. पण त्या लुच्चयानें फक्त ३ च घोडीं परत दिलीं व बाकीचीं मेलीं म्हणून सांगितलें! नाइलाज होऊन तेवढींच सही असें समजून व त्याचेंच आभार मानून आम्ही त्यास नमस्कार केला. आतां आमचेजवळ फक्त १२ माणसें राहिलीं. आम्हीं प्रवास करीत शिप्री–कोलारसपासून तीनचार दिवसांच्या मजलीवर जाऊन पोहोंचलों. तेथें जात असतां पूर्वीं फुटून निघालेली दुसरी टोळी आम्हांस भेटली व एकंदर २४ असामी आम्हीं झालों.

शिप्री–कोलारस शिंद्यांच्या मुलुखांत होतें. तेथल्या गांव-कुलकर्ण्याला आम्ही बंडवाल्यापैकीं आहोंत असा संशय आला व त्यानें आम्हास पकडण्याचा घाट घातला. पण आमच्या रघुनाथसिंगानें धूर्तपणानें तें ओळखलें व त्याची कशीबशी समजूत पाडली. व नंतर लगेच आम्ही तेथून पाटणांतील छिपत–बडोदकडे निघालों. त्या गांवचा अधिकारी एक वाणी होता. आम्ही गांवांत जातांच त्यानें आम्हास गिरफदार केलें. तीन दिवस कच्च्या कैदेंत ठेवलें, नंतर चौकशी करून १० स्वार व २५ शिपाई असा बंदोबस्त देऊन त्यानें आम्हास पाटणाच्या पोलिटिकल एजंटाकडे रवाना केलें. आमचीं घोडीं मागेंच अडकवून ठेवण्यांत आल्यामुळें आम्हाला पायींच चालावें लागलें. पण माझे नोकर खरे इमानी व खाल्ल्या मिठाला जागणारे; त्यांनीं मला पाळीपाळीनें पाठीवर घ्यावें.

अगदीं प्रथम आम्ही ग्वाल्हेरीहून निघालों तेव्हां एकंदर ६० असामी होतों. पुढें दहादहा बाराबारा जणांच्या टोळ्या टोळ्या करून गेलों. त्या सर्व लोकांपैकीं बहुतेक सारे जण पाटणाचा संस्थानिक पृथ्वीसिंग याच्याकडे जाऊन नोकर राहिले होते. पाटणापासून जवळच आगर येथें इंग्रज

रेसिडेन्सी असून तेथें मेजर फ्लीक नांवाचा पोलिटिकल एजंट होता. तेथें गोऱ्या सैन्याची एक छावणीहि ठेवण्यांत आली होती. आमचा ग्वाल्हेरचा रिसालदार पाटणास येऊन नोकरीस राहिल्याचें मघाशींच सांगितलें. त्याच्या-वर एजंटसाहेबांची मर्जी होती. झांशीच्या राणीबद्दल जेव्हां जेव्हां बोलणें निघे तेव्हां तेव्हां तो मोठ्या शिताफीनें आमच्या हालाचें वर्णन करी. "राणीसाहेबांना ९-१० वर्षांचा छोटा मुलगा आहे. त्या रणांत पडल्यावर त्याची हलाखी कशी झाली, व इंग्रज सरकारच्या भीतीनें वन्य पशूप्रमाणें त्याला रानांत दडून कसे दिवस काढावे लागले—" वगैरे त्यानें सांगितलें. पुढें तो म्हणाला, "त्या अज्ञान बाळाकडे, बिचाऱ्याकडे काय दोष आहे? त्यानें इंग्रज सरकारचें काय घोडें मारलें आहे? त्याच्या विश्वासू नोकरांनीं त्याला जिवापलीकडे जपून लपवून ठेविला आहे. साहेब, त्या मर्द राणीच्या पोरक्या मुलाला स्वतः तुम्ही अभय द्याल तर सारा हिंदुस्थानचा दुवा मिळेल!"

मेजर फ्लीक दयाळू स्वभावाचा होता. शिवाय आमच्या मातोश्रीबद्दलहि त्याचें बरें मत होतें; म्हणून त्यानें नान्हेखाला माझें रक्षण करण्याचें आश्वासन देऊन इंदोरास मध्य हिंदुस्थानचा पोलिटिकल एजंट कर्नल सर रिचमंड शेक्स्पियर म्हणून होता, त्याजकडे एक खलिता पाठविला. त्याचें उत्तर आलें कीं, 'जर झांशीकरणीचा मुलगा शरण येऊन माझे स्वाधीन होईल तर मी त्याची व्यवस्था लावून देईन.' असें पत्र आल्यावर मेजर फ्लीकनें नान्हेखाला मला तिकडे घेऊन जाण्यास सांगितलें. बरोबर २ स्वारहि त्यानें रक्षणास दिले. वाटेंत बडोदें लागलें. तेथें गणपतराव येऊन राहिला होता. त्याची अचानक गांठ पडली. माझी ती विपन्न दशा पाहून त्या म्हाताऱ्याच्या डोळ्यांतून खळखळ अश्रु वाहूं लागले. बडोदच्या कमाविसदारानें आम्हांस इंग्रज घोडेस्वारांच्या हवालीं केलें.

तेथून आम्ही पाटणास निघालों. रघुनाथसिंग व गणपतराव यांनीं पाटणेकर राजा पृथ्वीसिंग यांची मुलाखत करून दिली. त्याला आईसाहेबां-बद्दल फार आदर असल्यामुळें त्यानें मला फार इतमामानें वागविलें व दररोज १० रुपये खर्चास देऊं केले. पोलिटिकल एजंटामार्फत खटपट करून आपण तुम्हांस चांगलें स्वास्थ्य करून देण्यास अजमीरच्या रेसिडेंटास

सांगू असेंहि तो म्हणाला. पण आम्हांस ब्रिटिश बंदोबस्ताखालीं आगरास जावयाचें असल्यामुळें तें आम्ही कबूल केलें नाहीं. यामुळें तो नाखुष झाला. तथापि आमच्या ब्रिटिश बदरक्यासुद्धां त्यानें आम्हास पाटण्यापासून २ मैलांवर मधीन येथें तीन महिने ठेवलें. तेथें आम्ही चैनींत होतों. पण ही बातमी फुटून इंग्रज अधिकाऱ्यांनीं अजमेरच्या एजंटाला चौकशी करण्यास लिहिलें. तीन महिने पृथ्वीसिंग व रेसिडेंट यांच्यांत सवाल-जबाब होत होते. पण शेवटीं पृथ्वीसिंगाला नमतें घ्यावें लागून त्यानें आम्हास आगरचे छावणीकडे रवाना करून दिलें. त्या वेळीं मोठ्या उदारपणानें त्यानें रोख ६०० रुपये व भारदाहीकरितां गाडे व उंटें दिलीं. या त्याच्या कृपेमुळेंच सुखरूप पोंचलों. तेथें एजंटसाहेबांनींहि आम्हांस मानमरातबानें वागविलें. एजंटसाहेबांची दरबारी पद्धतीनें भेट घ्यावयाचें ठरलें. पण त्या वेळीं आमचेजवळ कांहींच पैका नव्हता म्हणून रघुनाथ-सिंगानें दोन सोन्याचीं कडीं ३२ तोळ्यांचीं राहिलीं होतीं तीं मोडून विकलीं! ह्याच मुक्कामीं रामचंद्रराव देशमुखहि आमचे ७-८ घोडे व नोकरलोक घेऊन येऊन मिळाला. रामचंद्रराव, गणपतराव व रघुनाथसिंग यांनीं माझी सारी अवस्था हृदयद्रावक रीतीनें कथन करून एजंटसाहेबांचा अनुकूल ग्रह उत्पन्न केला. पण झांशीचा मुल्ख त्याच्या अमलांतला नव्हता. फिरून आम्हांस मध्यप्रान्ताच्या पोलिटिकल एजंटाकडे पाठविण्यांत आलें. आम्ही त्याप्रमाणें ५ मे १८६० रोजीं इंदोर छावणींत पोहोंचलों! तेथें कर्नल सर रिचमंडची मुलाखत झाली. मुनशी धर्मनारायण नांवाचा एक काश्मिरी ब्राह्मण त्याचा दुय्यम अधिकारी होता. त्याच्या हवालीं मला केलें. त्यानें फक्त ५ नोकर ठेवून बाकीच्या सर्वांस रजा देण्यास भाग पाडलें. थोडे दिवसांनीं माझ्यासंबंधीं एजंटसाहेबांनीं वर लिहिलें व मला दीडशें रुपये तैनात मिळावी असा ठराव करून आणला. त्या वेळीं आम्ही लहान अज्ञानच होतों व जवळ कोणी मुत्सद्दी वगैरेहि नव्हता. म्हणून एजंटानें केलेल्या ठरावाला मी मुकाट्यानें मान्यता दिली!"

वर सांगितल्याप्रमाणें श्री. दामोदरराव इंदूर येथें राहिले. तेथें ते वयांत आल्यावर त्यांनीं आपली मिळकत सरकारी खजिन्यांतील सहा लक्ष रुपये व इतर खासगी मिळकत परत मिळावी म्हणून अनेक प्रकारें खटपट केली. परंतु कोंबड्यानें गिळलेल्या माणकाप्रमाणेंच त्यांच्या विनंतीचा

कांहींहि उपयोग झाला नाहीं. फक्त त्यांना मिळत असलेले रु. १५० पेनशन २०० रु. करण्यांत आलें व कर्जफेडीसाठीं दहा हजार रुपये देण्यांत आले. त्यांचा विवाह त्यांच्या चुलतीनें केला. त्यालाहि सरकारनें कांहीं साहाय्य केलें नाहीं. आपल्या दुर्दैवाला हात लावून ते इंदूर येथें राहात असतां त्यांचें देहावसान झालें!

पुढें त्यांचे चिरंजीव म्हणजे राणीसाहेबांचे नातु हे आपत्तींत सांपडले तेव्हां त्यांनीं आपली कांहीं दाद लावण्यासाठीं लो. ना. अणे यांनीं ता. १०-३-३६ रोजीं मध्यवर्ति विधिमंडळांत झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांच्या वंशजासंबंधीं पुढीलप्रमाणें प्रश्न विचारला होता, "झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांचा नातु हलाखींत दिवस कंठीत आहे, तरी सरकार त्याची स्थिति सुधारण्यास मदत करील काय?" त्याला पुढीलप्रमाणें निराशाजनक उत्तर मिळालें,—

उत्तर:– १८५७ च्या बंडामध्यें झांशीच्या राज्यकर्त्यांची सारी खाजगी मिळकत जप्त करण्यांत आली आहे. दामोदररावांनीं सहा लाख रुपये येणें असल्याचा हक्क सांगितला होता. पण तो १८८१ सालींच फेटाळण्यांत आला. आतां कांहीं तो प्रश्न उपस्थित होत नाहीं.

अशा रीतीनें सरकारनें या प्रकरणाची वासलात लावली! परंतु राणीसाहेबांचे वंशज म्हणून त्यांच्याबद्दल योग्यता, आदर प्रत्येक महाराष्ट्रीयास वाटेल हें निर्विवाद आहे!

## महाराणीसाहेबांचे दत्तक पुत्र कै. दामोदरराव यांचा

# वंशवृक्ष

- दामोदरराव ( मयत इंदूर येथें )
  - लक्ष्मणराव
    - कृष्णराव
      - मनोहर
      - अरुण
    - चंद्रकान्त (विद्याभ्यास करीत आहेत)

श्री. लक्ष्मणराव यांना दरमहा शंभर रुपये पेन्शन मिळत असून त्यांचे चिरंजीव कृष्णराव हे तेथें गिरणीत नोकर आहेत.

---

# राणीसाहेबांबद्दल परस्थांचे उद्गार

शत्रूनेंहि गुण गावे अशी योग्यता महाराणीसाहेबांची होती. त्यांच्याबद्दल **सर ह्यू रोज** म्हणतो :—

" राणीसाहेब अत्युच्च कुलोत्पन्न होत्या. त्यांच्या औदार्याला अंत नव्हता. त्यामुळें त्यांचे आश्रित व सैनिक त्यांजवर सदैव प्रसन्न असत. तशांत त्या धैर्यराशी असल्यामुळें या लढ्याला भयंकर स्वरूप आलें. "

राणीसाहेबांच्या मृत्यूबद्दल ऐकतांच रोजनें उद्गार काढले :—

" ग्वाल्हेरच्या युद्धाचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे महाराणी लक्ष्मीबाई-साहेब यांचा मृत्यु! जातीनें स्त्री असूनहि प्रतिपक्ष्याकडील अति शूर व उत्कृष्ट सेनानी त्याच होत्या!"

**डॉ. लो** ( सेंट्रल इंडिया, पृ. ३०१ ) म्हणतो :—

" शत्रूबरोबरच्या युद्धांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे जिवावर उदार झालेल्या वीरांपासून ग्वाल्हेर परत घेणें ही होती. या युद्धांत अत्यंत दृढनिश्चयाचा, तेजस्वी व प्रबल सेनानी म्हणजे महाराणी लक्ष्मीबाई या असून त्या युद्धांत पतन पावल्या!"

**मि. मार्टिन** ( इंडियन एम्पायर, पृ. ३०३ ) म्हणतो :—

" राणीसाहेब तारुण्याच्या ऐन भरांत असून अत्यंत सुंदर होत्या. त्या मनानें उत्साहपूर्ण आणि शरीरानें बलवान् होत्या. प्राण गेला तरी हरकत नाहीं, परंतु मानहानी होऊं देणार नाहीं, हा रजपुतांचा बाणा त्यांच्या अंगीं पुरा बाणला होता."

**सर एड्विन अर्नोल्ड** :—

" जी स्त्री राज्यकारभार चालविण्यास असमर्थ आहे असें म्हणून तिचें राज्य आम्हीं खालसा केलें, तीच स्त्री एका प्रचंड सैन्याचें आधिपत्य स्वीकारण्यास समर्थ आहे ही गोष्ट आतां आम्हांस उमगली!"

**मि. टॉरेन्स** ( एम्पायर इन् एशिया, पृ. ३७६ ):—

" स. १८५७ मध्यें क्रान्तियुद्धाची नौबत झडूं लागतांच राणीसाहेब घोड्यावर स्वार होऊन आपल्या पुरुषी वेषांत हजारों सैनिकांच्या नेत्या बनल्या व आपल्या वीरकृत्यांनीं त्या जोन ऑफ आर्क बनल्या! सर ह्यू रोजच्या सैन्याची तिरपीट यांच्याइतकी कोणीच उडविली नाहीं. तुमुल व निकराच्या युद्धामध्येंहि अनेक तास घनघोर युद्ध झालें तरी राणीसाहेब कधीं विन्मुख झालेल्या नाहींत!"

**जस्टिन मॅकॉर्थी** ( हिस्टरी ऑफ अवर ओन टाइम्स, पृ. १११ ):—

" अखेरपर्यन्त रणांगणावर झुंजणारांत झांशीच्या राणीसाहेब या होत्या. यांचा मुलूख खालसा करण्यांत आला होता. क्रान्तियुद्धांत त्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें होतें. नानासाहेब व तात्या टोपी यांच्या त्या सहकारी होत्या. दिल्लीचा पाडाव झाल्यानंतर कित्येक महिने त्यांनीं सर ह्यू रोज व इंग्रज सैन्याला पाणी पाजलें! त्या स्वतः रणक्षेत्रावर सैन्य नेत, व स्वतः युद्ध करीत. ग्वाल्हेरच्या युद्धांत त्यांचा आमच्या सैन्याशीं सामना झाला. त्या वेळीं त्या घोडेस्वार असून हल्यावर हल्ले त्यांनीं चढविले, व अखेर झुंजतां झुंजतां त्यांनीं रणांगणावर देह ठेवला! सर ह्यू रोज यांनींहि राणीसाहेबांबद्दल आदरोद्गार काढले!"

---

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ९७२० नों दि ........
वि. ...का. ली... क्र. ........

संग्रहालय,
अनुक्रम
क्रमांक
नों. दि.

# आधारभूत ग्रंथांची यादी

१. राजवाडे, खंड ६.
२. राजवाडे, खंड ९.
३. भारतवर्ष ( बुंदेले कैफियत ).
४. रियासत ( सरदेसाई ) मध्यविभाग, भाग १-२.
५. स्टोरी ऑफ सातारा.
६. वाड-तह-करार.
७. सह्याद्रि अंक–थोरले बाजीराव, मे १९४०.
८. माझा प्रवास, गोडशे.
९. ज्ञानकोश, भाग १३-१४-१८.
१०. रा. ब. पारसनीसकृत महाराणी लक्ष्मीबाईसाहेब चरित्र.
11. Rise of the Christian power in India.
12. Kay-History of the sepoy war.
13. Central India, Dr. Low.
14. Indian Empire by Torrence.
15. Malleson's History of the Indian Mutiny.

# याच लेखकाचीं —

## प्रकाशित व आगामी पुस्तकें

*प्रकाशित —*

निकोलाय लेनिन

स्वातंत्र्यदीप

सुभाषचंद्र बोस

पं. जवाहरलाल नेहरू

पं. मालवीयजी

श्री. नारायणमहाराज

इंग्रजांनीं हिंदुस्थान कसा घेतला? (पूर्वार्ध)

हिंदुमहासभेचा इतिहास

भारतभ्रमण

*आगामी —*

इंग्रजांनीं हिंदुस्थान कसा घेतला? (उत्तरार्ध)

हृदयोर्मि

अनुक्रमांक ........
विभाग ........
........
क्रमांक
नों. दि. ........
...मालय शाखा

# आमचें चरित्र - वाङ्मय

| | | रु. आ. |
|---|---|---|
| कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर | .... | १— ८ |
| ना. गो. कृ. गोखले .... | .... | १— ० |
| लोकहितवादी .... | .... | १— ० |
| पं. मोतीलाल नेहरू .... | .... | ०— ८ |
| पं. जवाहरलाल नेहरू .... | .... | ०—१२ |
| वीर वल्लभभाई पटेल .... | .... | ०— ४ |
| दादाभाई नौरोजी .... | .... | ०— ३ |
| महादेवभाई देसाई .... | .... | ०— ५ |
| पं. मालवीयजी .... | .... | ०—१२ |

याशिवाय आपणांस पाहिजे असलेल्या कोणत्याहि पुस्तकासाठीं आम्हांसच प्रथम लिहा.

चित्रशाळा प्रेस, .... प्रकाशन विभाग, .... पुणें २

IRBK-0109121

IRBK-0109121

## आमचीं नवीं प्रकाशनें

| | | रु. आ. |
|---|---|---|
| गीताञ्जलि | त्र्यं. र. देवगिरीकर | ३ – ८ |
| अल्पसंख्यांक? | ,, | २ – ८ |
| घटनापरिषद | ,, | २ – ० |
| सोव्हिएट राष्ट्रं व लोक | दि. के. बेडेकर | ० – १० |
| आपलें राष्ट्रीय सरकार | रा. वि. पाटणकर | १ – ४ |
| स्वातंत्र्यासाठीं आत्मयज्ञ | शि. म. परांजपे | ० – १२ |
| ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला? | ,, | १ – ० |
| अमोल गोष्टी | साने गुरुजी | १ – ८ |
| कम्युनिस्टांचा देशद्रोह | डॉ. तेंडुलकर | ० – १२ |

आजच मागणी करा!

**चित्रशाळा प्रेस, .... प्रकाशन विभाग, .... पुणें २**